# साहित्य संघाची पन्नास वर्षे

# साहित्य संघाची पन्नास वर्षे

एकोणिसशे पस्तीस ते एकोणिसशे पंचाऐंशी

लेखन व संकलन : शं० ना० अंधृटकर

प्रकाशन :
२७ ऑक्टोबर १९८५
सुवर्ण महोत्सव संघदिन

किंमत पंचवीस रुपये

प्रकाशक :
दाजी भाटवडेकर
प्रमुख कार्यवाह
मुंबई मराठी साहित्य संघ
डॉ. भालेराव मार्ग, मुंबई
४०० ००४

मुद्रक :
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई
४०० ००४

सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने मुंबई मराठी साहित्य संघाचा पन्नास वर्षांचा इतिहास लिहून प्रसिद्ध करावा असे नियामक मंडळाने ठरविले. हे काम संघाचे सन १९४१ पासूनचे जुने कार्यकर्ते व माजी कार्यवाह श्री० शं० ना० अंधृटकर यांच्यावर सोपविण्यात आले. संघाचा समग्र तपशीलवार इतिहास (सुमारे ५००-६०० पृष्ठांचा) लिहिण्यासाठी अधिक कालावधिची आवश्यकता असल्याने तो इतिहास या वेळेस प्रसिद्ध करणे अवघड होईल असे दिसून आल्यावर तूर्त निदान ५० वर्षातील ठळक ठळक घटना व वैशिष्ट्यपूर्ण कार्याचा धावता आढावा प्रसिद्ध करावा असे ठरले. या नुसार कामास प्रारंभ करुन श्री अंधृटकर यांनी हा मजकूर तयार केला. या शिवाय परिशिष्टांच्या स्वरूपात संमेलने, संघ दिन, विविध व्याख्यान माला, संघाचे नाटककार व नाटके, नाट्य दिग्दर्शक, नाट्योत्सव, अमृत नाट्य भारती, वाङ्मयीन वर्गाचे अध्यापक, अमराठी भाषिकांसाठीच्या वर्गाचे अध्यापक, साहित्य संघाचे विश्वस्त, पदाधिकारी, कार्यकारी मंडळाचे सदस्य, नियामक मंडळाचे सदस्य यांची जंत्री देऊन थोडक्यात संघ कार्याचा तपशील देण्यात आला आहे. या पुस्तिकेमुळे ५० वर्षातील संघाचे कार्य संक्षिप्तस्वरूपात का होईना जनतेसमोर मांडता आले या बद्दल आनंद वाटतो. समग्र इतिहासाचा विचार सोडला नाही; तर योग्य कालावधी घेऊन तो प्रसिद्ध करावयाचा आहेच. त्यासाठी आपणा सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता आहे.

स्मरणिकेत प्रसिद्ध केलेली स्मृतीचित्रेही मुद्दाम भावनांचे गहिरे रंग भरावे या हेतूने या संग्रहात समाविष्ट केली आहेत. ह्या आठवणी देणाऱ्या सर्व संघ संबंधितांचे आम्ही आभारी आहोत. परिशिष्टे तयार करण्यासाठी प्रा. डॉ. भीमराव कुळकर्णी व श्री. गोविंद करमरकर व त्यांचे सहकारी यांनी बहुमोल मदत केली या बद्दल धन्यवाद.

लेखनासाठी आवश्यक कालावधी न मिळाल्याने अगर अनवधानामुळे काही नोंदी राहिल्या असल्यास त्या बद्दलची दिलगिरी आधीच व्यक्त करतो.

मौज प्रिंटिंग ब्यूरोचे श्री. भागवत यांच्या सहकार्यामुळेच हे पुस्तक सुवर्णमहोत्सव संघ दिनी प्रसिद्ध करणे शक्य झाले याची जाणीव आम्हास आहे. कै. विष्णुपंत भागवत हे आमचे जिनींचे कार्यकर्ते होते. त्यांची परंपरा भागवतांनी चालू ठेविली याचा आनंद व्यक्त करणे आवश्यक आहे. मौजेने मनावर घेतले नसते तर...... सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद.

**दाजी भाटवडेकर**
प्रमुख कार्यवाह
मुंबई मराठी साहित्य संघ

मुंबई, २७ ऑक्टोबर १९८५
कोजागिरी पौर्णिमा, शके १९०७

# अंतरंग


| | |
|---|---|
| साहित्य संघाची सांस्कृतिक सरिता | |
| उगम आणि विकास | १–६० |
| परिशिष्टे | |
| मुंबई व उपनगर साहित्य संमेलने | ६१ |
| अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने | ६१ |
| अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन | ६१ |
| संघ दिन महनीय प्रवक्ते | ६२ |
| कै. वामन मल्हार जोशी स्मारक व्याख्यानमाला | ६३ |
| कै. डॉ. अ. ना. भालेराव स्मारक व्याख्यानमाला | ६४ |
| कै. हरि नारायण आपटे स्मारक व्याख्यानमाला | ६५ |
| कै. अण्णा मार्तंड जोशी स्मारक व्याख्यानमाला | ६५ |
| कै. नाथमाधव स्मारक व्याख्यानमाला | ६५ |
| कै. लालजी पेंडसे स्मारक व्याख्यानमाला | ६६ |
| कै. वि. स. खांडेकर स्मारक व्याख्यानमाला | ६६ |
| कै. ल. ग. जोग स्मारक व्याख्यानमाला | ६७ |
| व्याख्याने, परिसंवाद, चर्चा १९४२ ते १९८५ | ६८ ते ९७ |
| नाट्योत्सव | ९७ |
| अमृत नाट्य भारती | १०० |
| साहित्य संघाचे नाटककार आणि नाटके | १०० |
| मुंबई मराठी साहित्य संघाचे नाट्य दिग्दर्शक | १०४ |
| संघाचे विश्वस्त, पदाधिकारी | १०७ |
| कार्यकारी मंडळ | १०८ |
| नियामक मंडळ | ११० |
| वाङ्मयीन परीक्षा वर्गाचे अध्यापक | १११ |
| रशियन भाषावर्ग अध्यापक | ११३ |
| अमराठी भाषिकासाठी मराठीचे वर्ग अध्यापक | ११३ |
| प्रकाशने | ११४ |
| संघास साहाय्य करणाऱ्या संस्था | ११५ |
| सन्माननीय सदस्य | ११७ |
| स्मृतिचित्रे | ११९ ते १७५ |



डॉ० अमृत नारायण भालेराव

जन्म : १२ डिसेंबर १९०२ मृत्यू : २५ ऑगस्ट १९५५

हें सारस्वताचें गोड। तुम्हीं चि लाविलें जी झाड।
तरि अवधानामृतें वाड। सिंपौनि की जो॥
मग हे रसभावफुली फुलैल। नाना फळभारें भरैल।
तुमचेनि प्रसादें होईल। उपयोगु जगा॥

—ज्ञानेश्वरी : ११ वा अध्याय

# साहित्य संघाची सांस्कृतिक सरिता
# उगम आणि विकास

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी इ. स. १८७८ मध्यें मराठी ग्रंथकारांची पहिली सभा पुण्यास बोलाविली होती असा उल्लेख कै. न. र. फाटक यांच्या रानडे चरित्रात शोधपूर्वक नमूद केला आहे. म्हणजेच मराठी ग्रंथकारांच्या संमेलनाची सुरुवात खऱ्या अर्थाने १८७८ साली झाली असे दिसते परतु यात सातत्य राहू शकले नाही हेही विसरता येत नाही. पुन्हा १८८५ साली मे महिन्यात पुण्यासच ही ग्रंथकारांची सभा भरली होती. पुन्हा सातत्य न राहिल्याने १९०५ पर्यंत लेखक मंडळी जमली नाहीत. १९०५ साली मात्र मंडळी साताऱ्यास जमली आणि त्यालाच पहिले संमेलन म्हणू लागली.

१९१२ साली अकोल्यास भरलेल्या संमेलनाने जी घटना निर्माण केली त्यानुसार परिषदेचे स्थायी कार्यालय मुंबई शहरात आले. १९१२ ते १९३२ पर्यंत हे कार्यालय मुंबईत होते पण अपेक्षेनुसार कार्य होत नव्हते. १९३२ साली कोल्हापूरास झालेल्या संमेलनातील ठरावानुसार परिषदेचे कार्यालय पुण्यास हलविण्यात आले. आणि त्यामुळेच मराठी भाषा आणि साहित्य यांच्यासाठी प्रयत्नशील असणारी संस्था-महाराष्ट्र साहित्य परिषद मुंबईहून पुण्यास गेल्याने मुंबईत संस्था उरली नाही व त्यामुळे एक मोठी पोकळी निर्माण झाली असे अनेकास वाटू लागले असावे असे वाटते. मुंबईतील महाराष्ट्रीय समाजाला एकत्र आणणारी कोणती गोष्ट असेल तर मराठी भाषेवरील त्यांचे प्रेम हीच होय. त्यामुळेच एकत्रितपणे मराठी भाषेसाठी काम करण्याचा मार्ग परिषदेच्या

स्थानांतरामुळे नाहीसा झाला होता असे म्हणणे वावगे ठरू नये.

परिषदेच्या स्थानांतरामुळे अनेकांना जरी वाईट वाटत असले तरी त्या पैकी परिषदेचे जे कार्यकर्ते होते त्यांना आपण मुंबईसाठी स्वतंत्र संस्था काढून परिषदेशी द्रोह करावा असे न वाटणे साहजिकच होते व त्यामुळेच एप्रिल १९३४ पर्यंत तरी स्वतंत्र संस्था स्थापन करण्याचे प्रयत्न कार्यकर्त्यांनी केले नसावेत असे वाटते.

अशा वेळी मुंबईचे नुकतेच रहिवासी झालेल्या कै० रा० सा० र० लु० जोशी (भगूरकर) व श्री० गो० गो० अधिकारी या मित्रांना अशा संस्थेची निकड तीव्रतेने जाणवू लागली व त्यांनी अशी संस्था काढण्यासंबंधीचा विचारविनिमय करण्यासाठी दि० २९ एप्रिल १९३४ रोजी मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या ठाकुरद्वार येथील सभागृहात कै० दामोदर सावळाराम यंदे–मुंबईतील त्या काळातील एक प्रमुख प्रकाशक व वृत्तपत्र–कर्ते यांच्या अध्यक्षतेखाली एक अनौपचारिक सभा बोलाविली. या सभेस मुंबईतील या क्षेत्रात रस असणाऱ्या किमान ७५ व्यक्ती उपस्थित होत्या. या सभेत विचारविनिमयानंतर मुंबई मराठी साहित्य संमेलन या नावाने एक साहित्य संमेलन मुंबईत भरविण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. या नंतर विविध व्यक्ती व संस्था यांना निमंत्रणे पाठवून दि० १३ मे १९३४ रोजी कै० त्र्यं० शं० शेजवलकर यांच्या अध्यक्षतेखाली पूर्ण प्रातिनिधिक स्वरूपाची जाहीर सभा घेण्यासाठी एक तात्पुरते कार्यकारी मंडळ नेमण्याचा निर्णय घेण्यात आला. या कार्यकारी मंडळाच्या नेमणुकीने या कामास मोठीच गती मिळाली.

ह्या तात्पुरत्या कार्यकारी मंडळाने दि. ३ जून १९३४ रोजी श्री. पु. रा. लेले यांच्या अध्यक्षतेखाली एक सभा घेऊन "मुंबई मराठी साहित्य संमेलन १९३४" या नावाने साहित्यप्रेमी लोकांचे एक संमेलन भरविण्याचा निर्णय कायम करण्यात येऊन पंधरा लोकांचे एक कार्यकारी मंडळ स्थापन केले. या कार्यकारी मंडळाने आपल्यातील श्री० पु० रा० लेले, श्रीमती शांताबाई कशाळकर, डॉ० अ० ना० भालेराव व श्री० दि० वि० आमोणकर यांची अनुक्रमे अध्यक्ष, उपाध्यक्ष व संयुक्त चिटणीस म्हणून निवड केली. यानंतर कार्यासंबंधी विचार विनिमय होत असता कार्यकारी मंडळात कार्याच्या स्वरूपासंबंधी तीव्र मतभेद असल्याचे दिसून आले. या मतभेदापायीच अध्यक्ष श्री० पु० रा० लेले, श्री० मामा वरेरकर व अन्य पाच सहकारी यांनी आपल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदत्वाचे राजिनामे सादर केले. कार्यारंभीच मोठा अडथळा निर्माण झाला परंतु इतरांनी हे राजिनामे सखेद स्वीकारून त्यांच्या जागी अन्य सभासद नियुक्त केले. याच नियुक्तीचा परिणाम म्हणजे अध्यक्ष म्हणून श्री० पु० रा० लेले यांच्या ऐवजी प्राचार्य अ० वा० गजेन्द्रगडकर यांची नियुक्ती केली व कामास नेटाने प्रारंभ केला. या मतमतांतराची वादळे त्या काळच्या वृत्तपत्रातून मुद्रित होत होतीच व त्याचे मुंबईकर व महाराष्ट्रातील अन्य ठिकाणी असणारी साहित्यप्रेमी मंडळी मोठ्या चवीने चर्वितचर्वण करीत असत असे अजूनही काही जणांच्या आठवणीत आहे व ते इतरांना ही गोष्ट

खुलवून सांगत असतात. फूट पडली पण कार्य थांबले नाही हेही नसे थोडके.

कार्यकारी सदस्यांनी व पोटसमित्यांच्या सदस्यांनी मुंबईतील अनेक साहित्य प्रेमींचे सहकार्य संपादन केले व संमेलनाच्या पूर्व तयारीचे विकट काम पार पाडले. या कार्यकर्त्यांच्या काहीजणांच्या नुसत्या नामनिर्देशीची नोंद ध्यानी घेतली तरी त्या वेळच्या मुंबापुरीतील मराठी समाजातील बहुतेक प्रमुख व्यक्ती या कामात अहमहमिकेने भाग घेत होत्या असे प्रत्ययास येईल.

नामदार श्री० मु० रा० जयकर, नामदार श्री० भास्करराव जाधव, प्राचार्य ले० कं० अ० बा० गजेन्द्रगडकर, श्री० दत्तो अप्पाजी तुळजापूरकर, प्रा० मा० दा० आळतेकर, प्रा० कृ० पां० कुलकर्णी, प्रा० द० के० केळकर, डॉ० सुकथनकर, प्रा० वि० ह० कुलकर्णी, श्री० श्री० म० वर्दे, श्री० अनंत हरि गद्रे, श्री० ना० के० भागवत, प्रा० वा० ल० कुलकर्णी, प्रा० अनंत काणेकर, श्री० र० धों० कर्वे, श्री० य० कृ० खाडिलकर, श्री० महाशब्दे, श्री० के० रा० पुरोहित, श्री० लालजी पेंडसे, श्री० अप्पा पेंडसे, श्री० का० म० ताम्हनकर, प्रा० वा० दा० गोखले, श्री० भा० रा० धुरंधर, श्री० खंडेराव सुळे, श्री० रामराव विजयकर, श्री० स० वि० राव, श्री० प्रभाकर पाध्ये, श्री० चं० वि० बावडेकर, श्री० न० रा० पारसनीस, श्री० वसंतराव मराठे, श्री० रमेश नाडकर्णी, श्री० श्री० रा० टिकेकर, श्री० वा० वि० भट, श्री० प्रभाकर गुप्ते, श्रीमती शांताबाई कशाळकर, श्रीमती शांताबाई दौंडकर, श्रीमती फिरोज आनंदकर, श्री० वामनराव ढवळे, श्री० दि० वि० आमोणकर आणि डॉ० अमृत नारायण भालेराव. जीवनाच्या विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने तळपणाऱ्या या सर्वांच्या ठायी एक तीव्र भावना होती ती म्हणजे या महानगरीत मराठी साहित्याचा आणि संस्कृतीचा उदो उदो व्हावा हीच. आणि त्याचसाठी साऱ्यांनी हे 'मुंबई मराठी साहित्य संमेलन १९३४' यशस्वी करण्याचा चंग बांधला होता. संमेलनाची कार्यवाही सुनियंत्रितपणे व्हावी म्हणून अनेक समित्या व पोट समित्या निवडण्यात आल्या. या समित्यांनी विविध व्यक्तींचे सहकार्य मिळवून पूर्व तयारीचे काम पूर्ण केले.

'मुंबई मराठी साहित्य संमेलन १९३४'चे पहिले अधिवेशन दि० ६ व ७ आक्टोबर १९३४ रोजी मुझफराबाद हॉल येथे भरविण्यात आले. संमेलनाचे अध्यक्ष म्हणून कै० गुरुवर्य कृ० अ० केळुस्कर यांना नियोजित केले होते. स्वागताध्यक्ष म्हणून संमेलन समितीचे अध्यक्ष कै० ले० क० अश्वथ्यामाचार्य बाळाचार्य गजेन्द्रगडकर यांची योजना झाली होती.

आपल्या स्वागताध्यक्षीय भाषणात संमेलन भरविण्यामागील हेतू विशद करताना त्यांनी पुढील प्रमाणे सांगितले. "या संमेलनाचा दुसरा हेतू असा आहे की मुंबई व उपनगरे यांकरिता एका मध्यवर्ती साहित्य विषयक संस्थेची स्थापना करावी. कार्यकारी मंडळाने याविषयी एक योजना तयार केली आहे. ती योग्य वेळी आपल्या पसंतीकरता आपणापुढे

मांडली जाईल. जर या साहित्य संमेलनाने अशा प्रकारच्या मध्यवर्ती साहित्य संस्थेची स्थापना केली तर एक मोठेच काम केल्यासारखे होईल यात शंका नाही."

संमेलनाचे अध्यक्ष गुरुवर्य केळूस्कर यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांचे अध्यक्षीय भाषण वाचून दाखविण्यात आले. या संमेलनात एकूण तीस ठराव संमत करण्यात आले. दिवंगत साहित्य सेवकांना श्रद्धांजली अर्पण केल्यानंतर संमेलनाने पहिला ठराव पुढीलप्रमाणे केला :

"या संमेलनाचे ठराव अंमलात आणण्याच्या योग्य उपायांची योजना करण्यासाठी व १९३५ सालापासून होता होईल तो दरसाल मुंबई (शहर व उपनगर) येथे साहित्य संमेलन भरविण्यासाठी हे संमेलन पुढील कमिटी नेमीत आहे. या कमिटीने मुंबई शहर व उपनगर यांतील वाङ्मय संस्थांशी विचार विनिमय करून त्यांच्या प्रतिनिधींच्या सहकार्याने मध्यवर्ती संस्थेची घटना होता होईल तो या सालच्या डिसेंबर महिन्याच्या अखेरीपर्यंत तयार करावी व १९३५ सालच्या जानेवारी महिन्यात या संमेलनाच्या व वाङ्मय संस्थांच्या प्रतिनिधींची सभा बोलावून या सभेत पास होईल अशा घटनेनुसार मुंबई (शहर व उपनगर) येथील साहित्य संस्था व साहित्यिक यांची एक मध्यवर्ती संस्था स्थापन करावी." या ठरावाशिवाय अनेक महत्वाचे ठराव या संमेलनात संमत करण्यात आले ज्यामुळे साहित्य विषयक चळवळींना पुष्टी देण्याचे कार्य सुकर होऊ शकले.

या ठरावानुसार सर्व कार्यवाही करण्यासाठी कमिटीने पूर्ण विचारांती दि० २१ जुलै १९३५ रोजी "**मुंबई मराठी साहित्य संघ**" या नावाची संस्था रीतसर स्थापन केली. घटनेनुसार सभासद नोंदणीचे काम सुरू झाले. दहा वाङ्मयीन संस्था व साठ व्यक्ति सभासदांच्या नोंदणीनंतर दि० १९–१–३६ रोजी साहित्य संघाची पहिली साधारण सभा झाली. या संस्थेचे कार्यालय संस्थेचे एक चिटणीस कै० डॉ० अ० ना० भालेराव यांच्या विठ्ठलभाई पटेल रोडवरील 'नारायण मॅन्शन' या निवासस्थानी होते. मध्यंतरीच्या काळात मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलनाची दोन अधिवेशने झाली. या संमेलनांच्या अध्यक्षपदी कै० वि० स० खांडेकर व कै० भा० वि० तथा मामा वरेरकर यांची नियुक्ती झाली होती.

संघाच्या पहिल्या वर्षाच्या कार्यात तिसऱ्या संमेलनातील ठरावांची अंमलबजावणी, विविध साहित्यिकांचा प्रसंगोपात सत्कार, दिवंगतास श्रद्धांजली या कार्याबरोबरच त्या काळी गाजलेल्या 'सावकारी पाश' या बोलपटावर संघाने जाहीर चर्चा घडवून आणली. या चर्चेचे वैशिष्ट्य हे होते की चर्चेत भाग घेणारे वक्ते व श्रोते यांच्यासाठी या बोलपटाचा एक खास प्रयोग 'सेंट्रल सिनेमात' आयोजित करण्यात आला होता. हा बोलपट वक्ते व श्रोते यांनी एकत्र बसून आस्वादिल्यानंतरच चर्चा झाली. या मुळे चर्चेस रंग चढला तर नवल नाही.

१९३७ साली नव्यानेच कार्यान्वित झालेल्या कॉंग्रेस सरकारचे पहिले मुख्य मंत्री कै० बाळासाहेब खेर यांचा मुजफराबाद हॉल मध्ये सत्कार करण्यात आला. याच सुमारास कै० स्वातंत्र्यवीर वि० दा० सावरकर बंधमुक्त होऊन मुंबईस आले असता त्यांचा कृष्ण सिनेमा आता ड्रीम लॅन्ड सिनेमा येथे भव्य सत्कार करण्यात आला. राष्ट्रभक्ति व साहित्य-भक्ति या दोन्हीतही प्रथमश्रेणी मिळविणाऱ्या सावरकरांचा सत्कार केल्यामुळे संस्थेच्या कार्याबद्दल जनतेत आपुलकी निर्माण झाली. फेडरल कोर्टाचे न्यायाधीश म्हणून नियुक्त झालेल्या कै० मुकुंदराव रामराव जयकर या मुंबईकर मान्यवराचा सत्कार करण्यात आला. या बरोबरच पुरोगामी परिषदेचे अध्यक्ष म्हणून निवड झालेल्या कै० पु० ह० तथा रावसाहेब पटवर्धन यांचा सत्कार संघाने आयोजित केला.

या वर्षापासून संघ दिन साजरा करण्याची प्रथा साहित्य संघाने सुरु केली. पहिला संघदिन दि० १७ एप्रिल १९३७ रोजी 'जयलक्ष्मी' या नौकेवर साजरा करण्याची आगळी कल्पना संघाने यशस्वी केली. या संघदिनाचे महनीय प्रवक्ते म्हणून रियासतकार कै० गोविंद सखाराम सरदेसाई यांची योजना केली होती. संघाचे मुखपत्र म्हणून 'वीणा' हे मासिक संघाने सुरू केले. या मासिकाचे संपादक म्हणून शाहिरी वाङ्मयाचे अभ्यासक व चतुरस्त्र लेखक व संघ स्थापनेतील एक सहकारी कै० श्री० म० वर्दे यांची नियुक्ती केली होती. संपादन सहाय्य प्रा० वा० दा० गोखले, श्री० चं० वि० बावडेकर करीत असत. संघाच्या पहिल्या घटनेचे शिल्पकार म्हणूनही कै० वर्दे यांची कामगिरी निर्विवाद होती.

विविध विषयावर व्याख्यानमाला गुंफण्यासाठी मुं० म० ग्रंथ संग्रहालयाच्या सहकार्याने 'हेमंत व्याख्यानमाला' याच वर्षी सुरु करण्यात आली. १९३४ च्या संमेलनापासूनच जप्त वाङ्मयावरील बंदी उठवावी असे ठराव प्रत्येक संमेलनात करण्यात येत होते. या ठरावांची अंमलबजावणी करण्यासाठी व या बाबतीत लोकमत तयार करण्यासाठी संघाने अनेक प्रकट सभा घेतल्या व सरकारकडे एक शिष्ट मंडळही पाठवून शासनास लोकमताचे दर्शक असे निवेदन सादर करण्यात आले. या चळवळीचा परिणाम म्हणून या चळवळीस कालांतराने यश येऊन जप्त वाङ्मयावरील बंदी उठविल्याचे सरकारने जाहीर केले. संघटित चळवळीचे प्रत्यंतर आल्याने संघ कार्यास जोर चढला व जनतेत साहित्य संघाचे स्थान निरपवादपणे स्थिर झाले.

१९३८ साली महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे २२ वे अधिवेशन मुंबईत भरविण्यासाठी संघाने महाराष्ट्र साहित्य परिषदेस विनंती केली होती. आता पावेतो मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलनाची तीन अधिवेशने संघाने भरविली असल्याने या कार्यासाठी आवश्यक ते नियोजन करण्याची क्षमता व मनुष्यबळ संघाकडे होते. म्हणूनच साहित्य चळवळीच्या मुख्य प्रवाहाचे लोण मुंबईस पुन्हा आणावे व मुंबई अशा साहित्य विषयक कार्यापासून अलिप्त नाही हे अखिल महाराष्ट्रास समजावे ही भावना या मागे होती.

या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून कै० स्वातंत्र्यवीर बॅरिस्टर वि० दा० सावरकर यांची निवड मुंबईकरांनी केली होती. आदल्याच वर्षी बंधमुक्त झालेल्या या महान साहित्यिकाचा उचित असा सन्मान करावा आणि या साहित्य विषयक चळवळीला नवे नेतृत्व मिळवून द्यावे ही या मागची भावना होती. या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते मुंबईचे श्रेष्ठ नागरिक नेक नामदार बॅरिस्टर मुकुंदराव रामराव जयकर.

या अधिवेशनात 'महाराष्ट्र विद्यापीठ' स्थापण्यासंबंधीचा ठराव, 'अनरजिस्टर्ड' व्ही-पी-पार्सल पाठविण्यावरील बंदी उठविण्याची विनंती व बुकपोस्टाचे दर कमी करण्यासंबंधीचा ठराव; नभोवाणी केंद्राच्या कार्यक्रम समितीवर साहित्य संस्थांच्या प्रतिनिधींची नियुक्ती करण्याविषयी व पुणे, नागपूर वगैरे ठिकाणी केंद्रे काढण्याची विनंती, मराठीतून अधिक कार्यक्रम करण्याबद्दल सूचना या संबंधातील ठराव; देवनागरी लिपी करण्यासाठी परिषदेने समिती नेमावी अशी मागणी; सरकारी नोकरांनी लिहिलेल्या साहित्याला आक्षिप्त ठरवून नोकरीतून कमी करण्याचे जे प्रकार झाले त्यांची फेर चौकशी करून त्यांना न्याय देण्यासंबंधी सरकारला विनंती; एलफिन्स्टन कॉलेजात मराठी भाषेच्या अध्यापनाची सोय करण्यासाठी मराठी व्याख्यात्याची नेमणूक करण्याची विनंती; जप्त वाङ्मयावरील बंदी त्वरित उठविण्याची विनंती; या संबंधात साहित्य संघाने कै० ना० म० जोशी यांच्या नेतृत्वाखाली जे शिष्टमंडळ सरकारकडे पाठविले होते त्याचा आवर्जून उल्लेख; चांगल्या वाङ्मयास पुरस्कार देण्याची इंदूर सरकारला विनंती; परभाषातील उत्तम ग्रंथाची भाषांतरे प्रसिद्ध करण्याचे प्रयत्न परिषदेने करावे यासाठी विनंती; युद्धविरोधी विचारांची जागृती करण्यासाठी लेखकांना विनंती; मध्यप्रांत व मुंबई या सरकारांनी सीमा भागात आवश्यक त्या ठिकाणी मराठी शाळा काढण्याची विनंती, लेखकांनी संघटना करून लेखकांवर येणारे निर्बंध दूर करून घ्यावेत. नाथीबाई ठाकरसी विद्यापीठाने मराठीतून शिक्षण देण्याचे धोरण अवलंबिल्याबद्दल अभिनंदन व या विद्यापीठास सरकारमान्यता प्राप्त करून देण्याची सरकारला विनंती. असे विविध ठराव या १९३८ साली भरलेल्या म० सा० संमेलनात संमत झाले.

या संमेलनात संघाने कै० श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या अप्रकाशित व अप्रयोगित 'माया विवाह' या नाटकाचा प्रयोग सादर केला व प्रतिनिधींचे मनोरंजनही करण्याची प्रथा सुरू केली. या प्रथेचा पुढील कालातील संमेलनांनी अवलंब केल्याचे आढळून येईल. साहित्याच्या अभिवृद्धी बरोबरच नाट्य, संगीत, चित्र, नृत्य या कलांचा परामर्षही साहित्य संमेलनांनी घेतला पाहिजे व समाजाच्या सांस्कृतिक जीवनाची पातळी उंचावण्यास साहाय्यभूत झाले पाहिजे हा उद्देश या उपक्रमामागे होता. मुंबईस भरलेल्या या साहित्य संमेलनाने एक आदर्श निर्माण केला व या आदर्शास अनुसरून पुढील साहित्य संमेलनांनी मार्गक्रमण केले असल्याचे आढळून येते. या वरून साहित्य संघाचे महत्व ओळखणे कठीण नाही.

१९३८-४१ या कालावधीत परिभाषा मंडळ, नवे शुद्धलेखन प्रसार मंडळ, कॉपी राईट कायद्याचा विचार करून त्यात सुधारणा सुचविण्यासाठी मंडळ, कोकणी भाषिकांची मराठी भाषा बोलणारे म्हणून नोंद व्हावी अशी चळवळ करण्यासाठी मंडळ इत्यादी पोट मंडळे नेमण्यात येऊन संघाने व्यापक स्वरूपाचे काम करण्यास प्रारंभ केला. याच सुमारास महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे घेण्यात येणाऱ्या वाङ्मयीन परीक्षांसाठी वाङ्मयाचे अभ्यासवर्ग सुरू करण्यात आले व या परीक्षांचे मुंबईतील केंद्र संघाने चालविले. या उपक्रमाचे सूत्रधार होते. कै० वा० रा० ढवळे. १९६४ साली संघाने या वाङ्मयीन परीक्षा स्वतःच घेण्यास सुरुवात केली व ती आजतागायत चालू आहे. या उपक्रमाचे नेतृत्वही कै० ढवळे यांनी आमरण केले. १९४० साली झालेल्या संघ दिनानिमित्त झालेल्या संघ सप्ताहात 'संघमुद्रा' ठरविण्यात आली. ही मुद्रा संघाचे एक मान्यवर सभासद व ख्यातकीर्त चित्रकार दीनानाथ दलाल यांनी तयार केली होती. ही मुद्रा संघ सभासदांनी संघाच्या विविध कार्यक्रमांच्या प्रसंगी वापरावी असे ठरविण्यात आले.

साहित्य संमेलना प्रमाणेच नाट्य संमेलने १९०५ सालापासून महाराष्ट्रात भरत आली आहेत. १९४० साली नाशिक येथे कै० नटवर्य गणपतराव बोडस यांच्या अध्यक्षतेने नाट्य संमेलन भरले होते. याच संमेलनात मराठी रंगभूमीचा शतसांवत्सरिक उत्सव १९४३ साली करण्याचा ठराव संमत झाला होता. या ठरावाचा पाठपुरावा करण्यासाठी १९४१ साली हे संमेलन मुंबईस भरविण्यासाठी साहित्य संघाने निमंत्रण दिले व नाट्य संमेलनाचे ३२ वे अधिवेशन १९४१ साली विल्सन हायस्कूल मध्ये भरविले. या संमेलनाचे अध्यक्ष होते कै० आचार्य प्रल्हाद केशव अत्रे आणि स्वागताध्यक्ष होते आंधळ्यांची शाळा वाले कै० श्री० वि० वर्तक. या संमेलन प्रसंगी दोन नव्या नाटकांची निर्मिती साहित्य संघाने केली. एक नाटक 'घरकुल' इब्सेनच्या Doll's House' चे भाषांतर कै० अनंत काणेकर यांनी लिहीले होते व कै० के० नारायण काळे यांनी दिग्दर्शित केले होते तर २ रे नाटक होते कै० मामा वरेरकर लिखित 'उडती पाखरे'. या नाटकाचे दिग्दर्शक होते कै० पार्श्वनाथ आळतेकर. यांत कै० नलिनी डेरे, कै० कर्वे आणि कै० रामचंद्र वर्दे नट म्हणून पुढे आले, या पासूनच साहित्य संघाच्या नव्या नाटकांच्या निर्मितीचा प्रारंभ झाला. याच नाट्य संमेलनात कै० नटवर्य केशवराव दाते यांनी आपल्या भाषणात 'आम्हा नटांना उभे राहण्याला जागा द्या' अशी विनंती केली. या विनंतीचा संघ कार्यकर्त्यांवर एवढा परिणाम झाला कि संघाने लवकरच नाट्यगृहाची सोय असलेले मंदिर बांधण्याचा संकल्प केला व त्यासाठी निकराचे प्रयत्न सुरू केले. याच संमेलनात १९४३ साली मराठी रंगभूमीचा शतसांवत्सरिक उत्सव साजरा करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली होती. या नाट्यसंमेलनाच्या रंगमंचावर 'तमाशा'च्या कार्यक्रमाची खास योजना करण्यात आली होती.

१९४१ मध्ये कै० आचार्य अत्रे आणि कै० प्रा० ना० सि० फडके यांच्या मध्ये एक अनिष्ट वाद सुरू झाला. हा वाद बंद व्हावा या हेतूने साहित्य संघाने प्रयत्न करण्याचे

ठरवून एका समितीची नियुक्ती केली होती. या समितीने दीर्घ विचारांती हा वाद संपुष्टात यावा म्हणून एक करार या दोघांना सुचविला होता. दि. १४-८-१९४१ रोजी रोजी वाङ्मय व वैयक्तिक टीके संबंधीच्या करारास दोघांनी मान्यता दिली होती. साहित्यिकांनी वैयक्तिक टीका करून साहित्य गढूळ करू नये म्हणून संघाने केलेल्या प्रयत्नाबद्दल मराठी रसिकांनी संतोष व्यक्त केला होता. हा करार घडवून आणण्याचे कामी संघाच्या विनंती वरून कै० बा० म० जोशी यांनी पुढाकार घेतला होता.

दि. १२ जुलै १९४२ रोजी भरलेल्या संघाच्या विशेष साधारण सभेने मुंबई व उपनगर साहित्य संमेलनाच्या अधिवेशनाकरिता नियम संमत केले. ३-४ वर्षांपूर्वीच कार्यकारी मंडळाने नियम तयार केले होते व २-३ अधिवेशनात त्यांचा अनुभव घेतल्यानंतर आता ते पक्के करण्यात आले.

मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलनाच्या अधिवेशनात महाराष्ट्र विद्यापीठासंबंधी एक ठराव संमत करण्यात आला होता. या नंतर मुंबई सरकारने ने० ना० जयकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने महाराष्ट्र विद्यापीठासंबंधी एक प्रश्नावली तयार करून ती शिक्षणतज्ज्ञ, प्रमुख संस्था इत्यादीकडे पाठवली होती. संघाकडेही ही प्रश्नावली आल्यानंतर कार्यकारी मंडळाने या प्रश्नास उत्तरे देण्यासाठी व जरूर पडल्यास तोंडी साक्ष देण्यासाठी खालील गृहस्थांची एक समिति नेमली होती.

(१) ले. क० प्रा० अ० बा० गजेन्द्रगडकर (अध्यक्ष) (२) प्रा० कृ० पां० कुळकर्णी (३) श्री० सी० एन० पटवर्धन (४) श्री० गो० बा० महाशब्दे (५) श्री० भा० रा० धुरंधर (६) ॲ० श्री० म० वर्दे (७) प्रा० अनंत काणेकर (८) श्री० श्री० रा० टिकेकर.

या समितीने प्रश्नावलीची उत्तरे पाठवून शिवाय तोंडी साक्षही दिली.

बनारस विश्व विद्यालयाने कै० गु० अण्णासाहेब कर्वे याना डॉक्टरेट दिल्याबद्दल कै० अण्णासाहेबांचा सत्कार करण्यात आला.

कै० रा० भि० गुंजीकर यांच्या वाङ्मयाचा प्रकाशन समारंभ ने० ना० जयकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला.

१९४२ साली नाशिक येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी कै० आचार्य अत्रे यांची अध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा संघातर्फे सत्कार करण्यात आला.

१९४२ साल भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यांत महत्वाचे स्थान मिळवून गेले. ऑगस्ट ४२ मध्ये मुंबईस गोवालिया टँक वर भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनात महात्मा गांधींनी 'करेंगे या मरेंगे' चा नारा देऊन स्वातंत्र्य लढ्याच्या पर्वाला प्रारंभ केला. या लढ्यात संघाच्या अनेक सदस्यांनी वैयक्तिक रित्या भाग घेऊन समयोचित राष्ट्रसेवा अर्पण केली.

१९४१ साली संघाने भरविलेल्या नाट्य संमेलनप्रसंगी कै० मामा वरेरकर लिखित "उडती पांखरे" या नाटकातील एका वाक्याबद्दल कै० गो० कृ० गोखले यांच्या कन्या

सौ० आनंदीबाई ढवळे यांनी खटला भरला होता. हा खटला जोराने लढवून ग्रंथकाराच्या लेखन स्वातंत्र्यावर आलेला एक प्रकारचा अन्याय्य निर्बंध मामा वरेरकर यांनी दूर करून घेतला. या खटल्यात मामांना जे यश प्राप्त झाले त्या बद्दल संघाने त्यांचे वार्षिक सभेत या संबंधात २ ठराव करून अभिनंदन केले.

१९४३ सालच्या वार्षिक साधारण सभेत दोन नवीन प्रथा सुरू करण्याबद्दल ठराव करण्यात आले. एक म्हणजे संघ दिनाच्या महनीय प्रवक्त्यास व संघातर्फे किंवा संघटित संस्थातर्फे भरणाऱ्या मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांस गाडीभाड्याच्या खर्चाशिवाय सन्मानार्थ म्हणून रुपये एकावन्न मानधन म्हणून देण्यात यावेत व दुसरी म्हणजे साहित्य संघाच्या सभासदांनी केलेल्या वाङ्मय निर्मितीसाठी शंभर रुपयांचे संघ पारितोषिक देण्यात यावे. संघाच्या स्थापनेपासून कार्यालयीन व्यवस्थापक म्हणून श्री० धों० तु० तोंडवळकर यांनी शारीरिक व मानसिक श्रमाची पर्वा न करता अनेक प्रकारे संघास साहाय्य केले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले व संघ दिनाचे वेळी त्यांच्या निवृत्तीबद्दल त्यांना अल्पशी थैली देऊन सत्कार करण्यात आला. श्री० वा० म० जोशी हे कालवश झाले. त्यांच्या निधनानिमित्त भरलेल्या दुखवट्याच्या सभेत कै० वा० म० जोशी यांचे स्मारक म्हणून एक व्याख्यानमाला प्रतिवर्षी सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

संघ पारितोषिकाचा उपक्रम या वर्षापासून सुरू करण्यात आल्यामुळे या वर्षीचे पारितोषिक ललित विभागास द्यावयाचे ठरल्याने श्री० वि० वा० शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या 'विशाखा' काव्य संग्रहास हे पारितोषिक देण्यात आले. संघ दिनाच्या महनीय प्रवक्त्या सौ० कुसुमावती देशपांडे यांना रु. ५१ ची भेट देण्यात येऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

दिनांक २४–१०–४३ रोजी संघाची तातडीची जादा साधारण सभा भरली होती. सभेत मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरिक उत्सवाबद्दल व कै० वा० म० जोशी यांच्या स्मारकाबद्दल पुढील प्रस्ताव संमत करण्यात आले.

(१) मराठी रंगभूमीचा शतसांवत्सरिक उत्सव मुंबईत साहित्य संघाने पुढाकार घेऊन घडवून आणावा व या संबंधीची सर्व व्यवस्था कार्यकारी मंडळाने करावी.

(२) कै० वा० म० जोशी यांच्या निधनानिमित्त दि० ३१ जुलै १९४३ रोजी भरलेल्या प्रकट सभेत स्मारकासंबंधी जो प्रस्ताव संमत झाला त्या प्रस्तावास ही सभा संमती देत आहे.

१९४३ च्या नोव्हेंबरमध्ये मराठी रंगभूमीचा शतसांवत्सरिक उत्सव, मध्यवर्ती समितीच्या वतीने मराठी रंगभूमीच्या जन्मस्थानी सांगली येथे साजरा करण्यात आला. या उत्सवात 'शारदा' नाटकाची निर्मिती करण्याची जबाबदारी साहित्य संघावर सोपविण्यात

आली होती. ही जबाबदारी संघाने उत्कृष्टपणे पार पाडली. या नाटकाचे वैशिष्ट्य म्हणजे कै० चिंतूबुवा गुरव यांनी दीर्घ कालावधीनंतर पुन्हा रंगभूमीवर 'श्रीमंता'ची भूमिका केली. तसेच कै० बालगंधर्व, कै० गणपतराव बोडस. कै० चिंतामणराव कोल्हटकर, कै० केशवराव दाते, कै० लोंढे, कै० मास्टर नरेश या मराठी रंगभूमीवरील नटश्रेष्ठांनी भूमिका केल्या होत्या. तर शारदेच्या मैत्रिणींच्या हळदीकुंकवाच्या प्रवेशात संघाच्या बाल कलावतींनी दर्जेदार भूमिका वठविल्या होत्या. सांगलीस झालेल्या या शारदेच्या प्रयोगामुळे हा शतसांवत्सरिक उत्सव चिरस्मरणीय तर झालाच पण मुंबईस होणाऱ्या उत्सवाचे स्वरूप कशा प्रकारचे असेल याचे दिग्दर्शनही महाराष्ट्रातील नाट्य रसिकांना झाले व मुंबईच्या उत्सवाबद्दल अपेक्षा वृद्धिंगत झाल्या. या सांगलीच्या उत्सवास साहित्य संघाचे ३०० प्रतिनिधी डॉ० भालेरावांच्या नेतृत्वाखाली गेले होते.

मुंबई मराठी साहित्य संघाने मराठी रंगभूमीचा मुंबईतील शतसांवत्सरिक उत्सव एप्रिल १९४४ मध्ये साजरा केला. या उत्सवात मुंबईतील साहित्यसंस्था व नाट्यसंस्था यांनी सहकार्य दिले होते. एकूण ४१ संस्था या उत्सवात सहभागी होत्या. या संस्थांना सहभागी करण्याचा उपक्रम करण्याचे कारण हा उत्सव 'मुंबई'चा होता फक्त संघाचा नव्हे याची जाणीव संघ कार्यकर्त्यांना पूर्णपणे होती. मराठी रंगभूमीची शतकोत्तर पूजा बांधताना फक्त संघाचा उत्सव करण्यापेक्षा अखिल मुंबईकर नाट्यरसिक व मुंबईतील सांस्कृतिक संघटना यांचा सहभाग साधण्याने या उत्सवाचे विशाल दर्शन महाराष्ट्राला–भारताला घडवून आणावे अशीच भव्य कल्पना संघाच्या कार्यकर्त्यांनी स्वीकारली व या नाट्य यज्ञाचे यजमान पद स्वीकारून कार्यास प्रारंभ केला.

एखाद्या साहित्य संस्थेने नाटकाच्या बाबतीत एवढा उत्साह दाखविणे काही लोकांना जरा चमत्कारिक वाटले. पण साहित्य संघाची मूळपासूनची प्रथा नाट्यानुकूल अशी आहे. साहित्य संमेलनाला करमणुकीची विशेषतः साहित्य–प्रधान करमणुकीची जोड देण्याचे बरेचसे श्रेय संघाला आहे. १९३८ च्या साहित्य संमेलनात कै० श्री० कृ० कोल्हटकरांच्या 'माया विवाह' नाटकाचा प्रयोग संघाने स्वतः बसवून करून दाखविला. तो इतका लोकप्रिय झाला की साहित्य संमेलनात नाट्यप्रयोग करण्याची प्रथा जवळजवळ तेव्हापासून पडून गेली. १९४१ साली नाट्यसंमेलनाचे अधिवेशन संघाने भरविले व 'नाट्य' हा साहित्याचा एक भाग आहे याबद्दल कुणास शंका घेण्यास जागा ठेवली नाही. त्यानंतरही संघाच्या विद्यमाने जी मुंबई व उपनगर साहित्य संमेलनाची अधिवेशने भरविली जात त्यांत नाटक, नाटिका, नाट्यप्रवेश यांचा अंतर्भाव करमणुकीच्या कार्यक्रमात नियमितपणे केला जात असे. यामुळे १९४४ साली साहित्य संघाने मराठी रंगभूमीचा शतसांवत्सरिक उत्सव भव्य दिव्य प्रमाणात व अखिल मुंबईला या सोहळ्यात सहभागी करून साजरा करण्यासाठी बद्धपरिकर होणे क्रमप्राप्तच होते. मुंबापुरीच्या सांस्कृतिक जीवनातील हा सोहळा अभूतपूर्व होता व त्याचे यजमानपद साहित्य संघ

करीत होता ही घटना संघाच्या कार्यात सुवर्णाक्षरांनी नोंदविणारी होती यात शंका नाही. हा उत्सव साजरा करताना फक्त रंगभूमीच्या शताब्दी निमित्त आनंद व्यक्त करणे व काही नाट्यप्रयोग करणे एवढाच संकुचित उद्देश संघापुढे नव्हता तर साहित्य संघाच्या व तत्सम इतर संस्थांच्या साहित्य विषयक चळवळींकरिता व नाट्यसंस्थाना मुंबईतील प्रतिष्ठित वस्तींत प्रतिष्ठित समाजासमोर अल्प भाड्यात नाट्यप्रयोग करून दाखविण्याची सोय करण्याकरिता म्हणजे एका दृष्टीने रंगभूमीच्या शताब्दीचे स्मारक करण्यासाठी व दुसऱ्या दृष्टीने पुढील शतकात होणाऱ्या रंगभूमीविषयक चळवळींचा पाया घालण्याकरिता साहित्य संघाच्या कार्यास व नाट्यप्रयोगास सोईस्कर असे मंदिर प्राप्त करून देणे हा या उत्सवाचा प्रमुख उद्देश ठरविण्यात आला होता.

या शतसांवत्सरिक उत्सवाचे स्वरूप ठरविताना त्यात व्यावसायिक नट, नाटककार, हौशी नट व नाट्य संस्था, व्यावसायिक नाट्य संस्था, साहित्य संस्था, स्त्रिया व मुले या सर्वांचा समावेश व्हावा अशी दृष्टी ठेवण्यात आली होती. हौशी नाट्य संस्थासाठी एक चढाओढ लावण्यात आली होती. या चढाओढीत एकूण तेरा संस्थांनी आपली नाटके सादर केली होती. यातील पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या 'नाट्य नवजीवन' संस्थेच्या संगीत उद्यांचा संसार या नाटकाचा व द्वितीय क्रमांकावर आलेल्या रॉयल ड्रॅमॅटिक फोर्स या संस्थेच्या पेल्यातील वादळ या नाटकातील प्रवेशाचा उत्सवात समावेश करण्यात आला होता. या शतसांवत्सरिक उत्सवात मराठी रंगभूमीवर अधिराज्य गाजविणाऱ्या व आपल्या अवीट गोडीने रसिक प्रेक्षकांची मने जिंकणाऱ्या जुन्या नाटकापैकी संगीत शारदा, संगीत सौभद्र, संगीत स्वयंवर, संगीत सत्तेचे गुलाम, भाऊबंदकी या प्रथम श्रेणीच्या नाटकांबरोबरच त्या काळात नवीन असलेल्या सारस्वत, जन्माचे सोबती या नाटकांचाही समावेश होता. मुंबईकर आद्य संगीत नाटककार सोकर बापूजी त्रिलोकेकर कृत 'हरिश्चंद्र' या नाटकातील प्रवेश समाविष्ट करून मुंबईतील आद्य रहिवासी पाठारे प्रभु जमातीला सहभागी करण्यासही उत्सव विसरला नाही.

कै. राम गणेश गडकरी कृत वेड्यांचा बाजार हे नाटक साहित्यिकांनी सादर करून लेखकात अभिनय निपुण नटही असतात हे दाखवून दिले. स्त्रियांच्या कार्यक्रमासाठी एक स्वतंत्र दिवस देण्यात आला होता. वृंदवादन, मूकाभिनय, नृत्य, नाट्य छटा, श्रीमती कृष्णाबाई मोटे कृत 'गुणाची पोर' ही नाटिका या गोष्टींनी हा दिवस साजरा करून हौशी स्त्रियांनी रंगभूमी गाजविली.

या उत्सवात ज्या नवीन गोष्टी करण्याचा प्रयत्न करण्यात आला त्यात संगीतिका (ऑपेरा) 'शकुन्तला स्वप्न' याचा प्रथम निर्देश केला पाहिजे. मराठी संगीत रंगभूमीची सुरुवात कै. अण्णासाहेब किर्लोस्करांच्या संगीत शाकुंतल या संगीत नाटकाने १८८० साली झाली तर 'ऑपेरा' या नाट्य प्रकाराचा— (मराठीतील संगीतिकेचा) प्रारंभही शकुंतला स्वप्नाने झाला हा एक योगायोगच होता. या संगीतिकेचे लेखक होते श्री० प्रभाकर ग० गुप्ते. यात चित्रपट सृष्टीतील ख्यातनाम कलाकार श्री० शाहू मोडक

व कु० नलिनी जयवंत यांनी भूमिका केल्या होत्या. या पहिल्या संगीतिकेचे संगीत दिग्दर्शन केले होते श्री० व्ही० जी० भाटकर यांनी.

उत्सवाच्या दुसऱ्या एका विशेषाचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे तो म्हणजे प्रफुल्ल पिक्चर्स या कोल्हापूरस्थ चित्रपट कंपनीचा संमिश्र कार्यक्रम होय. चित्रपटातील नट नटींनी आपल्या अभिनय निपुणता आणि कल्पना चातुर्याच्या साह्याने मराठी रंगभूमीला करभारच प्रदान केला असे म्हणावयास पाहिजे. यात सहभागी झाले होते मास्टर विनायक, बेबी आचरेकर, साळवी, दामुअण्णा मालवणकर, जोग, एरिक, ग० दि० माडगूळकर आणि लता मंगेशकर. या कार्यक्रमाने नाट्याची विविध अंगेच लोकांसमोर आली असे म्हणावयास हरकत नाही.

या उत्सवात नाट्यप्रयोगाशिवाय 'मराठी रंगभूमीच्या पुनर्जीवनाची दिशा' या विषयावर चर्चा ठेवण्यात आली होती. गेल्या शतकाच्या वाटचालीबद्दल आनंद प्रदर्शित करताना पुढील शतकातील वाटचालीच्या दिशेचा विचार करणे जाणतेपणाचे दर्शनच होय यात संदेह बाळगण्याचे कारण नाही. या चर्चेत श्री० श्री० वि० वर्तक, प्रा० वा० ल० कुळकर्णी, प्रा० गो० के० भट, श्री० पार्श्वनाथ आळतेकर इत्यादि विचारवंतांनी भाग घेतला होता. या शिवाय रंगभूमीच्या निष्ठेसंबंधी पुढील रंगभूमिविषयक ठराव संमत करण्यात आला. "नाट्य आणि नाट्यकला ही आज हजारो वर्षांपासून या भरतवर्षात प्रतिष्ठा आणि लोकप्रीति उपभोगीत आलेली आहेत. समाजातील भिन्न भिन्न व्यवसायातील आणि परिस्थितीतील सर्व प्रकारच्या स्त्री पुरुषांचे 'एकं समाराधनम्' म्हणून घेण्याचे भाग्य नाट्यालाच मिळाले आहे.

इ० स० १८४३ वर्षी सांगलीचे विष्णुदास भावे यांनी महाराष्ट्र नाट्य कलेच्या नवा अवतार घडवून आणला. त्या वेळेपासून अनेक कुशल नटांनी, गायकांनी, कलावंतानी आणि योजकानी नाट्यकलेची जोपासना सतत मोठ्या उत्साहाने केली आणि तिला सन्माननीय आणि लोभनीय स्थान प्राप्त करून देऊन मोठ्या यशाला आणि वैभवाला चढविले.

अलिकडे नाट्यकलेच्या वर्धमान यशाला कांहीशी ओहोटी लागल्याची चिन्हें दिसू लागली होती. पण ही चिन्हें आगांतुक असून जातिवंत नाट्य हे अमर आहे. आणि महाराष्ट्रातील रसिक जनता तिला कधीहि अंतर देणार नाही असा या सभेचा अढळ विश्वास आहे.

नाट्याच्या जोपानेसाठी सदैव उपयोगी पडणारे आणि जनतेच्या एतद्विषयक विविध आकांक्षा पूर्ण करणारें नाट्य मंदिर महाराष्ट्राच्या मुंबापुरी सारख्या महनीय महानगरीत उभे करणें हे येथील समस्त महाराष्ट्रीयांचे अवश्य कर्तव्य आहे आणि आजच्या या मंगल शतसांवत्सारसरिक उत्सवाच्या निमित्ताने हे कर्तव्य पार पाडण्याचा निश्चय ही सभा प्रगट करीत आहे." हा ठराव प्रा० अनंत काणेकर यांनी मांडला व श्री. मामा वरेरकर आणि श्री० पु० रा० लेले यांनी त्यास दुजोरा दिला. या उत्सवास आत्मीयतेने आणि

अहमहमिकेने हजर असलेल्या हजारो रसिकांनी उभे राहून टाळ्यांच्या प्रचंड गजराने आपली पसंती दर्शविली.

या उत्सवात झालेल्या नाटकांबद्दल काही लिहिणे अप्रस्तुत तर होणार नाहीच; उलट संघाच्या इतिहासात ज्या उत्सवाचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे त्या उत्सवातील वैशिष्ठ्यांची नोंद करणे व यात सहभागी होणाऱ्या मान्यवर कलाकारावद्दल काही लिहिणे हे अत्यंत आवश्यक आहे.

उत्सव झाल्यावर कोणते कार्यक्रम रसिकांच्या लक्षात राहतील व राहिले असे विचारले तर निरनिराळी उत्तरे येणे आवडीनिवडीनुसार अपरिहार्य आहे. तथापि 'शारदा' 'सौभद्र' व 'भाऊबंदकी यांना सर्व संमती मिळाल्याशिवाय राहणार नाही. 'शारदेला' तर मुंबईच्या प्रकाश पिक्चर्सने सर्वोत उत्तम ठरेल त्या कार्यक्रमासाठी ठेवलेले कै० वि० ह० औंधकर या नट आणि नाटकाराच्या स्मरणार्थ योजिलेले सुवर्णपदक मिळाले. शारदेतील 'श्रीमंताने' तर कमालच केली. श्री० चिंतुबुवा गुरव जवळ जवळ २७ वर्षांनी पुनः रंगभूमीवर प्रकट झाले आणि तेही स्वतःचे वय 'अवघे पाऊणशे' असताना. चिंतूबुवानी रंगभूमीवर प्रवेश केला व आपल्या पहिल्याच गाण्याने सर्व प्रेक्षकांना तोंडून आश्चर्योद्गार काढण्याखेरीज गत्यंतर राहिले नाही. त्यांच्या कामाची रसिकावर एवढी छाप बसली की त्यांच्याकरिता उत्सव मंडळाकडून एक खास निधी उभारण्यात येऊन, सुमारे १४०० रुपये त्यांना अर्पण करण्यात आले. पैसे गोळा करण्यासाठी आचार्य अत्रे टोपी घेऊन प्रवेश द्वारापाशी उभे राहिले होते. या नाटकात चिंतुबुवा, बालगंधर्व, चिंतामणराव कोल्हटकर, केशवराव दाते, गंगाधरपंत लोंढे, माधवराव वालावलकर, सदुभाऊ रानडे, वैशंपायन या सर्वांनी आपल्या कामानी रसिकावर छाप टाकली यात संशय नसला तरी या नाटकात भूमिकेसाठी प्रथमच उभ्या राहिलेल्या सिनेमा चंद्रिका 'वासंती'ची स्तुती कुठल्या शब्दात करावी हे समजत नाही. वासंतीचे 'मूर्तीमंत भिती उभी' हे पद ज्यांनी त्या दिवशी ऐकले त्यांना ती शारदा वर्षानुवर्षे आठवेल यात संशय नाही. वासंतीच्या संगीताच्या तयारीचे श्रेय श्री० वामनराव सडोलीकर यांना आहे. शेठ सुशीलकुमार रुईया यांनी कु० वासंतीला सुवर्णपदक दिले ते यथायोग्यच होते.

सौभद्रात हिराबाई बडोदेकरांनी तर कमालच केली. त्यांना बालगंधर्व, लोंढे, मास्तर कृष्णराव यांच्याबरोबर सामना द्यावयाचा होता. हिराबाईंच्या आवाजात त्या दिवशी जणू प्रत्यक्ष गान देवताच अवतरली होती. 'वद जाऊ कुणाला शरण' व 'पांडूनृपति'च्या वेळेस तर ७–८ हजाराचा लोकसमुदाय या मधुर व सुरेल संगिताने नुसता भारावून गेला होता. पहाटे ६ वाजले तरी शेवटचा अंक चालूच होता. हिराबाईंनी रसिकांना जुन्या काळातील दीर्घकाल चालणाऱ्या नाटकांचा पुनः प्रत्यय आणून दिला यात शंका नाही.

महाराष्ट्रीय नाट्य रसिकांवर संगीताची पकड काही अजब आहे. तेव्हा प्रथम श्रेणीच्या संगीत नटांनी आपली नाटके गाजवली यांत नवल नाही. पण कौतुक वाटते 'भाऊ बंदकी' नाटकाचे. यात केशवराव दाते यांची भूमिका होती, तीहि अगदी छोटी म्हणजे

तुळोजी पवाराची. ही भूमिका छोटी असली तरी भाऊबंदकीवर केशवरावांची छाप होती. कारण तेच या नाटकाचे दिग्दर्शक होते. पण नानासाहेब फाटक, शिवरामपंत परांजपे सौ० वर्तक व मामा पेंडसे यांनी आपल्या अभिनय नैपुण्याने प्रेक्षकांना खिळवून ठेवले होते. नारायणरावाची छोटी भूमिका करणाऱ्या दत्तू देवधरनी आपल्या "काका-काका मला वाचवा" या आरोळ्यांनी रसिकांच्या हृदयाला घरे पाडली. सौ० वर्तक या नाट्य मन्वंतरच्या रंगमंचावर गाजल्या तरी त्या हौशी कलाकारच होत्या. त्यांनी आनंदीबाई म्हणून रंगमंचावर प्रवेश करताच पेशवाईतली आनंदीबाईच प्रत्यक्ष अवतरल्याची जाणीव प्रेक्षकांना झाली होती यात शंका नाही. नाना फाटकांनी तर निश्चयच केलेला दिसत होता की आज आपले सर्व कौशल्य पणाला लावावयाचे. तडफ तर होतीच परंतु त्यांच्या कामातला संयमच अधिक प्रशंसनीय होता. राघोबाचे काम फारच उत्तम झाले. बाबुराव पेंढारकरांनी गणपतराव जोशी आणि दिनकर कामण्णा यांच्या स्मरणार्थ ठेवलेले दोन रौप्य करंडक नाना फाटक व शिवरामपंत परांजपे यांनी मिळविले. जी गोष्ट राघोबाची तीच नाना फडणीसाची व रामशास्त्री यांची. परंतु पार्श्वनाथ आळतेकरांच्या रामशास्त्रीपेक्षा त्यांची सारस्वतमधील साहित्यिकाची भूमिका प्रेक्षकांना अधिक भावली. वरेरकरांच्या वाक्याचे अर्थ अभिनयाने स्पष्ट करावे आळतेकरांनीच असे जे म्हणतात ते काही खोटे नाही. नाटककाराला स्वतःशी समरस झालेला असा निर्माता आणि दिग्दर्शक क्वचितच लाभतो हेच खरे. वरेरकरांच्या सारस्वताला पार्श्वनाथ आळतेकर हे दिग्दर्शक व नट म्हणून मिळाले हा अशा क्वचितच जुळून येणाऱ्या योगापैकी एक योग होता. या सारस्वतनेच या शतसांवत्सरिक उत्सवाच्या नाटकांची सुरवात झाली. आळतेकरांनी रंगभूमीसाठी जी झीज सोसली आणि वरेरकरांचे त्या काळातील विद्यमान नाटककारामध्ये जे स्थान होते ते लक्षात घेता त्यांना मिळालेला हा अग्रपूजेचा मान योग्यच होता. मामा पेंडसे यांची नाना फडणीसाची भूमिका पाहून जुन्या मुरब्बी प्रेक्षकांनी माना डोलावून म्हटले कि कै० नानवा गोखल्यांच्या नंतर आज पुन्हा नाना फडणीस पाहिला. केवळ जुनी ऐतिहासिक भूमिकाच मामांनी चांगली केली असे नाही तर सत्तेच्या गुलामातील हेरंबराव मामांनी असा उभा केला की भूमिका नवी असो वा जुनी असो ह्या दोहोतही आपण फड जिंकू शकतो हे मामांनी सिद्ध केले.

पण सत्तेच्या गुलामात खरी छाप पाडली भालचंद्र पेंढारकरांनी—मुलाने आपल्या पित्याचे नाव काढले व राखले असेच प्रेक्षकांचे मत होते.

या नटवर्यांच्या मालिकेत एक नवा तारा आपल्या अभिनय नैपुण्याने त्या दिग्गजांच्या मालिकेत जाऊन बसला त्याचे नाव अनंत वर्तक. इतर व्यवसाय करून केवळ हौशीखातर नाटकात काम करणारे अनंत वर्तक. वेड्याच्या बाजारमध्ये खरे चमकले ते बाळाभाऊ —अनंत वर्तक आणि आचार्य अत्रे. पण वर्तकांनी आपल्या अभिनयाने आणि गाण्याने सर्वांना मोहित केले म्हणूनच श्रीमान सुशीलकुमार रुईयांनी दुसरे सुवर्ण पदक वर्तकांना प्रदान केले.

या उत्सवासाठी 'मरीन लाईन्स'वर सागराच्या सान्निध्यात एक मोकळीजागा मुंबईच्या कलेक्टर फरुकी यांनी दिली एवढेच नव्हे तर भाड्यातही सवलत देऊन इतरही सर्व प्रकारचे साहाय्य केले. या नाट्य मंडपाचा आराखडा संघ सदस्य श्री० ग० ल० कुळकर्णी आर्किटेक्ट व श्री० मराठे इंजिनिअर यांनी तयार केला होता. हा मंडप नेहमीच्या मंडपाप्रमाणे नव्हता तर फक्त रंगमंच, बाजूच्या ओवऱ्या आणि स्वागत कक्ष एवढ्यावरच आच्छादन होते प्रेक्षागार उघडे होते. यात ५००० प्रेक्षकांच्या बैठकीची व्यवस्था होती परंतु काही प्रयोगांना जादा खुर्च्या टाकून ८००० प्रेक्षकांची सोय करण्यात आली होती. 'ओपन एअर थिएटरचा' एवढ्या मोठ्या प्रमाणावर उपयोग निदान हिंदुस्तानात पहिल्यानेच केला गेला होता असे वाटते. ऐकण्याची सोय झाकलेल्या ध्वनिक्षेपकांनी केली होती आणि या व्यवस्थेचे श्रेय होते आकाशवाणीचे श्री० ढोलेकर व रेडिओ कम्बाईन ही संस्था. मंडप उभारणी केली होती संघ सदस्य श्री० चंद्रकांत भांडारे यांनी.

या अभूतपूर्व शतसांवत्सरिक उत्सवाचे अध्यक्ष होते 'बालगंधर्व'— श्री० नारायणराव राजहंस. आपले सौंदर्य, मधुर आवाज, असामान्य अभिनय कौशल्य आणि उच्च दर्जाची रसिकता व उत्तमातील उत्तमाचा नाट्य निर्मितीसाठी मेळ घालणारे नारायणराव, ज्यांनी मराठी रंगभूमीच्या भक्तांना भुलविले, डोलविले आणि तोषविले एवढेच नव्हे तर सतत ४० वर्षे मराठी रंगभूमीवर अधिराज्य केले त्यांना या उत्सवाच्या अध्यक्षपदी विराजमान करून उत्सवाने नारायणरावांचा गौरव केला की स्वतःची प्रतिष्ठा वाढविली या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण आहे. एवढी गोष्ट खरी की उत्सवाच्या यशात नारायणरावांचा सिंहाचा वाटा आहे. अध्यक्ष होण्यास संमती दिल्यापासून नारायणरावांनी उत्सवाच्या प्रत्येक बाबतीत लक्ष घालून अडचणी दूर करण्याचा प्रयत्न केला. एवढेच नव्हे तर प्रथमतः उत्सवात सहभागी होण्यास कचरणाऱ्या प्रथम श्रेणीच्या कलाकारांना आवर्जून उत्सवात सहभागी होण्यास उद्युक्त केले. अध्यक्ष झाल्यावर नाटकात काम कसे करू असा संकोच तर नारायणरावांना वाटला नाहीच उलट त्यांच्या हौसेप्रमाणे सगळी नाटके करणे उत्सव मंडळाला अशक्य झाले. आपल्या हातखंडा स्त्री भूमिकांबरोबर एक पुरुष भूमिकाही—अर्जुनाची—नारायणरावांनी केली. अध्यक्ष हा कोणत्याही समारंभाचा केवळ नेता नसून कार्यकर्ताही असतो हे त्यांनी आपल्या वर्तनाने सिद्ध केले.

या महोत्सवाचे स्वागताध्यक्षपदी उत्सव मंडळाने आचार्य अत्रे यांची निवड केली होती. नारायणरावांप्रमाणेच अत्रे यांनी या साठी आवश्यक ते सर्व केलेच व त्यांच्या प्रमाणेच नाटकात भूमिकाही करून त्यात निराळाच रंग भरला.

या उत्सवाचे उद्घाटक होते नाट्याचार्य काकासाहेब खाडिलकर. प्रकृतिच्या अस्वास्थामुळे ते प्रत्यक्ष हजर राहू शकले नाहीत पण उद्घाटनपर भाषण त्यांनी लिहून पाठविले व ते त्यांचे चिरंजीव अप्पासाहेब खाडिलकर यांनी वाचून दाखविले. शिष्याच्या

अध्यक्षतेखाली होणाऱ्या मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरिक उत्सवाच्या उद्घाटनाचे मंत्र गुरुने—मराठी रंगभूमीच्या नाट्याचार्याने, म्हणणे ही परम भाग्याचीच गोष्ट होय.

उत्सव समितीचे कार्याध्यक्ष होते संघाध्यक्ष ले० क० प्रा० अ० वा० गजेंद्रगडकर. या उत्सवाचे मुख्य आधारस्तंभ तेच होते. त्यांनी सर्व कामे केली ती पडद्याआडूनच. उत्सवाची जबाबदारी शिरावर घेताना जेव्हा संघाचे कार्यकारी मंडळ कांकू करीत असे तेव्हा स्वतःच्या उत्साहरूपी करांगुलीच्या आधाराने त्यांनी हा उत्सवाचा गोवर्धन कार्यकारी मंडळास आपल्या शिरावर घ्यावयास लावला एवढेच नव्हे तर बारीक सारीक गोष्टीतही निर्णय घेताना संघाची इभ्रत, उत्सवाची थोरवी, कार्यकर्त्यांचा उत्साह, रसिक प्रेक्षकांच्या अपेक्षा व स्खलनशील मनुष्य स्वभाव या सर्वांचा तारतम्याने विचार करून उत्सवमंडळाचे नेतृत्व खंबीरपणे व यशस्वीपणे केले.

अशा या अतुलनीय उत्सवाचे खरे श्रेय कोणाला द्यावे असे विचाराल तर ते मराठी नाटकावर वेड्यासारखे प्रेम करणाऱ्या रसिक प्रेक्षकांना. ५००० ते ८००० माणसांची (स्त्री-पुरुषांची) सतत पंधरा दिवस उत्तमोत्तम पोषाक करून सुगंधाची बरसात करणारी ती प्रचंड गर्दी!! मराठी रंगभूमीचा इतर रंगभूमींनी हेवा करावा असेच ते दृष्य होते. हिंदी रंगभूमीवरील प्रख्यात अभिनेते श्री पृथ्विराज कपूर यांना तर हा सोहळा पाहून आनंदाश्रू आवरेनात. व उत्सव संपल्यावर एक दिवस हे प्रेक्षागार पृथ्वि थिएटर्सचे 'दिवार' नाटक करण्यासाठी देण्याचा आग्रह त्यांनी धरला व त्याला संघाने प्रतिसादही दिला त्यामुळे पृथ्विराजांना धन्य वाटले.

साहित्य संघाच्या या उत्सवात पहिले तिकीट होते १००० रुपयाचे तर अखेरचे तिकीट होते २५ रुपयाचे. या उत्सवातून खर्चवेच वजा जाता संघ मंदिराच्या प्रधान उद्देशासाठी सुमारे ४६००० रुपयांचा निधी उभा राहिला.

या उत्सवाची सुरुवात होणार होती १४ एप्रिल १९४४ ला. परंतु १४ एप्रिलला मुंबईच्या गोदीत प्रचंड स्फोट झाल्याने हा उत्सव १५ एप्रिल रोजी सुरू झाला होता. सुरुवातीला विघ्न आले नंतर मात्र हा उत्सव निर्विघ्नपणे पार पडला.

शेकडोंच्या सहकार्याने हा उत्सव साकारला खरा; पण या उत्सवाचे खरे कल्पक सूत्रधार होते संघाचे संस्थापक चिटणीस डॉ० अमृत नारायण भालेराव. डॉक्टरांना वगळून या उत्सवाची कल्पनाच करता येत नाही. भव्य स्वप्ने पाहणे, त्या स्वप्नपूर्तीसाठी अविश्रांत धडपड करणे व सर्व सहकाऱ्यांत दुर्दम्य आत्मविश्वास निर्माण करण्याचे सामर्थ्य ही डॉक्टरांची बलस्थाने. असा नेता संस्थेस महद्भाग्यानेच प्राप्त होत असतो. त्यांचे मराठी रंगभूमीवरील ऋण वर्षानुवर्षे आपल्या शिरावर धारण करणेच नाट्य रसिक पसंत करतात यातच त्यांचे मोठेपण जाणवते.

१९४४ साली हेमंत व्याख्यानमाला मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय व वाङ्मय सेवा मंडळ यांच्या सहकार्याने आयोजित केली होती तर संघदिनासाठी महनीय प्रवक्ते म्हणून म्हणून सुप्रसिद्ध विनोदी लेखक प्रा० चिं० वि० जोशी हे होते. या वर्षीचे संघ

पारितोषिक ललितेतर विभागासाठी श्री० प्रभाकर पाध्ये यांच्या 'पाकिस्तान की पन्नास टक्के" व श्री० बापूराव नाईक यांच्या 'कागद' या पुस्तकास विभागून देण्यात आले.

दि० ११ नोव्हेंबर १९४४ रोजी झालेल्या वार्षिक साधारण सभेत संघाच्या घटनेत फेरफार करण्यासंबंधी विचार होऊन संघाच्या उद्देशाची कलमे अधिक स्पष्ट करण्यात आली. त्याच प्रमाणे संघाच्या द्रव्यनिधी संबंधीच्या कलमांची पुनर्रचना करण्यात आली.

याच सभेत 'मुंबई मराठी साहित्य संघ' ही संस्था सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्टखाली नोंदविण्यात यावी त्याचप्रमाणे संघाचे विश्वस्त नेमण्यात येऊन संघाची स्थावर जंगम मिळकत सदर विश्वस्तांच्या नावे ठेवण्यात यावी असे ठरविण्यात आले होते.

१९४३ पर्यंत संघाचे हिशोब तपासनीस म्हणून श्री वामनराव देशपांडे ऑडिटर हे काम पहात असत. त्यांच्याच आग्रहावरून ते भागिदार असलेल्या बाटलीबॉय आणि पुरोहित या कंपनीकडे हिशोब तपासणीचे कार्य सोपविण्यात आले ते अद्यापही हीच कंपनी करीत असते.

१९४४ साली संघाने चर्चा मंडळाचा संघटित रीतीने उपक्रम सुरू केला. चर्चामंडळाच्या बैठकी महिन्यातून दोनदा पहिल्या व तिसऱ्या शनिवारी, मुंबईस संघ कार्यालयात व दादर येथे भरविण्याचे ठरले.

१७ मार्च १९४५ च्या वार्षिक सभेत रंगभूमीच्या शतसांवत्सरिक उत्सवाच्या जमाखर्चाच्या बाबतीत व शिलके बाबतीत आवश्यक ठराव करण्यात आले. १६ जून १९४५ च्या साधारण सभेत साहित्य संघाने दरसाल मराठी नाट्य वार्षिकोत्सव साजरा करावा असे ठरविण्यात आले.

११ ऑगस्ट १९४५ च्या साधारण सभेत संघाचे विश्वस्त म्हणून १) ले० क० अ० वा० गजेन्द्रगडकर २) श्री रामराव गणपतराव विजयकर ३) डॉ० अ० ना० भालेराव ४) ॲ० भा० ना० गोखले व ५) डॉ० गं० मा० फडके यांना नेमण्यात आले. याच सभेत १९४१ साली भरविलेल्या नाट्य संमेलनास जी तूट आली होती तीची जबाबदारी संघाने स्वीकारली. सांगलीच्या शतसांवत्सरिक उत्सवाचे वेळी ठरल्यानुसार ५ नोव्हेंबर हा दिवस रंगभूमी स्मृतिदिन म्हणून साजरा करण्याची प्रथा संघाने अवलंबिली.

कै० गो० ग० आगरकर यांची ५० वी पुण्यतिथी संघाने साजरी केली. आचार्य भागवत यांचे 'आगरकरांचा बुद्धिवाद' हा विषयावर भाषण झाले. व दुपारी दामोदर हॉल परळ येथे 'हॅम्लेट' नाटकाचा प्रयोग करण्यात आला.

१९४६ सालच्या वार्षिक सभेने संघातर्फे 'साहित्य' नावाचे द्वैमासिक सुरू करण्याचे ठरविले. संघ मंदिराकरिता जागा पसंत करून विकत घेण्याकरिता 'भूमि समिती' नेमली.

१५ ऑगस्ट १९४७ या दिवशीं भारत इंग्रजांच्या दास्यातून मुक्त होऊन स्वतंत्र

झाला. संघाने हा स्वातंत्र्योत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला.

१९४७ साली नोव्हेंबर महिन्यात संघाच्या स्थापने पासूनचे संघाध्यक्ष व कार्याध्यक्ष लें० क० अ० बा० गजेन्द्रगडकर यांचे आकस्मिक दुःखद निधन झाले. प्राचार्य गजेन्द्रगडकरांचा अनेक संस्थाशी कमी अधिक प्रमाणात संबंध होता पण जिला त्यांनी जन्माला घातली, मरेपर्यंत जिच्या कार्याची धुरा वाहून त्यांनी लहानची मोठी केली व नांवारुपास चढविली अशी मुंबई मराठी साहित्य संघ ही एकच संस्था आहे. साहित्य संघ अस्तित्वात येण्यास्तव, त्यास विशिष्ट दर्जा प्राप्त होण्यास कै० गजेन्द्रगडकर यांचे व्यक्तिमत्व व निर्भिड, धीरगंभीर, करारी, उत्साही नि अचूक नेतृत्व कारणीभूत झालेले आहे. त्यांच्या अकाली मृत्यूमुळे संघाचे फार मोठे नुकसान झाले.

नंतर कार्यकारी मंडळाने वार्षिक सभेच्या आदेशानुसार कै० गजेन्द्रगडकर यांच्या स्मारकाची योजना आखली. या योजनेनुसार एक संदर्भ ग्रंथालय सुरु केले. त्यांचा अर्धपुतळा तयार करून संदर्भ ग्रंथालयात ठेवला व विशारद परीक्षेत पहिल्या वर्गात पहिला येणाऱ्या विद्यार्थ्यास रु. १०० चे पारितोषिक देण्याचे ठरले.

डिसेंबर १९४५ मध्ये भरलेल्या मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलनाच्या ९ व्या अधिवेशनात भाषावार प्रांत रचनेसंबंधात पुढील ठराव संमत करण्यात आला होता. ' आगामी प्रांतीय निवडणुकी आटोपतांच त्यांत निवडून आलेल्या प्रतिनिधींची स्वतंत्र हिंदुस्थानची भावी राज्यघटना तयार करण्याकरीता एक घटना समिती अस्तित्वात आणण्याबाबत ब्रिटिश सरकारतर्फे अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. ही भावी राज्यघटना सांप्रत अस्तित्वात असलेल्या प्रांतीय मर्यादांच्या आधारावर करण्यात न येता ती भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वावरच करण्यात यावी अशी या परिषदेची आग्रहाची मागणी आहे.' याच प्रमाणे जानेवारी १९४७ मध्ये भरलेल्या याच संमेलनाच्या १० व्या अधिवेशनात पुढील ठराव संमत करण्यात आला.

' भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न जितका चालढकलीवर टाकला जाईल तितका तो सोडविणे कठीण जाईल म्हणून हिंदुस्तानची घटना ठरविली जात असतांच नवी प्रांतरचना करण्यात यावी. व मराठी भाषा बोलणाऱ्यांचा एक प्रांतिक घटक करण्याचे प्रयत्न करावे अशी घटना समितीवरील महाराष्ट्रीय सभासदांस विनंती करावी ' असा ठराव प्रा० अनंत काणेकर यांनी मांडला. श्री० प्रभाकर पाध्ये यांनी ' व भावी महाराष्ट्रात मुंबई समाविष्ट करावी ' अशी उपसूचना मांडली. ' व संयुक्त महाराष्ट्राची राजधानी मुंबई असावी ' अशी उपसूचना श्री० आप्पा पेंडसे यांनी सुचविली. श्री० पर्वते यांनी मूळ ठरावास अनुमोदन दिल्यावर ठराव दोन्ही उपसूचनासहित संमत करण्यात आला.

१९४७ च्या जानेवारी महिन्यापासून संघाने एक नवा उपक्रम हाती घेतला पूर्वी सुरुवातीस संघाचे मुखपत्र ' वीणा ' या नांवाने प्रसिद्ध होत असे. त्याच उपक्रमाचे पुनरुज्जीवन करून ' साहित्य ' या नांवाने द्वैमासिक सुरू करण्यात आले. जानेवारी व

एप्रिल हे दोन खास अंक स्वतंत्र प्रकाशने म्हणून प्रसिद्ध केल्यावर जून महिन्यापासून द्वैमासिक श्री० वा० रा० ढवळे यांच्या संपादकत्वाखाली सुरू झाले.

१९४८ साली मुंबईत संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे अधिवेशन डॅ० रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली शिवाजी पार्क वर भरले होते. सदर अधिवेशनाच्या पदाधिकाऱ्यांत संघ सदस्य मोठ्या प्रमाणात होते. लालजी पेंडसे या अधिवेशनाचे कार्यवाह होते. तर श्री० शं० नवरे उपाध्यक्ष होते. डॉ० भालेराव करमणूक समितीत होते. चित्रकार द० ग० गोडसे व श्री० शं० ना० अंधृटकर यांचेवर प्रदर्शनाची जबाबदारी होती. संघ सदस्यांनी या अधिवेशनात मोठ्या संख्येने भाग घेऊन अधिवेशन यशस्वी करण्यास सर्वतोपरी साहाय्य केले होते. 'संयुक्त महाराष्ट्र' चळवळीची मुहूर्तमेढ संघानेच आपल्या साहित्य संमेलनात दोन वेळेस ठराव करून रोविली होती.

१९४९ साली नाट्य विषयक कार्य सातत्याने करण्यासाठी संघाने नाट्यशाखेची स्थापना केली. श्री० शं० ना० अंधृटकर हे प्रथमपासून नाट्य शाखेचे कार्यवाह म्हणून काम करीत होते. नाट्य शाखेतर्फे नाट्य शिक्षण वर्ग सुरू करण्यात आले. या वर्गांना श्री० केशवराव दाते, नानासाहेब फाटक, श्री० मामा पेंडसे, श्री० के० नारायण काळे, श्री० पार्श्वनाथ आळतेकर आदि व्याख्याने देत असत. याच वर्षी मुंबईस भरलेल्या प्राच्यविद्या परिषदेसाठी आलेल्या विद्वान पंडितांचा संघाने सत्कार केला.

दरसाल होणारा नाट्य वार्षिकोत्सव यावर्षी एकाच वेळी मुंबई व दादर या दोन ठिकाणी साजरा करण्यात आला.

१३ आक्टोबर १९५० रोजी झालेल्या वार्षिक साधारण सभेने जागेसंबंधी पुढील ठराव केले. "संघ मंदिरासाठी भूमिसमितीने ठरविलेले सेंटपीटर्स आर्मेनियम चर्चच्या केळेवाडीतील सेंट टेरेसा हायस्कूल शेजारील सुमारे २३०० चौरस वाराचे दोन जमिनीचे तुकडे १४० रुपये चौरसवार व निम्माखर्च याप्रमाणे खरेदी करण्यास ही सभा संमती देत आहे." "तसेच संघमंदिराची रुपरेषा ठरविणे, त्यासाठी लागणारे नकाशे तयार करणे व त्या बरहुकूम एकदम अथवा भागशः मंदिर उभारणे, ह्या बांधकामासाठी आवश्यक ते करारमदार करणे, मंदिराकरिता लागणारा निधी देणगी रूपाने, कर्जाऊ किंवा संस्थेची मालमत्ता तारण ठेऊन उभा करणे इत्यादि अधिकार कार्यकारी मंडळास देण्यात येत आहेत."

हे दोन्ही ठराव एकमताने संमत करण्यात आले. या वर्षीच्या संघदिनाचे महनीय प्रवक्ते म्हणून त्या वेळी भारत सरकारात कायदेमंत्री असलेले डॉ० भीमराव रामजी आंबेडकर यांची नियुक्ती करण्यात आली होती परंतु ऐनवेळी सरकारी कार्यबाहुल्यामुळे ते येऊ शकले नाहीत.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या आदेशाप्रमाणे संघाने मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय व

ज्ञानलता मंडळाच्या सहकार्याने दि० ८, ९ व १० मार्च १९५० ला विल्सन हायस्कूलच्या आवारात 'संत तुकाराम' यांची त्रिशत सांवत्सरिक जयंती साजरी केली या निमित्त दि० ८ मार्च रोजी श्री० पु० मं० लाड यांचे "तुकाराम वाङ्मयातील काव्य" या विषयावर भाषण झाले. दि. ९ मार्च रोजी श्री. म. भा. भू. आजगावकर यांचे "तुकाराम चरित्र आणि कार्य" या विषयावर भाषण झाले. दि. १० मार्च रोजी प्रा. न. र. फाटक यांचे "तुकारामाच्या शिकवणुकीचा आणि वाङ्मयाचा तौलनिक विचार" या विषयावर भाषण झाले.

संत तुकारामाचा मराठी माणसाच्या भावजीवनावर केवढा प्रभाव आहे व मराठी माणूस संत मालिकेत अग्रणी असलेल्या संत तुकारामाचा किती ऋणी आहे याचे यथायोग्य दर्शन या भाषणांनी झाले.

पुणे येथे १९४९ साली भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या ३२ व्या अधिवेशनाचे वेळी दिलेल्या आमंत्रणानुसार हे ३३ वे अधिवेशन मुंबई येथे १९५० साली भरविण्यात आले. या संमेलनाच्या अधिवेशनाची पूर्व तयारी कार्यकारी मंडळाने ऑगस्ट १९४९ पासूनच सुरू केली होती. यासाठी नेमलेल्या समितीने कार्याच्या सुकरतेसाठी पुढील समित्या नियुक्त करून कार्यास प्रारंभ केला.

१) साहित्य समिती २) प्रदर्शन समिती ३) करमणूक समिती ४) नियम समिती.

साहित्य समितीने मुख्य संमेलनाबरोबरच शाखा संमेलने भरविण्याचा व १९२० ते १९५० पर्यंतचा मराठी कवितेचा प्रातिनिधिक असा काव्य संग्रह 'मराठी कविता' या नावाने प्रकाशित करण्याचे ठरविले.

प्रदर्शन समितीने मुंबईचा विकास, संयुक्त महाराष्ट्र आणि पुस्तकांच्या मलपृष्ठांची चढाओढ जाहीर केली. करमणूक समितीने, संगीत, नृत्य, नाट्य, काव्यगायन यांच्या द्वारे प्रतिनिधींच्या मनोरंजनाची रूपरेषा आखली तर नियम समितीने संमेलनासाठी नियम तयार केले.

या सर्व समित्यांनी कार्य करताना हे अधिवेशन आदर्श अधिवेशन व्हावे अशी महत्वाकांक्षा बाळगिली होती.

ह्या पूर्वतयारीनंतर स्वागत सभासद नोंदण्याचे कार्य सुरू झाले. यावेळी वार्षिक नाट्योत्सवाची धामधूम चालूच होती त्याचे जोडीलाच संमेलनाची धामधूम सुरू झाली. संमेलन नाट्योत्सवाच्या मंडपांत भरण्याचे ठरल्यामुळे नाट्योत्सवाच्या मंडपाचा आकार वाढविण्यात आला. शाखा संमेलने विल्सन हायस्कूलचे आवारात स्वतंत्र मंडप घालून घेण्यात आली. प्रतिनिधींचे निवासस्थान म्हणून विल्सन हायस्कूलची भव्य इमारत मुक्रर झाली व फडके गणपती मंदिरात प्रतिनिधींच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली.

१२ एप्रिल रोजी अध्यक्ष व स्वागताध्यक्ष यांची निवड करण्याचे ठरले होते. परिषदेकडून अध्यक्षपदासाठी तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी व राजकवी यशवंत ही दोन नावे आली होती परंतु तर्कतीर्थांनी आपले नाव आधीच मागे घेतल्याने कवी यशवंत

यांची अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड झाली.

स्वागताध्यक्ष म्हणून मुंबईचे प्रख्यात धन्वंतरी, मुंबई विद्यापीठाच्या सीनेटचे सदस्य, रसिक व्यासंगी, मराठीभाषा व महाराष्ट्र यांचे कट्टे अभिमानी आणि साहित्य संघाचे ज्येष्ठ सदस्य डॉ० भा० ग० वाड यांची स्वागत मंडळाने निवड केली.

महाराष्ट्राची रूपसंपदा नावाने प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे मुख्य अंग मुंबईचा विकास. ह्या विभागाच्या अवलोकनाने मुंबईच्या विकासात महाराष्ट्राचा वाटा केवढा प्रचंड आहे याची पूर्ण कल्पना येत असे. मुंबईचे आजचे वैभव, शैक्षणिक वाढ, कलाविषयक वाढ, सांस्कृतिक वाढ, या सर्वांसाठी महाराष्ट्राने किती हातभार लावला याची समग्र वाटचाल या प्रदर्शनाने प्रेक्षकांस आली. महाराष्ट्राच्या वाङ्मयीन, ऐतिहासिक, शैक्षणिक, राजकीय आणि सामाजिक व इतर चळवळींचा जिवंत व स्फूर्तिप्रद इतिहास ह्या प्रदर्शनाने प्रेक्षकांसमोर पुन्हा एकदा आला. ज्ञानेश्वर ते ज्ञानकोशकार केतकरांपर्यंत वाङ्मयीन क्षेत्रात प्रभुत्व गाजविलेल्या व्यक्तींच्या व अहमदनगरच्या चांदबिबीपासून १८५७ च्या राणी लक्ष्मीपर्यंत ऐतिहासिक व्यक्तींच्या प्रतिमा लावल्या होत्या. हिंदी असंतोषाच्या जनकापासून ४२ च्या क्रांतीवीरापर्यंत महाराष्ट्राने केलेली राजकीय चळवळ प्रेक्षकांना दिसत होती. सामाजिक क्षेत्रात महात्मा ज्योतिबा फुले आणि आगरकर अग्रभागी दिसत होते.

आणि शेवटी महाराष्ट्राची होणारी राजधानी मुंबापुरी ही महाराष्ट्राची कशी याचे पुरावे लावले होते. या विभागामुळे संयुक्त महाराष्ट्राचे दर्शन प्रेक्षकांना संपूर्णपणे होत असे.

याशिवाय अनेक कलाकौशल्याचे दुर्मिळ नमुने, ऐतिहासिक हस्ताक्षरे, साहित्यिकांची हस्ताक्षरे, दुर्मिळ ग्रंथ व संमेलनाचे अध्यक्ष राजकवी यशवंत यांचे समग्र वाङ्मयही प्रदर्शनात मांडले होते.

पुस्तकाच्या मलपृष्ठाच्या चढाओढीत अनेकांनी भाग घेतला होता यातून तीन मलपृष्ठांना पारितोषिके देण्यात आली.

प्रदर्शनाचे उद्घाटन रियासतकार श्री सरदेसाई यांच्या हस्ते २८ एप्रिल १९५० रोजी सायंकाळी ६॥ वाजता झाले. महाराष्ट्राच्या इतिहासाचे सुंदर विवेचन करून अशा प्रकारच्या प्रदर्शनांना कायमचे स्वरूप दिले तर विद्यार्थ्यांना इतिहास शिकवणे फार सुलभ होईल असे त्यांनी भाषणात प्रतिपादले. प्रदर्शन १६ मे पर्यंत प्रेक्षकांसाठी खुले होते. हजारो प्रेक्षक हे प्रदर्शन पाहून संतुष्ट झाले.

दि० ११ मे रोजी रात्रौ ८-३० वाजता संमेलनास प्रारंभ झाला. प्रास्ताविक कार्यवाही नंतर स्वागताध्यक्ष व अध्यक्ष यांची भाषणे झाली. स्वागताध्यक्षांनी आपल्या भाषणात उपस्थितांचे अंतःकरणपूर्वक स्वागत करून आणि मुंबईचा वाङ्मयीन वारसा सांगून, मायबोलीचे, महाराष्ट्राचे व आपल्या देशाचे वैभव वाढवून स्वातंत्र्याचा फायदा सर्वांना सारखा मिळावा हे ध्येय गाठण्याकरिता आपल्या स्फूर्तिदायक व प्रभावी

साहित्याचा उपयोग करा, अशी विनंती त्यांनी साहित्यिकांना केली. मुंबई महाराष्ट्राचीच आहे अशी निःसंदिग्ध घोषणा त्यांनी आपल्या भाषणाच्या अखेरीस केली.

व्यासपीठावर संमेलनाचे भूतपूर्व अध्यक्ष म० म० दत्तोपंत पोतदार, आचार्य जावडेकर, श्री० भाऊसाहेब खांडेकर, आचार्य अत्रे, प्रा० न० र० फाटक, श्री० माडखोलकर, व शाखा संमेलनांचे नियोजित अध्यक्ष प्रा० कृ० पां० कुलकर्णी, श्री० बा० सी० मर्ढेकर, श्री० दिवाकर कृष्ण, श्री० बाबुराव पराडकर, प्रा० कुसुमावती देशपांडे, व संघाध्यक्ष प्रा० द० के० केळकर इत्यादि मान्यवर साहित्यिक होते. तर उपस्थितात म० म० श्री० पां० वा० काणे, श्री० त्र्यं० र० देवगिरीकर, श्री० शंकरराव देव, श्री० पु० मं० लाड, आचार्य भागवत, श्री० नानासाहेब कुंटे, श्री० नानासाहेब मोडक, महाराष्ट्राचे महसूल मंत्री श्री० भाऊसाहेब हिरे, श्री० यशवंतराव चव्हाण, प्रा० रा० श्री० जोग, प्रा० क्षीरसागर प्रभृति दिसत होते.

अध्यक्षांच्या भाषणानंतर काव्यगायनाच्या चढाओढीतील यशस्वी उमेदवारांचे काव्यगायन, श्री० लक्ष्मीबाई केळकर यांच्या गौळणी, श्री० फुलाजी बुवा आणि मंडळीचे भजन इ० कार्यक्रम झाले.

या संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणून ज्या उपक्रमाचा उल्लेख करता येईल असा उपक्रम म्हणजे शाखा संमेलने. ही संमेलने विल्सन हायस्कूलच्या मंडपात भरत होती. या शाखा व शाखा संमेलनांचे अध्यक्ष पुढीलप्रमाणे होते.

'भाषा व व्याकरण'—अध्यक्ष प्रसिद्ध वैय्याकरणी प्रा० कृ० पां० कुळकर्णी.

'काव्य'—अध्यक्ष श्री० बा० सी० मर्ढेकर.

'कथा वाङ्मय'—अध्यक्ष श्री० दिवाकर कृष्ण.

'वृत्तपत्र वाङ्मय'—अध्यक्ष श्री० बाबुराव पराडकर.

'टीका वाङ्मय'—अध्यक्ष प्रा० कुसुमावती देशपांडे.

या शाखा संमेलनात अध्यक्षांच्या भाषणाशिवाय त्या त्या शाखेतील विद्वानांनी आपआपले निबंध सादर केले व त्यावर चर्चा केल्या.

करमणुकीच्या कार्यक्रमात विविध नाटकातील प्रवेश, शाहीर नानिवडेकरांचे पोवाडे, नृत्य इ० कार्यक्रम झाले. खुल्या अधिवेशनांत एकूण १० ठराव मांडण्यात आले होते. या ठरावात संयुक्त महाराष्ट्रासंबंधीचा ठराव म० म० दत्तोपंत पोतदार, श्री० लालजी पेंडसे श्री० श्री० शं० नवरे व आचार्य अत्रे यांनी मांडला होता.

प्रतिथयश कवींच्या काव्यगायनाच्या कार्यक्रमात कवि यशवंत, आचार्य अत्रे, सौ० संजीवनी मराठे, कवि गिरीश, कुसुमाग्रज, श्री० मर्ढेकर, श्री० दत्तप्रसन्न कारखानीस, श्री० पु० शि० रेगे, श्री० विंदा करंदीकर इ० कवींनी भाग घेतला होता.

शेवटच्या रात्री श्री० वि० वा० शिरवाडकर यांच्या 'वैजयंती' नाटकाचा प्रयोग मुद्दाम ठेवण्यात आला होता. या प्रयोगात श्री० दुर्गाबाई खोटे, श्री० नानासाहेब फाटक, श्री० मामा पेंडसे आणि मा० दत्ताराम यांच्या भूमिका होत्या. हा प्रयोग साहित्य संघाच्या

नाट्य शाखेने सादर केला होता. उत्कृष्ट नाटक आणि उत्कृष्ट प्रयोग यांचे हे मीलनच होते याचे प्रत्यंतर म्हणजे प्रयोग संपल्यावर ५,००० प्रेक्षक उभे राहून सुमारे ५ मिनिटे टाळ्यांचा गजर करून आपली पसंती दर्शवीत होते.

या संमेलनात अध्यक्षांना पुस्तके घेण्यासाठी ५०० रुपयाची भेट सन्मानपूर्वक देण्यात आले. या संमेलनाने आदर्श संमेलनाचा पायंडा पाडला असे म्हणणे अतिशयोक्तीचे होणार नाही असा विश्वास वाटतो. या संमेलनाचे स्वरूप ठरविताना प्रा० वा० ल० कुलकर्णी, प्रा० रा० भि० जोशी यांचे साह्य झाले. १९५० साली संघाने दिल्ली व ग्वाल्हेर येथे भाऊबंदकी व संशय कल्लोळ या नाटकांचे प्रयोग केले. अर्थोत्पादनापेक्षा त्या ठिकाणच्या महाराष्ट्रीयांना मराठी रंगभूमीचे दर्शन दीर्घ कालावधीनंतर घडवून देण्याचे व तेथील मराठी शाळांना मदत करण्याचे श्रेय संघास मिळाले.

१९५० साली मुंबईस भरलेल्या कन्नड साहित्य संमेलनाच्या निमित्ताने उपस्थित झालेल्या कन्नड साहित्य सेवकांचा संघाच्या वतीने दि० २८ डिसेंबर १९५० रोजी सत्कार करण्यात आला. यावेळी संमेलनाचे अध्यक्ष श्री० गोविंद पै, श्री० श्रीनिवासमूर्ती, मास्ती व्यंकटेश अय्यंगार, श्री० व्ही० डी० नाईक, श्री० पुरोहित रामाचारी, श्री० राघवाचार्य, प्रि० धारणींद्रम, श्री० सुब्रम्हण्यशास्त्री, प्रा० माळवाड व प्रिं० गोकाक इ० कन्नड साहित्यसेवक हजर होते.

सुप्रसिद्ध इंग्लिश नट नार्मन मार्शल व ब्रिटीश ड्रामा लीगचे श्री० न्यूटन हे आपल्या सहकाऱ्यासमवेत हिंदुस्तानच्या दौऱ्यावर आले असता त्यांचा संघातर्फे सत्कार करण्यात आला. त्यांना भाऊबंदकी, सौभद्र, खडाष्टक, पतंगाची दोरी, संशयकल्लोळ इ० नाटकातील प्रवेश मुद्दाम दाखविण्यात आले. या समारंभास आचार्य अत्रे, श्री० के० नारायण काळे, श्री० मामा वरेरकर, श्री० चिंतामणराव कोल्हटकर, श्री० पार्श्वनाथ आळतेकर, श्री० दुर्गाबाई खोटे, श्री० वनमाला व कार्यकारी मंडळ व नाट्यशाखेचे सदस्य हजर होते.

सरकारी करमणूक कर माफ व्हावा, नाट्यगृह व नाट्यप्रयोगाबाबत इतर निर्बंधाच्या अडचणींचा परिहार करण्याबद्दल त्या वेळचे गृहमंत्री श्री० मोरारजी देसाई यांची शिष्टमंडळाने भेट घेऊन निवेदन दिले व सांगोपांग चर्चा केली. या शिष्टमंडळात श्री० केशवराव दाते, श्री० अ० ह० गद्रे, श्री० अनंत काणेकर, श्री० मो० ग० रांगणेकर, श्री० नानासाहेब फाटक, श्री० श्री० शं० नवरे, श्री० वा० रा० ढवळे, श्री० दि० वि० आमोणकर आणि डॉ० अ० ना० भालेराव आदि सदस्य होते. श्री० बाल गंधर्व व सौ० हिराबाई बडोदेकर यांनी आपली लेखी निवेदने दिली होती.

१९५१ साली पुण्यास नटवर्य केशवराव दाते यांच्या एकसष्टीनिमित्त जो नाट्योत्सव झाला त्यात संघाने 'वैजयंती' नाटकाचा प्रयोग विनामूल्य सादर केला होता.

१९५२ च्या नाट्यशिक्षण वर्गात श्री० के० नारायण काळे, श्री० पार्श्वनाथ आळतेकर, श्री० केशवराव दाते, श्री० गणपतराव बोडस, प्रा० वा० ल० कुलकर्णी, प्रा० वि० ह० कुलकर्णी, प्रा० अनंत काणेकर, प्रा० रा० भि० जोशी व श्री० गोविंदराव टेंबे यांनीं नाट्य शिक्षणाचे वर्ग घेतले होते.

संघाच्या १९४९ च्या वार्षिक साधारण सभेने दिलेल्या आदेशानुसार भूमिसमितीने जागेचा शोध करून जागेची निश्चिती केल्याचे आपण पाहिलेच होते. या जागेचा तपास लागल्यानंतर डॉ० भालेरावांनी आपल्या सहकाऱ्यांना ही जागा अत्यंत गुप्तता राखून दाखविली. फक्त रात्रीच ते सहकाऱ्यांना जागेवर नेऊन पाळीपाळीने दाखवीत असत. कारण गिरगावात मोकळ्या जागाच शिल्लक नव्हत्या आणि अनेक धनिक अशा जागांच्या शोधात होते, त्यांना या जागेचा वास न लागता ही जागा संघास मिळावी म्हणून त्यांनी खूप प्रयास केले. या कामी बॉम्बे लॉजचे मालक श्री ढवळे यांनी व श्री० सावे यांनी खूपच मेहनत घेतली होती. १० ऑक्टोबर १९५० रोजी रु० ३०,००० देऊन साठेखत करण्यात आले होते. जागेच्या आजूबाजूच्या मालकांकडून आलेल्या तक्रारींचा निकाल होण्यास बराच विलंब लागला त्यामुळे खरेदीचे काम लांबले. शेवटी २२ आक्टोबर १९५२ या दिवशी रु० १,१०,००० देऊन संघाने खरेदीखत केले. यापूर्वी त्यावेळची आर्थिक मंदी विचारात घेऊन व मोठा भाग निर्वेधपणे, विनासायास व लौकर रिकामा मिळण्याच्या दृष्टीने या दोन तुकड्यांपैकी अदमासे ६४ वाराचा लहान तुकडा स्वतः विकत न घेता मोठ्या तुकड्यातील भाडेकरी श्री० कदम यांना तो परस्पर विकत देण्याबद्दल आर्मेनियम चर्चच्या विश्वस्तांशी बोलणी करून संमती दिली. या मोबदल्यात श्री० कदम यांनी मोठ्या तुकड्यावरील एका टोकास असलेला त्यांचा कारखाना विक्रीखतानंतर जास्तीत जास्त १८ महिन्याचे आत हलविण्याचे मान्य केले. तीन वर्षांच्या अखंड धडपडीनंतर जागेचे खरेदीखत झाले. रु० १,४०,००० दिले. उरलेल्या रकमेची फेड करण्यासाठी आर्मेनियमचर्चच्या विश्वस्तानी कालावधी दिला. उरलेल्या रकमेवर व्याज देण्याचे संघाने मान्य केले होते.

भूमिप्रवेश समारंभाचा दिवस संघाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला. हा भूमिप्रवेश समारंभ मंगळवार दि० २७ आक्टोबर १९५२ रोजी सायंकाळी ६॥ वाजता आयोजिला होता. समारंभाचे अध्यक्ष म्हणून भारताचे मंत्री श्री० काकासाहेब गाडगीळ यांना नियुक्त केले होते. समारंभाचे पौरोहित्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले. जागेवर भव्य व्यासपीठ बांधले होते. श्री० काकासाहेबांच्या हस्ते भूमीचे पूजन करून संघाची जमीन ताब्यात घेण्यात आली. नंतर तर्कतीर्थांचे भूमीपूजनाच्या महत्वासंबंधी भाषण झाले. श्री० काकासाहेबांनी या दिवसाच्या महत्त्वाबद्दल विवेचन केले. समारंभास मुंबईचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई व महसूलमंत्री भाऊसाहेब हिरे उपस्थित होते. समारंभास संघ सदस्य व मुंबईतील प्रतिष्ठित निमंत्रित मिळून सुमारे दीड हजार लोक उपस्थित होते. कार्याध्यक्ष नवरे यांनी संघाचा इतिहास व संघाचे ध्येय सांगून ज्यांच्या

मदतीमुळे हा दिवस उगवला अशा सर्वांचे आभार मानले. रात्री सौभद्र, खडाष्टक, लग्नाची बेडी, त्राटिका, शिक्का कट्यार, या नाटकातील नाट्यप्रवेश करण्यात आले. यात श्री० केशवराव दाते, दुर्गाबाई खोटे, नानासाहेब फाटक, मा. दामले, राम मराठे, भालचंद्र पेंढारकर, वसंतराव जोगळेकर, वसंत ठेंगडी, सुमती गुते, कुसुम देशपांडे इत्यादि नटनटींनी भाग घेतला होता. या प्रसंगी श्री० केशवराव दाते यांनी भाषण करून नटांना स्वतःचे एक घर प्राप्त करून दिल्याबद्दल साहित्य संघाचे आभार मानले. संघाच्या वाटचालीतला हा एक महत्वपूर्ण दिवस होता यात शंका नाही.

१९४४ च्या मुंबई येथे होणाऱ्या मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरिक उत्सवासाठी काढलेल्या पहिल्या पत्रकात गिरगाव सारख्या प्रतिष्ठित वस्तीत व मध्यवर्ती ठिकाणी संघाच्या नित्य चळवळीस उपयोगी व नाट्यप्रयोगाची सोय असलेली इमारत बांधण्याची आपली मनीषा संघाने व्यक्त केली होती. या अनुसार चर्नीरोड स्टेशनपासून दोन मिनिटांच्या अंतरावर व गिरगावात मध्यवर्ती ठिकाणी जागा संपादन करून आपली प्रतिज्ञा काही अंशी संघाने पूर्ण केली. मंदिर बांधण्याच्या उरलेल्या कार्याच्या पूर्ततेसाठी भगीरथ प्रयत्न करावयास हवेत याची जाणीव कार्यकर्त्यांना निश्चितच होती. तथापि त्यापैकी एक पाऊल म्हणून जमिनीच्या दक्षिणेस एक ७०×४० फूट लांबी रुंदीची कच्ची इमारत सुमारे २५ हजार रुपये खर्चून बांधण्यात आली. यात संघाचे कार्यालय, गजेन्द्रगडकर स्मारक संदर्भ ग्रंथालय, प्राज्ञ विशारदवर्ग इत्यादि राहून शिवाय रात्री नाट्यप्रयोग करता यावेत अशी सोयही करण्यात आली. आर्थिक अडचणीमुळे तर त्यावेळी या वस्तूवर छप्परही टाकले नव्हते. शेवटी डॉ० भालेरावांनी स्वतःच्या व्यक्तिगत पतीवर रु० ४००० चे कर्ज काढून त्यांचे मित्र बाबुभाई यांच्याकडून छप्पर पावसाळ्यापूर्वी टाकून घेतले. संघाचा १९५२–५३ चा नाट्योत्सव याच उघड्या नाट्य-मंदिरात भरविला. नाट्यगृहासाठी खुर्च्या विकत घेण्यासाठी श्री० पु० ल० देशपांडे यांचे 'अंमलदार' हे नाटक नाट्यशाखेने बसविले होते. या नाटकाचे दिग्दर्शक होते डॉ. भालेराव. यात श्री दाजी भाटवडेकर, श्री अनंत वर्तक, श्री नाना अभ्यंकर, श्री दि० वि० आमोणकर, श्री अंधृटकर, श्री० त्रिं० के० गोखले, श्री० मोहन संझगिरी, श्री० बळवंत पाठारे, श्री० भोसले, श्री बावडेकर, श्री. बाबा कलगुटकर, श्री शिवा चिखलीकर, श्री राजा पटवर्धन, सौ० चारुशिला भाटवडेकर व सौ० ललिता केंकरे या संघाच्या कार्यकर्त्यांनी भूमिका केल्या होत्या. या नाट्यप्रयोगातून जे उत्पन्न मिळाले त्यातून सुमारे ३०० खुर्च्या विकत घेण्यात आल्या होत्या. हा नाट्यप्रयोग म्हणजे संघ कार्यकर्त्यांच्या अभिनय निपुणतेचे प्रतिकच म्हणावयास पाहिजे.

१९५२ साली ३, ४ व ५ मे रोजी मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलनाचे ११ वे अधिवेशन प्रसिद्ध कवयित्री श्री० इंदिरा संत यांच्या अध्यक्षतेखाली साजरे झाले. या संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व प्रतिनिधी 'जलतरंगिणी' या बोटीवर जमले, बोटीवरच अध्यक्षीय भाषण झाले. संमेलनाची सुरवात समुद्रप्रवासात करणारे हे एकमेव

संमेलन असेल. हा एक आगळाच अनुभव होता.

१९५३ साली रेल्वेच्या शताब्दीनिमित्त दिल्ली येथे खास प्रदर्शन भरले त्या प्रसंगी नाट्यप्रयोग करण्यासाठी रेल्वे बोर्डाने संघास आमंत्रण दिले होते. संघाने या आमंत्रणाचा स्वीकार करून 'खडाष्टक व भाऊबंदकी' हे दोन नाट्यप्रयोग केले. रेल्वेबोर्डातर्फे उपराष्ट्रपति डॉ० राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली कॉन्स्टिट्यूशन क्लब मध्ये कलावंताचा सत्कार करण्यात आला.

१९५३ पासून मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सहकार्याने 'शारदोत्सव' अश्विन शु० १ ते आश्विन शु० १० (दसरा) पर्यंत हा उत्सव साजरा करण्यास प्रारंभ केला.

१९५३ साली महाराष्ट्रात फार मोठा दुष्काळ पडला होता. यावेळी पीपल्स महाराष्ट्र फॅमिन रिलीफ कमिटी स्थापन झाली होती. यासाठी आयोजिल्या गेलेल्या नाट्योत्सवास संघाने विनामूल्य जागा दिली. इतरही सर्व प्रकारची मदत केली.

१९५३ सालात संघाध्यक्ष प्रा० न० र० फाटक यांनी 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' या विषयावर व्याख्यानमाला गुंफली.

श्री केशवराव दाते संघ कार्यात आस्थेने भाग घेत असत. काही वर्षे ते कार्यकारी मंडळाचेही सदस्य होते. त्यांच्या एकसष्टीनिमित्त पुण्यास झालेल्या समारंभातून त्यांना जे मानधन देण्यात आले ते ६,००० रु० व ३,००० रु० त्यांनी संघाकडे ठेव म्हणून ठेवले. यापैकी रु० ६,००० पुण्याच्या 'भरत नाट्य संशोधन' मंदिराच्या बांधकामासाठी देणगी म्हणून देण्यात आले तर रु० ३,००० च्या व्याजातून गरजू अपंग नटांना केशवरावांच्या सल्ल्याने मदत देण्यात येत असे.

१९५४ साली झालेल्या संघदिना निमित्त संघ सदस्यांची देहू व आळंदी या ठिकाणी सफर काढण्यात आली होती. या सफरीत संघाध्यक्ष न० र० फाटक, म० म० दत्तोपंत पोतदार आणि इतिहास संशोधक श्री० वा० सि० बेंद्रे हे प्रसिद्ध इतिहास संशोधक संघ सदस्यांसमवेत होते. त्यामुळे या ठिकाणच्या ऐतिहासिक महत्त्वाचे सभासदांना सखोल विवेचन मिळून त्यांच्या ज्ञानात भर पडली.

१९५४ साली भारत सरकारने एक राष्ट्रीय नाट्य महोत्सव साजरा करण्याचे ठरवून १४ भाषांतील नाटकांचे आयोजन करण्याचे ठरविले होते. यासाठी मराठी नाटकांची निवड करण्यासाठी मुंबईत एक नाट्यस्पर्धा आयोजिली होती. या स्पर्धेच्या परीक्षक समितीचे अध्यक्ष होते न्यायमूर्ती श्री० ग० स० राजाध्यक्ष. या समितीने साहित्य संघाचे 'भाऊबंदकी' व महाराष्ट्र नाट्य परिषदेचे 'शारदा' या दोन नाटकांची निवड केली. राष्ट्रीय स्तरावरील पहिलाच नाट्यमहोत्सव असल्यामुळे या उत्सवात संघाने भाग घेणे अगत्याचे आहे असा आग्रह संघहितैषी व संघाच्या नाट्यविषयक कार्यासंबंधी आस्था असणारे न्यायमूर्ती राजाध्यक्ष यांनी धरला होता. त्यांच्या प्रोत्साहनामुळेच संघाने या

स्पर्धेत भाग घेतला व त्यासाठी श्री० दुर्गाबाई खोटे व नटवर्य नानासाहेब फाटक या मराठी रंगभूमीच्या मोहऱ्यांना ड्रेस घातले होते. नाटकाचे दिग्दर्शक होते नटवर्य केशवराव दाते.

प्राथमिक स्पर्धेत निवड झाल्यावर प्रयोग सर्वांग परिपूर्ण होण्यासाठी डॉ० भालेरावांनी अटोकोट प्रयत्न करण्याचे ठरविले. नवीन नेपथ्य, ऐतिहासिक वेषभूषा व आभूषणे नवीन करण्याचे ठरविले. वास्तविक संघाची आर्थिक स्थिती हा खर्च करण्यास अनुकूल नव्हती परंतु पहिल्याच राष्ट्रीय स्पर्धेत आपण कुठल्याही अंगाने कमी पडून अपयश पदरी येऊ नये म्हणून विलक्षण जिद्दीने कामास प्रारंभ केला. चित्रकार गोडसे यांनी ऐतिहासिक वाडे, म्युझियममधील त्या काळातील पोषाख, दागिने यांचा अभ्यास करून नेपथ्य व वेशभूषा यांचे आराखडे तयार करून त्या बरहुकूम शनिवारवाड्यातील दालने आणि इतर स्थळे प्रत्यक्षात उभी केली. या सर्व साहित्यासह आणि नटवर्ग आणि सहाय्यक मिळून ५० माणसांच्या ताफ्यासह संघाने दिल्लीवर चाल केली. हा राष्ट्रीय नाट्य महोत्सव होता दिल्लीतील सप्रू हाऊसमध्ये. या ठिकाणचा रंगमंच नाट्यानुकूल नव्हता. त्यामुळे मुद्दाम नवीन तयार केलेल्या १४ फूटी फ्लॅट सीन्सची उंची कमी करून १२ फूटी करण्यात आली. अखंड २४ तास परिश्रम करून ही सारी तयारी दिल्लीत करावी लागली. या सभागृहाचे श्रुतिगुण उत्तम असल्याने प्रयोगाचे वेळी ध्वनिक्षेपक वापरावयाचे नाही असे डॉ० भालेरावांनी सहकाऱ्यांशी सल्लामसलत करून ठरविले. दिल्लीकर आयोजकांनी नापसंती व्यक्त करून प्रयोग ढासळण्याची भीती घातली होती परंतु डॉ० भालेरावांचा आपल्या कलाकारांच्या शब्दफेकीवर पूर्ण भरवसा होता. या निर्णयामुळे या स्पर्धेत हे एकच नाटक ध्वनिवर्धकाशिवाय झाले. प्रेक्षागृह खच्चून भरले होते. नाटकाचे अंकामागून अंक प्रेक्षकांची मने चढत्या श्रेणीने आकर्षून घेते झाले. नटांच्या शब्दातील चढउतारच नव्हे तर उसासेसुद्धा अखेरच्या रांगेतील प्रेक्षकांच्या कानावर यथायोग्य तऱ्हेने पोहचत होते. पहिल्या अंकातील नारायणरावाचा खून तर प्रेक्षकांना थरकावून गेलाच पण रामशास्त्र्याने राघोबाला दिलेली देहांत प्रायश्चिताची सजा प्रेक्षकांची मने जिंकून गेली. सर्वच प्रयोग दृष्ट लागण्यासारखा झाला. दृष्य आणि श्राव्य ही दोन्ही अंगे इतकी एकजीव झाली की नाटक संपल्यावर प्रेक्षकांनी सतत दीर्घकाल टाळ्या वाजवून आपल्या पसंतीचे प्रदर्शन केले. मुख्य कलाकारांनी आपल्या अभिनय नैपुण्याचे प्रदर्शन सुयोग्य केलेच परंतु अगदी भालदार चोपदारांची भूमिका करणाऱ्या छोट्या कलाकारांनी वडिलांना साथ देऊन प्रयोगाचा दर्जा उंचावून नेला. नाटक संपल्यावर परीक्षकांनी नेपथ्य आणि वेषभूषा यांचे ऐतिहासिकत्व तपासून घेतले. अनेक प्रश्न विचारले. पुरावे पाहिले आणि दिसले ते ऐतिहासिकच होते याची खात्री करून घेतली.

नाट्य परीक्षा संपली पण निर्णय काही कालाने लागणार होता. या 'भाऊबंदकी' बरोबरच संघाने दिल्लीकर मराठी प्रेक्षकांसाठी संघाच्या 'होनाजी बाळा' नाटकाचा प्रयोग सादर केला होता.

स्पर्धेच्या निर्णयाबाबत परीक्षक आणि आयोजक यात बराच वादविवाद झाला. 'भाऊबंदकी' नाटक पारंपारिक नाही हे म्हणण्यापर्यंत अनेकांनी मजल मारली परंतु परीक्षकांनी आपला निर्णय तावून सुलाखून घेतला होता. त्यामुळे परीक्षक आपल्या निर्णयावर ठाम होते. त्यांनी 'भाऊबंदकी' नाटकाला पारंपारिक विभागाचे प्रथम पारितोषिक जाहीर केले. थिएटर सेंटरने ठेवलेले हे पारितोषिक राष्ट्रपति राजेन्द्रप्रसाद यांच्या हस्ते संघाच्या वतीने श्रीमती दुर्गाबाई खोटे यांनी स्वीकारले. मराठी रंगभूमीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदण्याजोगी घटना घडवून आणण्याचे भाग्य साहित्य संघ आणि संघाचे कलाकार यांना मिळाले. अटकेपार मराठ्यांचा झेंडा फडकवणाऱ्या राघोबादादांच्या जीवनावर आधारलेल्या 'भाऊबंदकी' नाटकातील सर्वच कलाकारांनी आपल्या अभिनय नैपुण्याने मराठी नाटकाचा झेंडा राजधानी दिल्लीतही डौलाने फडकावला हा खराच मोठा योगायोग. यामुळे मराठी नाटक भारतीय नाटकांच्या तुलनेत अजोड ठरले आणि मराठी रंगभूमीचा दबदबा भारतभर पसरला.

पण...दिल्लीतच डॉ० भालेरावांना हृदय विकाराचा झटका आला होता. परंतु वेळेचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी त्याचा उच्चारही केला नाही इतकेच नव्हे तर साऱ्या कलाकारांसह हृषिकेश आणि हरिद्वार येथे जाऊन कडाक्याच्या थंडीत गंगास्नान करून आपले कर्तृत्व गंगार्पणाच्या भावनेने मराठी रंगभूमीच्या चरणी अर्पण केले.

भाऊबंदकीला प्रथम पारितोषिक मिळाल्याचे जाहीर झाल्यानंतर संघाने कलाकारांचा सत्कार करण्याच्या उद्देशाने एक समारंभ त्यावेळचे मुंबई राज्याचे राज्यपाल नामदार मंगळदास पक्वासा यांच्या हस्ते साजरा केला. त्या भाऊबंदकीच्या प्रयोगाचे वेळी सर्व कलाकार आणि सहाय्यक यांना चांदीची स्मृतिचिन्हे देण्यात आली. या समारंभाच्या वेळीं डॉ० भालेराव आजारी असताना देखील डॉक्टर्सच्या अनुमतीने विंगमधे आरामखुर्चीवर लेटून कलाकारांचे कौतुक करण्यासाठी हजर होते. जिवंतपणी डॉ० भालेरावांची ही संघमंदिरातील अखेरचीच उपस्थिती होती.

१९५४ साली नाट्योत्सवात शेक्सपिअरच्या मॅक्बेथ या नाटकाचा अनुवाद— 'राजमुकुट' सादर केले. याचे लेखक होते वि० वा० शिरवाडकर आणि दिग्दर्शक होते इंग्लिश रंगभूमीवर शेक्सपिअरच्या अनेक नाटकाचे दिग्दर्शक, प्रसिद्ध इंग्लिश नाट्य दिग्दर्शक श्री० हर्बर्ट मार्शल. मराठी रंगभूमीवर इंग्लिश नाट्य दिग्दर्शकाने मराठी नाटक दिग्दर्शित करण्याचा हा पहिला आगळावेगळा प्रयोग होता. याच उत्सवात श्री० चिं० य० मराठे लिखित व श्री० बाळासाहेब काळे दिग्दर्शित 'होनाजी बाळा' या संगीत नाटकाचा प्रयोग सादर केला. संगीत नाटकाच्या संदर्भात एक नवा ढंग संघाने सादर करून संगीत नाटकात नाविन्य निर्माण केले.

म० म० दत्तोपंत पोतदार यांनी साहित्य संघास कर्जाऊ म्हणून त्यांच्याकडे असलेली पुण्यातील शतसांवत्सरिक नाट्य महोत्सवातील शिल्लक रक्कम ठेव म्हणून ठेविली होती ती योग्य वेळीं परत करण्यात आली.

१९५५ साली संघाने ख्यातनाम नाटककार कै० गोविंद बल्लाळ देवल यांची जन्मशताब्दी साजरी केली. दि० ७ नोव्हेंबरला कै० देवलांच्या नाट्य संसारावर श्री० व० शां० देसाई, श्री० के० नारायण काळे व प्रा० वि० ह० कुलकर्णी यांची व्याख्याने झाली व कै० देवलांची सातही नाटके सात दिवस सादर केली. 'दुर्गा' व 'विक्रमोर्वशीय' ही विस्मृतीत गेलेली नाटके आवर्जून सादर केली गेली.

१९५५ साली मुंबई सरकारने हौशी नाट्य संस्थांच्या नाटकांच्या स्पर्धा सुरू केल्या. प्राथमिक व अंतिम स्पर्धा संघ मंदिरात झाल्या. या स्पर्धांची सर्व व्यवस्था संघाकडे सोपविण्यात आली होती. ही जबाबदारी उत्तम रीतीने पार पाडल्याबद्दल मुंबई सरकारने संघास धन्यवाद दिले.

या कालावधीत इमारत निधीसाठी देणग्या मिळविण्याचा उपक्रम आरंभिला होता. यासाठी मुंबईच्या रॉयल टर्फ क्लबने एक खास शर्यत ठेवून रु० १०,०००/– ची देणगी दिली. यामुळे इमारत निधी जमा करण्यास कार्यकर्त्यांना हुरूप चढला.

संघकार्याची कमान चढती असतानाच नियतीने एक जबरदस्त प्रहार संघावर केला. तो म्हणजे दि० २५ ऑगस्ट १९५५ रोजी संघाचे संस्थापक, २० वर्षे अखंडपणे असलेले कार्यवाह, संघाचे विश्वस्त, संघाचे सर्वश्रेष्ठ कार्यकर्ते आणि संघकार्याची चैतन्यमूर्ती डॉ० अमृत नारायण भालेराव यांचे दीर्घ आजारानंतर परंतु अकाली झालेले निधन. संघावर हा एक वज्राघातच होता. साहित्य संघाला जन्मास घालण्यापासून तो स्वतःचे निधन होईपर्यंत त्यांनी संघाच्या सेवेत सतत अहर्निश आणि सर्वांना बरोबर घेऊन केलेले कार्य अजोडच होते. खानदानी मोठेपणा, साहित्य आणि नाट्य यांचा चोखंदळपणे व रसिकतेने आस्वाद घेण्याची त्यांची क्षमता, न पटणाऱ्या गोष्टीवर समर्पकपणे टीका करण्याचे कौशल्य, नियोजित कार्यासाठी समर्थपणे नेतृत्व करण्याची धडाडी या साऱ्या गुणसमुच्चयाने त्यांनी सांस्कृतिक क्षेत्रात आपले स्थान अढळ केले होते. संघासाठी त्यांनी खाल्लेल्या खस्ता, सोसलेले कष्ट त्याचबरोबर आत्मकेंद्रित साहित्यिक आणि नट यांच्याकडून झालेली अवहेलना लक्षात न घेता त्यांना संघाच्या कार्यात सामावून घेऊन कार्यसिद्धी साधणारे डॉक्टर हे एक आगळेच व्यक्तीमत्व होते. मातृवात्सल्याने त्यांनी २० वर्षे संघाची जोपासना केली, शारीरिक अस्वास्थ्य व दुर्धर आजार यांनाही न जुमानता पोट तिडिकेने संघाच्या गौरवासाठी निष्ठापूर्वक आत्मत्याग करण्याची वृत्ती अजोड होती. तंदुरुस्त शारीरिक अवस्थेत ते अहोरात्र संघाची चिंता वाहत होतेच परंतु अखेरच्या आजारातही डॉक्टरांना काळजी होती ती संघाची. केवळ घरादाराची, मुलाबाळांची नव्हे. संघाने घेतलेल्या जागेचे देणे फिटले नव्हते. जागा लिलावात जाण्याचा संभव होता. कार्यकर्ते हताश झाले होते. काही स्वकीयच हितशत्रू बनून जागेच्या लिलावाकडे डोळे लावून होते आणि डॉक्टर मात्र विकलांग होऊन पडून होते. रात्री दोन तीन वाजता ते उठत व शेजारी बसलेल्या अंधूटकरला हाक मारीत. संघाचे देणे किती शिल्लक आहे याची चौकशी करीत. वेळ आली तर स्वतःचे घर विकून

व अंधृटकरची शेती गहाण टाकून हा पैसा उभा करायची त्यांची कल्पना होती. यास संमती आहे की नाही हे ते अंधृटकरला विचारीत. यासाठी त्यांनी घराचे कागदपत्र व अंधृटकरच्या शेतीचे सातबाराचे उतारे काढले होते. यावरून एकच ध्यानी येते त्यांनी अखेरच्या क्षणीसुद्धा चिंतन केले ते संघाच्या स्वास्थ्याचे. मनन केले ते संघाच्या हिताचे. या सर्वांचा विचार केला म्हणजे डॉ० भालेराव हे संघासाठीच जगले आणि संघासाठीच त्यांनी आत्मार्पण केले असे म्हणण्यात यत्किंचितही अतिशयोक्ती होणार नाही.

डॉक्टरांचा पार्थीव देह अंत्यदर्शनासाठी संघ मंदिरात आणून रंगमंचावर पुष्पाच्छादित मंचकावर ठेवला होता. मुंबईत हजर असलेल्या मुख्यमंत्र्यापासून तो सामान्य रसिकापर्यंत हजारो व्यक्ति अंत्यदर्शनार्थ आल्या. डॉक्टरांबद्दल लोकांना किती आत्मीयता वाटत होती याचे हे प्रत्यंतरच होते.

महाराष्ट्रातील व इतर ठिकाणच्या सर्व भाषिक प्रमुख वृत्तपत्रांनी डॉक्टरांना त्यांच्या कार्याबद्दल आदरांजली समर्पित केली. संघाने प्रकट शोकसभा आयोजिली होती. संघ सभासद आणि हितचिंतक यांनी सारे आवार फुलून गेले होते. सभेच्या सुरुवातीस संघाध्यक्ष प्रा० फाटक प्रास्ताविक करण्यासाठी उभे राहताच रंगमंचाच्या मागील बाजूस मुद्दाम तयार केलेले १६ × ३० फुटाचे डॉक्टरांचे तैलचित्र प्रकाशित झाले. सारा उपस्थित समाज मानवंदना देण्यासाठी मूकपणे अश्रुपात करू लागला. डॉक्टरांच्या भव्यतेचे हे प्रतीक दृष्टीस पडताच साऱ्या सुहृदांचे भानच हरपले. अनेक मान्यवरांनी डॉक्टरांना श्रद्धांजली अर्पण केली. साऱ्यांची भावना एकच होती आणि ती म्हणजे संघ कार्याबाबत डॉक्टरांच्या सर्व अपुऱ्या आकांक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांवर आणि त्यांच्या निकटवर्ती कार्यकर्त्यांवर इतकेच नव्हे तर साऱ्या मराठी समाजावर आहे. आणि खरोखरच कार्यकर्त्यांनी त्यांच्या भव्य प्रतिमेला साक्ष ठेऊन हे कार्य पूर्ण करण्याची प्रतिज्ञा मनोमनी घेतली.

या नंतर लगेच संघाचे एक कार्यकर्ते श्री० र० य० पेंढारकर यांचे मेंदूच्या रोगाने अकाली निधन झाले. संघाचे सेवक म्हणून त्यांनी १९४० पासून संघाची निष्ठापूर्वक सेवा केली आणि संघाच्या अनेकविध कार्यात हौसेने भाग घेऊन आपले सहकार्य मोठ्या कळकळीने दिले. त्यांच्यासारख्या निरलस, प्रामाणिक, कष्टाळू व हसतमुख कार्यकर्ता ऐन तारुण्यात निधन पावल्याने संघाच्या कामाकाजात उणीव न भासली तर नवलच.

७ ऑक्टोबर १९५५ रोजी भरलेल्या विशेष साधारण सभेने डॉ० अ० ना० भालेराव यांच्या निधनामुळे व श्री० रा० ग० विजयकर यांना ६० वर्षे पूर्ण झाल्यामुळे संघाच्या विश्वस्तापैकी रिकाम्या झालेल्या दोन जागावर श्री० दुर्गाबाई खोटे व डॉ० भा० नी० पुरंदरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

१९५६ सालातील संघाच्या दृष्टीने सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे जागा खरेदीच्या कर्जातून मुक्ती. १९५३ अखेर जागेच्या किंमतीपैकी रु. १२७९७९-७५ इतकी रक्कम

द्यावयाची बाकी होती. ५४ साली फक्त व्याजाचे रु० ६५२७–५७ इतकीच रक्कम दिली होती. १९५५ साली मुद्दलापैकी रु० ८७८७३–६० व व्याजाचे रु० ३४०५–७५ मिळून ९१२७९–३५ इतक्या रकमेची फेड केली. यासाठी सर्वसामान्य माणसालाही हातभार लावता यावा म्हणून रु० १ ते १० पर्यंतची देणगीची तिकीटे काढण्यात आली होती. या तिकीटाच्या रुपाने संघाच्या कार्यकर्त्यांनी देणग्या गोळा केल्या. या काळात संघाचे हितचिंतक, आश्रयदाते व तहहयात सभासद संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली. नाट्योत्सव आणि नाट्यशाखेची नाटके यांच्यामुळेही मोठी रक्कम जमा झाल्यामुळेच १९५५ साली संघ एवढी मोठी कर्जफेड करू शकला. दि० १३ एप्रिल १९५६ रोजी जमिनीच्या देण्यापैकी अखेरचा हप्ता संघाने सेंटपिटर्स आर्मेनियम चर्चच्या विश्वस्तांना देऊन कर्जमुक्ति केली. हा कर्जमुक्ति दिन दि० १९ एप्रिल १९५६ रोजी राज्यपाल हरेकृष्ण मेहताब यांच्या अध्यक्षतेखाली समारंभपूर्वक साजरा केला. संघाचे कर्णधार कै० डॉ० अ. ना० भालेराव यांनी सोडलेल्या संकल्पातील एक टप्पा यशस्वीरित्या पुरा केला. दुर्दैवाने हा दिवस पहावयास डॉ० भालेराव हयात नसले तरी त्यांच्या कार्याचे व प्रेरणेचेच हे फळ होय अशी त्यांच्या सहकाऱ्यांची व कार्यकर्त्यांची भावना होती.

१९५७ साली प्रथमच 'साहित्य' या वार्षिकाचे प्रकाशन करण्यात आले. यात १९५६ सालातील मराठी ललित वाङ्मयाचा समालोचनात्मक आढावा घेणारे लेख प्रतिथयश लेखकांकडून खास लिहून घेऊन प्रसिद्ध करण्यात आले होते.

भारत सरकारच्या नव्या कॉपीराईट विधेयकातील लेखकांना अन्याय करणाऱ्या भागाचा विचार करण्यासाठी मुंबईतील लेखकांची एक सभा दि. ५-१-५७ रोजी बोलाविण्यात आली होती. या सभेने एक उपसमिती नेमून साहित्य संघाला पुढील अधिकार दिले. (१) उपसमितीकडून निवेदन वा ठराव तयार करून घेणे. (२) उपसमितीने तयार केलेले निवेदन वा ठराव सरकारकडे लेखकांच्या वतीने पाठविणे. या प्रमाणे कार्यवाही करून संघाने हे निवेदन तयार करवून भारत सरकार कडे पाठविले.

म० सा० परिषदेने मराठी शुद्धलेखनासाठी नेमलेल्या समितीवर संघाच्या वतीने प्रा० वसंत दावतर यांना पाठवून सहकार्य केले.

दि० २६ जानेवारी १९५७ रोजी संघाच्या नाट्यशाखेने श्री० पु० ल० देशपांडे यांनी लिहिलेल्या 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकाचा प्रयोग सादर केला. या नाटकाचे दिग्दर्शन श्री० पु० ल० देशपांडे यांनी केले होते. या नाटकातील भूमिका संघाच्या हौशी कलाकारांनीच केल्या होत्या. या नाटकाचे एक वर्षात संघाने २६ प्रयोग सादर केले. हौशी कलाकारांच्या दृष्टीने ही अभूतपूर्व घटना होती. व मराठी रंगभूमीच्या संदर्भात ही घटना चिरस्मरणीय होती. या नाटकातील 'काकाजी'च्या भूमिकेने श्री दाजी भाटवडेकर हे प्रथम श्रेणीच्या कलाकारांच्या पंक्तीत जाऊन बसले. ह्या नाटकाच्या मुळे संघास फार मोठे आर्थिक साहाय्य झाले व श्री० पु० ल० देशपांडे प्रथम

श्रेणीचे नाटककार म्हणून ख्यातकीर्त झाले.

१९५८ पासून संघाने कै० डॉ० अ० ना० भालेराव स्मारक व्याख्यानमाला सुरू केली. ही व्याख्यानमाला मुख्यत्वेकरून रंगभूमि विषयक असावी असे ठरविण्यात आले. प्रथम पुष्प श्री० चिंतामणराव कोल्हटकर यांनी गुंफिले. १९५८ साली महर्षि अण्णासाहेब कर्वे यांनी ९ मार्च रोजी संघास भेट दिली त्यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला. तर प्रख्यात राजकीय पुढारी जयप्रकाश नारायण यांनी २१ एप्रिलला संघास भेट देऊन 'भूदान' संबंधी मराठी साहित्यिकांशी चर्चा केली. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला. ३ ऑक्टोबर रोजी भारताचे माहिती व नभोवाणी मंत्री श्री० बाळकृष्ण केसरकर यांनी भेट देऊन संघ कार्याबद्दल गौरवोद्गार काढले. या वेळी त्यांचा सत्कार करण्यात आला.

१ जानेवारी ५९ रोजी सुप्रसिद्ध हंगेरिअन लेखक ऑर्थर कोस्लर यांनी संघास भेट दिली. त्यावेळी मराठी, गुजराथी व हिंदी भाषातील मान्यवर साहित्यिक उपस्थित होते. यावेळी निरनिराळ्या साहित्य विषयक प्रश्नावर चर्चा करण्यात आली.

१९४४ साली संघाने मुलांचे नाटक बसविले होते. १९५८ च्या अखेरीस संघाने बालनाट्य शाखा सुरू करण्याचे ठरविले. ही शाखा श्रीमती सुधा करमरकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आली. श्री. रत्नाकर मतकरी लिखित 'मधुमंजरी' या नाटकाचा प्रयोग २ जानेवारी ५९ रोजी संघ मंदिरात झाला. या नंतर श्रीमती सुधा करमरकर लिखित 'जादुचा वेल' या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. बालनाट्याचे प्रयोगही संघानेच सुरू केले असे म्हणता येईल.

दि० ७ जानेवारी १९६० या दिवसाला संघाच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे स्थान राहील. या दिवशी संकल्पित संघ मंदिराचा कोनशिला समारंभ साजरा करण्यात आला. मंदिराची कोनशिला श्री० चिंतामणराव देशमुख, अध्यक्ष विद्यापीठ अनुदान मंडळ यांचे शुभहस्ते बसविली गेली. संस्कृत साहित्याचे व्यासंगी विद्वान, रसिक, आंतरराष्ट्रीय कीर्तिचे अर्थशास्त्रज्ञ व संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर भारताच्या अर्थमंत्री पदाचा राजीनामा देऊन तत्त्वनिष्ठ व दुसरे 'रामशास्त्री' म्हणून प्रख्यात झालेले, साहित्य संघाच्या अनेक उपक्रमांना स्वतः हजर राहणारे व संघाबद्दल आत्मियता असणाऱ्या सुयोग्य व्यक्तींच्या हस्ते कोनशिला बसविण्याचे भाग्य संघाला लाभले म्हणून प्रत्येक सभासदास धन्यता वाटली. या समारंभाचे अध्यक्षस्थानी मुंबई राज्याचे मुख्य मंत्री व लोकप्रिय कर्णधार श्री० यशवंतराव चव्हाण होते.

या समारंभासाठी संघाने श्री० म० दा० भट यांच्या अध्यक्षतेखाली एक स्वतंत्र समिती नियुक्त केली होती. समारंभाची आखणी निर्दोष व सुव्यवस्थित व्हावी यासाठी

समिती सदस्य व असंख्य कार्यकर्ते अहोरात्र परिश्रम घेत होते. या समारंभासाठी नुसते संघमंदिराचे आवारच नव्हे तर केळेवाडीचा सबंध रस्ताच सुशोभित करण्यात आला होता. गिरगावकडील केळेवाडीच्या नाक्यावर दाक्षिणात्य पद्धतीच्या मंदिराचे प्रवेशद्वार केले होते तर चर्नीरोडकडील प्रवेशद्वाराची रचना अत्याधुनिक पद्धतीने केली होती. संघमंदिराच्या आवाराचे प्रवेशद्वार पेशवाई पद्धतीने उभारले होते. सर्व रस्ता लतापल्लवांनी व वीजेच्या प्रकाश गोलांनी शृंगारण्यात आला होता. संघ मंदिराच्या प्रवेशद्वारावरील नगारखान्यात संघाचे प्रमुख संस्थापक व संवर्धक डॉ० भालेराव यांचा अर्धपुतळा श्री० आनंद पै यांनी तयार करून ठेवला होता. सारे आवार लतापुष्प-मालांनी व विद्युत्‌दीपांच्या मालिकांनी सुशोभित केले होते. कोनशिलेच्या मागील बाजूस डॉ० भालेरावांची प्रतिमा आशीर्वादासाठी सज्ज होती तर बाजूस नाट्यशाखेचे वेताने बनविलेले भव्य प्रतीक चिन्ह विराजमान होते. दुसऱ्या बाजूस संघाचे संस्थापक व पहिले अध्यक्ष ले० क० प्रि० अ० बा० गजेन्द्रगडकर यांचा अर्धपुतळा ठेवण्यात आला होता.

सुमधुर सनईच्या स्वरानी संघ मंदिरातील वातावरण भरून गेले होते आणि संघाचे सारे आवार संघ सभासद आणि मान्यवर निमंत्रित यांनी खेचाखेच भरले होते. रंगमंचाची, नाट्यदेवतेची व सरस्वती-गणेशाची पूजा नाटयशाखेचे कार्यवाह श्री० शं० ना० अंबूटकर यांनी केल्यावर महाराष्ट्रगीताने समारंभाची सुरुवात झाली. श्री० म० दा० भट यांनी श्री चिंतामणराव देशमुख व श्री यशवंतराव चव्हाण यांना व्यासपीठावर नेले. कार्याध्यक्ष प्रा० वि० ह० कुलकर्णी यांनी आलेल्या संदेशापैकी निवडक संदेश वाचून दाखविले. यात भारताचे राष्ट्रपती डॉ० राजेन्द्रप्रसाद, उपराष्ट्रपति डॉ० राधाकृष्णन, राज्यपाल ना० काकासाहेब गाडगीळ, राज्यपाल ना० हरिभाऊ पाटसकर, राज्यपाल ना० सुखठणकर, श्री मोरारजी देसाई, श्री स० का० पाटील, श्री० जत्ती आदींचे संदेश होते.

श्री म० दा० भट यांनी स्वागताचे भाषण करून श्री यशवंतराव चव्हाण यांना या या समारंभाचे अध्यक्षस्थान स्वीकारण्याची व श्री चिंतामणराव देशमुखांना कोनशिलान्यासाची विनंती केली. श्री चिंतामणरावांनी सर्व उपस्थितांच्या समोर कोनशिलेची विधीपूर्वक पूजा केली. पूजनप्रसंगी सौ० दुर्गाबाई देशमुख चिंतामणरावा समवेत होत्या. नंतर टाळयांच्या प्रचंड गजरात व वरून अखंड पुष्पवृष्टी होत असताना कोनशिलेची स्थापना करण्यात आली. श्री चिंतामणराव देशमुखांनी आपल्या भाषणात साहित्य संघासारखीच सांस्कृतिक कार्य करणारी एक संस्था अमेरिकेत अलिकडेच जन्माला आली आहे आणि क्रोडोरुपयांची मदत तिला अमेरिकन सरकार कडून होत आहे असे सांगून श्री० चिंतामणराव यांनी असे उद्गार काढले की वरील संस्थेचे विभाग व कार्य यांचा तपशील पाहिला तर साहित्य संघाचीच नक्कल त्या संस्थेने केली आहे की काय असे म्हणण्याचा मोह टाळता येत नाही. तथापि फरक असलाच तर तो एवढाच. या अमेरिकन संस्थेला पैशाची ददात नाही उलट साहित्य संघाने आजवरचे कार्य सरकारी मदतीशिवायच रसिकांच्या मदतीने यशस्वीरित्या पुरे केले आहे. या संस्थेला

आता यापुढे तरी महाराष्ट्र सरकार आणि भारत सरकार सढळ हाताने व घसघशीत मदत करील असा विश्वास वाटतो. तथापि सरकारी मदत मिळो न मिळो रसिक जनतेचा पाठिंबा निश्चितच मिळून स्वावलंबनाचा आदर्श घडा गिरविला जाईल असा विश्वास व्यक्त केला. समारंभाध्यक्ष मुख्यमंत्री यशवंतरावांनी आपल्या भाषणात संघाच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढून संघ मंदिर बांधणीच्या संकल्पामागे मुंबईचे राज्यशासन निश्चितपणे उभे आहे हा विश्वास सर्वांनी बाळगावा अशी हमी दिली आणि द्वैभाषिक विभाजनानंतर नव्यानेच निर्माण होणाऱ्या महाराष्ट्राचे यथायोग्य मार्गदर्शन करण्यासाठी साहित्यिकांनी आपली जबाबदारी योग्यप्रकारे पार पाडावी म्हणून त्यांस आवाहन केले.

या निमित्ताने संघाच्या २४ वर्षाच्या कार्याचे दिग्दर्शन करणारी सचित्र स्मृतिका काढण्यात आली होती. या स्मृतिकेला क्रमांक देण्यात आले होते. स्मृतिकेच्या भाग्यशाली क्रमांकाना श्रीमती दुर्गाबाईंच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली या भाग्यवंतात म० म० पां० वा० काणे यांचा समावेश होता. मध्यंतरानंतर या समारंभासाठी मुद्दाम बसविलेली 'कांचनमृग' ही श्री० वि० वा० शिरवाडकरांची नाटिका प्रयोगित करण्यात आली. यानंतर पाहुणे व निमंत्रित यास कार्यकारी मंडळ व समित्यांचे सदस्य यांच्या समवेत थाटाची मेजवानी देण्यात आली.

संघाचे विश्वस्त डॉ० गं० मा० फडके यांनी आभार मानताना श्री० चिंतामणराव व श्री० यशवंतराव याना पूर्ण उंचीचे भव्य पुष्पहार व स्मृतिचिन्ह प्रदान करून त्यांचे व सर्व उपस्थितांचे अंतःकरणपूर्वक आभार मानले. या समारंभाची भव्यता, नमुनेदार व्यवस्था, नेत्रदीपक रोषणाई आणि समयोचित भाषणांमुळे उपस्थितांच्या नेत्राचे आणि कर्णांचे पारणे फिटले असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही असा विश्वास वाटतो. या समारंभात भाषण करताना संघाचे उपाध्यक्ष व ख्यातनाम साहित्यिक ॲड० खं० सा० दौंडकर यांना हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन १०-१-६० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. आनंदा पाठोपाठ तीव्र दुःखाची रचना करणाऱ्या नियतीला काय म्हणावे हेच समजू नये अशीच ही घटना होती यात शंका नाही.

महाराष्ट्राच्या मराठी भाषिक राज्याच्या मागणीची सुरुवात मराठी साहित्य संमेलनातून झाली. साहित्य संघाच्या विद्यमाने भरणाऱ्या मुंबई उपनगर मराठी साहित्य संमेलनाच्या १९४५ साली भरलेल्या ९ व्या अधिवेशनापासून ही मागणी सातत्याने होत होती. महाराष्ट्र राज्यात मुंबईचा समावेश झालाच पाहिजे इतकेच नव्हे तर मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असली पाहिजे असा आग्रह दरवेळी ठरावातून केला जात असे व त्याप्रमाणे वेळोवेळी भारत सरकार व प्रधान मंत्री जवाहरलाल नेहरू यांना निवेदने सादर केली जात असत. नेटाने चालविलेल्या या चळवळीला मूर्त स्वरुप आल्यामुळे महाराष्ट्र राज्य स्थापनादिन आनंदाने व उत्साहाने साजरा करण्याचे संघाने ठरविले. शिवजयंती उत्सव व महाराष्ट्र स्थापना दिन एकाच दिवशी आल्याने त्या अनुरोधाने उत्सवाचे स्वरूप ठरविण्यात आले. २९ एप्रिल पासूनच या उत्सवाची सुरुवात झाली. संघ मंदिराला

ऐतिहासिक किल्ल्याचा साज चढविण्यात येऊन संघ मंदिराच्या मधल्या दरवाजापाशी श्री० शिवाजी महाराजांच्या मोठ्या ऐतिहासिक तैलचित्राची स्थापना एका दालनात करण्यात आली. सर्व आवार लतापल्लव व विद्युत रोषणाईने सजविण्यात आले. बाहेर रात्री पणत्यांची आरास करण्यात आली. १ व २ मे रोजी साहित्य संघाच्या वतीने तीन विषयांवर परिसंवाद घडवून आणण्यात आले.

१) नव्या महाराष्ट्र राज्यामध्ये साहित्य संस्थांच्या भावी कार्याचे स्वरूप कसे असावे

२) साहित्याचा सरकारी पुरस्कार आणि त्याबाबत विचार आणि मत प्रदर्शन

३) साहित्य संस्थांच्या विद्यमाने प्रसिद्ध होत असलेली व इतर साहित्य विषयक नियतकालिके–त्यांचे स्वरूप व अपेक्षा.

ह्या परिसंवादात भाग घेण्यास महाराष्ट्रातील ठिकठिकाणच्या नामवंत व विचारी व्यक्तींना पाचारण करण्यात आले होते. बाहेरगावाहून आलेल्यात म० म० दत्तोपंत पोतदार, श्री० के० नारायण काळे, सौ० मालतीबाई बेडेकर, डॉ० ना० ग० जोशी, श्री० रा० पु० सगदेव, श्री० चिं० वि० जोशी, श्री० श्री० ना० बनहट्टी, प्रा० या० मु० पाठक, श्री० पु० दि० ढवळे, प्रा० दि० के० बेडेकर तर मुंबईतील प्रा० अनंत काणेकर, श्री० श्री० शं० नवरे, श्रीमती दुर्गाबाई भागवत, श्री० वा० रा० ढवळे, प्रा० गंगाधर गाडगीळ, प्रा० श्री० पु० भागवत, श्री० धों० वि० देशपांडे, श्री० ज्ञानेश्वर नाडकर्णी, श्री० माधव मनोहर, प्रा० विद्याधर पुंडलिक, प्रा० गं० बा० ग्रामोपाध्ये यांनी भाग घेतला होता. एकूण हा आनंदोत्सव भव्यतेने व विचार परिप्लुत पद्धतीने साजरा झाला.

१९६० साली महाराष्ट्र सरकारने दरवर्षी होणाऱ्या सरकारी नाट्य स्पर्धेनंतर एक सुविहित नाट्य महोत्सव आयोजिला होता. यात संघाने भाग घ्यावा म्हणून मनोरंजन समितीने पत्रद्वारे संघास विनंती केली होती. श्री० पु० ल० देशपांडेलिखित 'सुंदर मी होणार' या नाटकाची निवड केली होती. समितीने ती मान्य केली व या शिवाय संघाने कै० कृ० प्र० खाडिलकर कृत 'सवाई माधवराव यांचा मृत्यू' हे नाटक नव्याने सादर करावे व त्याचे दिग्दर्शन श्री० केशवराव दाते यांनी करावे म्हणून विनंती केली. ही विनंती मान्य करून हेही नाटक सादर केले. कलाकार, नेपथ्य वेषभूषा याकडे कटाक्षाने लक्ष दिल्यामुळे या नाटकाचा प्रयोग उत्कृष्ट वठला व सर्व उत्सवातील पहिल्या क्रमांकाचे नाटक म्हणून प्रेक्षक व वृत्तपत्रे यांनी या नाटकाची प्रशंसा केली. केशवराव दाते यांच्या उत्तरायुष्यातील केशवशास्त्री या भूमिकेने रसिकांना परमसंतोष दिला.

याच वर्षी 'तुझें आहे तुजपाशीं' या नाटकाचा शतक महोत्सवी प्रयोग विर्लो मातुश्री सभागृहात थाटाने साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी श्री० सेतुमाधवराव पगडी होते. सर्व नव्याजुन्या कलाकारांना स्मृतिचिन्हे देण्यात आली. श्री० दाजी भाटवडेकर व श्री० अरविंद देशपांडे यांना सतत १०० प्रयोगांत भूमिका केल्याबद्दल खास नक्षीची तबके देण्यात आली. हौशी कलावंतांनी केलेल्या नाटकाचे १०० यशस्वी

प्रयोग होणे ही मराठी रंगभूमीवरील एक अभूतपूर्व अशी घटना होय. एकाच नाटकाचे १०० प्रयोग संघाच्या वतीने होणारे हे पहिलेच नाटक. या यशाबद्दल नाटकाचे लेखक व दिग्दर्शक श्री० पु० ल० देशपांडे, नेपथ्यकार चित्रकार द० ग० गोडसे, सर्व कलाकार, सर्व सहाय्यक यांना जितके धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच. या नाटकाबद्दल संघाला अत्यंत अभिमान वाटण्याचे आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे हौशी रंगभूमीला मराठी रंगभूमीवर एक वैशिष्टयपूर्ण स्थान या नाटकाने मिळवून दिले हे होय.

साहित्य संघ मंदिराच्या वास्तूची कल्पना डॉ० भालेराव १९४४ सालापासूनच मनात घोळवीत होते. १९४४ सालच्या शतसांवत्सरिक उत्सवापासून नाट्य मंडपाचे आराखडे प्रसिद्ध वास्तूशास्त्रज्ञ व संघाचे सभासद श्री० ग० ल० कुलकर्णी हेच करीत असत. आपल्या या मंदिराबाबतच्या कल्पना त्यांना सांगून डॉक्टरांनी त्यांना संघ मंदिराचे प्राथमिक आराखडे करण्यास सांगितले. हे आराखडे तयार करताना लंडनमधील सुमारे २० नाट्यगृहांचे आराखडे त्यांनी त्या वेळी लंडनमध्ये शिक्षणासाठी वास्तव्य करीत असलेल्या श्री. बापूराव नाईक यांचेमार्फत मिळविले होते. त्यांचा अभ्यास करून आपल्या कडील परिस्थितीचा व संघाच्या आर्थिक कुवतीचा विचार करून त्यांनी आपल्या कल्पना निश्चित केल्या होत्या. हे प्राथमिक आराखडे त्यांनी ब्रिटिश ड्रामा लीग व लंडनमधील नाट्यगृहांच्या वास्तुशास्त्रज्ञांकडे पाठवून त्यांचे अभिप्राय मागविले होते. लंडनहून आलेल्या सूचनांचा विचार करून आवश्यक ते बदल करून श्री. कुलकर्णी यांनी पुन्हा पुन्हा आराखडे तयार केले होते. डॉक्टरांनी यासाठी जो अभ्यास केला, जे परिश्रम केले जी यातायात केली ती खरोखरच अपूर्व होती. यामुळेच हे आराखडे डॉक्टरांच्या मृत्यूपूर्वीच बऱ्हंशाने तयार झाले होते. त्या आराखड्यास संघमंदिर बांधकाम समितीने पूर्णत्वाने अनुसरण्याचे ठरवून आराखडे महानगरपालिकेला सादर केले. या आराखड्यात महानगरपालिकेने सुचविलेल्या दुरुस्त्या केल्यानंतर २–५–१९६० रोजी महानगर-पालिकेने संमती दिली. बांधणीविषयक तपशील तयार करणे व समग्र खर्चाचा अंदाज करणे यासाठी आराखडे आर० सी० सी० तज्ञांकडे तसेच वातानुकुलित व्यवस्थेसाठी तज्ञांकडे देऊन आवश्यक ती तयारी पूर्ण करण्यात आली. बांधकाम साहित्याच्या वाहतुकीसाठी शेजारच्या शाळेच्या आवारातून स्वतंत्र रस्ता काढण्याची परवानगी मिळविली. प्रत्यक्ष बांधकामासाठी टेंडरे मागविण्याची मुदत ३ एप्रिल १९६१ पर्यंत ठेवण्यात आली होती. आलेल्या टेंडरमधून सहकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स यांचे सर्वात कमी खर्चाचे टेंडर स्वीकारण्यात आले. याच कंपनीने पुढे निमोणकर बिल्डर्स हे नामाभिधान घेऊन संघ मंदिराचे काम केले.

१७ एप्रिल १९६१ 'अक्षय तृतिया' या शुभ मुहूर्तावर संघाध्यक्ष श्री० न० र० फाटक यांच्या हस्ते कुदळ मारण्याचा समारंभ घडवून आणून बांधकामास प्रारंभ केला.

या पूर्वी संघमंदिरातील नेपथ्याचे साहित्य, कपडेपटाच्या पेट्या, गजेन्द्रगडकर स्मारक ग्रंथालयातील पुस्तकांची कपाटे, कपडे इत्यादि व संघाचे कार्यलयीन दप्तर हलविणे भाग होते. मोठ्या प्रयत्नानंतर बोरभाटलेन मधील १६ क्रमांकाचे संपूर्ण घर मिळाले त्या ठिकाणी कार्यालय व सामान हलविण्यात आले होते. संघ मंदिराच्या बांधकामास प्रारंभ झाला परंतु सिमेंटच्या टंचाईमुळे आवश्यक तेवढे सिमेंट मिळेल की नाही यांची शंका होती. श्री० मधु देसाई यांनी श्री० राजवाडे यांना विनंती करून सीमेंट कोटा मंजूर करून घेतला पण एस०टी०सी० कडून सीमेंट देण्याबाबत दिरंगाई होत होती. परंतु संघाचे हितचिंतक व सदस्य श्री० डी० एस० जोशी हे भारत सरकार मध्ये मंत्री मंडळाच्या सेक्रेटरी पदावर काम करीत होते त्यांच्या प्रयत्नामुळे सिमेंटचा संपूर्ण साठा एस०टी०सी० कडून मिळू शकला. या प्रयत्नात भारत सरकार, महाराष्ट्र सरकार मधील संबंधीत खात्याचे अधिकारी (विशेषतः श्री० माधव राजवाडे) असोसिएटेड सिमेंट कंपनीचे डायरेक्टर, सिमेंट कंट्रोलर व एस०टी०सी० चे स्थानिक अधिकारी व बांधकाम समितीचे सदस्य यांनी बहुमोल सहाय्य करून या अडचणींचे निवारण केल्यामुळेच बांधकाम वेगाने सुरू झाले.

१९६१ साली कलकत्ता येथील 'लिटल थिएटर' या संस्थेने आपल्या "अंगार" नाटकाचे प्रयोग मुंबईत करण्याचे ठरवून संघास सहाय्यासाठी विनंती केली. विनंतीनुसार संघाने त्यांना नाट्यगृह मिळवून देणे, प्रसिद्धीची व्यवस्था करणे वगैरे साठी साहाय्य केले. कलाकारांचा संघाचे वतीने सत्कार करण्यात आला. संघाने कलकत्त्यास येऊन आपले प्रयोग करण्याचे आमंत्रण लिटल थिएटरच्या चालकांनी दिले.

श्री० वि० स० खांडेकर यांच्या 'ययाति' कादंबरीला साहित्य अकादमीने १९६० चे रु० ५,००० चे पारितोषिक देऊन त्यांचा गौरव केल्याबद्दल संघाने इतर संस्थांच्या सहकार्याने त्यांचा जाहीर सत्कार केला.

या वर्षी अखिल भारतीय लेखक संमेलन मुंबईस भरले होते. (१८ नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबर ६१) संघाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य प्रा० गंगाधर गाडगीळ हे या संमेलनाचे कार्यवाह होते. श्री० बापूराव नाईक, चित्रकार गोडसे व श्री० अंबुटकर हे कार्यकारी मंडळाचे सदस्य संमेलनाच्या विविध समित्यांवर निवडले गेले होते. परस्थ पाहुण्यांना संघाने ग्रंथसंग्रहालयाच्या सहकार्याने खास मेजवानी दिली. कै० रविन्द्रनाथ टागोर यांची जन्मशताब्दी 'रविंद्र दर्शन' या कार्यक्रमाने साजरी करण्यात आली.

१९५१ साली कारवार येथे भरलेल्या संमेलनाचे वेळी अखिल महाराष्ट्रातील साहित्य संस्थांच्या एकीकरणाचा विचार प्रथमतः मांडला गेला. दहा वर्षांच्या दीर्घ परिश्रमानंतर १९६० साली मराठी साहित्य महामंडळाची रितसर स्थापना झाली. या महामंडळात म० सा० परिषद पुणे, विदर्भ साहित्य संघ नागपूर, मराठवाडा साहित्य परिषद औरंगाबाद व मुंबई मराठी साहित्य संघ मुंबई या प्रमुख घटक संस्था आहेत. या शिवाय भारतातील कोणत्याही राज्यातील संपूर्ण प्रदेशाकरिता या भागात कार्यरत असलेल्या मराठी भाषिकांच्या संस्थाना समाविष्ट करण्याचा अधिकार महामंडळाच्या घटनेप्रमाणे दिला

गेला. दि० २-१०-१९६१ रोजी महामंडळाच्या कार्यकारिणीची सभा संघ कार्यालयात म० म० दत्तोपंत पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. या सभेला महामंडळाचे सर्व सभासद उपस्थित होते. त्यांच्या स्वागतार्थ साहित्य संघाने मेजवानी दिली होती. या महामंडळाचे अध्यक्ष म० म० प्रा० दत्तो वामन पोतदार होते तर खजिनदार व कार्यवाह म्हणून अनुक्रमे श्री० श्री० शं० नवरे व श्री० बापूराव नाईक हे साहित्य संघाचे कार्यकारी सदस्य होते. प्रथमपासून अनेक वर्षे महामंडळाचे कार्यालय मुंबई मराठी साहित्य संघात होते. साहित्य संघाने महामंडळाच्या घटनेनुसार महामंडळावर आपले प्रतिनिधी म्हणून श्री० श्री० शं० नवरे, श्री० वा० रा० ढवळे व श्री० बापूराव नाईक यांची निवड केली होती. हे प्रतिनिधी सातत्याने महामंडळाच्या कार्यात प्रमुखपणे वावरत होते. श्री० नवरे व श्री० वा० रा० ढवळे यांच्या निधनापर्यंत संघाचे प्रतिनिधीत्व करीत होते तर श्री० बापूराव नाईक हे अद्यापही महामंडळावर संघाचे प्रतिनिधित्व करीत आहेत.

या महामंडळाचे वतीने मराठी साहित्य संमेलनाचे अधिवेशन हैद्राबाद येथे प्रथमतः भरले. या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून साहित्य संघाचे एक प्रथमपासूनचे कार्यकर्ते प्रसिद्ध समीक्षक प्रा० वा० ल० कुलकर्णी यांची निवड झाली होती.

महामंडळाच्या कार्यात साहित्य संघ सदैव आस्थापूर्वक भाग घेत आला आहे.

दि० १६ मार्च ६२ रोजी महाराष्ट्र सरकारच्या भाषासल्लागार मंडळाच्या सभासदांनी संघास भेट दिली व संघ कार्याची माहिती करून घेतली. वैज्ञानिक अनुसंधान व सांस्कृतिक मंत्रालयाकडून एक नाटक बसविण्यासाठी संघाला रु० ७५०० चे अनुदान मिळाले. यासाठी संघाने श्री० वि० वा० शिरवाडकर लिखित 'ऑथेल्लो' या नाटकाची निवड केली.

संघाच्या नाट्य समितीने कै० डॉ० भालेराव यांच्या स्वप्नापैकी नाट्य शिक्षणाचे स्वप्न साकार करण्याचे हेतूने 'अमृत नाट्य भारती' (अ० ना० भा०) या नावाने एक योजना सुरू करून या योजनेअंतर्गत नाट्यशिक्षण देण्याचा संकल्प केला. भारत सरकारच्या सॉंग ॲण्ड ड्रामा डिव्हिजनच्या निमंत्रणानुसार समर ड्रामा फेस्टिव्हलमध्ये महाराष्ट्र राज्यातर्फे 'सवाई माधवराव यांचा मृत्यू' हे नाटक सादर केले. दिल्ली येथील तालकटोरा गार्डन मध्ये उघड्या रंगमंचावर पडदे वगैरे साहित्याशिवाय फक्त प्रकाश योजनेच्या साहाय्याने अगदी नवीन धर्तीने हा प्रयोग करण्यात आला. श्री० केशवराव दाते यांच्या अभिनय नैपुण्याने दिल्लीतील परभाषिक नाट्यरसिक मंत्रमुग्ध झाले होते.

वैज्ञानिक अनुसंधान व सांस्कृतिक खात्याचे मंत्री प्रा० हुमायून कबीर यांनी संघ मंदिराच्या बांधकामाची प्रगती पाहण्यासाठी संघास भेट दिली. कामाच्या प्रत्यक्ष पाहाणी नंतर त्यांनी समाधान व्यक्त केले. भारत सरकारच्या या खात्याने दिलेल्या अनुदानाचे चीज झाल्याचे त्यांनी बोलून दाखविले. या खात्याकडून संघास एकूण एक लक्ष रुपयाचे

अनुदान मिळाले. महाराष्ट्र शासनानेही बांधकामासाठी रु. ५५००० चे अनुदान दिले. यासाठी महाराष्ट्राचे अर्थमंत्री श्री० स० गो० बर्वे यांनी बांधकामाची प्रत्यक्ष पाहणी करून नंतरच हे अनुदान दिले.

१९६२ च्या संघदिनाचा एक भाग म्हणून एका आगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. चीनने भारतावर सशस्त्र आक्रमण केले होते. त्याचा निषेध करण्यासाठी मुंबईतील मराठी व इतर भाषातील लेखकांची एक सभा दि० ९ डिसेंबर १९६२ रोजी भरली होती. सभेच्या अध्यक्षस्थानी प्रा० अनंत काणेकर होते. सभेत प्रा० गंगाधर गाडगीळ, प्रा० वा० ल० कुलकर्णी, श्री० पु० ल० देशपांडे यांची भाषणे झाली. या सभेत लेखकांचा पुढील निर्धार वाचून तो संमत करण्यात आला.

"मुंबई मराठी साहित्य संघाच्या विद्यमाने भरलेली मराठी व इतर भाषिक लेखकांची ही सभा आमच्या मायभूमीच्या उत्तर सीमेवरील चिनी आक्रमणाचा निषेध करीत आहे आणि शत्रूला हद्दपार करण्याच्या राष्ट्रीय धोरणास संपूर्ण पाठिंबा देण्याची प्रतिज्ञा करीत आहे...जगातील सर्व लोक आणि विशेषतः साहित्यिक यानाही आम्हाला असे कळकळीचे आवाहन करावेसे वाटते की ह्या आमच्या स्वातंत्र्य टिकविण्यासाठी चाललेल्या झगड्यात त्यांनी आम्हाला पाठींबा द्यावा. ह्या झगड्यात विजयी होण्याचा आमचा ठाम निश्चय आहे."

१९६३ साली संघाचे एक हितचिंतक डॉ० पां० वा० काणे यांना भारतसरकारने 'भारतरत्न' ही अत्युच्च पदवी देऊन या धर्मशास्त्र पंडिताचा गौरव केला या निमित्ताने संघाने दि० २३ फेब्रुवारी १९६३ रोजी म० म० काणे यांचा भव्य सत्कार केला.

संघ मंदिराची वास्तू आकार घेऊ लागली असतानाच कार्यकर्त्यांच्या मनात फार पूर्वीपासून म्हणजे संघासाठी जागेची खरेदी झाल्यापासून जी एक कल्पना ठाण मांडून होती ती म्हणजे केळेवाडीच्या रस्त्याचे नाव बदलून घेणे ही होय. यासाठी महानगरपालिकेत ठराव मांडणे व यासाठी नगरसेवकांची अनुमती प्राप्त करून घेणे आवश्यक होते. संघाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य डॉ० बाबा कलगुटकर व श्री आप्पा पेंडसे हे दोन खंदे नगरसेवक या साठी प्रयत्न करीत होते. त्या दोघांच्या प्रयत्नाला यश येऊन महानगरपालिकेने केळेवाडीच्या रस्त्याचे नामकरण 'डॉ० भालेराव मार्ग' असे करण्याचा प्रस्ताव एकमताने संमत केला. साहित्याची आणि संस्कृतिची सेवा करण्यासाठी मुंबई मराठी साहित्य संघाची निर्मिती झाली होती व या निर्मितीचे सूत्रधार आणि संगोपक होते डॉ० भालेराव. त्यांनी अनुसरलेल्या मार्गाची आठवण ठेवण्यासाठी संघमंदिराप्रत जाणाऱ्या मार्गाला डॉ० भालेराव मार्ग म्हणून संबोधिणे क्रमप्राप्त आणि आवश्यकच होते.

दि० २६ मार्च १९६३ रोजी दुपारी ४-३० वाजता मुंबईचे महापौर डॉ० शहा यांचे हस्ते डॉ० भालेराव मार्ग ह्या फलकाचे उद्‌घाटन करण्याचा समारंभ झाला. फलकाचे प्रत्यक्ष उद्‌घाटन हा मार्ग गिरगावातील बाजूस ज्या ठिकाणी सुरू होतो तेथे झाले तरी

सभा मात्र संघमंदिराच्या बांधकाम चालू असलेल्या वास्तूत झाली. याच निमित्ताने सत्यनारायण पूजनही संघाचे विश्वस्त डॉ० भा० नी० पुरंदरे यांच्या हस्ते झाले. संघ सदस्य, केळेवाडीतील रहिवासी व निमंत्रित यांच्या उपस्थितीत समारंभ शानदार रितीने पार पडला.

फिलिफाईन्स देशातील कवी, कादंबरीकार, पत्रकार यांचे एक शिष्टमंडळ भारत भेटीसाठी आले असता त्यांनी संघास भेट दिली. मुंबईतील साहित्यिकांशी त्यांनी वाङ्मय विषयक प्रश्नावर चर्चा केली. साहित्य संघाचे कार्य व इमारतीचे बांधकाम पाहून पाहुण्यांनी आनंद व समाधान व्यक्त केले.

शास्त्रीय साहित्य व परिभाषा यांचा सर्वांगीण विचार करण्यासाठी शास्त्रीय साहित्य समितीची निर्मिती करण्यात आली. समितीचे अध्यक्ष प्रा० रँग्लर का० रा० गुंजीकर होते तर कार्यवाह म्हणून श्री० म० ना० गोगटे काम करीत होते. समितीच्या वतीने शास्त्रीय साहित्यावर अनेक व्याख्याने करण्यात आली. या कार्यातूनच कालांतराने मराठी विज्ञान परिषदेचा जन्म झाला.

चिनी आक्रमणाचे वेळी उभारण्यात आलेल्या राष्ट्रीय संरक्षण निधीसाठी संघाने भाऊबंदकी या नाटकाचा खास प्रयोग रंगभवन येथे दि० १२–१–६३ रोजी केला. यात नटवर्य केशवराव दाते यांनी १९४४ सालानंतर पुन्हा 'तुळोजी' उभा केला तसेच दुर्गाबाई खोटे, नानासाहेब फाटक, मा० दत्ताराम, मामा पेंडसे, दाजी भाटवडेकर, नाना अभ्यंकर यांनी आपआपल्या हातखंडा भूमिका केल्या. या प्रयोगाच्या उत्पन्नातून रु. १०१०१ राष्ट्रीय संरक्षण निधीस देण्यात आले. तसेच संरक्षण निधीसाठी नाट्य कलावंतांनी केलेल्या कार्यक्रमांत संघाने भाऊबंदकी व तुझे आहे तुजपाशी या नाटकातील एक एक अंक सादर केले व या कार्यक्रमाची संपूर्ण व्यवस्था केली होती.

रशियातील कवि, नाटककार, कादंबरीकार, लेखक व साहित्य समीक्षक यांच्या शिष्ट मंडळाने २८ एप्रिल १९६३ रोजी संघास भेट दिली. वाङ्मयीन चर्चेनंतर संघ मंदिराची पूर्ण होत आलेली इमारत व नाट्यगृह पाहून एक खाजगी संस्था एवढा मोठा प्रकल्प हाताळू शकते याबद्दल आनंद व्यक्त केला. 'होनाजी बाळा' या नाटकाच्या तालमीही त्यांनी मोठ्या औत्सुक्याने पाहिल्या.

७ मार्च ६४ ते १५ मार्च ६४ पर्यंत संघाने कै० हरिभाऊ आपटे जन्म शताब्दी महोत्सव ग्रंथ संग्रहालय व आलोचना यांच्या सहकार्याने साजरा केला. अध्यक्षस्थानी श्री० मामा वरेरकर होते. या महोत्सवात हरिभाऊंच्या वाङ्मय सेवेवर ८ व्याख्याने झाली तसेच हरिभाऊंच्या 'संत सखू' या नाटकाचा प्रयोग मुद्दाम नाटक बसवून करण्यात आला. हरिभाऊंच्या वाङ्मयांचे प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते. हे कार्यक्रम संघ मंदिर व संग्रहालयाच्या रंग मंदिरात सादर करण्यात आले होते.

म. सा. परिषदेच्या वाङ्मयीन परीक्षांचे वर्ग जरी संघ आपल्या स्थापनेपासून घेत

आलेला असला तरी १९६४ सालापासून संघाने आपल्या स्वतःच्या वाङ्मयीन परीक्षा सुरू केल्या. या परीक्षा पुढील स्तरावर घेण्यास प्रारंभ केला. साहित्य प्रथमा, साहित्य प्रवेश, साहित्य प्रबोध, साहित्य विशारद व साहित्याचार्य. यासाठी अनेक ठिकाणी केंद्रे चालविण्यात येत असत.

१९६१ साली संघ मंदिर इमारतीचे बांधकाम सुरू झाल्यानंतर बांधकामापोटी होत असलेला मोठा खर्च भागविण्यासाठी कर्ज उभारणे आवश्यक झाले. संघाच्या साधारण सभेने योग्य त्या अटीवर महाराष्ट्र बँकेकडून कर्जाऊ रक्कम घ्यावी असा ठराव करून कार्यकारी मंडळास अधिकार दिले. महाराष्ट्र बँकेकडून कर्ज योग्य त्या सवलतीने मिळावे म्हणून संघाचे हितचिंतक व बँकींग क्षेत्रातील एक अग्रणी श्री० बा० पु० वर्दे यांनी मध्यस्ती करून हे काम पूर्ण केले. ही आर्थिक विवंचना दूर होऊ शकल्यानेच बांधकाम ठरविलेल्या वेळापत्रकानुसार होत राहिले होते. व यामुळेच खर्चाच्या केलेल्या अंदाजापेक्षा प्रत्यक्षात फार फरक पडला नाही.

प्रथम पासून संघ मंदिराच्या बांधकामावर प्रत्यक्ष नजर ठेवण्याचे काम नाट्यशाखेचे कार्यवाह श्री० अंधृटकर यांनी अंगिकारले होते. यामुळे दैनंदिन होण्याऱ्या कामावर देखरेख होऊन काही कमजास्त झाल्यास वास्तुशास्त्रज्ञाना त्याची त्वरित दखल मिळून आवश्यक ते सुधार घडवून आणता आले. बांधकाम पूर्णावस्थेत येत असताना आणि मंदिराच्या उद्‌घाटनाची कार्यवाही नक्की करताना मंदिरातील नाट्यगृहाच्या नामकरणाचा विचार करणे क्रमप्राप्तच होते. कार्यकर्त्यांच्या मनात यासंबंधीची कल्पना निश्चित स्वरूपाची होती परंतु त्यावर संघाच्या साधारण सभेच्या मान्यतेची मोहोर होणे आवश्यक होते. म्हणून रविवार दि० ८ मार्च १९६४ रोजी एक विशेष साधारण सभा बोलाविण्यात आली. या सभेत एकमताने पुढील ठराव संमत करण्यात आले.

"संघ मंदिरातील नाट्यगृहास 'डॉ० अ० ना० भालेराव नाट्यगृह' असे नाव द्यावे व विश्रामिकेत डॉ० अ० ना० भालेराव यांचा अर्धपुतळा बसविण्यात यावा." त्याचप्रमाणे संघ मंदिरातील प्रायोगिक नाट्यगृहास व इतर दालनांस देणगीदारांची नांवे देण्याच्या कल्पनेस संमती देण्यात आली. हा ठराव नाट्यशाखेचे कार्यवाह श्री० अंधृटकर यांनी मांडला व श्री० बापूराव नाईक यांनी यास अनुमोदन दिले.

साहित्य संघाचे नाट्यविषयक कार्य करणाऱ्या नाट्य समितीचे या वर्षातले एक प्रमुख कार्य म्हणजे साहित्य संघ मंदिराचा उद्‌घाटन समारंभ योजून नाट्यगृह कार्यान्वित करणे हे होते. या उद्‌घाटन समारंभाचे स्वरूप अतिशय भव्य प्रमाणावर योजावयाचे होते कारण नाट्यगृहासहित संघ मंदिराच्या कल्पनेचा जन्म ज्या शतसांवत्सरिक नाट्य महोत्सवात झाला त्याची भव्यता साऱ्या भारतात वाखाणली गेली होती; त्यामुळेच संघ मंदिराचा उद्‌घाटन समारंभ त्याला साजेसा करण्याची कार्यकर्त्यांची धडपड होती. यासाठी स्वतंत्र उद्‌घाटन–समारंभ समिती व अनेक उपसमित्या नेमण्यात आल्या होत्या तरी सुद्धा या समारंभाची मुख्य जबाबदारी नाट्यसमितीवरच होती. मंदिराचे उद्‌घाटन संरक्षण मंत्री

ना० यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते करण्याचे उद्घाटन समिती, कार्यकारी मंडळ व सर्वसाधारण सभा यांनी निश्चित केले होते. मंदिराची कोनशिला त्यांच्याच अध्यक्षतेने माननीय चिंतामणराव देशमुख यांनी १९६१ साली बसविली होती. त्यावेळी यशवंतरावजी मुंबई राज्याचे मुख्यमंत्री होते. यशवंतरावांनी त्यावेळच्या अध्यक्षीय भाषणात मुंबई सरकार या कार्याचा पाठपुरावा करील असे प्रकट आश्वासन दिले होते. या आश्वासनामुळे संघाच्या कार्यकर्त्यांत आत्मविश्वास निर्माण होऊन त्यांनी हे कार्य तीन वर्षात पूर्णत्वास नेले. यामुळेच या मंदिराचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात औचित्य होते. त्यांनीही या आमच्या विनंतीस तात्काळ अनुमती दिली. एवढेच नव्हे तर दि० ६ एप्रिल १९६४ हा दिवस त्यांना सोयीचा नव्हता; कारण ते याच दिवशी अमेरिकेच्या दौऱ्यावर संरक्षण विषयक चर्चेसाठी जाणार होते. परंतु उद्घाटन समारंभाचे महत्त्व ओळखून त्यांनी आपला दौरा काही दिवसांनी पुढे ढकलला व कार्यकर्त्यांनी ठरविलेल्या दिवशीच व वेळीच हा उद्घाटन समारंभ सोहळा करण्यासाठी अमोल असे सहकार्य दिले.

इमारतीचे बांधकाम जरी पूर्ण झाले होते तरी वातानुकूलित व्यवस्थेचे काम पूर्ण झालेले नव्हते. हे काम लांबण्यास परदेशातून येणारे आवश्यक साहित्य मार्च अखेरीपर्यंत आलेलेच नव्हते. परंतु या सर्व अडचणींवर मात करून ६ एप्रिल १९६४ चा मुहूर्त साधण्याचा कार्यकर्त्यांचा निश्चय होता आणि त्याप्रमाणेच या प्रचंड कार्याचे संचालन रात्रंदिवस चालू होते. मंदिराच्या उद्घाटन समारंभासाठी अगदी मोजक्या हितसंबंधियांना बोलवावयाचे ठरलेले असले तरीसुद्धा ही संख्या तीन हजाराच्या आत येईना व मंदिरातील नाट्यगृह तर ८५० जागांचे, त्यामुळेच हा समारंभ मंदिराच्या शेजारील शाळेच्या उघड्या आवारात घेणे भाग होते. शाळेच्या चालकांनीही यास उदारतेने अनुमती दिली.

कार्यक्रमासाठी शाळेचे संपूर्ण आवार सारखे करून घेण्यात आले. भव्य व्यासपीठ उभारण्यात आले. संघ मंदिर विद्युत मालिकांनी सुशोभित करण्यात आले. पुष्प मालिकांची तर गणतीच नव्हती. डॉ० भालेराव मार्ग संपूर्णपणे गुढ्यातोरणे व पुष्पमाला यांनी सुशोभित केला होता. मंदिराकडे येणाऱ्या सर्व रस्त्यांच्या नाक्यावर आकर्षक कमानी उभारण्यात आल्या होत्या. उद्घाटन कार्यक्रमाचे नियोजन संघाचे कार्यकर्ते, ख्यातनाम लेखक व नाटककार, नट, श्री० पु० ल० देशपांडे यांनी केले होते.

पाहुण्यांच्या स्वागतासाठी सुस्वर सनई चौघडा, नगारखान्यातून निनादत होता. संघाध्यक्ष, विश्वस्त व कार्यकारी मंडळाचे सदस्य तसेच उत्सव समितीचे सदस्य निमंत्रितांचे स्वागत करीत होते.

ठीक सायंकाळी ५-३० वाजता मा० यशवंतराव, मा० बाळाहेब देसाई यांच्या समवेत संघ मंदिरात आले. त्यांना संघ मंदिर दाखविण्यात आले. रंगमंचावर डॉ० भालेराव यांच्या तैलचित्रास यशवंतरावांनी पुष्पहार घातला. याच वेळी श्रीमती सुधाताई

भालेराव आणि भालेराव कुटुंबीय व संघाच्या एक विश्वस्त श्रीमती दुर्गाबाई खोटे यांनी पुष्पहार घालून यशवंतरावांचे स्वागत केले. डॉ० भालेराव यांची प्रतिमा व रंगमंचाची पूजा करून यशवंतरावांनी पूजेचा नारळ फोडला. यानंतर यशवंतराव सभास्थानी आले. त्यावेळी सनई, चौघडा, रणशिंग इत्यादी वाद्यांनी त्यांचे आगमन उद्घोषित केले.

कार्यक्रमाची सुरुवात कै. अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या पहिल्या 'शाकुंतल' नाटकाची नांदी 'पंचतुंड नररुंड मालधर' या वैशिष्ट्यपूर्ण नांदीने झाली. या नांदीसाठी मराठी रंगभूमीवरील चार पिढ्यांचे प्रतिनिधी म्हणून ६० नटनटींनी भाग घेतला होता. नांदीला असा अपूर्व योग लाभला होता. अशी नांदी ऐकण्याचे भाग्य लाभले ते धन्य. नांदीनंतर गणराजाचे स्तवन पूर्वापार पद्धतीने करण्यात आले. सर्व देवदेवतांना समारंभाला हजर राहण्यासाठी आवाहन करण्यात आले. वेदमंत्रांनी पंचमहाभूतांची आणि चित्‌शक्तिची आळवणी करण्यात आली. आणि यानंतर...ज्यांनी ह्या साहित्य संघ मंदिराचे स्वप्न पाहिले आणि ते साध्य करण्यासाठी आमरण प्रयत्न केले अशा सर्व दिवंगत कार्यकर्त्यांचे मेरुमणी असलेले संघ संस्थापक आणि संवर्धक कै० डॉ० भालेराव यांनी या समारंभाला आशीर्वाद द्यावेत म्हणून नियोजक श्री० पु० ल० देशपांडे यांनी आवाहन करताच व्यासपीठामागील शुभ्र जवनिकेवर डॉ० भालेरावांची चिरपरिचित भव्य प्रतिमा साकार झाली. या भव्य प्रतिमेचे दर्शन होताच उपस्थितांनी उभे राहून व टाळ्यांच्या गजरात डॉक्टर भालेरावांना अभिवादन केले.

उपस्थितांचे स्वागत अत्तर, गुलाब व पेढे देऊन संघस्वयंसेवक व सेविका यांनी केले. नियोजकांनी यशवंतरावांना व अन्य मानकऱ्यांना व्यासपीठावर नेले. व्यासपीठावर संघाध्यक्ष, विश्वस्त, समारंभाचे अध्यक्ष, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व अन्य मंत्री, पुणे विद्यापीठाचे कुलगुरु, महापौर व संघाचे नियोजित सन्मान्य सभासद आपआपल्या स्थानी विराजमान झाले.

संघाध्यक्ष प्रा० न० र० फाटक यांनी उपस्थितांचे स्वागत करून संघ कार्याचा आढावा घेतला व संघ सदस्यांचे साकार झालेले स्वप्न जे 'मुंबई मराठी साहित्य संघ मंदिर' त्याच्या उद्घाटनाची व या मंदिरातील नाट्यगृहाला 'डॉ० अ० ना० भालेराव नाट्यगृह' असे नाव प्रदान करण्याची समारंभाच्या अध्यक्षांना विनंती केली. कार्याध्यक्ष श्री० वा० रा० ढवळे यांनी संदेशवाचन केले. संदेशात राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, शिक्षणमंत्री आणि महाराष्ट्रातील अनेक मान्यवर साहित्यिक व समाजनेते यांचे संदेश आले होते.

स्वागताचे प्रतीक म्हणून यशवंतरावजींना यावेळी पुष्पमाला न घालता ते भारताचे संरक्षणमंत्री आहेत हे ध्यानी घेऊन सर्व कला-साहित्य-संगीत-नाट्य यांचे प्रतीक असलेल्या सुकुमार पुष्पांची पण शौर्याची प्रतीक अशी ढाल-तलवार नजर करण्यात आली.

यशवंतरावांनी विद्युत् कळ दाबून व्यासपीठावरील संघ मंदिराचा नामफलक व संघ

मंदिरावर केलेली विद्युत्‌दीपांची रोषणाई प्रज्वलित केली व संघ मंदिराचे उद्घाटन केल्याचे जाहीर केले. व नंतर केलेल्या अत्यंत समयोचित भाषणाचा शेवट "हे मंदिर ज्या कलेच्या प्रेमातून निर्माण झाले आहे, ज्या साहित्याच्या प्रेमातून निर्माण झाले आहे ते साहित्य आणि ते कलाजीवन, ते महाराष्ट्राचे सांस्कृतिक जीवन वाढत राहो, वाहात राहो, त्याची गंगा अशीच दुथडी भरत राहो आणि त्या दुथडी गंगेच्या काठी राहणारे लोक, वाहत असणारे लोकजीवन, सतत समृद्ध, संपन्न होत राहो" अशा शब्दात केला.

यानंतर या संघ मंदिर उद्घाटनाच्या निमित्ताने जीवनाच्या विविध क्षेत्रात ज्या महाराष्ट्रीयांनी वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी केली अशा सोळा व्यक्तींना संघाचे सन्मान्य सभासदत्व सन्मानपूर्वक देण्यात आले.

संघाचे कार्यवाह श्री० बापूराव नाईक यांनी संघमंदिर बांधणीचा इतिहास निवेदन करून संघमंदिराची वैशिष्ट्ये सांगितली व मंदिराचे स्थापत्यकार श्री० ग० ल० कुलकर्णी व श्री० मराठे तसेच कॉन्ट्रॅक्टर निगोमार कंपनीचे श्री० मराठे यांचा यशवंतरावांचे हस्ते पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. संघ मंदिरासाठी मिळालेल्या देणग्या जाहीर केल्या. मुंबईचे महापौर डॉ० दिवगी यांनी या प्रसंगी महापालिकेच्या देणगीचा रु० पन्नास हजाराचा चेक अध्यक्षांचे स्वाधीन केला. संघाचे ज्येष्ठ विश्वस्त डॉ० गं० मा० फडके यांनी आभार प्रदर्शन करताना ज्यांनी ज्यांनी या कल्पनेला हातभार लावला इतकेच नव्हे तर आजपर्यंत संघ कार्यास साहाय्य केले त्या सर्वांचे व विशेषतः कार्यकारी मंडळ व कार्यकर्ते यांचे विश्वस्तांचे वतीने कृतज्ञतापूर्वक आभार मानले. राष्ट्रगीतानंतर हा अपूर्व सोहळा संपला.

या कार्यक्रमानंतर सर्व निमंत्रितांना संघ मंदिर दाखविण्यात आले. रात्रौ ९॥ वाजता हिंदु जिमखान्यावर संघ सदस्य, पाहुणे व निमंत्रित यांच्यासाठी मेजवानी आयोजित करण्यात आली होती. या मेजवानीस १,००० सभासद व निमंत्रित मिळून उपस्थित होते. श्री० यशवंतरावांनी या वेळेस स्वतः पंक्तीत फिरून सर्वांचा परिचय करून घेतला व पूर्व परिचितांशी हास्यविनोद केला.

समारंभाचा एक भाग म्हणून ४५ दिवसांचा नाट्योत्सव आयोजित केला होता. यातच गायन व वादनाचा स्वतंत्र कार्यक्रम ठेवला होता. या नाट्योत्सवात मुंबईतील व बाहेरील ज्या नाट्यसंस्थांनी (हौशी व व्यावसायिक) संघाच्या कार्यात हातभार लावला होता अशा सर्वांना आवर्जून निमंत्रिले होते. या सर्व संस्थांनी आपला एक नाट्यप्रयोग फक्त खर्च घेऊन या उत्सवात केला. संघ मंदिर ही फक्त साहित्य संघाचीच वास्तू नसून सर्व महाराष्ट्राच्या कलाप्रेमाचे प्रतीक आहे, अशी भावना संघ कार्यकर्त्यांची आहे व म्हणूनच या सर्व संस्थाना विनंती केली गेली.

दि० ८ एप्रिल ६४ रोजी या नाट्योत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री श्री० बाळासाहेब देसाई यांनी केले. ना० बाळासाहेबांनी नाट्योत्सवाचे उद्घाटन करण्यात एक औचित्य होते. आता वीस वर्षांनंतर पुढील प्रसंग सांगितल्यास औचित्यभंग होणार नाही.

उद्‌घाटन समारंभाच्या अगोदर २-३ दिवस महाराष्ट्राच्या गृहखात्याकडून एक शासकीय आदेश आला आणि संघाची ही वास्तू का पाडून टाकू नये याची विचारणा केली गेली. हे पत्र पाहताच संघाध्यक्ष प्रा० न० र० फाटक यांनी गृहमंत्र्यांची भेट घेतली. सोबत कार्यवाह श्री० बापूराव नाईक व नाट्यशाखा कार्यवाह श्री० अंधृटकर होते.

भेटीत प्रा० फाटकांनी आलेले पत्र दाखवून आम्ही समारंभ रद्द करतो. आपण कृपया यशवंतरावांना आमची अडचण सांगा अशी विनंती केली. पत्र वाचून व प्रा० फाटकांची विनंती ऐकून गृहमंत्र्यांनी संबंधित चिटणीसांना ताबडतोब पाचारण केले व पत्राबद्दल विचारणा केली. चिटणीस कारणांची माहिती देऊ लागले त्यावेळी त्या कारणातील फोलपणा पाहून बाळासाहेब अतिशय संतापले व त्यांनी चिटणीसास सांगितले की हे पत्र ताबडतोब परत घ्या व पत्राबद्दल संघाध्यक्षांची माफी मागा. मुंबईतील महाराष्ट्रीय समाजाचा मानबिंदू असलेल्या संस्थेच्या मंदिराची वास्तू उद्‌घाटन समारंभाच्या वेळीच का पाडू नये अशी विचारणा करण्यास तुम्ही धजलात तेव्हा मला गृहमंत्रीपदाचा राजीनामा देऊन मोकळे झाले पाहिजे व तुम्हाला या खात्याच्या चिटणीस पदातून मुक्त केले पाहिजे. बाळासाहेबांच्या या शीघ्र संतापदर्शक बोलण्यामुळे चिटणीसांनाही झालेला औचित्यभंग व शासनाची चूक ध्यानात आली व त्यांनी ताबडतोब हे पत्र परत घेण्यासाठी पत्र लिहून दिले. गृहमंत्र्यांनी दिलगिरी व्यक्त करून प्रा० फाटकांसारख्या वयोवृद्ध विद्वानाला आणि कार्यकर्त्यांना झालेल्या मनःस्तापाबद्दल क्षमा मागितली. असे घडले हे अघटित. यामुळे बाळासाहेबांनी नाट्योत्सवाचे उद्‌घाटन करणे कसे औचित्यपूर्ण होते हे सहज ध्यानी येईल.

महाराष्ट्राच्या राजधानीत साहित्य संघ मंदिर व सुसज्ज असे डॉ० भालेराव नाट्यगृह उभारून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात साहित्य संघाने फार मोठा जोम निर्माण केल्याबद्दल बाळासाहेबांनी संघास धन्यवाद दिले. या नंतर सौभद्र नाटकाने उत्सवाच्या कार्यक्रमास सुरवात झाली. एकूण २६ नाटककारांची नाटके या उत्सवात झाली. २१ संस्थांनी यात सहभाग घेतला. श्री० कुमार गंधर्व व श्री० भीमसेन जोशी यांचे शास्त्रीय संगीत व पंडित रविशंकर यांच्या सतार वादनाची जोड या नाट्योत्सवास लाभली होती.

या उत्सवासाठी संघाने श्री० द० ग० गोडसे यांचे 'राजयाचा पुत्र अपराधी देखा' हे संभाजीच्या चरित्रावरील नाटक, श्री० वि० द० घाटेकृत "यशवंतराव होळकर" व श्री० विजय तेंडुलकर लिखित 'सरी ग सरी' या नवीन नाटकांचा प्रयोग आवर्जून बसविले होते. परंतु 'यशवंतराव होळकर' नाटकाचे दिग्दर्शक श्री० के० नारायण काळे हे आजारी पडल्यामुळे हा प्रयोग स्थगित करावा लागला. हा प्रयोग पुढे झाला होता. दि० २७ मे १९६४ रोजी भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे दुःखद निधन झाल्यामुळे उत्सव स्थगित करावा लागला. राहिलेली नाटके नंतर जूनच्या अखेरीस करण्यात आली.

नाट्योत्सवा बरोबरच या उद्‌घाटन उत्सवाचा एक भाग म्हणून साहित्य विषयक

कार्यक्रम आयोजिला होता. मराठी साहित्यासंबंधी अनेक विषयावर व्याख्याने, परिसंवाद, वादविवाद व जुन्या नव्या कवींचे काव्यगायन अशा भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या संस्मरणीय प्रसंगी साहित्य संघाच्या कार्याचा धावता आढावा, साहित्य विषयक व नाट्यविषयक कार्याचे छायाचित्रांच्या साहाय्याने दर्शन व कार्यकर्त्यांचा परिचय, कै० डॉ० अ० ना० भालेरावांचे चित्रमय व शब्दमय जीवनदर्शन व महाराष्ट्रीय कलावद्दल मान्यवर लेखकांचे खास लेख यांनी समृद्ध असलेल्या स्मृतिग्रंथाचे आयोजन केले होते परंतु या ग्रंथात उद्घाटन समारंभाचाही समावेश करण्याचे ठरले. सुमारे ७०० छायाचित्रे यात दिली होती. नाट्यविभागाची छायाचित्रे पाहिली तर मराठी रंगभूमीच्या इतिहासाची झलकच डोळ्यापुढे उभी राहते. या सचित्र स्मृतिग्रंथामुळे मराठी साहित्य आणि मराठी रंगभूमी यांचे दर्शन घडून येते असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. स्मृतिग्रंथाचा आदर्शच संघाने निर्माण केला असाच सर्वांचा एकमुखी अभिप्राय होता. अनेक परदेशस्तांना या एका ग्रंथामुळे लेखक, नाटककार दिग्दर्शक आदि एकत्र दृष्टीस पडू शकले असे म्हणणे वावगे होणार नाही.

हा स्मृतिग्रंथ दि० २५ ऑगस्ट १९६४ रोजी डॉ० भालेराव यांच्या पुण्यतिथीला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या हस्ते प्रकाशित करून डॉ० भालेरावांच्या स्मृतीस अर्पण करण्यात आला.

ही उद्घाटन समारंभाची कथा दीर्घकथाच झाली पण संघाच्या आयुष्यातील या सर्वोत्तम क्षणांची विस्तारपूर्वक आठवण केल्याशिवाय गत्यंतरच नाही हेही ध्यानात घेतले पाहिजे.

१३ सप्टेंबर १९६४ रोजी संघाचे जेष्ठ विश्वस्त आणि डॉ० भालेरावांच्या नंतर संघ कार्यकर्त्यांना धीर देऊन संघ मंदिराची उभारणी करवून घेणारे डॉ० गं० मा० फडके यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने कार्यकर्त्यांना पुन्हा पोरकेपणाच्या भावनेने गाठले. परंतु दुःखातही आपल्या नियोजित कार्याचा विसर पडू न देण्याचा मंत्र त्यांनीच शिकवल्यामुळे तो मंत्र ध्यानात ठेऊन कार्यकर्ते संघकार्य पुढे चालवू लागले. संघाने डॉ० फडके यांचे स्मारक म्हणून एक निधी उभारला. या निधीतून नाट्य कलवंतांना औषधोपचारासाठी मदतीचा हात दिला जातो. याच कालावधीत संघातील पुढील जेष्ठ व्यक्ती निधन पावल्या डॉ० बा० दा० गोखले, प्रा० कु० पां० कुळकर्णी, ख्यातनाम साहित्य सेवक भा० वि० तथा मामा वरेरकर या संघावर प्रेम करणाऱ्या व्यक्ती पुन्हा संघकार्यात सहभागी होऊ शकणार नाहीत ही जाणीव दुःख दिल्याशिवाय कशी राहील.

संघाचे नट, दिग्दर्शक, कार्यकारी मंडळाचे सदस्य आणि नाट्यविषयक सल्लागार श्री० केशवराव दाते यांच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण झाल्यावद्दल मराठी नाट्य परिषदेने त्यांचा अमृत महोत्सव सांगली येथे साजरा केला. संघाने यात सहभागी होऊन केशवरावांची भूमिका असलेले ' सवाई माधवराव यांचा मृत्यू ' या नाटकाचा प्रयोग विनामूल्य सादर

केला. साहित्य संघाची नाट्यशाखा समृद्ध करण्यासाठी श्री० केशवराव यांनी फार परिश्रम घेतले. संघाचे नाट्यविषयक धोरण ठरविण्यात केशवरावांचा फार मोठा सहभाग होता. दिग्विजयी 'भाऊबंदकी'चे दिग्दर्शक केशवरावच होते. त्यांच्या अमृत महोत्सवात त्यांच्यासह सहभागी होण्याचे भाग्य संघास मिळाले याबद्दल धन्यता वाटणे स्वाभाविकच नाही का?

संघाध्यक्ष प्रा० न० र० फाटक यांच्या वयाला ७० वर्षे पूर्ण झाली म्हणून संघाने दि० १५ एप्रिल १९६५ रोजी म० म० दत्तोपंत पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली प्रकट सत्कार आयोजित केला. प्रा० फाटकांनी साहित्य संघाचे अध्यक्षपद १९५२ साली स्वीकारले त्या वेळेपासून त्यांनी विविध विषयावर व्याख्यानमाला गुंफून संघाच्या साहित्य विषयक कार्यात सदैव चैतन्य खेळत ठेवले. या व्याख्यानमालांना रसिक श्रोत्यांची सदैव फार मोठ्या प्रमाणावर उपस्थिती असे. म्हणूनच त्यांचा सत्कार करण्याची संधी संघाने गमाविली नाही. आणि समारंभाचे अध्यक्षपदी मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष व प्रा० फाटकांचे निकटचे ज्येष्ठ स्नेही दत्तोपंत पोतदार हे होते हाही एक मोठाच योग होता. सत्कार प्रसंगी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रा० गोवर्धन पारीख, डॉ० पु० म० जोशी, श्री० ग० ल० चंदावरकर श्री० य० कृ० खाडिलकर, डॉ० गं० ब० ग्रामोपाध्ये, प्रा० ल० के० आरावकर इत्यादींची फाटकांच्या वाङ्मयीन सेवेचा व संशोधन कार्याचा गौरव करणारी भाषणे झाली.

मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष व मराठी वाङ्मय सेवकातील भीष्माचार्य म० म० दत्तोपंत पोतदार यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त संघाने त्यांचा सत्कार करण्याचे योजिले. या सत्कारात महामंडळाच्या सर्व घटकसंस्था व सलग्नसंस्था सामील झाल्यामुळे सबंध मराठी साहित्यविश्व या सत्कारात सहभागी झाल्याने हा एक अपूर्व योगायोगच होता. अध्यक्षस्थानी संघाध्यक्ष प्रा० न० र० फाटक होते. सत्काराचे वेळी डॉ० ह० रा० दिवेकर, डॉ० वि० भि० कोलते, श्री० के० नारायण काळे, प्रा० वामनराव चोरघडे, प्रा० नरहर कुरुंदकर यांची भाषणे झाली.

१९६५ साली रशियन लेखकांच्या सांस्कृतिक शिष्ट मंडळाने—कवि मायकेल ल्युकोनिक, श्रीमती मीरा सालागांनिक, टीकाकार व्हिक्टर पॅन्काव्ह आणि सोव्हिएट लिटरेचरच्या उपसंपादिका व्हॅलेन्टिना जाकिस यांनी २३ डिसेंबर रोजी भेट दिली तत्पूर्वी दि० ११ रोजी रशियन साहित्यिक वाय–डो० लुडोव्हन व के० अलिन गॅनाव्ह यांनी भेट दिली होती.

या वर्षी मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलनाच्या १८ व्या अधिवेशन प्रसंगी शास्त्रीय साहित्य शाखा संमेलन प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ० ग० शां० कसवेकर यांच्या अध्यक्षतेखाली भरविले होते. शास्त्रीय साहित्याची, संमेलनाने दाद घेण्याचा हा पहिला प्रयत्न होता असे म्हणता येईल.

आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या गणिततज्ज्ञानी—रँ. जयंत नारळीकरांनी आपले वडील रँ.

नारळीकर व मातोश्री समवेत संघास भेट दिली. त्यांचा सत्कार संघाचे उपाध्यक्ष डॅ. का० रा० गुंजीकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला. आंग्ल नाटककार शेक्सपिअर चतुर्थ शताद्बि महोत्सव साहित्य संघाने मराठी नाट्य परिषदेच्या सहकार्याने साजरा केला. नाट्यक्षेत्रातील शेक्सपिअरचे स्थान मोठ्या मानाचे असल्यामुळे आणि मराठी रंगभूमीवर शेक्सपिअरचे ऋण अमान्य करणे कृतघ्नपणाचे ठरेल म्हणूनच या जागतिक कीर्तीच्या नाटककाराची चतुर्थ शताद्बि साजरी करणे अगत्याचे होते. या निमित्त मुंबई विद्यापीठाचे इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ० गोपाळचंद्र बॅनर्जी यांचे नाटककार शेक्सपिअर या विषयावर इंग्रजीतून भाषण, नाना जोग लिखित ३ अंकी हॅम्लेटचा प्रयोग व परिषदेच्या 'रुपकम्' शेक्सपिअर खंडाचे प्रकाशन करण्यात आले.

मुंबईचे शिल्पकार कै० नाना शंकरशेठ यांच्या मृत्यूस १०० वर्षे झाल्यानिमित्त संघाध्यक्ष प्रा० फाटक यांची 'नाना शंकरशेट कालीन मुंबई व नाना शंकरशेट यांची कामगिरी' या विषयावर तीन व्याख्याने झाली. अव्वल इंग्रजीतील आद्य आणि कट्टे समाजसुधारक कै० अण्णा मार्तंड जोशी हे नाटककारही होते. १८८३ साली 'संगीत सौभाग्यरमा' हे त्यांचे पहिले नाटक रंगभूमीवर आले होते. संघाचे विश्वस्त डॉ० भा० नी० पुरंदरे हे त्यांचे नातू. डॉ० पुरंदरे यांनी कै० अण्णा मार्तंड जोशी स्मारक व्याख्यान माला संघाने चालवावी म्हणून रु. ५०००/—ची १९६६ साली देणगी दिली. या रकमेच्या व्याजातून ही व्याख्यानमाला चालविली जाते.

१९६६ साली महाराष्ट्र शासनाने केशवसुत जन्मशताब्दि साजरी करण्यासाठी एक शासकीय समिती नेमली होती या समितीवर संघाचे कार्यकर्ते होतेच. ही समिती व साहित्यसंघ यांनी हा जन्मशताद्बि दिन साजरा केला व संघाने नंतर वर्षभर व्याख्यानमाला आयोजित केली होती.

संघाचे वतीने कै० नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या जन्मशताब्दि निमित्त प्रा० न० र० फाटक यांनी नऊ व्याख्यानांची एक माला गुंफली होती.

नटसम्राट गणपतराव जोशी यांचा जन्मशताब्दि समारंभ संघाने श्री पृथ्विराज कपूर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा केला व या निमित्ताने गणपतराव जोशी यांच्या रंगभूमीवरील कामगिरीविषयी लेख असलेला संग्रह प्रसिद्ध केला.

१९६८ साली श्रीलक्ष्मीबाई टिळक जन्मशताब्दिनिमित्त व्याख्याने आयोजिली होती.

प्रसिद्ध विद्वान सौ० इरावती कर्वे यांच्या 'युगान्त' या पुस्तकावर परिसंवाद घडवून आणला.

१९६८ पासून प्रतिथयश व उदयोन्मुख साहित्यिकांनी एकत्र जमावे, केवळ एकत्र येण्यासाठीच जमावे पर्यायाने नव्या ओळखी व्हाव्या, जुन्यांना उजाळा मिळावा आणि

त्यांच्यात अनौपचारिक 'काव्यशास्त्र विनोद' चालावा या हेतूने 'अनौपचारिक साहित्यिक गप्पा' हा कार्यक्रम ७ डिसेंबर १९६८ पासून सुरू केला. या कार्यक्रमाला साहित्यिकांचा प्रतिसाद चांगलाच मिळत होता.

महाराष्ट्र राज्य वाङ्मय पारितोषिक विजेत्या लेखकांच्या व त्यांच्या प्रकाशकांच्या सन्मानार्थ पारितोषिक वितरण समारंभाचे दिवशी संघातर्फे मेजवानी देण्याची प्रथा साहित्य संघाने १९६८ पासून सुरू केली होती. या मागील हेतू राज्य पुरस्कार मिळविण्याऱ्या गावोगावच्या लेखक प्रकाशक यांचा साहित्य संघाने सन्मान करावा हाच होता.

१९६९ साली महात्मा गांधी जन्मशताब्दिनिमित्त प्रा० फाटक यांनी 'महात्माजींच्या जीवनाचे विविध पैलू' या विषयावर एकूण ४० व्याख्याने दर रविवारी दिली.

अ–मराठी भाषिकांसाठी मराठी भाषेचे वर्ग साहित्य संघाने १९७० पासून सुरू केले. हे वर्ग प्रामुख्याने प्रौढासाठीं असून विद्यार्थात प्राध्यापक, इंजिनिअर, डॉक्टर्स व विविध कचेऱ्यातील अधिकारी व नोकर वर्ग सहभागी होऊन मराठी भाषेचे शिक्षण संपादन करतात. या उपक्रमात तमीळ संघ, साहित्यिका या संस्थाचा सहभाग असे. चेंबूर, पवई, बान्द्रे इ० ठिकाणी हे वर्ग संघातर्फे चालविले जातात. या वर्गांना शिकविण्यासाठी मराठीच्या प्राध्यापकांनी व साहित्यिकांनी संघास सदैव सहकार्य दिले.

याच वर्षी संघातर्फे रशियन भाषा शिक्षणाचे वर्गही सुरू झाले व बंगाली भाषा शिकविण्यासाठी वंगभाषा प्रचार समितीच्या सहकार्याने वर्ग सुरू केले. 'सौंदर्यशास्त्र परिचय' वर्गही एस्थेटिक सोसायटी मुंबई या संस्थेच्या सहकार्याने सुरू केले.

'आदर्श भारत सेवक–नामदार गोपाळ कृष्ण गोखले' या ग्रंथास साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभल्यामुळे या ग्रंथाचे लेखक संघाध्यक्ष प्रा० न० र० फाटक यांचा १८ मे १९७१ रोजी कोल्हापूरचे विद्वान संस्कृत पंडित श्री० बाळाचार्य खुपेरकर यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात आला.

जुन्या पिढीतील सुप्रसिद्ध छाया चित्रकार श्री० मोरेश्वर नारायण कीर्तीकर यांनी साहित्य संघाला कै० बालगंधर्व यांचे सिंधूच्या भूमिकेतील पूर्णाकृती छायाचित्र भेट दिले.

मुंबई महानगरपालिकेच्या शतसांवत्सरिक महोत्सवाच्या निमित्ताने संघाध्यक्ष प्रा० न० र० फाटक यांनी 'मुंबई शहराची बनावट' (जडणघडण) या विषयावर एकूण २२ व्याख्याने दिली.

भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने आखलेल्या योजनेनुसार नाट्यपथक चालविण्यासाठी ज्या संस्थांची निवड केली त्यात साहित्य संघाची निवड केली होती.

वर्षात तीन नवीन नाटके निर्मित करण्यासाठी प्रत्येकी रु. १०,००० प्रमाणे एकूण रु. ३०,०००चे निर्मिती अनुदान व रु. १९,६००चे खर्चासाठी अनुदान केंद्र सरकारकडून प्राप्त झाले.

२५ ऑगस्ट १९७३ रोजी डॉ० भालेराव यांच्या १८व्या पुण्यतिथीला डॉ० भालेराव यांच्या अर्ध पुतळ्याचे अनावरण मुंबईचे महापौर श्री० सुधीर जोशी यांच्या हस्ते झाले. प्रथमतः हा अर्धपुतळा तयार करण्याची जबाबदारी प्रख्यात शिल्पकार श्री० पानसरे यांचेवर सोपविली होती त्यांनी नमुना शिल्प तयारही केले होते परंतु त्यांचे आकस्मिक निधन झाल्यामुळे हे काम पूर्ण होऊ शकले नव्हते. हे काम शिल्पकार श्री० शशिकांत वडके यांनी संघाच्या विनंतीवरून पूर्ण केले. श्री० वडके यांचा संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. नाट्यगृहाच्या दर्शनी विश्रामिकेत हा पुतळा बसविण्यात आला आहे.

१९७४ साली कै० नाथमाधव स्मृति व्याख्यानमाला सुरू करण्यासाठी रु. २,००० ची देणगी साहित्य संघास मिळाली. या रकमेच्या व्याजातून व्याख्यान मालेचा खर्च होत असतो.

संघाच्या स्थापनेपासूनचे सभासद व विनीचे कार्यकर्ते श्री० लालजी पेंडसे यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी श्रीमती शैला पेंडसे यांनी रु. ५५०० ची देणगी दिली व या देणगीतून कै० श्री० लालजी पेंडसे स्मारक व्याख्यानमाला सुरू झाली.

१९७४ सालात संघाच्या नाट्यशाखेच्या दृष्टीने अत्यंत अभिमानाची, महत्वाची घटना म्हणजे "अजब न्याय वर्तुळाचा" या नाटकाचा युरोपातील दौरा ही होय. जर्मन डेमॉक्रेटिक रिपब्लीक (पूर्व जर्मनी) च्या स्थापनेच्या रौप्य महोत्सव प्रसंगी त्या राष्ट्राने निरनिराळया राष्ट्रांतील व भाषिकांतील नाट्यप्रयोग सादर करण्यासाठी बर्लिन येथे एक नाट्योत्सव आयोजित केला होता. त्या नाट्योत्सवात सुप्रसिद्ध जर्मन नाटककार बर्टोल ब्रेख्तच्या "धी कॉकेशियन चॉक सर्कल"च्या आधारे कै० चिं० त्र्यं० खानोलकरानी लिहिलेल्या "अजब न्याय वर्तुळाचा" या साहित्य संघाने निर्मिती केलेल्या मराठी नाटकाच्या प्रयोगास खास निमंत्रण देण्यात आले होते. वाटेत स्वित्झरलंड मधील झुरिच येथे तीन प्रयोगाचे आमंत्रण आल्यावरून हा दौरा सप्टेंबर १९७४ मध्ये घेण्यात आला. नाटककार श्री० चिं० त्र्यं० खानोलकर, दिग्दर्शक श्रीमती विजया मेहता, संगीत दिग्दर्शक श्री० भास्कर चंदावरकर, नाट्यशाखा कार्यवाह डॉ० बाळ भालेराव नाट्यपथकाचे कार्यकारी संचालक—संघाचे प्रमुख कार्यवाह श्री० दि० वि० आमोणकर व ३५ कलावंत मिळून एकूण ४० जणानी या दौऱ्यात भाग घेतला होता. नटसंच २३ सप्टेंबर १९७४ रोजी मुंबई सांताक्रूझ विमानतळावरून निघाला. झुरिच येथे तीन यशस्वी प्रयोग करून २८ सप्टेंबर रोजी बर्लिन येथे दुपारी पोहोचला. रौप्य महोत्सवातील दोन प्रयोग सप्टेंबर

२९ व ३० रोजी संध्याकाळी ७ वाजता सादर करण्यात आले. दोनही प्रयोग कमालीचे रंगले व दोनही प्रयोगांना प्रेक्षकांचा प्रतिसाद व वृत्तपत्रातील अभिप्राय इतके उत्कृष्ट आले की हे नाटक ह्या नाट्योत्सवातील 'Outstanding event' ठरले. नाट्योत्सव समितीतर्फे नटसंचाला मेजवानी देण्यात आली. त्यावेळी बर्लिन येथील नाट्य दिग्दर्शक, समीक्षक व नाटककार, कै० बर्टोल ब्रेख्तचे सहकारी उपस्थित होते. त्या सर्वांनी प्रयोगाची मुक्त कंठाने स्तुती केली. त्यानंतर गेरा (२ ऑक्टोबर) अरफर्ट (३ ऑक्टोबर) वायमार (४ ऑक्टोबर) असे तीन प्रयोग झाले. या कालात नटसंचाचा मुक्काम वायमार येथे होता. 'वायमार'च्या प्रयोग अतिशय रंगला. वायमार येथील राष्ट्रीय नाट्यशिक्षण केंद्राने कलावंताचा सत्कार केला. या सत्कारानिमित्त गळयात घालावयाचे मॅडेलियन (रतिमदनाचे शिल्प) सर्व कलाकार, साहाय्यकास प्रदान केले. त्यानंतर पोस्टडॅम (८ आक्टोबर) व ब्रॅडनबर्ग (९ आक्टोबर) येथे दोन प्रयोग करण्यात आले. ११ आक्टोबरला संच बर्लिनहून निघून ब्रुसेल्स, बैरुट लेबॅनॉन व तेहरान मार्गे दि० १३ आक्टोबरला मुंबईस परत आला.

या धावपळीच्या काळातही नटसंचाला पूर्वजर्मनीतील बर्लिन येथील नाट्यगृहे विशेषतः तेथील लोकनाट्याचे मोठे मोठे नाट्यगृह-रंगमंच व तांत्रिक सोई पाहता आल्या. ॲलेक्झांडर, प्लाल्स ही नाट्यगृहे पाहिली, टी० व्ही० टॉवरवरून बर्लिन परिसर, म्युझियम पाहिले. ७ आक्टोबर रोजी संबंध दिवस चाललेला उत्सव पाहण्यास तर मिळालाच पण या उत्सवातील कार्यक्रमात भारतीय पथक म्हणून सक्रीय भाग घेता आला. एका जगप्रसिद्ध नाटककाराचे नाटक त्याच्या देशात रौप्यमहोत्सवी समारंभाच्या निमित्ताने मराठी भाषेत सादर करण्याचा व भारतीय पथक म्हणून या समारंभात भाग घेण्याची संधी संघाच्या कलापथकास मिळाली. बरोबर २० वर्षांनी नाट्यशाखेला मिळालेली ही महत्वाची संधी होती. १९५४ साली राष्ट्रीय नाट्योत्सवात 'भाऊबंदकी' नाटकाला प्रथम पारितोषिक मिळाले होते. त्यावेळी पथकाचे नेतृत्व कै० डॉ० अ० ना० भालेराव यांनी केले होते तर १९७४ साली एका राष्ट्राच्या रौप्य महोत्सवातील देशादेशातील नाट्यपथकांनी सादर केलेल्या नाटकांनी युक्त अशा नाट्यमहोत्सवात भारताच्या वतीने सहभाग घेण्याचे व आपल्या नाट्यनैपुण्याने सर्वांची मने आकर्षून घेऊन वाहवा करून घेण्याची संधी या पथकाला मिळाली आणि या पथकाचे नेतृत्त्व करीत होते डॉ० बाळ भालेराव.

मुंबईस आल्यावर येथील जर्मन डेमॉक्रेटिक रिपब्लिकच्या कार्यालयाने एक आभार प्रदर्शक कार्यक्रम आयोजिला होता. त्यावेळी दौऱ्यातील छायाचित्रांचे प्रदर्शनही भरविले होते. 'वायमार' येथील नाट्यदिग्दर्शक मि० फ्रित्झ बेनेव्हिटज् हे 'अजब'चे सह दिग्दर्शक होते. त्यांनी संघास पुन्हा भेट देऊन नाटकाचा दौरा करून रौप्य महोत्सवात सहभागी झाल्याबद्दल आभार मानले. भारताच्या पंतप्रधानांना जर्मन रिपब्लिकच्या पंतप्रधानांनी आभार प्रदर्शक पत्र दिले होते ते देण्यासाठी त्यांचे आगमन होते. भारत

सरकारच्या वतीने हा संच जर्मनीस गेला होता. संचाचा प्रवास खर्च भारत सरकारने केला होता तर जर्मनीतील वास्तव्याचा खर्च जर्मन सरकारने केला होता. या संचाची निवड करण्याची जबाबदारी संगीत नाटक अकादमीवर सरकारने सोपविली होती. भारतातील इतरही नाट्यसंच यासाठी प्रयत्न करीत होते परंतु नाटक अकादमीने श्री० वेनिव्हित्झ व श्री० पु० ल० देशपांडे यांची मते प्रमाण मानून हा मान साहित्य संघाच्या नाट्यसंचास दिला.

विख्यात साहित्यिक व साहित्य संघाचे प्रारंभापासूनचे हितचिंतक पद्मभूषण श्री० भाऊसाहेब खांडेकर यांचा ज्ञानपीठ पारितोषिकाचे विजेते म्हणून गुरुवार दि० २५ मार्च १९७६ रोजी सायंकाळी ५–३० वाजता मुंबईतील अनेक मराठी व अ-मराठी भाषिक साहित्यिक व सांस्कृतिक संस्था यांच्या सहकार्याने मुंबई विद्यापीठ दीक्षान्त सभागृहात भव्य सत्कार करण्यात आला. मराठी साहित्यिकाला हा अखिल भारतीय श्रेष्ठ सन्मान मिळाल्याबद्दल सर्व भाषिक साहित्यिकांनी अभिनंदनपर भाषणे केली.

मुद्राराक्षस या नाटकाचा जर्मन भाषेत प्रयोग करण्याचे जर्मनीने ठरविल्यानंतर त्याचे भरत नाट्यशास्त्रानुसार अभिप्रेत असलेल्या भरत रंगभूमीवर प्रथमतः मराठी भाषेत प्रयोग करण्याची विनंती साहित्य संघाने मान्य केली व त्यानुसार आयोजन केले. या नाटकाचे दिग्दर्शन श्रीमती विजया मेहता यांनी केले तर नेपथ्य योजना संघाचे नेपथ्यकार चित्रकार द० ग० गोडसे यांनी केले होते. संगीत दिग्दर्शक म्हणून श्री० भास्कर चंदावरकर यांनी संगीताची कालानुरूप योजना केली होती. या प्रयोगास जर्मनीतील दिग्दर्शक हजर राहून त्यांनी एकूण प्रयोगाच्या बाजाबद्दल पसंती दर्शविली. या नंतर जर्मन भाषेतील प्रयोगासाठी दिग्दर्शक, नेपथ्यकार व संगीतकार यांनी जर्मनीत जाऊन प्रयोगाची सर्व सिद्धता करून दिली होती.

१९५५ पासून १९७१ पर्यंतचे संघाचे एक कार्यवाह श्री० चं० वि० बावडेकर हे १९७६ मधे निधन पावले. साहित्य संघाच्या स्थापनेपासून श्री० बावडेकर संघाचे कार्यशील सदस्य होते. संघाचे मुखपत्र 'वीणा' यात ते सहसंपादक होते १९५५ साली डॉ० भालेराव आजारी झाल्यानंतर ते कार्यवाह म्हणून ते कार्य करू लागले. यावेळी त्यांनी संघाचे सुमारे १५० तहह्यात सदस्य मिळविले. चं० वि० बावडेकर यांनी विविधवृत्त साप्ताहिकात अनेक वर्षे सहसंपादक म्हणून काम केले. यात आलमगीर या नावाने ते लिहीत असत. नंतर त्यांनी आलमगीर या नावाचे साप्ताहिक चालविले. प्रारंभापासून तो मृत्यूपर्यंत साहित्य संघाच्या कार्यास त्यांनी फार मोठा हातभार लावला. त्यांच्या मृत्यूने संघ एका कार्यतत्पर कार्यकर्त्यास पारखा झाला.

१९४६ पासून संघाच्या कार्यात भाग घेणारे संघाचे सक्रीय कार्यकर्ते श्री० श्रीपाद शंकर नवरे यांनी कोषाध्यक्ष, कार्याध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून अनेक वर्षे जबाबदारीच्या

पदावर काम करून संघ कार्यात रस घेतला होता. मराठी साहित्य महामंडळावर संघाचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी मृत्यूपर्यंत काम केले. त्यांच्या मृत्यूमुळे संघ एका कार्यरत कार्यकर्त्याला मुकला. संघाच्या यशात त्यांचा मोठा सहभाग होता.

मराठी साहित्य महामंडळाचे प्रारंभापासूनचे अध्यक्ष व साहित्य संघाच्या महत्त्वाच्या कार्यक्रमांना सदैव उपस्थित राहून सक्रीय भाग घेणाऱ्या व कार्यकर्त्यांशी अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध असलेल्या म० म० पोतदारांचे निधन ही कार्यकर्त्यांवर मोठीच आपत्ती होती. कुटुंबातील ज्येष्ठ पुरुष काळाने ओढून न्यावा याबद्दल कार्यकर्त्यांना अतीव दुःख होणे स्वाभाविक होते.

साहित्य संघाचे १९५० पासून १९७९ पर्यंत सतत अध्यक्ष असलेले प्रा० न० र० फाटक यांचे निधन दि० २१ डिसेंबर १९७९ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी झाले. आपल्या अध्यक्षीय कारकीर्दीत त्यांनी अनेक व्याख्यानमाला गुंफून ३०० वर व्याख्याने संघासाठी दिली. कै० फाटकांची व्याख्याने म्हणजे श्रोत्यांना ज्ञानरसात डुंबण्याची अपूर्व संधीच असे. ते एक चालते बोलते ज्ञानकोषच होते. त्यांच्यासारखा अध्यक्ष मिळणे हे संघाचे भाग्यच होत. साहित्य संघाची वाङ्मयीन बाजू त्यांनी भक्कमपणे लावून धरली होती. प्रा० फाटक यांनी सतत ३० वर्षे संघाध्यक्षपद भूषविलेच नव्हे तर त्यांनी आपल्या अजोड कर्तृत्वाने निरलसतेने विद्वत्तेने साहित्य संघास अजोड प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांच्या निधनानिमित्त झालेल्या शोकसभेत साहित्य संघाने प्रा० न० र० फाटक स्मारक संशोधन केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घोषित करण्यात आला. हे संशोधन केंद्र स्थापन करताना पहिल्या दशवार्षिक योजनेसाठी एक १० कलमी कार्यक्रम आखण्यात आला. या केंद्रास महाराष्ट्र शासनाची मान्यताही मिळाली. मुंबई महानगरपालिकेने या केंद्रासाठी ५० हजार रुपयांचे अनुदानही जाहीर केले. हे संशोधन केंद्र पब्लिक ट्रस्ट ॲक्ट खाली नोंदविण्यातही आले.

मुंबई मराठी साहित्य संघाचे एक संस्थापक सदस्य प्रारंभापासूनचे डॉ० भालेराव यांच्या समवेत कार्यवाह म्हणून कार्यरत असणारे व आमरण संघ सेवा करणारे माजी प्रमुख कार्यवाह मुंबईतील अनेक सांस्कृतिक व शैक्षणिक संस्थाशी अधिकारपरत्वे संबंध असलेले श्री० दिनकर विठ्ठल तथा तात्यासाहेब आमोणकर यांच्या निधनाने एक निरलस निरपेक्ष वृत्तीचा कार्यकर्ता गेल्याने मुंबईच्या साहित्यिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनात नोंदीच पोकळी निर्माण झाली यात शंका नाही. आमोणकर हे नुसतेच कार्यवाह नव्हते तर वेळप्रसंगी निरनिराळ्या भूमिकांनी संघकार्य रेटण्यात कुशल होते. ते आपल्या सर्व कुटुंबियासह संघ कार्यात सदैव रस घेत असत. संघ मंदिर झाल्यावर आपल्या निवृत्तीच्या कालावधीत दररोज १२–१४ तास संघमंदिरात हजर राहून सर्व कार्यावर देखरेख करीत असत. त्यांची संघ मंदिरातील अनुपस्थिती ही साऱ्यानाच एक क्लेशकारक जाणीव

होती. संस्थेवर अखंड प्रेम करणाऱ्या आणि तिच्यासाठी वर्षानुवर्षे खस्ता खाणाऱ्या अशा कार्यकर्त्यांच्यामुळेच संस्था मोठ्या होतात. त्यांची स्मृती हा कार्यकर्त्यांचा ठेवा होय यात शंका नाही. डॉ० भालेरावांच्या मृत्यूनंतर ते संघाच्या कुटुंबातील प्रमुख होते व यासाठीच अखेरच्या कालखंडात त्यांना संघाचे प्रमुख कार्यवाह म्हणून मोठ्या सन्मानाने कार्यकर्त्यांनी मानले. त्यांचे निधन ही संघावरील मोठीच आपत्ती होय.

१९४४ सालच्या मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरिक महोत्सवासाठी डॉ० भालेराव यांनी एका मोठ्या कार्यकर्त्याची संघास जोड करून दिली. हे कार्यकर्ते म्हणजे श्री० भार्गवराम पांगे. संगीत, नृत्य व नाटक हे श्री० पांगे यांचे कार्यक्षेत्र. संघाच्या नाट्यशाखेचे ते प्रमुख आधारस्तंभ. मराठी रंगभूमीवरील सर्व कलाकार श्री० पांगे यांना परिचित होते. योग्य वेळी योग्य कलाकाराचा सहभाग मिळविणे यात पांगे यांचा हातखंडा होता. उघड्या संघ मंदिरापासूनच संघ मंदिराचे व्यवस्थापक म्हणून श्री० पांगे यांनी अतिशय मोलाची व जबाबदारीची जागा भूषविली. साहित्य संघाच्या प्रत्येक नाट्यप्रयोग हा त्यांच्या उपस्थितीत व देखरेखी खालीच होत असे. वर्षानुवर्ष सातत्याने अशी सेवा करणे हे खरोखरच दिव्य होते. संघ मंदिर बांधकामातही श्री० पांगे यांचा सहभाग उल्लेखनीय होता. आपल्या अंगी असलेल्या सर्व गुणसमुच्चयाचा वापर त्यांनी नाट्यशाळा व साहित्य संघ याच्यासाठीच आमरण केला. त्यांच्या निधनाने मुंबई मराठी साहित्य संघ व मराठी रंगभूमीचे अपरिमित नुकसान झाले.

१९८१ च्या संघ दिनाला जोडून एक नाट्योत्सव मुंबई व ठाणे येथे साजरा करून संघास कर्जभारातून सोडवावे अशा कल्पनेने कार्यकर्त्यांनी उत्सवाचे आयोजन केले. या माध्यमातून अपेक्षित द्रव्यलाभ जरी झाला नाही तरी या उत्सवाच्या वेळी एक अकल्पित गोष्ट घडून आली. या उत्सवाच्या समारोपासाठी त्या वेळेचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बॅ० अंतुले आले होते. या आधी संघाचे विश्वस्त डॉ० पुरंदरे व प्रमुख कार्यवाह श्री० दाजी भाटवडेकर यांनी त्यांना संघाची आर्थिक परिस्थिती सांगितली होती व व्याजापायीच उत्पन्नाचा फार मोठा वाटा द्यावा लागतो याची माहिती दिली होती. मुख्यमंत्र्यांनी समारोपाच्या भाषणात संघ कार्याची प्रशंसा करून अशा मान्यवर संस्थेला आर्थिक अडचणी असू नयेत म्हणून मुख्य मंत्री निधीतून रुपये पाच लक्ष रकमेचा धनादेश प्रमुख कार्यवाह श्री० भाटवडेकर यांचे हाती दिला. यामुळे संघ आपल्या इमारत बांधकामासाठी झालेल्या कर्जातून मुक्त झाला. मुख्यमंत्र्याच्या या देणगीबद्दल संघ महाराष्ट्र शासनाचा आणि मुख्यमंत्री बॅ० अंतुले यांचा आभारी आहे. या देणगीमुळे अनेक वर्षे कर्जभाराखाली गुदमरलेल्या आपल्या साहित्य संघाच्या वास्तूने सुटकेचा पहिला सुखद निःश्वास सोडला. संघ मंदिराच्या कोनशिला समारंभ प्रसंगी अध्यक्ष या नात्याने त्या वेळचे मुख्यमंत्री कै० यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र शासन संघाच्या प्रकल्पामागे निश्चितपणे उभे राहील असे आश्वासन दिले होते. २१ वर्षांनी मुख्यमंत्री

बॅ० अंतुले यांनी कै० यशवंतरावांच्या आश्वासनाची सांगता केली असेच म्हटले पाहिजे.

१९८२ साली संघाच्या नाट्यशाखेकडे एक चांगले नाटक आले. श्री० विश्राम बेडेकर यांच्या पहिल्या नाटकाचे 'ब्रह्मकुमारी'चे कै. डॉ० भालेराव यांना कौतुक होते. या नाटककाराने संघासाठी नाटके लिहावीत अशी त्यांची उत्कट इच्छा होती. म्हणूनच १९५० पूर्वीच डॉ० भालेराव श्री० विश्राम बेडेकर यांना भेटण्याठी मुद्दाम त्यांच्या घरी गेले होते. नेहमीप्रमाणे श्री० अंधृटकर हे त्यांच्या बरोबर होते. डॉ० भालेरावांनी बेडेकर यांना नाटक लिहिण्याची विनंती केली नाट्यविषयांची चर्चाही केली पण...बघू एवढे म्हणण्यापलिकडे त्यावेळी काही घडले नाही. नंतर बेडेकरांनी एक दोन नाटके लिहिली परंतु ती संघाकडे आली नाहीत. 'वाजे पाऊल आपुले' या त्यांच्या नाटकात साहित्य संघाचे अनेक मान्यवर कलाकार होते परंतु निर्मिती मात्र संघाची नव्हती. वास्तविक त्यांनी लिहिलेले 'टिळक आणि आगरकर' हे नाटकही दुसऱ्या संस्थाच प्रयोगित करणार होत्या. सुमारे २ वर्षे हे नाटक तालमी सुरू होऊन स्थगित झाले होते. शेवटी हे नाटक संघासाठीच असावे म्हणूनच अखेरीस ते संघाकडे आले. यासाठी दाजी भाटवडेकर, डॉ० बाळ भालेराव, डॉ० कल्गुटकर यानी विशेष प्रयत्न केले, संघाने नाटक काढावयाचे ठरविले मात्र नाटकाचे दिग्दर्शन स्वतः बेडेकरांनीच करावे असे नाट्यशाखेचे मत होते. या नाटकासाठी सर्व कलावंत शक्यतो नवीन घेतले होते. या नाटकाचा पहिला प्रयोग १ ऑगस्ट १९८२ रोजी टिळक पुण्यतिथीस संघ मंदिरात झाला. एक दर्जेदार कलाकृती म्हणून या नाटकास मान्यता मिळाली. आकाशवाणी आणि दूरदर्शन या माध्यमातूनही प्रयोग झाले. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेने यावर्षीच सुरू केलेले वर्षातील उत्कृष्ट निर्मितीचे रु० ३००० चे पारितोषिकही या नाटकास मिळाले. ३०/३२ वर्षानंतर का होईना पण श्री० विश्राम बेडेकर यांचे नाटक संघाच्या रंगभूमीवर आले आणि गाजले, पारितोषिकाचे धनी झाले या वरून कै० डॉ० भालेराव यांच्या द्रष्टेपणाबद्दलची खात्री पटते.

१९४७ साली संघाने श्री० वि० वा० शिरवाडकर लिखित 'दुसरा पेशवा' हे बाजीराव पेशवे यांच्या जीवनावर आधारित नाटक सादर केले होते. १९८४ साली थोरले बाजीराव पेशवे स्मारक समितीने पुण्यास बाजीरावांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्याचे ठरविले होते. या प्रसंगी साहित्य संघाने बाजीराव पेशवे यांच्या जीवनावर नवे नाटक बसवून सादर करावे अशी स्मारक समितीने विनंती केली. या नाटकाची मूळ संकल्पना कॅप्टन वासुदेवराव बेलवलकर यांची आहे. नाट्य लेखन व दिग्दर्शन श्री० पुरुषोत्तम दारव्हेकर यांचे होते. नाटकाचे नाव 'रविराज तो मी रोहिणी' (बाजीराव मस्तानी) हे होते. या उपक्रमासाठी थोरले बाजीराव पेशवे स्मारक समितीकडून रु० २०,००० निर्मिती खर्चासाठी अनुदान मिळाले होते. पुतळ्याचे उद्घाटन भारताचे सरसेनापती जनरल वैद्य यांचे हस्ते पुण्यास झाले. या खास प्रसंगासाठी बाजीराव

पेशव्यांच्या जीवनावर नाटक सादर करण्याची संधी साहित्य संघास मिळाली याबद्दल धन्यता वाटणे साहजिक आहे.

१९८४ साली संघाचे संस्थापक सदस्य, कार्यवाह, कार्याध्यक्ष, 'साहित्य' द्वैमासिकाचे संपादक, वाङ्मयीन वर्गाचे प्रथम पासूनचे संचालक, अमराठी भाषिकासाठी मराठी वर्गाचे संचालक, उपाध्यक्ष इत्यादी नात्यांनी संघाची आमरण सेवा करणारे श्री० वामनराव ढवळे कालवश झाले. १९३४ पासून १९८४ पर्यंत श्री० ढवळे यांनी संघाच्या साहित्य विभागाची धुरा यशस्वी रितीने व समर्थपणे सांभाळली. वर्षानुवर्षे विविध नात्यांनी संस्थेची अखंडपणे सेवा करणे हे श्री० वामनरावांचे जीवनव्रत होते. मराठी साहित्य महामंडळावर संघाचे प्रतिनिधी म्हणूनही ते प्रारंभापासून अखेरपर्यंत कार्यरत होते. त्यांच्या निधनाने साहित्य संघ एका निष्ठावान आणि कर्तृत्ववान कार्यकर्त्यास मुकला.

१९४४ सालापासून श्री० शिवराम नारायण चिखलीकर हे संघात कार्यकर्ते म्हणून कार्य करीत होते. १९५८ साली ते संघाच्या कार्यकारी मंडळात सदस्य म्हणून निवडून आले. १९५२ साली डबडे नाट्यगृह बांधल्यापासून ते नाट्यगृहाची व्यवस्था पहात असत. या कामासाठी सायंकाळी ६ ते रात्रौ १२ पर्यंत संघ मंदिरात हजर राहून संघ मंदिराची व्यवस्था बघत. संघ मंदिर व्यवस्था समितीचे ते अनेक वर्षे सदस्य होते. १९६८ साली ते एक कार्यवाह म्हणून (संघ मंदिर) नियुक्त झाले. ऑगस्ट १९८० पर्यंत ते कार्यवाह संघ मंदिर म्हणून कार्यरत होते. नंतर शारीरिक अस्वास्थ्यामुळे त्यांना काम करणे शक्य झाले नाही. त्यांच्या सारखा निरलस कार्यकर्ता मिळाल्यामुळे संघ मंदिराची व्यवस्था ठेवणे संघास सुलभ झाले होते. स्वयंसेवक ते कार्यवाहपदापर्यंत त्यांनी मजल मारली होती. त्यांच्या निधनाने संघ एका कर्तव्यपरायण कार्यकर्त्यास मुकला. संघाच्या सुवर्ण महोत्सवाच्या वर्षात त्यांचे निधन ही सहकाऱ्यांच्या दृष्टीने अतीव दुःखाची गोष्ट होय.

१९३४ ते १९८५ या कालावधीतील महत्त्वाच्या घडामोडींचा, संघाने केलेल्या साहित्य व नाट्यविषयक वाटचालीचा हा धावता आढावा आहे. या वरून संघ कार्याचा समग्र इतिहास लिहिला जाईल तो केवढा मोठा असू शकेल याची कल्पना येणे सहज शक्य होईल. हा कार्याचा आढावा घेत असताना संघाच्या आर्थिक बाजूचा अत्यंत थोडक्या शब्दात परामर्ष घेणे अगत्याचे आहे. या शिवाय कोणत्या कठीण प्रसंगात संघाने कार्य केले व करीत आहे याचे दर्शन होणार नाही.

संघाचे सुरुवातीचे मुख्य उत्पन्न सभासदांची वर्गणी व देणग्या हेच होते. ३००-४०० रुपयांच्या अत्यंत तोकड्या उत्पन्नात सर्व कारभार चालवावा लागत असे. अनेक प्रसंगी कार्य करताना उसनवारी करूनच खर्च भागविणे प्राप्त होत असे.

अल्पस्वल्प देणग्याही मिळत असत. १९४३ अखेर संघाच्या आढाव्यात दिसणारी संपूर्ण मालमत्ता १८००-०० रुपयांची होती १९४४ साली मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरिक उत्सवातून शिल्लक राहिलेल्या रकमेमुळे आढवा पत्रकात मालमत्ता रु० ५१६७३-०० रकमेपर्यंत वाढली. या नंतर नाट्योत्सव व नाट्यशाखेची नाटके हेच संघाचे मुख्य उत्पन्नाचे साधन होते. या उत्पन्नाच्या शिलकीतूनच संघमंदिराच्या जागा खरेदीसाठी बयाणा इ० खर्च भागविला होता. १९५७-५८ पर्यंत महाराष्ट्र शासन अथवा नगरपालिका यांच्याकडून अनुदानासाठी संघाने प्रयत्न सुद्धा केले नव्हते. संस्था आपल्या कर्तृत्वावर उभी रहावी, आधी कार्य करून दाखवावे व नंतर मदतीसाठी हाक द्यावी असे डॉक्टरांचे धोरण होते. ५७-५८ पर्यंत कार्याची व्याप्ती वाढल्यानंतरच महाराष्ट्र शासन आणि मुंबई महानगरपालिका यांच्याकडे अनुदानाची मागणी करण्यात आली. शासनाने वेळोवेळीं अनुदाने दिली. महानगरपालिकेने इमारतीसाठी प्रथमतः एक लक्ष रुपयाचे अनुदान दिले. भारत सरकारनेही व महाराष्ट्रशासनानेही संघमंदिरासाठी प्रत्येकी एक लक्ष रुपयांचे अनुदान दिले. नंतर महापालिकेने व महाराष्ट्र शासनाने वार्षिक अनुदाने देण्यास प्रारंभ केला. याच कालावधीत काही व्यक्ती व संस्था यांनीही देणग्या दिल्या परंतु मुख्य ओघ नाटकाच्या तिकीट विक्रीचाच होत. ५७-५८ नंतर आर्थिक अडचणींचा अडसर संघ कार्यास राहिला नाही. १९६४ नंतर संघ मंदिराच्या भाड्याचेही उत्पन्न बऱ्यापैकी मिळू लागले होते. संघमंदिर बांधकामाचे वेळी महाराष्ट्र बँकेने सुमारे ६ लक्ष रुपयांचे कर्ज दिले होते या कर्जावरील चढ्या दराच्या व्याजामुळे मुद्दल फेडण्यास रक्कम उरणे दुरापास्त होत असे.

नाट्यगृह भाड्याचे उत्पन्न वाढवावे म्हणून नाट्यप्रयोगावर भरमसाट भाडे आकारण्याची कल्पनाही करणे शक्य नाही. कारण नाटकासाठी नाट्यगृह उभारण्याच्या कल्पनेपोटीच हा वास्तु प्रपंच होता. त्यामुळे खर्च भागण्या पुरतेच भाडे आकारले जात होते व आहे. एवढेच नव्हे तर एका वर्षी हौशी नाटकासाठी, प्रायोगिक नाटकांसाठी 'बुधवार योजना' राबविली गेली. दर बुधवारी हौशी संस्थाना आपल्या प्रयोगासाठी नाट्यगृह विनामूल्य दिले जात असे मात्र तिकीटाचे दर कमी ठेवण्याची अट असे. संघ मंदिराची वास्तू सांस्कृतिक कार्यासाठी आहे—व्यापारासाठी नाही हे सूत्र कधीही सुटले नाही. त्यामुळेच जेमतेम खर्चाची तोंडमिळवणी करण्या इतपत उत्पन्नावर संघाने समाधान मानले. पण १९७० नंतर चढत्या श्रेणीने खर्चाची बाजू एवढ्या प्रचंड प्रमाणात वाढली की त्या खर्चास तोंड देणे अशक्यप्राय होऊन बसले. अशा परिस्थितीत सुद्धा संघाने वेळोवेळी दर्जेदार प्रकाशने 'साहित्य' द्वैमासिक, साहित्य वार्षिक, विविध व्याख्यानमाला, नवी नवी नाटके सादर करणे, गरजेनुसार जुन्या नाटकांचे पुनरुज्जीवन करणे, साहित्य आणि नाट्य शिक्षणाचा उपक्रम राबविणे, संमेलने आयोजित करणे ही कार्ये चालूच ठेविली. ज्या उद्देशासाठी संघ निर्माण झाला ती उद्देश्ये साधण्यासाठी सतत धडपड चालू असल्याने व यासाठीही खर्च याच तुटपुंज्या उत्पन्नातून चालवावा

लागत असल्याने संघ मंदिराच्या बांधकामासाठी अपरिहार्यपणे महाराष्ट्र बँकेकडून जे मोठे कर्ज जागा व वास्तू नजरगहाण ठेऊन काढावे लागले त्या कर्जावरील नेहमीच्या दराचे व्याज देण्यातच शिल्लक संपून जाई व मुद्दलाची भरपायी नाममात्र होई. व्याजाची— भरपाई करण्यातच कार्यकर्ते मेटाकुटीला येत. वाढत्या महागाईमुळे खर्चाचे प्रमाणही मर्यादेबाहेर वाढल्याने मिळणाऱ्या उत्पन्नातून शिल्लक नाममात्र सुद्धा राहत नसे. त्या मुळेच घटनेनुसार निर्माण केलेल्या सर्व निधींच्या रकमा वाढत्या खर्चाने गिळून टाकल्या. कारण १९८४ अखेर आढावा पत्रक बघितले तर उत्पन्नापेक्षा वाढीव खर्च-संघमंदिर, साहित्य शाखा व नाट्य शाखा या तिन्ही शाखा मिळून—१९,५६,७४३–७८ इतका झाला आहे म्हणजे जेव्हा सुमारे २० लक्ष रुपये अनुदान अगर देणग्यांचे अथवा अन्य मार्गाने उभे होतील तेव्हाच इतर निधी जे घटनेनुसार निर्माण केले आहेत त्यांची भरपाई होईल. १९८२ साली मुख्यमंत्री निधीतून ५ लक्ष रुपयांचे अनुदान मिळाल्यामुळे इमारतीच्या कर्जाच्या फेडीची धास्ती राहिली नसली तरी दिवसेंदिवस वाढत जाणारे खर्च भागविण्यासाठी अन्य मार्गांचा अवलंब केल्याशिवाय भागणार नाही. म्हणूनच स्थायी स्वरूपाच्या उत्पन्नाचे मार्ग शोधणे व त्या मार्गांनी मोठ्या प्रमाणावर पैसा निर्माण केल्याशिवाय साहित्य संघासारख्या संस्था व्यवस्थित चालविणे अशक्य होऊन बसणार आहे. साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्यावर प्रेम असणाऱ्या व्यक्तींनी या परिस्थितीचा विचार अग्रक्रमाने करणे आवश्यक आहे. सुदैवाने ८१–८२ च्या सुमारास सारस्वत को–ऑपरेटिव्ह बँकेने सवलतीच्या व्याजाचे दराने म्हणजे दर्शनी बारा टक्के परंतु वेळेवर कर्जफेड केल्यास दोन टक्के सूट म्हणजे दहा टक्के व्याजाने संघास कर्जाऊ रक्कम दिल्याने महाराष्ट्र बँकेतील कर्जाची संपूर्ण फेड करण्यात आली. या नंतर पुढील प्रमाणे मदतीचा हात मिळाला. श्री० श्रीकृष्ण पंडित (अमेरिका) यांनी रु. ५०,००० फक्त ८ टक्के व्याजाने दिले परंतु नंतर त्यातूनच रु० २५,००० ची देणगी संघास दिली. श्री० भाऊसाहेब केळकर अत्तरवाले यांचेकडून रु० १०,०००. एका अनामिकाकडून (डॉ० खातूंचे तर्फे) रु० १०,०००. मनोरंजन मासिकाचे संपादक श्री० का० रा० मित्र यांचे जामात श्री० धोपेश्वरकर यांचेकडून सुमारे रु० ३०,०००. टाटा ऑईल मीलकडून रु० ५,००० या देणग्या मिळाल्या.

साहित्य संघासारखी सांस्कृतिक व साहित्यिक कार्य करण्यासाठी विशिष्ट उद्देश व ध्येयधोरणे डोळ्यापुढे ठेवून निर्माण झालेली संस्था अनुदाने, देणग्या यावर चालत नसते तर ती चालत असते कार्यकर्त्यांच्या जिद्दीवर आणि या उद्देशावर प्रेम करणाऱ्या व्यक्तींच्या सहकारावर. सुदैवाने प्रथमासूनच या संस्थेचे संस्थापक, संवर्धक यांनी अत्यंत चोखंदळपणे आपल्या सहकाऱ्यांची निवड केली होती.

योग्य व्यक्तीवर योग्य काम सोपवून सर्वांना कामात गुंतविणे. सर्वांच्या एकत्रित एकजुटीच्या प्रयत्नाने संस्थेचे उद्देश साधण्यासाठी जाणीवपूर्वक वाटचाल करण्याच्या धोरणामुळेच संघ गेल्या ५० वर्षांत मुंबईत सन्मानपूर्वक स्थिर राहून कार्य करू शकला.

लोकशाही मार्गाने संस्थेचा कारभार करताना मतमतांतरामुळे चर्चा, वादविवाद, मतप्रतिपादन यात कसूर नसे प्रसंगी या मतभिन्नतेचे स्वरूप उग्रही असे परंतु एकदा एखाद्या कार्याबद्दल, उपक्रमाबद्दल बहुमताने वा एकमताने निर्णय घेतला की सारे कार्यकर्ते त्यात एकदिलाने सहभागी होत मग ते कार्य व्यक्तीगत त्यांच्या मताविरुद्ध जरी असले तरी सहभागात कसूर नसे. व्यक्तीपेक्षा संस्था मोठी मानण्याची शिकवण डॉ० भालेरावांनी पूर्णपणे आपल्या सहकाऱ्यांत बिंबविली होती. कार्यकर्त्यांच्या गुण दोषाकडे बघताना गुणांकडेच बघितले जाई व दोषाकडे संस्थेचे अहित न होण्याइतपत कानाडोळा करण्याच्या वृत्तीने सारे कार्यकर्ते आजवर कार्यरत राहिले. त्यामुळे साहित्य संघ ही मुंबई अगर नुसत्या महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील एक अग्रगण्य साहित्यिक व सांस्कृतिक कार्य करणारी मराठी भाषिक संस्था म्हणून मोठ्या सन्मानाने वावरत आहे. आजवर ज्या कार्यकर्त्यांनी हा कार्यभार उचलला त्यांचे कौतुक करणे अगत्याचे आहे आणि कालमानानुसार जुन्यांची जागा घेण्यासाठी नव्या पिढीच्या कार्यकर्त्यांनी पुढे येणेही क्रमप्राप्त आहे आणि तसे घडेलही. आजवर शासनाने, संस्थांनी, धनिकांनी, रसिकांनी संघ ही आपलीच संस्था मानून जे आर्थिक पाठबळ दिले व कार्यकर्त्यांच्या उत्साहास पाठींबा देऊन संस्थेचे कार्य अव्याहत चालू ठेवण्यात सहभाग घेतला ते पुढेही आपला सहभाग चालू ठेवतील नव्हे तो सहभाग वाढीव प्रमाणावर देतील अशी खात्री आहे. या आढाव्याला जी परिशिष्टे जोडली आहेत त्यावरून संघ कार्याची व्याप्ती ध्यान्यात येईल व संघाने साहित्यासाठी काय केले? रंगभूमीसाठी काय केले? सांस्कृतिक उपक्रमासाठी काय केले? अशा सतत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांना समर्पक उत्तरे सापडतील अशी आशा आहे. या सुवर्ण महोत्सवाचे वेळी हा कार्याचा धावता आढावा घेतला परंतु शक्य तितक्या लवकर संघाचा संपूर्ण इतिहास प्रकाशित करून मराठी भाषेसाठी संघ काय करू शकला याचे संपूर्ण चित्र रेखाटणे अगत्याचे आहे. हीरक महोत्सवाच्या कालात मुंबई मराठी साहित्य संघ ही संस्था या पेक्षाही आपल्या कर्तृत्वाने मोठी होण्याची इच्छा बाळगणे आणि सर्वांसह कार्यरत राहणे हे उद्दीष्ट समोर ठेऊनच हा आढावा पूर्ण करु या.

संघाच्या वाटचालीचे लेखन करीत असता माझ्या डोळ्यासमोर एक मूर्ती वारंवार येत असे. आणि ही मूर्ती असे 'वहिनी श्रीमती सुधाताई भालेराव यांची. डॉक्टरांच्या त्या खरोखरीच्या सहधर्मचारिणी होत्या. डॉक्टरांच्या संसारात गृहिणी म्हणून प्रवेश केल्यापासून अखेर डॉक्टरांच्या मृत्युपर्यंत त्यांनी डॉक्टराना संघ कार्यात सतत साथ दिली. संघाच्या सर्व कार्यकर्त्यांच्या सहाय्यकांच्या नाना प्रकारच्या खस्ता खाल्ल्या. डॉक्टरांना कौटुंबिक कटकटीपासून दूर ठेवून गृहस्थाश्रम सुंदर करुन दाखविला आणि शेवटी डॉक्टरांच्या अकाली निधनाचा घाव मूकपणाने सोसून संघावर आणि संघ कार्यकर्त्यांवर मातृवात्सल्याचा वर्षाव केला. पुत्रवत संगोपन केले याची आठवण होऊन मन व्याकूळ होते. पण या कामामुळे त्यांच्यास आत्म्या समाधान होईल याचीही खात्री वाटते.

शेवटी संघ स्थापन करण्यात पुढाकार घेणाऱ्या संस्थापकांचे, आजवरच्या पदाधिकाऱ्यांचे, विश्वस्तांचे, आजवरच्या कार्यकारी मंडळ व नियामक मंडळाच्या सभासदांचे, सर्व सहकारी कार्यकर्त्यांचे, महाराष्ट्र शासन, महानगरपालिका, भारत सरकार, या संस्थातील अधिकारी, वृत्तपत्रे, देणगीदार आणि संघावर जीवापाड प्रेम करणारे सदस्य–श्रोते–प्रेक्षक, आणि संघ कार्यात सुधारणा होण्याचे दृष्टीने टीकेचा आसूड उगारून वेळीच कार्यकर्त्यांना जागे करणाऱ्या सुजाण टीकाकारांचे संघावर त्यांनी केलेल्या लोभाबद्दल अंतःकरण पूर्वक कृतज्ञता व्यक्त करून पुढील वाटचालीतही त्यांनी संघावर अखंड प्रेमाचा वर्षाव करावा अशी आग्रहाची विनंती करतो. शेवटी एकच अपुरी आकांक्षा व्यक्तवितो.

डॉक्टर तुम्ही या सुवर्ण महोत्सवाचे वेळी हवे होतात....

**शं० ना० अंधृटकर**

परिशिष्ट १

## मुंबई मराठी साहित्य संघाच्या विद्यमाने भरलेली

# मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलने

| इ.स. | जागा | अध्यक्ष | स्वागताध्यक्ष |
|---|---|---|---|
| १९३४ | मुंबई | श्री. कृ. अ. केळूसकर | श्री. अ. बा. गजेंद्रगडकर |
| १९३५ | दादर | ,, वि. स. खांडेकर | ,, भास्करराव जाधव |
| १९३६ | ठाणे | ,, मा. वि. वरेरकर | ,, रा. स. भागवत |
| १९३९ | मुंबई | ,, प्र. के. अत्रे | ,, मा. दा. आळतेकर |
| १९४० | कल्याण | ,, ग. त्र्यं. माडखोलकर | ,, त्रिं. का. मोडक |
| १९४१ | मुंबई | ,, शं. दा. जावडेकर | ,, द. अ. तुळजापूरकर |
| १९४३ | दादर | ,, रा. श्री. जोग | ,, ना. वि. मोडक |
| १९४४ | मुंबई | ,, लक्ष्मणशास्त्री जोशी | ,, अ. ह. गद्रे |
| १९४५ | मुंबई | ,, पु. य. देशपांडे | ,, अनंत काणेकर |
| १९४७ | मुंबई | ,, य. गो. जोशी | ,, श्री. म. वर्दे |
| १९५२ | मुंबई | श्रीमती इंदिराबाई संत | प्रा. वा. ल. कुळकर्णी |
| १९५४ | कुर्ला | श्री. ना. सि. फडके | डॉ. सावंत |
| १९५५ | डोंबिवली | ,, वि. स. खांडेकर | डॉ. सबनीस |
| १९५६ | मालाड | ,, वि. वा. शिरवाडकर | बॅ. पिंपुटकर |
| १९५७ | विलेपार्ले | श्रीमती मालतीबाई बेडेकर | प्रा. सौ. शैलजा करंदीकर |
| १९५८ | गोरेगाव | श्रीमती कुसुमावती देशपांडे | प्रा. वि. मा. दि. पटवर्धन |
| १९६० | दादर | श्री. महादेवशास्त्री जोशी | श्री. कृ. पां. कुळकर्णी |
| १९६५ | मुंबई | प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित | प्रा. वि. ह. कुळकर्णी |
| १९६८ | विलेपार्ले | प्रा. रा. भि. जोशी | प्रा. गंगाधर गाडगीळ |
| १९७० | खार | श्री. बा. भ. बोरकर | श्री. बाळ सावंत |
| १९७५ | मुंबई | प्रा. गं. बा. सरदार | ,, वा. रा. ढवळे |
| १९७७ | गोरेगाव | श्री. रणजीत देसाई | ,, भाईसाहेब सावंत |
| १९७८ | बान्द्रे | प्रा. नरहर कुरुंदकर | ,, पु. ग. खेर |
| १९८३ | मुलुंड | प्रा. वसंत बापट | ,, सु. ल. गद्रे |
| १९८४ | बोरिवली | श्री. सेतुमाधवराव पगडी | डॉ. वसंतराव चव्हाण |

### अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने

| | | | |
|---|---|---|---|
| १९३८ | मुंबई | स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर | नामदार मुकुंदराव जय.. |
| १९५० | मुंबई | राजकवि य. दि. पेंढरकर | डॉ. भा. ग. वाड |

### अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन

| | | | |
|---|---|---|---|
| १९४१ | मुंबई | आचार्य प्र. के. अत्रे | श्री. श्री. वि. वर्तक |

## परिशिष्ट २

### संघ दिन—महनीय प्रवक्ते

१९३७ डॉ. गो. स. सरदेसाई (रियासतकार).
१९३८ डॉ. र. पु. परांजपे.
१९३९ प्रा. ना. सी. फडके.
१९४० श्री. ना. ह. आपटे.
१९४२ प्रा. श्री. म. माटे—संतवाङ्मयाच्या अभ्यासातील अडचणी.
१९४३ प्रा. कुसुमावती देशपांडे.
१९४४ प्रा. चिं. वि. जोशी.
१९४५ डॉ. कमलाबाई देशपांडे—अपौरुषेय वाङ्मय.
१९४६ श्री. य. दि. पेंढरकर.
१९४७ श्री. आ. रा. देशपांडे (कवि अनिल)—साहित्य आणि सांस्कृतिक पुनरुत्थान.
१९४८ श्री. द. रा. बेंद्रे.
१९४९ श्री. धनंजयराव गाडगीळ.
१९५१ श्री. दादा धर्माधिकारी—साहित्य आणि जीवननिष्ठा.
१९५४ श्री. म. भा. भू. ज. र. आजगावकर.
१९५५ पं. श्री. दा. सातवळेकर.
१९५६ श्री. स. आ. जोगळेकर—गाथा सप्तशती.
१९५७ प्रा. सुरेंद्र बारलिंगे—ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र व भरताचे नाट्यशास्त्र.
१९५८ म. म. दत्तो वामन पोतदार—मराठी भाषेचा विकास.
१९५९ श्री. महादेवशास्त्री जोशी—ग्रंथनिर्मिती.
१९६० प्रा. वामन चोरघडे—असे आहे जीवन असे आहे साहित्य.
१९६१ प्रा. शं. दा. पेंडसे—संत वाङ्मयातील विवेक.
१९६२ श्री. म. भि. चिटणीस—कला आणि प्रगती : काही समस्या.
१९६४ बॅ. नाथ पै—राजकारण आणि साहित्य.
१९६५ श्री. देवीदास द. वाडेकर—जीवनाचे तात्त्विक अधिष्ठान.
१९६६ डॉ. वा. वि. मिराशी—महाराष्ट्रातील एक प्राचीन राजवंश.
१९६७ श्री. सदानंद वासुदेव कोगेकर—भारतीय लोकशाहीतील काही समस्या.
१९६८ श्री. प्रभाकर पाध्ये—कलेचे जीवशास्त्रीय स्वरूप.
१९६९ श्री. शंकर केशव कानेटकर—माझे जीवन.
१९७१ प्रा. रा. ना. दांडेकर—वेदांतील विश्वदर्शन.
१९७२ प्रा. वि. म. दांडेकर—लोकशाही समाजवाद आणि बुद्धिजीवी मध्यम वर्गाची जबाबदारी.

१९७३ डॉ. मा. पुं. आडारकर—भारताचे परकीय धोरण.
१९७४ श्री. गो. वा. बेडेकर (I. C. S.)—कर्ते आणि करविते.
१९७५ प्रा आ. भै. जोशी—भारतीय कृषिउत्पादन-प्रगती व परिसीमा.
१९७६ डॉ. दत्ता पै—कुटुंब नियोजन.
१९७७ प्रा. राम जोशी (कुलगुरु मुं. विद्यापीठ)—शिक्षणाचा सामाजिक अनुबंध.
१९७८ न्या. मू. चंद्रशेखर धर्माधिकारी—सामान्य मानवाची अगतिकता.
१९८० डॉ. वसंतराव पटवर्धन—कौटिल्य अर्थशास्त्र.
१९८१ श्री. चंद्रकांत वर्दे.
१९८२ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.
१९८३ श्री. जी. व्ही. बेडेकर—वृद्धापकाळचा ताळेबंद.
१९८४ श्री. विश्राम बेडेकर.

## परिशिष्ट ३

### कै. वामन मल्हार जोशी स्मारक व्याख्यानमाला

१९४४ प्रा. वा. ल. कुलकर्णी—वामन मल्हार वाङ्मयदर्शन.
१९४५ प्रा. रा. श्री. जोग—अर्वाचीन मराठी काव्य.
१९४७ प्रा. वि. ह. कुळकर्णी—कै. शि. म. परांजपे यांचे वाङ्मय.
१९४८ प्रा. कुसुमावती देशपांडे—मराठी कादंबरी भाग १ ला.
१९५० प्रा. इरावती कर्वे—मराठ्यांची संस्कृती.
१९५१ प्रा. कुसुमावती देशपांडे—मराठी कादंबरी भाग २ रा.
१९५२ प्रा. सुलभा पाणंदीकर—मराठी लघुकथा व मानसशास्त्र.
१९५३ प्रा. ग. त्र्यं. देशपांडे—आपले साहित्यशास्त्र.
१९५४ श्री. म. ना. सहस्रबुद्धे—शाहिरी वाङ्मय.
१९५५ श्री. वा. सी. बेंद्रे—तुकाराम.
१९५६ प्रा. रा. व. आठवले—अलंकारशास्त्र.
१९५७ प्रा. ग. ना. लवंदे—सौंदर्यशास्त्र.
१९५८ प्रा. ना. गो. कालेलकर—भाषाशास्त्र.
१९५९ प्रा. रा. ना. वेलींगकर—इंग्रजी रंगभूमी.
१९६० श्री. वा. ह. देशपांडे—हिंदुस्तानी संगीतातील घराणी व घरंदाज गायकी.
१९६१ श्री. मे. पु. रेगे—सौंदर्यशास्त्र व वाङ्मय.
१९६२ श्री. के. नारायण काळे—नाट्यकला व तंत्र.

१९६७ प्रा. गं. ब. ग्रामोपाध्ये—आख्यानक कविता.
१९६९ प्रा. म. वा. धोंड—भागवत धर्मप्रणेते आणि प्रतीक.
१९७० श्री. माधव आचवल—रसग्रहण-कला-साहित्य.
१९७१ प्रा. दि. के बेडेकर—धर्माचा उदय, अस्त व पुर्नलाभ.
१९७२ प्रा. दि. य. देशपांडे—युक्तिवादाची उपकरणे.
१९७३ श्री. प्रभाकर पाध्ये—वामन मल्हार आणि विचारसौंदर्य.
१९७४ डॉ. वि. रा. करंदीकर—ज्ञानेश्वर आणि वामनपंडित तौलनिक दर्शन.
१९७७ डॉ. पंडित आवळीकर—जी. ए. कुळकर्णी यांच्या कथा.
१९७९ प्रा. ल. ग. जोग—मराठी कादंबरी १९५० ते १९७५.
१९८० प्रा. गो. म. कुळकर्णी—संत साहित्य समीक्षाः काल-आज-उद्या.
१९८१ प्रा. म. वा. धोंड—पठण-निरुपण गायन, नर्तन, नाट्य.
दुसरे सत्र : दि. २१ डिसेंबर १९८१ (सकाळ) अध्यक्ष : ज्ञानेश्वर नाडकर्णी, चित्रपट संगीत : अरूण खोपकर

तिसरे सत्र : २१ डिसेंबर १९८० (दुपार) अध्यक्ष : प्रभाकर पाध्ये : घटितार्थ-शास्त्रीय प्रवाह, प्रा. गंगाधर पाटील : द. ग. गोडसे यांची कलामीमांसा, प्रा. म. बा. धोंड : चिकित्सक चर्चा.

प्रभाकर पाध्ये यांची सौंदर्यमीमांसा : रा. पु. रेगे.

१७ फेब्रुवारी १९८१ विंदा करंदीकर : ज्ञानेश्वर ते मर्ढेकर.

२० मार्च १९८१, दिलीप चित्रे : मर्ढेकरांची कविता.

## १९८१–८२

१५–२–८२, रमेश तेंडुलकर, विजया राजाध्यक्ष नवोदित कवींची कविता–चर्चा.

## १९८२–८३

३० एप्रिल, ज्ञानेश्वर नाडकर्णी, मॉडर्न मराठी थिएटर

७ ऑगस्ट, कविवर्य अनिल साहित्य चर्चा, अध्यक्ष—शंकर वैद्य. सहभाग : शिरीष कुलकर्णी, प्रवीण कुलकर्णी, निलिमा वैद्य, ज्योती ओझरकर.

३० ऑगस्ट, वेरीज वजाबाकी, एकांकीकेवर चर्चा, अध्यक्ष : पुष्पा भावे, सहभाग : राजीव नाईक व आनंद नाडकर्णी.

३ ते ५ सप्टेंबर "सुधीर रसाळ" समकालीन मराठी कविता स्मृती आणि गती.

२२ ऑक्टोबर, आ. ना. पेडणेकर "वाङ्मयातील वैरूपे."

२३ ऑक्टोबर आ. ना. पेडणेकर 'गलिव्हर्स ट्राव्हल्सचे टीकाकार'

## १९८३–८४

९ एप्रिल, भोलाराम आठवले, मराठी रंगभूमीचा अभिनय सम्राट.

२३ ऑक्टोबर, ग्रंथ प्रकाशन आणि प्रसार : चर्चा. अध्यक्ष : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी. सहभाग : माधव गडकरी, रामदास भटकळ, साधना कामत. दिनकर गांगल, चिं. स. लाटकर, मधुकाका कुलकर्णी.

२५ ऑक्टोबर, राम शेवाळकर, स्वातंत्र्यवीर सावरकरांची नाटके आणि 'ज्योतीने तेजाची आरती'

११, १२ ऑक्टोबर, भीमराव कुलकर्णी, वि. सी. गुर्जर—व्यक्तित्व आणि कर्तृत्व वि. सी. गुर्जर साहित्य.

२३ मार्च, व. दि. कुलकर्णी, कथाकार पु. भा. भावे.

## मुंबई मराठी साहित्य संघ : सुवर्ण महोत्सवी वर्ष व्याख्यानमाला (आगामी)

मुंबई मराठी साहित्य संघाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये खालील व्याख्यानांचे कार्यक्रम आयोजित करण्यात येतील.

२ नोव्हेंबर १९८५, अण्णासाहेब किर्लोस्कर मृत्युशताब्दि (नाट्यपरिषदेच्या सहकार्याने) वक्ते : विद्याधर गोखले.

१, २, ३ जानेवारी १९८६, कै. लाल्जी पेंडसे व्याख्यानमाला. वक्ते : गोविंद पुरुषोत्तम देशपांडे. विषय : मार्क्सवादी साहित्यविचार.

फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात कै. अण्णा मार्तंड स्मृतिव्याख्यानमाले निमित्त, कमलाकर सोनटक्के, विषय 'भारतीय रंगभूमी' १. प्रयोगाच्या काही दिशा, २ शैलीच्या काही दिशा.

फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात नाथमाधव स्मृति व्याख्यानमालेनिमित्त व्याख्यान होईल. मार्च महिन्यात कै. ल. ग. जोग स्मृति व्याख्यानमालेत, 'संततुकाराम' या विषयावर तीन व्याख्याने होतील.

मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मनोरंजनकार का. र. मित्र यांच्या स्मरणार्थ व्याख्यानमाला आयोजित करण्यात येईल.

याखेरीज वा. म. जोशी स्मृति व्याख्यानमाला, डॉ. भालेराव स्मृति व्याख्यानमाला

कै. कविवर्य अनिल स्मृति व्याख्यानमाला इ. मालांमध्ये विविध विषयावरची वाङ्मयीन व्याख्याने होतील.

यातील काही व्याख्याने लोकमान्य सेवा संघ, विलेपारले व नॅशनल लायब्ररी, बांद्रे येथे होतील.

# परिशिष्ट १२ वे

## नाट्योत्सव

**मराठी रंगभूमी शतसांवत्सरिक महोत्सव, १५ एप्रिल ते २७ एप्रिल १९४४**

अध्यक्ष : श्री. नारायणराव राजहंस (बालगंधर्व).

स्वागताध्यक्ष : आचार्य प्र. के. अत्रे

नाटके : संगीत सारस्वत, पेल्यातील वादळ (नाट्य प्रवेश) सं. उद्यांचा संसार, हरिश्चंद्र (प्रवेश) सं. सत्तेचे गुलाम, सं. शारदा, शिवाजीला शह (प्रवेश) वेड्यांचा बाजार, सं. सौभद्र, भाऊबंदकी, शकुंतला स्वप्न, जन्माचे सोबती, सं. स्वयंवर, स्त्रियांचा कार्यक्रम व गुणाची पोर, 'प्रफुल्ल'चा कार्यक्रम.

**वार्षिक मराठी नाट्योत्सव, २७ जानेवारी ते ५ फेब्रुवारी ४६**

अध्यक्ष : वीर वामनराव जोशी, स्वागताध्यक्ष : श्री. अनंत हरी गद्रे,

नाटके : विद्याहरण, संशय कल्लोळ, कांचनगडची मोहना, दूरचे दिवे, मानापमान, एकचप्याला, धरणीधर, सवाई माधवराव यांचा मृत्यू, त्राटिका, मी उभा आहे (प्रवेश), पूजानृत्य.

**वार्षिक मराठी नाट्योत्सव, २२ एप्रिल ते २ मे १९४७**

अध्यक्ष : श्री गणेश गोविंद बोडस, स्वागताध्यक्ष : श्री अनंत काणेकर

नाटके : शारदा, प्रेमसंन्यास, शिवसंभव, मृच्छकटिक, पारध, दुसरा पेशवा, म्युनिसिपालिटी, कुंपणावरुन (छायानाट्य) योगायोग (मुलांचे नाटक) वधू परीक्षा, साष्टांग नमस्कार

**वार्षिक मराठी नाट्योत्सव, २९ डिसेंबर ४८ ते १३ जानेवारी ४९**

मुंबई व दादर दोन्ही ठिकाणी एकाचवेळी

अध्यक्ष : श्री० गोविंदराव टेंबे

नाटके : एकच प्याला, भाऊबंदकी, यशाची शिंगे, शाकुंतल, एकच गांठ, मानापमान, कीचकवध, मृच्छकटिक, उधार उसनवार, संशय कल्लोळ.

वार्षिक मराठी नाट्योत्सव २९ एप्रिल ते ८ मे १९५०

नाटके : सौभद्र, त्राटिका, विचित्रलीला, वंदेमातरम, मूकनायक, शोभेचा पंखा, वैजयंती, विद्याहरण.

वार्षिक मराठी नाट्योत्सव

१४ एप्रिल ते २० एप्रिल १९५१ मुंबई व दादर या दोन ठिकाणी

अध्यक्ष : के. नारायण काळे

नाटके : स्वयंवर, विद्याहरण, प्रेमशोधन, सौभद्र, तुकाराम, आंधळ्यांची शाळा, लग्नाची बेडी, खडाष्टक, बेबंदशाही, दूरचे दिवे, पतंगाची दोरी, कवडीचुंबक.

वार्षिक मराठी नाट्योत्सव २७ डिसेंबर ५२ ते ११ जानेवारी ५३

अध्यक्ष : श्री. केशवराव दाते

नाटके : म्युनिसिपालिटी, पुण्यप्रभाव, अंमलदार, लग्नाची बेडी, खडाष्टक, कुंजविहारी, भाग्यवान, कौंतेय.

वार्षिक मराठी नाट्योत्सव १६ एप्रिल ते २९ एप्रिल १९५४

नाटके : कोणे एकेकाळी, सौभद्र, सृष्टीचे स्वंयवर-संगीतिका, ब्रह्मचारी यक्ष, रहस्य आणि तरुणी, आथेल्लो, मिडसमर नाईट ड्रीम, झुंज, होनाजीबाळा, मीराबाई, घराबाहेर, महानंदा, शापसंभ्रम राजमुकुट.

वार्षिक मराठी नाट्योत्सव २२ एप्रिल ते ३ मे १९५५

नाटके : होनाजी बाळा, भाऊबंदकी, उर्मिला, अंमलदार, अरे बाबा जाहिरात, मृच्छकटिक, झुंजारराव, श्री, गृहस्थ, खडाष्टक

वार्षिक मराठी नाट्योत्सव १९ एप्रिल ते २६ एप्रिल १९५६

नाटके : पतंगाची दोरी, छापील संसार, वधूपरीक्षा, लोकांचा राजा, शहाशिवाजी, दख्खनचा मोहरा, द्रौपदी

वार्षिक मराठी नाट्योत्सव २१ एप्रिल ते २९ एप्रिल १९५७

नाटके : जगन्नाथाचा रथ, दुरितांचे तिमीर जावो, माणूस नावाचे बेट, तीन एकांकिका, (मोठे मासे आणि छोटे मासे, सारं कसं शांत शांत, सदू आणि दादू), सत्त्व परीक्षा, एकच प्याला, लक्षित, वयंम मोठं खोटं, हे हो हर्रर्म, (कोल्होबाचे लग्न), कृष्णलीला

वार्षिक मराठी नाट्योत्सव २३ एप्रिल ते ३० एप्रिल १९५८

नाटके : निशिकांताची नवरी, पंचतंत्र, गृहदाह, तुझे आहे तुजपाशी, वैजयंती, सुंदर मी होणार

वार्षिक मराठी नाट्योत्सव १६ एप्रिल ते २७ एप्रिल १९५९

नाटके : पथ्थर का देवता, उत्तरराम चरितम्, संशय कल्लोळ, बच्चू लछमन, दुसरा पेशवा, सत्याग्रही, जादूचा वेल, गड्या आपुला गांव बरा

संघ मंदिर उद्घाटन नाट्य महोत्सव, ८ एप्रिल ते २८ जून १९६४

नाटके : सौभद्र, अंमलदार, सवाई माधवराव यांचा मृत्यू, एकच प्याला, खडाष्टक, स्वयंवर, मृच्छकटिक, होनाजी बाळा, भाऊबंदकी, तीन अंकी हॅम्लेट, असा मी असा मी, रायगडाला जेव्हा जाग येते, वाऱ्यावरची वरात, म्युनिसिपालिटी, पंडितराज जगन्नाथ, कुलवधू, कविराय राम जोशी, राजयाचा पुत्र अपराधी देखा, मंदारमाला, संशय कल्लोळम्, मी जिंकलो मी हरलो, खरी ग खरी, दूरचे दिवे, करायला गेलो एक, अल्लादिन जादूचा दिवा, वेड्याचं घर उन्हात, ऑथेल्लो, फोन नं. ३३३३३, सत्यविजय, मानीजाराव, पाणीग्रहण, एकरूप होऊ सगळे, प्रेमा तुझा रंग कसा, स्वयंवर, यशवंतराव होळकर (१० नोव्हेंबर ६४).

राष्ट्रपती पारितोषिक विजेते; पहिल्या राष्ट्रीय नाट्यमहोत्सवात पारंपारिक विभागात प्रथम आलेले नाटक भाऊबंदकी

लेखक : श्री. कृ. प्र. खाडिलकर,
दिग्दर्शक : श्री. केशवराव दाते
नेपथ्य : चित्रकार द. ग. गोडसे,
प्रकाश योजना : श्री. बापूराव नाईक
रंगभूषा : मेकअप सर्व्हिस
व्यवस्था : श्री. दि. वि. आमोणकर
रंगमंच व्यवस्था : श्री. भार्गवराम पांगे, श्री. शं. ना. अंधृटकर

भूमिका :

राघोबा : नानासाहेब फाटक
रामशास्त्री : मास्टर दत्താराम
नाना फडणीस : मामा पेंडसे
सखाराम बापू : दत्तोपंत आंग्रे
नमकशास्त्री : नाना अभ्यंकर
चमकशास्त्री : अनंत वर्तक
तुळोजी : दाजी भाटवडेकर
सुमेरसिंग : राजा पटवर्धन
भवानराव : त्रिंबक गोखले
व्यंकटराव : मोहन संझगिरी
आनंदीबाई : दुर्गा खोटे
दुर्गा : सुधा आमोणकर
म्हाळसा : सुमन मराठे
दासी : मालती भालेराव
दासी : सुधा देशपांडे
भिकंभट : शंकर घाणेकर
नारायणराव : दत्ता देवधर
खरकसिंग : जोशी
महादजी शिंदे : शंकर भोसले
लक्ष्मणराव : बळवंत पाठारे
सखाराम हरि : बाबुराव अंधृटकर
निर्माते : डॉ. अ. ना. भालेराव

## परिशिष्ट १३ वे

### अमृत नाट्यभारती

[१९६८ साली डॉ. अ. ना. भालेराव यांच्या नावाची आद्याक्षरे घेऊन 'अमृत नाट्य-भारती' या नावाने नाट्यशिक्षण देण्यासाठी स्वतंत्र शाखा सुरू करण्यात आली]

**वर्गाचे संचालक**

| | |
|---|---|
| श्री. कमलाकर सोनटक्के | श्री. मुकुंद नाईक-सहाय्यक |
| श्री. रमेश चौधरी | श्री. माधव खाडीलकर |

यापैकी श्री. सोनटक्के, नाईक व खाडिलकर हे दिल्ली येथील नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा मधून शिक्षण पूर्ण करून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेले संचालक लाभले होते. तर श्री. चौधरी हे प्रायोगिक नाट्याचे पुरस्कर्ते संचालक होते. या वर्गांना श्री. दाजी भाटवडेकर, दामू केंकरे, मामा पेंडसे, शं. ना. नवरे, चिं. त्र्यं. खानोलकर, विद्याधर गोखले, विजय तेंडुलकर, अशोक रानडे, श्याम आडारकर, नाना जोगळेकर, पांडे, सौ. कुसुम कुळकर्णी, सौ. विजया राजाध्यक्ष यांनी निरनिराळ्या विषयावर वर्गात व्याख्याने दिली.

**अमृत नाट्यभारतीच्या विद्यार्थ्यांनी सत्रांच्या अखेरीस पुढील एकांकिकांचे व नाटकाचे प्रयोग सादर केले**

चक्र, डॅडी, अंधेरीनगरी (हिंदी) इंद्रजीत वध, भगवज्जुकियम(हिंदी) सुनो जनमेजय, मुद्राराक्षस, झाली काय गंमत, लोकनृत्य, रंग पांचालिका, दुमार, वेटिंग फॉर गोदो, सरहद्द, करीन ती पश्चिम, संकेत, विरवलाची गोष्ट, चिन्तान, महायुद्ध (नाटक) महायुद्ध हे नाटक राज्य स्पर्धेत सादर केले होते. 'लोकांचा राजा' ऑथेल्लो, राजमुगुट, मानापमान, सत्तेचे गुलाम ही नाटकेही विद्यार्थ्यांनी वेळोवेळी सादर केली.

## परिशिष्ट १४ वे

# साहित्य संघाचे नाटककार आणि नाटके

| | |
|---|---|
| ● आचार्य प्र. के. अत्रे | लग्नाची बेडी १९५१, १९५३ |
| उद्याचा संसार १९४४ | * कवडी चुंबक १९५१ |
| साष्टांग नमस्कार १९४७ | घराबाहेर १९५४ |
| वंदे मातरम् १९५० | |

* खूण असलेली नाटके संघाने प्रथम प्रयोगित केली.

● गो. ग. आगरकर
विकारविलसित (हॅम्लेट) १९४५
● वा. नी. आगटे
महानंदा १९५४
● शामराव ओक
* भिडस्त माणूस १९३९
* गड्या आपुला गांव बरा १९५९
● विष्णुपंत औंधकर
वेबंदशाही १९५१, ८३
आग्र्याहून सुटका १९५८
● सुधा करमरकर
* जादूचा वेल १९५९
● न. ग. कमतनूरकर
श्री १९५५
● अनंत काणेकर
* घरकुल १९४१
वांदिवलीच्या मास्तरणी १९४३
* पतगाची दोरी १९५१, ५६
* झुंज १९५४
निशिकांताची नवरी १९५८
● मनोहर कातदरे
* घेतलं शिंगावर १९७०
● कवि कुलगुरु कालिदास
अभिज्ञानशाकुंतलम् १९५३
● अण्णासाहेब किर्लोस्कर
सौभद्र १९४४, ५०, ५१, ५४, ५५, ७९, ८०
शाकुंतल १९४८, ४९
● वि. ह. कुलकर्णी
* शोभेचा पंखा १९५०
● वासुदेवराव केळकर
त्राटिका १९४६, ५०
● न. चिं. केळकर
कृष्णार्जुन युद्ध १९४९

● केशव केळकर
वल्लभपूरची दंतकथा १९७०–७१
साठा उत्तराची कहाणी १९६८
● श्री. कृ. कोल्हटकर
* मायाविवाह १९३८
वधूपरीक्षा १९४७, १९५६
मूक नायक १९५०
प्रेमशोधन १९५१
● बाळ कोल्हटकर
दुरितांचे तिमिर जावो १९५७
● वासुदेवशास्त्री खरे
शिवसंभव १९४७
उग्रमंगल १९६२
● कृ. प्र. खाडिलकर
भाऊबंदकी १९४४, ४९, ७२
स्वयंवर १९४४, ५१, ८०
विद्याहरण १९४६, ५०, ५१
कांचनगडची मोहना १९४६
मानापमान १९४६, ४९, ७७, ८५
सवाई माधवराव यांचा मृत्यू १९४६, ८४, ७२
कीचकवध १९४९
द्रौपदी १९५६, ७२
सत्त्वपरीक्षा १९५७
● चिं. त्र्यं. खानोलकर
* सगे सोयरे १९६६
* अवघाही अश्वत्थामा १९७२
* अजब न्याय वर्तुळाचा १९७४
● रा. ग. गडकरी
वेड्यांचा बाजार १९४४
एकच प्याला १९४६, ४८, ४९, ५७

* खूण असलेली नाटके संघाने प्रथम प्रयोगित केली.

प्रेमसंन्यास १९४७
पुण्यप्रभाव १९५२
भावबंधन १९५५
● गंगाधर गाडगीळ
रहस्य आणि तरुणी १९५४
● शां. गो. गुर्जे
दख्खनचा मोहरा १९५६
रणरागिणी १९५७
● प्र. ग. गुर्जे
* शकुंतला-स्वप्न १९४४
(संगीतिका)
● रमेश कोटस्थाने
* घरात हसरे तारे १९७९
● शरच्चंद्र गुणे
पराजिता मी १९६५-६६
● जगन्नाथ गोखले
* उर्मिला १९५५
● द. ग. गोडसे
* राजयाचा पुत्र अपराधी देखा
  १९६४
* धाडिला राम तिने का वनी?
  १९७८
● नाना गवंडे (संग्राहक)
ललित १९५७
● पद्माकर गोवईकर
* रातराणी १९७०-७१
* माझे जीवन गाणे १९७६-७७
● दिलीप चित्रे
* मिठू मिठू पोपट १९८०
● माधवराव जोशी
म्युनिसिपालिटी १९४७, ५२, ७२
उधारउसनवार १९४९
पैसाच पैसा १९७७

○ शं. प. जोशी
विचित्रलीला १९५०
खडाष्टक १९५१, ५३, ५५, ७२
● चिं. वि. जोगळेकर
* अरे बाबा जाहिरात १९४२, ५५
● नाना जोग
तीन अंकी हॅम्लेट १९६३
● य. ना. टिपणीस
शहाशिवाजी १९५६
राज्यारोहण १९८०, ८१
● गोविंदराव टेंबे
* महाश्वेता १९७५-७६
● डॉ. टेंबे
आठवणीचे खंदक १९३९, ४३
● विजय तेंडुलकर
गृहस्थ १९५५
माणूस नांवाचें बेट १९५७
* सरी ग सरी १९६४
● त्रिलोकेकर
हुंडा-प्रवेश १९४४
● कमलाकर दाते
पत्थरका देवता १९५९
● पुरुषोत्तम दारव्हेकर
* रविराज तो मी रोहिणी १९८४
● गो. नि. दांडेकर
जगन्नाथाचा रथ १९५७
● दिवाकर (गर्गे)
कारकून १९४३
● गो. ब. देवल
शारदा १९४४, ४७, ५५
संशयकल्लोळ १९४६, ४९, ५५,
  ५९, ७६
मृच्छकटिक १९४७, ४९, ५५, ७७

* खूण असलेली नाटके संघाने प्रथम प्रयोगित केली.

शापसंभ्रम १९५४
झुंजारराव १९५५
विक्रमोर्वशीय १९५५
दुर्गा १९५५
● पु. ल. देशपांडे
अंमलदार १९५२, ५५
* भाग्यवान १९५३
* तुझें आहे तुजपाशी १९५७, ५८, ८२
* सुंदर मी होणार १९५७, ७४
एकांकिका
छोटे मासे, मोठे मासे १९५७
* सारं कसं शांत शांत १९५७
* सदू आणि दादू १९५७
* वयं मोठं, खोटं १९५७
● अशोकजी परांजपे
* बुद्धीवादी हरला १९७३–७४
● शैलजादेवी पंत
* योगायोग १९४७
(मुलांचे नाटक)
● वि. मा. दि. पटवर्धन
* गोड अपघात १९४४
● रमेश पवार
* दर्यासागर १९७४–७५
● श्री० ना० पेंडसे
* शोनार बंगला १९७२
* पंडित आता तरी शहाणे व्हा १९७८
● मालती बेडेकर
* पारध १९४७
● विश्राम बेडेकर
* टिळक आणि आगरकर १९८२
● बेंडे
बुवा १९४१
● गो. के. भट
गृहदाह १९५८
* मुद्राराक्षस १९७५–७६
● भवभूति
उत्तररामचरितम् (संस्कृत) १९५९
● चिं. य. मराठे
* होनाजी बाळा १९५४, ५५, ८०
* लोकांचा राजा १९५६, ७८
● माधव मनोहर
सशाची शिंगे १९४८, ४९
* आजोबाच्या मुली १९४३
● रत्नाकर मतकरी
* मधुमंजिरी १९५८
● वसंत माने
ब्रह्मचारी यक्ष १९५४
* हे, हो, हर्ररंम ऊर्फ कोल्होबाचे लगीन १९५७
कृष्णलीला १९५७
* चौऱ्यांशीचा फेरा १९६२
● व्यंकटेश माडगूळकर
* पति गेले ग काठेवाडी १९६८
● सुं. भु. मानकर
* परत या १९४५
● कृष्णाबाई मोटे
* गुणाची पोर १९४४
● श्री. बा. रानडे
* कुंपणावरून १९४७
(छायानाट्य)
● बाबाजीराव राणे
तुकाराम १९५१
● कुसुदिनी रांगणेकर
* पृथ्वीचें स्वयंवर १९५४
(संगीतिका)

* खूण असलेली नाटके संघाने प्रथम प्रयोगित केली

* बच्चू लछमन १९५९
● मो. ग. रांगणेकर
कोणे एके काळीं १९५४
● यशवंत रांजणकर
* शतानिक १९६६
* नकटीच्या लग्नाला १९७३–७४
● व्यंकटेश वकील
* जन्माचे सोबती १९४४
तें वेगळें जग–नाटिका १९४४
● श्री. वि. वर्तक
आंधळ्यांची शाळा १९५१
● भा. वि. वरेरकर
* उडतीं पांखरें १९४१
सारस्वत १९४४
सत्तेचे गुलाम १९४४, ८२
* धरणीधर १९४६
कुंजविहारी १९५३
● माधव वाटवे
* नाटककाराच्या शोधात
सहा पात्रे १९६८
● वि. वा. शिरवाडकर
* दूरचे दिवे १९४६, ५१
* दुसरा पेशवा १९४७, ५९
* वैजयंती १९५०, ५८, ७४
* कौंतेय १९५३
* राजमुकुट १९५४
कांचनमृग १९६०
ऑथेल्लो १९६३
* एक होती वाघीण १९७४
ययाति देवयानी १९७६
● स. अ. शुक्ल
मीराबाई १९५४
सत्याग्रही १९५९
● शेक्सपिअर
मिडसमर नाईट ड्रीम–प्रवेश
(इंग्रजी) १९५४
ऑथेल्लो—प्रवेश
(इंग्रजी) १९५४
● शं. गो. साठे
छापील संसार १९५६
● वसंत सबनीस
* मेजर चंद्रकांत १९६८
● सुधा साठे
* एकच गाठ १९४९

* खूण असलेली नाटके संघाने प्रथम प्रयोगित केली.

## परिशिष्ट १५ वे

# मुंबई मराठी साहित्य संघाचे नाट्य-दिग्दर्शक

**श्री. गणपतराव बोडस**
एकच प्याला, शारदा, मृच्छकटिक, शाकुंतल, संशयकल्लोळ, सौभद्र, त्राटिका, मूकनायक, विद्याहरण, प्रेमशोधन, दुर्गा, शापसंभ्रम.

**श्री. केशवराव दाते**
भाऊबंदकी, सवाईमाधवराव यांचा मृत्यू. कीचकवध, आंधळयांची शाळा, खडाष्टक, झुंज, कारकून

श्री. चिंतामणराव कोल्हटकर
धरणीधर, भाग्यवान, अरे बाबा जाहिरात
श्रीमती दुर्गाबाई खोटे
वैजयंती, कौंतेय, द्रौपदी, पतंगाची दोरी
श्री. के. नारायण काळे
सवाचीं शिंगें, गृहदाह, धरकूल
श्री. पार्श्वनाथ आळतेकर
शोभेचा पंखा, सारस्वत, पतंगाची दोरी, उडतीं पांखरें
श्री. नानासाहेब फाटक
कांचनगडची मोहना
श्री. आचार्य अत्रे
वेड्यांचा बाजार, साष्टांग नमस्कार, कवडीचुंबक
श्री. बाळासाहेब काळे
दूरचे दिवे, दुसरा पेशवा, होनाजी बाळा, लोकांचा राजा, गड्या आपुला गांव बरा
डॉ. अ. ना. भालेराव
अंमलदार
श्री. अ. ह. गद्रे
त्राटिका
श्री. वासुअण्णा गोडबोले
म्युनिसिपालीटी
श्री. दासुअण्णा जोशी
वंदे मारतम, लग्नाची बेडी
श्री. मामा पेंडसे
शिवसंभव, विचित्र लीला, वैजयंती, सवाई माधवराव यांचा मृत्यू
श्री. शिवराम जोशी
तुकाराम, महानंदा
श्री. नाना अभ्यंकर
शहाशिवाजी
श्री. माधवराव टिपणीस
सवाई माधवराव यांचा मृत्यू
श्री. नंदू खोटे
मायाविवाह
श्री. हिरामण देसाई
भिडस्त माणूस
श्री. बंडोपंत सोहनी
मीराबाई
श्री. अनंत धुमाळ
घराबाहेर
श्री. वसंत सावरकर
एकच गांठ
श्री. श्री जोगळेकर
शिवसंभव
सौ. सुशीला काशीकर
पारध
सौ. मालती बेडेकर
गुणाची पोर
सौ. कुमुदिनी रांगणेकर
सृष्टीचें स्वयंवर (संगीतिका)
श्री. श्री. बा. रानडे
कुंपणावरून
श्री. सानेमामा
वधूपरीक्षा
श्री. बाळकोबा गोखले
उग्रमंगल
श्री. म. के. गुप्ते
जन्माचे सोबती
श्री. भार्गवराम पांगे
योगायोग
श्री. भालचंद्र पेंढारकर
वधूपरीक्षा, होनाजी बाळा, राज्यारोहण, सत्तेचे गुलाम
श्री. मास्टर दत्ताराम
कुंजविहारी, एकच प्याला, सत्त्वपरीक्षा, राजयाचा पुत्र अपराधी देखा, शतानिक,

ययाति देवयानी, भाऊबंदकी
**श्री. दामू केंकरे**
ब्रह्मचारी यक्ष, रहस्य आणि तरुणी, दुसरा पेशवा, तीन अंकी हॅम्लेट, छापील संसार, माणूस, नांवाचें बेट, चौऱ्यांशीचा फेरा, गृहस्थ, मेजर चंद्रकांत, वल्लभपूरची दंतकथा, साटा उत्तराची कहाणी, घेतलं शिंगावर
**श्री. पु. ल. देशपांडे**
तुझें आहे तुजपाशीं, सुंदर मी होणार.
**श्री. विजया जयवंत (खोटे) (मेहता)**
सदू आणि दादू, सारं कसं शांत शांत, मोठे मासे आणि छोटे मासे, रातराणी, अजब न्याय वर्तुळाचा, मुद्राराक्षस
**श्री. आत्माराम भेंडे**
अरे बाबा जाहिरात
**श्री. नंदकुमार रावते**
वच्चू लछमन
**सौ. सुधा करमरकर**
मधुमंजिरी, जादूचा वेल, ललित, वयं मोठं खोटं, कोल्होबाचें लगीन, कृष्णलीला, पति गेले ग काठेवाडी
**श्री. दाजी भाटवडेकर**
ऑथेल्लो, स्वयंवर, मानापमान, संशय कल्लोळ, सौभद्र, द्रौपदी, मृच्छकटिक, धाडिला राम तिने का वनी, एकच प्याला
**अरविंद देशपांडे**
सरी ग सरी, सगे सोयरे, पराजिता मी
**श्री. इर्वर्ट मार्शल**
ऑथेल्लो, मिडसमर नाईट्स ड्रीम, राजमुकुट
**विहंग नायक**
नकटीच्या लग्नाला, पंडित आता तरी शहाणे व्हा, घरात हसरे तारे, माझे जीवन गाणे
**माधव वाटवे**
नाटककाराच्या शोधात सहापात्रे, एक होती वाघीण
**रमेश चौधरी**
असाही अश्वत्थामा, शोनार बंगला, बुद्धीवादी हरला
**माधव खाडिलकर**
दर्यासागर, स्वयंवर
**दिलीप कोल्हटकर**
पैसाच पैसा
**अरविंद पिळगावकर**
महाश्वेता, मानापमान
**विश्राम बेडेकर**
टिळक आणि आगरकर
**पुरुषोत्तम दारव्हेकर**
रविराज तो मी रोहणी (बाजीराव मस्तानी)
**सत्यदेव दुबे**
मिठू मिठू पोपट
**जयंत सावरकर**
वेबंदशाही
● **भरत पांगे**
ययाती आणि देवयानी

**संगीत दिग्दर्शक :**

श्री. डी. पी. कोरगावकर
श्री. व्ही. जी. भाटकर
श्री. वामनराव सडोलीकर
श्री. जयसिंग भोई
सौ. कुमुदिनी रांगणेकर
श्री. हेमंत केदार
पं० जितेंद्र अभिषेकी

श्री. कृष्णराव चोणकर
श्री. भास्कर चंदावरकर
श्री. वासुदेव चंद्रचूड

**नृत्य दिग्दर्शक :**
श्री. पार्वती कुमार
श्री. चंद्रकांत हडकर
श्रीमती माया जाधव

**नेपथ्यकार :**
श्री. द. ग. गोडसे
श्री. शं. ना. अंधृटकर
श्री. मोहन कुळकर्णी

श्री. आनंद पै
श्री. प्रभाकर गोरे
श्री. शांताराम पवार
रघुवीर तळाशीलकर
प्रभाकर पारकर
सुधीर ठाकूर
दिलीप भाटवडेकर

**संगीत साथ :**
श्री. गोविंद पटवर्धन
श्री. दामुअण्णा पार्सेकर
श्री. अनंता लिमये

## परिशिष्ट १६ वे

## मुंबई मराठी साहित्य संघ १९३५ ते १९८५

### संघाचे विश्वस्त, पदाधिकारी, कार्यकारी मंडळ व नियामक मंडळ

**विश्वस्त :**
प्रा. अ. बा. गजेन्द्रगडकर
रामराव ग. विजयकर
डॉ. अ. ना. भालेराव
डॉ. गं. मा. फडके
भा. ना. गोखले
डॉ. भा. नी. पुरंदरे
श्रीमती दुर्गाबाई खोटे
सुशील कवळेकर
श्रीमती मनोरमाबाई फडके
भारत गुलाबचंद दोशी
न्या. मू. श्री वि. द. तुळजापूरकर
प्रा. त्र्यं. कृ. टोपे
रा. ल. बेलोसे

**संघाध्यक्ष :**
द. अ. तुळजापूरकर
प्रा. अ. बा. गजेन्द्रगडकर
प्रा. द. के. केळकर
प्रा. न. र. फाटक
प्रभाकर पाध्ये
प्रा. गंगाधर गाडगीळ

**उपाध्यक्ष :**
प्रा. अ. बा. गजेन्द्रगडकर
ना. के. भागवत
श्रीमती शांताबाई कशाळकर
त्रिं. सा. दौंडकर
रा. ग. विजयकर

भास्करराव जाधव
प्रा. कृ. पां. कुलकर्णी
प्रा. मा. दा. आळतेकर
प्रा. द. के. केळकर
र. धों. कर्वे
श्री. शं. नवरे
भा. ना. गोखले
गं. वि. पुराणिक
प्रा. न. र. फाटक
प्रा. क. रा. गुंजीकर
पु. का. दिवेकर
सुशील कवळेकर
शां. म. डहाणूकर
प्रा. अनंत काणेकर
प्रा. त्र्यं. कृ. टोपे
प्र. पां. जोशी
ना. रा. अभ्यंकर
भारत गुलाबचंद दोशी
मनोहर ना. गोगटे
व. शं. पुरंदरे
वा. ल. कुलकर्णी
वा. रा. ढवळे
विनायक अ. फडके

कार्याध्यक्ष :

द. अ. तुळजापूरकर
प्रा. अ. बा. गजेन्द्रगडकर
श्री. शं. नवरे
वि. ह. कुलकर्णी
वा. रा. ढवळे
बापूराव नाईक

कोषाध्यक्ष :

भा. सी. सुखतनकर
द. अ. तुळजापूरकर
खं. सा. दौंडकर
रा. ग. विजयकर
श्री. शं. नवरे
पु. शि. नाडकर्णी
बा. शि. नाईक
डॉ. बाबा कलगुटकर

कार्यवाह :

डॉ. अ. ना. भालेराव
दि. वि. आमोणकर
वा. रा. ढवळे
चं. वि. बावडेकर
व. के. दावतर
बापूराव नाईक
शं. ना. अंधृटकर
शि. ना. चिखलीकर
रा. अ. भालेराव
वि. पु. भागवत
प्रा. व. दि. कुलकर्णी
दामू केंकरे
त्रिं. के. गोखले
कृ. मो. भाटवडेकर
मल्हार ढगे
श्रीमती सरोजीनी वैद्य
रमेश मंत्री
केशव मेश्राम
प्रा. भीमराव कुळकर्णी

## कार्यकारी मंडळ सदस्य

दत्तो आप्पाजी तुळजापूरकर
प्रा. अ. बा. गजेंद्रगडकर
ना. के. भागवत
श्रीमती शांताबाई कशाळकर
भास्करराव जाधव
प्रा. कृ. पां. कुळकर्णी

प्रा. मा. दा. आळतेकर
अ. ह. गद्रे
प्रा. वा. ल. कुळकर्णी
प्रा. माधव मनोहर
दि. वि. आमोणकर
वा. रा. ढवळे
रमेश नाडकर्णी
प्र. ग. गुर्ते
वा. वि. भट
डॉ. अ. ना. भालेराव
श्री. रा. टिकेकर
य. कृ. खाडिलकर
गो. बा. महाशब्दे
प्रा. अनंत काणेकर
प्रा. द. के. केळकर
रा. ग. विजयकर
खं. सा. दौंडकर
श्रीमती शांताबाई दौंडकर
श्रीमती सुशीला जाधव
श्रीमती मनोरमाबाई फडके
प्रभाकर पाध्ये
र. धों. कर्वे
प्रा. गो. के. भट
श्री. शं नवरे
शं. ना. अंधृटकर
श्रीमती लीला मस्तकार-रेळे
भारत गुलाबचंद दोशी
ना. रा. अभ्यंकर
श्रीमती पिरोज आनंदकर
प्रा. व. दी. राव
प्रा. वि. ह. कुळकर्णी
प्रा. का. रा. गुंजीकर
गं. वि. पुराणिक
भा. ना. गोखले
प्रा. रा. भि. जोशी
प्रा. पु. शि. रेगे
बापूराव नाईक
केशवराव दाते
चं. वि. बावडेकर
मोहन संझगिरी
कृ. मो. भाटवडेकर
अनंत वर्तक
प्रा. गं. बा. ग्रामोपाध्ये
गो. रा. परांजपे
पु. का. दिवेकर
श्रीमती सुशीला द. जोशी
भार्गवराम पांगे
प्रा. वसंत के. दावतर
मो. ग. रांगणेकर
पु. ल. देशपांडे
प्रा. स. गं. मालशे
शि. ना. चिखलीकर
श्रीमती इंदूताई पुरंदरे
सुशील कवळेकर
शां. म. डहाणूकर
प्रा. गंगाधर गाडगीळ
द. ग. गोडसे
त्रिं. के. गोखले
डॉ. बाबा कलगुटकर
म. ना. गोगटे
पु. शि. नाडकर्णी
के. नारायण काळे
प्रा. मं. वि. राजाध्यक्ष
स. ग. भटकळ
वि. पु. भागवत
दामू केंकरे
प्रा. त्र्यं. कृ. टोपे
प्र. पां. जोशी

डॉ. रा. अ. भालेराव
व. शं. पुरंदरे
श्रीमती अचला जोशी
र. शां. भांडारकर
मनोहर ना. गोगटे
प्रा. व. दि. कुलकर्णी
डॉ. सरोजिनी शेंडे
श्री. के. देवधर
श्री. भि. वेलणकर
शां. शं. रेगे
मल्हार ढगे
श्रीमती विजया राजाध्यक्ष
रमेश मंत्री
सुधीर दामले
वा. य. गाडगीळ
विहंग नायक
उमाकांत ठोमरे
शि. मो. वैसास
दिलीप भाटवडेकर

## नियामक मंडळाचे सदस्य

(१९६८ सालापासून नियामक मंडळ अस्तित्वात आले. ६८ ते ८५ पर्यंतचे नियामक मंडळाचे सदस्य)

प्रा. न. र. फाटक
प्रा. अनंत काणेकर
प्रा. का. रा. गुंजीकर
भा. ना. गोखले
प्रा. त्र्यं. कृ. टोपे
प्र. पां. जोशी
ना. रा. अभ्यंकर
भारत गुलाबचंद दोशी
शं. ना. अंधृटकर
दि. वि. आमोणकर
डॉ. बाबा कलगुटकर
डॉ. ना. गो. कालेलकर
दा. का. केंकरे
प्रा. व. दि. कुळकर्णी
डॉ. गं. ब. ग्रामोपाध्ये
त्रिं. के. गोखले
शि. ना. चिखलीकर
प्रा. ल. ग. जोग
वा. रा. ढवळे
दिनानाथ द. दलाल
श्री. शं. नवरे
बापूराव नाईक
भा. तु. पांगे
चं. वि. बावडेकर
स. ग. भटकळ
वि. पु. भागवत
डॉ. रा अ. भालेराव
कृ. मो. भाटवडेकर
प्रा. मं. वि. राजाध्यक्ष
शां. शं. रेगे
भा. वि. लाड
सरोजिनी ना. शेंडे
मोहन ज. संझगिरी
प्रा. रा. गि. सोहनी
अचला सु. जोशी
रा. बा. नायक
चिं. गो. पेंडसे
रा. ल. वेलोसे

| | |
|---|---|
| मा. र. सप्रे | हेमचंद्र गाडगीळ |
| मनोहर ना. गोगटे | गुं. फ. आजगावकर |
| व. शं. पुरंदरे | पु. वि. गाडगीळ |
| गजानन तांडेल | प्रा. केशव मेश्राम |
| गो. रा. परांजपे | भालचंद्र शंकरशेट |
| र. शा. भांडारकर | विहंग नायक |
| पांडुरंगराव शिरोडकर | सुधा करमरकर |
| द. ब. कुळकर्णी | प्रा. गंगाधर गाडगीळ |
| ना. रा. बर्वे | विनायक अ. फडके |
| अनंत दि. वर्तक | नारायण त्रिलोकेकर |
| प्रा. वा. ल. कुळकर्णी | प्रभाकर पारकर |
| श्री. भि. वेलणकर | पुरुषोत्तम दारव्हेकर |
| मनोरमा वागळे | व्य. गो. गवंडे |
| मु. कृ. परूळेकर | वा. य. गाडगीळ |
| विद्याधर सं. गोखले | एस. पी. अडारकर |
| डॉ. म. आ. रानडे | अ. ग. फडके |
| भालचंद्र पेंढारकर | राजा राजवाडे |
| मनोहर देवधर | अशोकजी परांजपे |
| प्रकाश मोहाडीकर | सुधाकर भानुशे |
| शशिकांत ओक | दिलीप भाटवडेकर |
| न. रा. साठे | मा. आ. कारंडे |
| शि. मो. वैसास | कमलाकर गुर्जर |
| वसुंधरा पेडसे-नाईक | सुधीर दामले |
| प्रभाकर स. मोने | |
| रमेश मंत्री | या शिवाय मुंबई महानगर पालिकेचे प्रतिनिधी व संलग्न संस्थांचे प्रतिनिधी नियामक मंडळावर असतात. |
| दामोदर वगळ | |
| यशवंती आडारकर | |

## वाङ्मयीन परीक्षा वर्गांचे अध्यापक

| | |
|---|---|
| प्रा. अ. वा. गजेंद्रगडकर | प्रा. श्री. शं. खानोलकर |
| प्रा. कृ. पां कुळकर्णी | प्रा. वा. ल. कुळकर्णी |
| प्रा. मा. दा. आळतेकर | प्रभाकर पाध्ये |
| प्रा. अनंत काणेकर | डॉ. व. दी. राव |
| प्रा. वि. ह. कुळकर्णी | खं. सा. दांडकर |

दि. वि. आमोणकर
ए. ना. जोशी
वा. रा. ढवळे
प्रा. ना. द. नांदुर्डीकर
प्रा. म. अ. करंदीकर
प्रा. र. वि. हेरवाडकर
प्रा. श्री. पु. भागवत
प्रा. रा. भि. जोशी
प्रा. पु. शि. रेगे
व्यं. ना. नाईक
प्रा. गार्गी भाटवडेकर
प्रा. स. गं. मालशे
प्रा. गं. वा. ग्रामोपाध्ये
प्रा. सरोजिनी शेंडे
श्री. म. परांजपे
प्रा. माधव मनोहर
प्रा. न. र. फाटक
अविनाश केळकर
प्रा. ल. ग. जोग
प्रा. रमेश तेंडुलकर
प्रा. ज. के. रानडे
प्रा. शांताराम जोग
मंगेश पाडगावकर
राम पटवर्धन
व. वि. पारखे
प. वा. साठे
मा. ना. आचार्य
जगन्नाथ महाजन
प्रा. भीमराव कुळकर्णी
दिलीप चित्रे
प्रा. वसंत दावतर
प्रा. के. पां. जोग
प्रा. ग. वि. नेलेंकर
यशवंत कानिटकर
रविंद्र पिंगे
धों. वि. देशपांडे
सदा कऱ्हाडे
कु. अचला फडके
अनंत भावे
म. ल. आपटे
रा. ग. जोग
प्रा. मे. पुं. रेगे
प्रा. सुरेन्द्र गावसकर
प्रा. शकुंतला धारप
प्रा. विजया राजाध्यक्ष
प्रा. व. दि. कुलकर्णी
प्रा. लीला गोविलकर
प्रा. सुहास बापट
प्रा. वि. द. संत
प्रा. म. वा. धोंड
प्रा. सरोजिनी वैद्य
प्रा. प्र. म. उपाध्ये
प्रा. वि. वि. दळवी
प्रा. वि. द. आपटे
ग. ना. इनामदार
स. के. कानधिंदे
रमेश राणे
प्रा. कांचनमाला हरमलकर
प्रा. साधना उपाध्ये
प्रा. गंगाधर पाटील
प्रा. उमेश तेंडुलकर
प्रा. केशव मेश्राम
शांताबाई शेळके
प्रा. स. रा. चुनेकर
प्रा. सुभाष सोमण
दिगंबर पाध्ये
प्रा. सुहासिनी आजगावकर
प्रा. रा. वि. मंत्री

प्रा. राम कापशे
प्रा. सुहासिनी आगासकर
कुमुदिनी खांडेकर
माधुरी रेळे
प्रा. एकनाथ बाग
प्रा. अंजली सरदेसाई
सुमती मोडक
प्रा. विवेक जोग
प्रा. रमेश कुबल
प्रा. सुमती मोडक
प्रा. कुंदा सबनीस
शोभा कुळकर्णी
प्रा. सु. श. देशपांडे
सुहासिनी किर्तीकर

रशियन भाषावर्ग अध्यापक

गु. त्र्यं. दिवेकर
द. य. राजाध्यक्ष
अशोक रानडे
गो. य. तुळपुळे
डॉ. भा. ना. कारेकर
श. ह्. परांजपे
डॉ. श्री. रा. जावळेकर
व. सु. हेम्माडी

अमराठी भाषिकांसाठी मराठीचे वर्ग–
अध्यापक

त्र्यं. वि. पर्वते
राम पटवर्धन
ना. द. नांदुर्डीकर
रा. ना. इनामदार
सौ. वासंती गजेंद्रगडकर
मल्हार ढगे
सरोजिनी शेंडे
रमेश तेंडुलकर
सौ. सुधा जोशी
व. वै. भांडारे
अरुण टिकेकर
कांचनमाला हरमळकर
अनुराधा जोशी
सौ. मनीषा टिकेकर
सुभाष सोमण
सौ. वसुंधरा देवधर
वि. शं. चौधुले
अ. रा. कुलकर्णी
मिलिंद माळशे
शरयू अनंतरामन
सौ. सुमती अय्यर
रेखा जोशी
कृ. रा. सावंत
वसंत पाटणकर
पेंडसे
फ्रान्सिस दिब्रिटो
कालिंदी सुखठणकर
सु. शं. देशपांडे
रा. वि. मंत्री
कुसुम आडारकर
एस. एस. टेंगळे
सौ. एस. एच. देवरकर
डी. नॉर्मन

परिशिष्ट १७ वे

# प्रकाशने

१. बामन मल्हार : वाङ्मय दर्शन लेखक प्रा. वा. ल. कुळकर्णी (त्रितीयावृत्ती) पृष्ठे १९८+१४ मूल्य रु. १५.

२. अर्वाचीन मराठी काव्य : लेखक प्रा. रा. श्री. जोग (द्वितीयावृत्ती) पृष्ठे ३६१+८ मूल्य रु. ६.

३. मराठी कादंबरी पहिले शतक भाग १ व २ (एकत्र) लेखक प्रा. कुसुमावती देशपांडे, (आवृत्ती दुसरी). पृष्ठे ३६८+१० मूल्य रु. ३०

४. मराठी कविता : इस. स. १९२० चे १९५०, (आवृत्ती संपली) कार्यकारी संपादक : श्री. वा. रा. ढवळे. मराठी कवितांचा प्रातिनिधिक संग्रह पृष्ठे २३२+१२ मूल्य रु. ५.

५. मातीची धरणे : (आवृत्ती संपली). श्री. लेखक श. म. भालेराव पृष्ठे ४+३२ मूल्य रु. १

६. अश्लीलता : एक परिसंवाद (आवृत्ती संपली). डॉ. इरावती कर्वे, ॲ. सुशील कवळेकर, प्रा. गंगाधर गाडगीळ, प्रा. वा. ल. कुळकर्णी, प्रा. ग. प्र. प्रधान, बॅ. वि. न. गाडगीळ. पृष्ठे ६४+५६ मूल्य रु. २

७. स्मृतिग्रंथ : साहित्य संघ मंदिराच्या उद्‌घाटनाचे प्रसंगी प्रसिद्ध करण्यात आलेली व साहित्य संघाच्या साहित्यविषयक व नाट्यविषयक कार्याचा परिचय करून देणारी सचित्र स्मरणिका मूल्य रु. २०

८. मराठी कविता : १९४५–१९६५ लेखक प्रा. रा. श्री. जोग (पहिली आवृत्ती संपली) (समालोचन) पृष्ठे ७४ मूल्य रु. २

९. मराठी ग्रंथांचे आदर्श संग्रहालय : लेखक प्रा. अ. का. प्रियोळकर पृष्ठे १२+१४४ मूल्य रु. ५

१०. मराठी आख्यान कविता : लेखक डॉ. ग. गं. ग्रामोपाध्ये (आवृत्ती संपली) पृष्ठे ६२+१२ मूल्य रु. २

११. गोमंतकीय लेखकांच्या ग्रंथांची सूची : संपादक : काशीनाथ वासुदेव केंकरे, पृष्ठे १७३+१२ मूल्य रु. ५

१२. डॉ. भाऊ दाजी : व्यक्ती, काल व कर्तृत्व : लेखक–प्रा. अनंत काकबा प्रियोळकर पृष्ठे ५८६+२८ मूल्य रु. १५

१३. मराठी रंगभूमी : मराठी नाटक घटना, आणि परंपरा : डा. भालेराव स्मृतिग्रंथ : संपादक : श्री. के. नारायण काळे, श्री. वा. ल. कुलकर्णी, श्री. वा. रा. ढवळे (कार्यकारी संपादक). पृष्ठे ३७८+१६, मूल्य रु. ३०

१४. रसास्वाद : वाङ्मय आणि कला : लेखक माधव आचवल, पृष्ठे ७६+५; मूल्य रु. ५ (१९७२)

१५. मराठी कविता : प्राचीन कालखंड : ११५०–१८४० संपादक : श्री. वा. रा. ढवळे, प्रा. व. दि. कुळकर्णी (प्रथमावृत्ती १९६९) मूल्य रु. १० पृष्ठे २३२+२०

१६. महाराष्ट्रातील विद्यापीठापुढील काही शैक्षणिक व शासकीय समस्या लेखक श्री. वसंत हरी गोळे, पृष्ठे ५२+४, रु. २.

१७. हरी नारायण आपटे यांच्या कादंबऱ्या लेखिका : श्रीमती अचला जोशी, पृष्ठे १२७+६ मूल्य रु. ८

१८. युक्तिवादाची उपकरणे : लेखक प्रा. दि. य. देशपांडे पृष्ठे ७५+८, मूल्य रु. ५

१९. कृष्णदास शामा-विरचित श्रीकृष्णचरित्रकथा संपादक : डॉ. वि. वा. प्रभुदेसाई व डॉ. वा. ना. मुंडी, मूल्य रु. २०

२० वामन मल्हार आणि विचार सौंदर्य लेखक : प्रभाकर पाध्ये, पृष्ठे १९४+१५ मूल्य रु. १०

२१. मराठी कवितेचा उषःकाल किंवा मराठी शाहीर : (द्वितीयावृत्ती) लेखक : श्रीपाद महादेव वर्दे पृष्ठे ३४+१८६ मूल्य रु. ५०

## परिशिष्ट १८ वे

### संघास साहाय्य करणाऱ्या संस्था

मुझफराबाद हॉल, रॉबर्ट मनी हायस्कूल, विल्सन हायस्कूल, विल्सन कॉलेज, नाथीबाई कन्याशाळा, सरस्वती हायस्कूल, फडके गणपती मंदिर, चिकित्सक समूह वागळे हॉल, नवयुग कार्यालय, वनमाळी हॉल, छबिलदास, बालमोहन विद्यामंदिर, वेस्टर्न इंडिया थिएटर्स, कृष्ण सिनेमा, सेंट्रल सिनेमा, दादर भगिनी समाज, डॉन बॉस्को हायस्कूल, आर. एम. भट हायस्कूल, दामोदर हॉल परळ, संगीत नृत्यकला मंदिर परळ, राम नारायण रूइया कॉलेज, पोद्दार कॉलेज, कॅथॉलिक जिमखाना, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मराठी नाट्य परिषद, आर्यन हायस्कूल, स्टु. लि. अ. गर्ल्स हायस्कूल, सेंट टेरेसा हायस्कूल.

चित्पावन ब्राम्हण संघ, ब्राम्हणसभा, मराठी सांस्कृतिक मंडळ, पवई, जनरल एज्युकेशन अकादमी चेंबूर, ह्यूम हायस्कूल, तमीळ संघम चेंबूर, 'साहित्यिका' माटुंगा, सिडको, पार्ले कॉलेज.

भारत सरकार, सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार, शिक्षण मंत्रालय भारत सरकार, संगीत नाटक अकादमी, साहित्य अकादमी, महाराष्ट्र सरकार, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, सांस्कृतिक संचालनालय, मुख्यमंत्री निधी, शिक्षण मंत्रालय महाराष्ट्र शासन, मुंबई महानगरपालिका, पोलिसखाते; पी. डब्ल्यू. डी. खाते, कलेक्टर मुंबई, मे. बाटलीबॉय आणि पुरोहित चार्टर्ड अकौंटन्टस् मे. कुळकर्णी मराठे आणि कंपनी, दिवेकर आणि कंपनी सॉलिसिटर्स, बँक ऑफ महाराष्ट्र, सारस्वत बँक, वेस्टर्न इंडिया बँक, मुंबई साहित्य संमेलनांचे अध्यक्ष, स्वागताध्यक्ष, निमंत्रक संस्था, संघदिनाचे महनीय प्रवक्ते, व्याख्याते, लेखक, नाटककार, दिग्दर्शक संगीत दिग्दर्शक, नेपथ्यकार, संगीत साथीदार, रंगमंच सहाय्यक, नाटकातील कलाकार, महाराष्ट्रातील नाट्यसंस्था, साहित्य संस्था ठेवीदार, सहाय्यक वाङ्मय वर्गाचे प्राध्यापक, परीक्षांचे संचालक, परीक्षांचे केंद्राधिकारी.

न्यू भारत प्रिंटिंग प्रेस, फेमस प्रिंटर्स, राष्ट्रवैभव प्रेस, कर्नाटक मुद्रणालय, मौज प्रिंटिंग ब्युरो, साहित्य सहकार मुद्रणालय, गणेश प्रिंटिंग प्रेस. अक्षर प्रतिरूप.

दामोदर हॉल, शिवाजी मंदीर, रविंद्र नाट्य मंदिर, रंगभवन, दीनानाथ नाट्यगृह, भरत नाट्यमंदीर, बालगंधर्व पुणे, बालगंधर्व वांद्रा, परगावची नाट्यगृहे, संघाचे प्रयोग कराराने घेणाऱ्या संस्था व व्यक्ती, मुंबईतील व महाराष्ट्रातील सर्व वृत्तपत्रे, संघाचे सदस्य, देणगीदार, आणि हजारो संघावर प्रेम करणाऱ्या ज्ञात अज्ञात व्यक्ती.

या सर्वांच्या ऋणात राहूनच काम करणे संघास अभिमानास्पद वाटते.

परिशिष्ट १९ वे

# सन्माननीय सभासद

[१९६४ साली संघ मंदिर उद्‌घाटन समारंभाचे वेळी प्रथमतः जीवनातील विविध क्षेत्रात अग्रेसरत्व मिळविणाऱ्या व्यक्तींना संघाचे सन्मान्य सदस्यत्व देण्याच्या प्रथेस सुरुवात झाली. प्रथमतः पहिल्या सोळा व्यक्तींना सन्मान्य सदस्यत्व देण्यात आले. त्यानंतर प्रसंग विशेषी पुढील व्यक्तींना ते प्रदान करण्यात आले.]

* १. श्री. श्री. दा. सातवळेकर
* २. श्री. ना. गो. चापेकर
* ३. भारतरत्न पां. वा. काणे
* ४. बॅ. वि. दा. सावरकर
* ५. श्री. गणपतराव बोडस
* ६. श्री. भा. वि. वरेरकर
* ७. श्री. म. म. वा. वि. मिराशी
* ८. श्री. वि. पां. करमरकर
* ९. प्रा. ना. सी. फडके
* १०. श्री. चिं. द्वा. देशमुख
* ११. श्री. सां. ल. हळदणकर
* १२. श्री. म. म. दत्तो वामन पोतदार
* १३. श्री. वि. स. खांडेकर
* १४. श्री. प्र. के. अत्रे
१५. श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
* १६. श्री. यशवंतराव चव्हाण
* १७. श्री. पांडुरंगराव पिसुर्लेकर
१८. श्री. उमाशंकर जोशी
* १९. श्री. केशवराव दाते
* २०. प्रा. धनंजयराव गाडगीळ
* २१. श्री. विनायकबुवा पटवर्धन

* अशी खूण असलेल्या व्यक्ती दिवंगत झाल्या आहेत.

* २२. श्री. एम. आर. आचरेकर
२३. श्री. यशवंत दि. पेंढरकर
२४. श्री. ना. स. बेंद्रे (चित्रकार)
* २५. श्री. सूरश्री केसरबाई केरकर
* २६. श्री. द. रा. बेंद्रे
* २७. प्रा. न. र. फाटक
* २८. श्री. ग. त्र्यं. माडखोलकर
* २९. श्री. अ. का. प्रियोळकर
* ३०. श्री. आ. रा. देशपांडे
* ३१. श्री. के. सी. ठाकरे प्रबोधनकार
३२. श्रीमती हिराबाई बडोदेकर
* ३३. श्री. नानासाहेब फाटक
* ३४. श्री. मास्टर दत्ताराम
३५. श्री. विजय मर्चंट
३६. डॉ. सुखात्मे
३७. डॉ. भा. नी. पुरंदरे
३८. श्रीमती दुर्गाबाई खोटे
३९. श्रीमती मोगूबाई कुर्डीकर
४०. प्रा. वा. ल. कुलकर्णी
४१. प्रा. रा. भि. जोशी
४२. श्री. वि. वा. शिरवाडकर
* ४३. श्री. दि. वि. आमोणकर
४४. श्री. पु. ल. देशपांडे
* ४५. श्री. वा. रा. ढवळे
४६. श्री. अनंत वर्तक
४७. श्रीमती मीनाक्षी शिरोडकर
४८. श्रीमती ज्योत्स्ना भोळे
४९. श्री. विश्राम बेडेकर
५०. श्रीमती वनमाला

* अशी खूण असलेल्या व्यक्ती दिवंगत झाल्या आहेत.

# स्मृतिचित्रे

[साहित्य संघाच्या सुवर्णमहोत्सवाचे वेळी एक प्रकाशन प्रसिद्ध करण्याचे ठरल्यानंतर यात ज्यांचा कारणपरत्वे संघाशी दीर्घकाल संबंध आला त्यानाही ह्या निमित्ताने त्यांच्या मनात साठलेल्या आठवणींना वाट करून द्यावी व इतरांना त्या आठवणी सांगाव्यात असे वाटणे स्वाभाविक आहे. म्हणूनच आमच्या विनंतीनुसार ज्यांनी आठवणी पाठविल्या त्या व काही संबंधितांनी पूर्वीच उद्धृत केल्या होत्या अशांचे हे संकलन. या संकलनाने आपलीही संघा-संबंधीची स्मृतिचित्रे उफाळून वर येतील असा विश्वास वाटतो.]

## आरंभ झाला

इ. स. १९३४ साली मुंबई मराठी साहित्य संमेलन भरविण्याची कल्पना निघाली—या कल्पनेचा ज्यांनी प्रारंभ केला त्यांचा परिषदेशी काही एक संबंध नव्हता. फक्त मुंबई शहरातील साहित्यिकांचे एक संमेलन भरावे इतकाच उद्देश प्रथम होता. मुंबई शहराच्या रहिवाशांबाहेरचे सभासद नसावे आणि अध्यक्षही मुंबईकरच असावा अशी या संमेलनाची घटना होती. या संमेलनास मुंबईकर वाङ्मयभक्तांकडून जे उत्तेजन मिळाले, त्यामुळे या संमेलनातून एक कायमची मध्यवर्ती वाङ्मयसंस्था स्थापन करावी व त्या संस्थेने सालोसाल अशी संमेलने भरवावी आणि इतर साहित्यकार्यही करावे अशी कल्पना येऊन, या प्रकारची मध्यवर्ती संस्था स्थापना करण्यासाठी एक समिती नेमण्याचा १९३४ सालच्या मुंबई साहित्य संमेलनाने ठराव केला. त्या ठरावा-नुसार 'संघा'ची घटना मान्य करणाऱ्या सभासदांकडून संघाची स्थापना २१ जुलै १९३५ रोजी झाली.

संघाच्या सभासदांमध्ये तरुण आणि वरुण, पुरोगामी व सनातनी, साम्यवादी अणि वर्गाभिमानी अशा सर्व मतांच्या, वयांच्या आणि वृत्तींच्या सभासदांचा समावेश झालेला आहे. विरोध आणि मतभेद तीव्रतेने कायम ठेवूनही स्वभाषेच्या आस्थेने सर्वांनी सारख्या उत्साहाने गेली दोन वर्षे कार्य केले आहे. मुंबईत मराठी वाङ्मयाच्या कार्यक्षेत्रात काम करणाऱ्यांनी 'संघा' साठी केलेले सहकार्य या दोन वर्षांत तरी महाराष्ट्रावर होणारा परमतसहिष्णुतेचा आरोप खोडून काढणारे आहे. कोणत्याही सन्मान्य उद्देशाने एकत्र येणाऱ्या व्यक्तींचे परस्परांविषयीचे गैरसमज दूर होऊन स्नेहसंवर्धन होते याचा संघाच्या गेल्या दोन वर्षांतील कार्याचा दाखला अत्यंत आशाजनक आहे.

## 'संघा'ची व्याप्ति

विरार, सोपारे, अंधेरी, विलेपार्ले, चेंबूर, कल्याण, भिवंडी, ठाणे, डोंबिवली वगैरे उपनगरातील साहित्यभक्तांशी मुंबईतील वाङ्मयोपासकांचा सतत संबंध 'संघा'च्या द्वारा येत असल्यामुळे या सर्व प्रदेशातील साहित्यविषयक चळवळींना परस्परसहाय्य होऊन बराच एकसूत्रीपणा त्यांच्या कार्यांत येतो. जप्त वाङ्मय बंधनिर्मुक्त करण्याची चळवळ नवीन राजसुधारणा अमलात येताच झटपटीने झाली व महाराष्ट्रातील अनेक केंद्रांची परस्परांस मदत होऊन शिष्टमंडळाची योजना थोड्या अवधीत करता आली. सर्व वृत्तपत्रांचा पाठिंबा मिळाला व या चळवळीला आशाजनक यश मिळाले. या सर्व कार्यात संघाला महत्त्वाचा भाग अंगीकारणे मुंबईतील सर्व साहित्यिक गटांच्या सहकार्यामुळेच शक्य झाले. 'संघा'च्या सभासदत्वाचे क्षेत्र कदाचित अतिव्याप्त असले तरी दळणवळणाच्या अद्यतन साधनांमुळे आणि वृत्तपत्रांच्या फैलावामुळे या काहीशा विस्तीर्ण क्षेत्रातील सभासदांना सहकार्य आणि विचारविनिमय करणे शक्य होते. मुंबईसारख्या शहराशी उपनगरचा मिलाप करणाऱ्या साधनांचा उपयोग यापेक्षा कितीतरी जास्त प्रमाणात करता येण्यासारखा आहे. संघाशी संलग्न झालेल्या वाङ्मय संस्थांच्या अंतर्गत कारभाराशी संबंध न ठेवता किंवा दर्जाच्या वरिष्ठतेची अगर कनिष्ठतेची झळ न लागता समानतेने, समान उद्देशाने सहकार्य करणाऱ्या संस्था, असेच या संलग्नतेचे स्वरूप आहे. प्रत्येक संस्थेचा उद्देश व कार्यक्षेत्र स्वतंत्र असून वाङ्मयक्षेत्रात वावरणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांना एकत्र आणणे हे संघाचे प्रमुख कार्य आहे. इतर संस्थांचे विशिष्ट कार्य

अथवा महत्त्व यांवर आक्रमण न करता परस्पराशी संबंध येण्याचे केंद्र अशी 'संघा'ची रचना राहिल्यानेच 'संघ' ही या कार्यप्रदेशातील मध्यवर्ती संस्था होवू शकेल, असा अनुभव येत आहे. या जाणिवेने ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालयाशी सहकार्य करून १९३६ सालचे मुंबई व (उपनगर) साहित्य संमेलन यशस्वितेने पार पाडता आले. मुंबई मराठी साहित्य संघ ही 'साहित्य परिषदे'शी चढाओढ करणारी एक संस्था होईल ही किल्येकांची भीती दूर करण्यासाठी संघ सुरवातीसच 'परिषदे'शी संलग्न झाला. परिषदेची घटना तयार करण्यात 'संघा'च्या प्रमुख कार्यकर्त्यांनी कसोशीने भाग घेतला. जळगावच्या संमेलनात संघाच्या सभासदांनी पूर्ण सहकार्य केले. पुरोगामी लेखक परिषदेशींही सहकार्य केले. परिषदेच्या २२ व्या संमेलनाचा सर्व कार्यभार आज 'संघा'ने शिरावर घेतला तो या सहकार्यापोटीच. अशा सहकार्यानेच महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांना प्रभावशील होता येईल.

## पहिले मुंबई मराठी साहित्य-संमेलन

पहिले मुंबई मराठी साहित्य संमेलन १९३४ हे गुरूवर्य कृष्णराव अर्जुन केळुसकर यांच्या अध्यक्षतेखाली ६-७ आक्टोबर १९३४ रोजी भरले. त्याचे स्वागताध्यक्ष प्रो. अ. बा. गजेंद्रगडकर हे होते. याच संमेलनाने 'संघा'च्या स्थापनेसाठी समिती नेमली व संघाची स्थापना झाली.

[वीणा: मुंबई मराठी साहित्य संघाचे पहिले मुखपत्र
मार्च-एप्रिल १९३८च्या अंकातून......]

श्री० म० वर्दे

## कै० प्राचार्य अ. बा. गजेंद्रगडकर

मुंबई मराठी साहित्य संघाचे जणू प्राणच असलेले प्राचार्य अ. बा. गजेंद्रगडकर यांचे शनिवार, दिनांक ८ नोव्हेंबर १९४७ रोजी एकाएकी निधन झाले.

मुंबई मराठी साहित्य संघाच्या जवळ जवळ अगदी सुरुवातीपासून तो तहत मृत्यूपर्यंत संघाचे अध्यक्ष म्हणून अविरत तेरा वर्षे त्यांचा सहवास आम्हाला लाभलेला होता. या काळात साहित्य संघाची जी भरभराट होत गेली तिचे श्रेय जसे श्री. श्रीपादराव वर्दे, डॉ. भालेराव प्रभृति कार्यकर्त्यांना द्यावे लागेल

तसेच प्राचार्य गजेंद्रगडकरांच्या निर्भीड, धीरगंभीर, करारी, उत्साही नि अचूक नेतृत्वाला देणे जरुरीचे आहे. अनेक अडचणी व आपत्ती यांना संघाने जे धैर्याने वेळोवेळी तोंड दिलेले आहे याचे कारण सुद्धा त्यांचेच प्रभावी नेतृत्व हे होय. किंबहुना स्वतःच्या नोकरीवर प्रसंगी गदा येण्याची भीती असताही संघाचे कार्य नेटाने पुढे चालविण्याचा दमदारपणाही त्यांनी दाखविला ही गोष्ट त्यांच्या स्वाभिमानी व बेडर वृत्तीला साजेशी अशीच होती. संघाचे 'साहित्य' हे द्वैमासिक सुद्धा त्यांच्या दुर्दमनीय प्रेरणेमुळेच सुरू होऊ शकले. ते प्रत्येक कार्यात नी चळवळीत आशावादी होते. साहित्यविषयक नवीन नवीन चळवळी अंगावर घेतांना आर्थिक दृष्ट्या त्या संघाला झेपतील किंवा नाही अशी जेव्हा आम्हा कार्यकर्त्यांना शंका येई त्यावेळी "कार्य सुरू करा. पैसा आपोआप तुमच्या मागून येईल. पैशाच्या अभावी कार्य कधीच अडणार नाही. शिवाय कोणतीही सार्वजनिक संस्था ही कर्जातच असली तरच तिची प्रगति होते नी त्या संस्थेला पैसेही मिळतात" असा उत्साह आम्हास देऊन ते आमच्यात विश्वास निर्माण करीत.

वा. रा. ढवळे

## श्री० स० वर्दे....

मुंबईला इ. स. १९३४ साली कै. केळुसकर यांच्या अध्यक्षतेखाली जे पहिले प्रादेशिक संमेलन झाले त्यातूनच 'मुंबई मराठी साहित्य संघ' ही संस्था निर्माण करण्याची कल्पना श्री० वर्दे यांना सुचली हे जरी खरे असले तरी मुंबईत साहित्याची एक मध्यवर्ती संस्था असली पाहिजे हे त्यांचे विचार जुनेच होते. किंबहुना त्यामुळेच मुंबईला असलेली महाराष्ट्र साहित्य परिषदेची कचेरी मुंबईच्या काही साहित्यिकांच्या 'अदूरदर्शीपणामुळे' पुण्याला गेली याचे त्यांना दुःख झाले. पण आपली ही इच्छा त्यांनी साहित्य संघाला संघटित स्वरूप देऊन निराळ्या मार्गांनी पुरी केली. साहित्य संघाची वाढ व्हायला सुरवातीला त्यांचेच बरेचसे श्रम कारणीभूत झालेले आहेत. त्याची घटना ही त्यांच्याच हातची आहे. ऐन पन्नाशीतच ते जराजर्जर झाल्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाचा फारसा लाभ पुढे संघाला मिळाला नसला तरी त्यांचा वेळोवेळी मिळालेला सल्ला हा साहित्य संघाला नेहमी उपकारच झाला आहे.

शरीरदौर्बल्यामुळे त्यांना घराबाहेर पडणे जरी अशक्य होते तरी त्यांचे सर्व लक्ष साहित्य संघाच्या वर्धिष्णू यशाकडे लागून राहिलेले असे. साहित्य संघाच्या नेतृत्वाखाली भरलेली वैभवशाली साहित्यसंमेलने व नाटयोत्सव पाहून व झालेले ऐकून त्यांना समाधान होई. 'साहित्य' द्वैमासिकाच्या उच्च वाङ्मयीन दर्जाबद्दलचे आपले समाधान त्यांनी अनेकदा प्रत्यक्ष माझ्याशी अगर माझ्या पाठीमागेही व्यक्त केलेले आहे. साहित्य संघाच्या कार्याचा व्याप वाढत आहे हे ऐकून त्यांना आनन्द होई. आपण लावलेल्या वृक्षाला चांगली फळे येत आहेत हे पहाण्याचे भाग्य त्यांना लाभले. जसे आपले गृहजीवन समृध्द झालेले ते पाहू शकले. साहित्य संघांवर त्यांचा एवढा जीव की प्राण होता की आपल्या सर्व प्रकाशनाचे हक्क त्यांनी मरणापूर्वी साहित्य संघाला अपर्ण केले आहेत.

**वा. रा. ढवळे**

## एक अविस्मरणीय नाट्यमहोत्सव :

मुंबई मराठी साहित्य संघाचा विषय निघाला म्हणजे १९४४ सालच्या एप्रिल महिन्यात संघाने साजरा केलेल्या मराठी रंगभूमीच्या मुंबईतील नाट्य-शताब्दी महोत्सवाची मला हटकून आठवण होते एकेचाळीस वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर सुद्धा त्या महोत्सवाचे स्मृतिचित्र यत्किंचितही अस्पष्ट झालेले नाही.

मराठी रंगभूमीची सुरुवात १८४३ साली सांगली येथे झाली म्हणून, १९४३ सालच्या नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात, सांगली येथे साजरा केलेल्या महोत्सवाने नाट्यशताब्दी महोत्सवाची सुरुवात झाली होती. परंतु मराठी रंगभूमीने शंभर वर्षांची आयुर्मर्यादा ओलांडली म्हणून आनंदित होऊन तिच्या भक्कम भविष्याविषयी निश्चिंत रहावे, की तिची 'शंभर वर्षे भरली' म्हणून निराश व्हावे अशी परिस्थिती त्यावेळी उद्भवली होती.

'मराठी माणूस' हा नाटकवेडा आहे असे म्हणतात. पण १९३३–१९३४ सालापासून आमच्या मराठी माणसाने रंगभूमीकडे पाठ फिरवून, बोलक्या झालेल्या चित्रभूमीकडे धाव घेण्याची सुरुवात होऊन तो अतिशय झपाट्याने तिच्या आहारी जातो आहे, असे दृश्य दिसू लागले होते. बोलपटांच्या

नवीन, चमत्कृतिपूर्ण आणि तुलनेने स्वस्त अशा करमणुकीमुळे तो आकर्षित झाला असला, तरी आमच्या रंगभूमीच्या यंत्रणेत शिरलेले काही दोषसुद्धा मराठी माणसाला तिच्यापासून पराङ्मुख करावयास कारणीभूत झाले होते.

मराठी रंगभूमीच्या पीछेहाटीच्या त्या काळात 'बलवंत', 'यशवंत', आणि 'ललितकलादर्श' या संगीत शाखेतल्या आणि 'महाराष्ट्र' आणि 'समर्थ' या गद्य शाखेतल्या एकेकाळच्या समर्थ नाट्यसंस्था विसर्जित झाल्या होत्या. सुप्रसिद्ध गंधर्व नाटक मंडळी कशीबशी चालू असली तरी बालगंधर्व हे तिच्या रंगभूमीवर, काही व्यावसायिक कारणांसाठी दिसत नसल्यामुळे तिची स्थिती डेन्मार्कच्या युवराजाशिवाय सादर केलेल्या हॅम्लेट नाटकासारखी झाली होती. केशवराव दाते, नाना फाटक आणि दिनकर कामण्णा यांच्यासारखे नट चित्रपटात भूमिका करीत होते. १९३३ साली स्थापन झालेल्या 'नाट्य-मन्वंतर' या संस्थेचे केव्हाच विसर्जन झाले होते. तिच्यासारखी नवमतवादी नाट्यसंस्थासुद्धा विसर्जित व्हावी याचा अर्थच असा होता की नव्या पद्धतीची नाटके आणि जुन्या पद्धतीची नाटके असा भेद प्रेक्षकांसमोर नसून, 'नाटक' या कलाप्रकाराबद्दलच त्यांच्या मनात अरुची निर्माण झाली होती. १९३९ नंतर अत्रे यांनी नाटके न लिहिल्यामुळे त्यांच्या नाटकांवर जगणारी बालमोहन नाटक मंडळी बंद पडली होती. अशा एकंदर परिस्थितीला अपवाद म्हणूनच की काय, रांगणेकरांच्या 'नाट्यनिकेतन' या संस्थेच्या रंगभूमीवर अवतरलेले 'कुलवधू' हे नाटक आणि त्यातील सौ० ज्योत्स्नाबाई भोळे यांची भूमिक आमच्या संगीत रंगभूमीच्या सुवर्णकालाची आठवण करून देत होती.

"नाट्यशताब्दि महोत्सव झालाच पाहिजे—" अशी आमच्या रंगभूमीच्या उपासकांची घोषणा असली तरी तिला कितीसा प्रतिसाद मिळेल याबद्दल अनेक रसिक साशंक होते. त्या परिस्थितीत शताब्दिमहोत्सव साजरा करणे म्हणजे एखाद्या पराभूत सेनापतीचा एकसष्ठी समारंभ साजरा करण्यासारखे तर होणार नाही ना?—अनेकांच्या मनातली पाल असे चुकचुकत होती!

परंतु सांगली येथील महोत्सवाला केवळ सांगली आणि मिरज या जुळ्या शहरातील रसिकांनीच नव्हे, तर अखिल महाराष्ट्रातील रसिकांनी जो प्रचंड आणि भावपूर्ण प्रतिसाद दिला तो अनपेक्षितच समजला पाहिजे. सांगली ही मराठी रंगभूमीची जन्मभूमी, तिचे जनक विष्णुदास भावे हे सांगलीचे, तिचे

पहिले आश्रयदाते, सांगलीचे राजेसाहेब, महोत्सवातील प्रमुख आकर्षण असे 'शारदा' नाटक ज्यानी लिहिले ते गोविंद बल्लाळ देवल सांगलीतच स्थायिक झालेले—अशी त्या भावपूर्णतेची प्रमुख कारणे होती. महोत्सवाचे अध्यक्ष स्वातंत्र्यवीर सावरकर होते हे आणखी एक आकर्षण आणि शारदा नाटकाचा प्रयोग करण्यासाठी एकत्र आलेले कलावंत हे दुसरे आकर्षण! त्या प्रयोगासाठी मराठी रंगभूमीच्या निरनिराळ्या परंपरेतले प्रमुख नट जसे एकत्र आले तसे त्यापूर्वी कधी एकत्र आले नव्हते आणि त्यानंतरही अद्यापपावेतो कधी एकत्र आले नाहीत. ही भूमिका महत्त्वाची आणि ती सामान्य असा भेदभाव न करता, सर्वच नटानी आपापल्या भूमिका अत्यंत श्रद्धेने केल्यामुळे प्रत्येक भूमिकेलाच महत्त्व प्राप्त झाले होते. बालगंधर्व (इंदिराकाकू), गणपतराव बोडस (कांचनभट), चिंतोबा गुरव (श्रीमंत), चिंतामणराव कोल्हटकर (भद्रेश्वर), केशवराव दाते (सुवर्णशास्त्री), गंगाधरपंत लोंढे (कोदंड) आणि मास्तर नरेश (शारदा)—ही यादीच त्या प्रयोगातील संयुक्ततेच्या व्यापकतेची कल्पना देऊ शकेल.

पण शताब्दी महोत्सवातील, पहिला-वहिला भावनिक उद्रेक एक प्रकारचा जल्लोश—असे तर या समारंभाचे मूल्यमापन होणार नाही ना?—पालीचे चुकचुकणे अद्याप थांबले नव्हते!—प्रत्येकाचे लक्ष मुंबईकडे होते—सांगली ही आमच्या रंगभूमीची जन्मभूमी असली तर मुंबई ही तिची कर्मभूमी आणि उत्सवभूमी नव्हे का?

मुंबई येथील महोत्सवाची मुंबई मराठी साहित्य संघ ही आमंत्रक संस्था असून मुंबईतील प्रख्यात डॉक्टर अमृत नारायण भालेराव हे तिचे कर्णधार होते. मुंबईतील महोत्सव अत्यंत भव्य आणि नेटक्या स्वरूपात सादर करण्याचा,जणू काय, त्यांनी चंगच बांधला होता. संघातील अनेक कार्यकर्ते उत्सव यशस्वी व्हावा म्हणून अहोरात्र झटत असले तरी प्रत्येक बाबतीत शेवटचा शब्द भालेरावांचा होता. त्या महोत्सवाच्या अध्यक्षपदी बालगंधर्व यांची निवड घडवून आणण्याचे चातुर्य डॉक्टरसाहेबांनी सुरुवातीसच दाखविले होते. १९४४ च्या सुरुवातीपासून, काही व्यावसायिक कारणांमुळे, बालगंधर्व हे गंधर्व मंडळीच्या रंगभूमीवर भूमिका करीत नसल्यामुळे, अध्यक्षपदावरील त्यांची योजना म्हणजे मराठी रंगभूमीच्या शंभर वर्षांच्या इतिहासावर छाप

टाकणाऱ्या नटश्रेष्ठाला, जणू काय, निरोप देण्याचाच तो समारंभ होता! महोत्सवाच्या स्वागताध्यक्षपदी अत्रे यांच्यासारख्या उत्सवमूर्तींची योजना अत्यंत अनुरूपच समजली पाहिजे. रंगभूमीच्या संगीत आणि गद्य या दोन्ही शाखांचे कर्तृत्व आणि महत्त्व लक्षात घेऊन सौभद्र, स्वयंवर आणि एकच प्याला या तीन संगीत नाटकांप्रमाणेच 'भाऊबंदकी' या तेजस्वी गद्य नाटकाची निवड करण्यात येऊन, त्याच्या प्रयोगात नानासाहेब फाटक (राघोबा), सौ. वर्तक (आनंदीबाई) आणि रेजिसर अळतेकर (रामशास्त्री) अशी पात्रयोजना होती. गंधर्व मंडळीतील माधवराव वालावलकर, कृष्णाप्पा भांडारकर, सदाशिवराव रानडे, मास्तर कृष्णराव आणि गंगाधरपंत लोंढे या जुन्या नटांची निवड करण्यात आली होती. सौभद्र नाटकासाठी बालगंधर्व (अर्जुन) आणि हिराबाई बडोदेकर (सुभद्रा) अशी योजना होती.

या नाटकांचे प्रयोग पहायला अमर्याद गर्दी जमेल या विश्वासाने चर्नीरोड स्थानकाजवळच्या पटांगणात एक भव्य मंडप उभारला होता. उघड्या रंगमंदिरात (ओपन एअर थिएटर) सादर केलेले मुंबईतील ते पहिलेच नाट्य-प्रयोग असावेत. भालेरावांचा विश्वास खरा ठरून एकेका नाटकाला पंधरा-सोळा हजार रुपये उत्पन्न व्हावे इतके विक्रमी उत्पन्न त्या प्रयोगात झाले. त्या प्रचंड गर्दीपैकी कोणताही प्रेक्षक "शेवटची लोकल कधी सुटते"—अशी चौकशी करीत नव्हता. संगीत नाटकाच्या प्रयोगावर पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास शेवटचा पडदा पडल्यानंतरच त्या नंतरच्या "पहिल्या लोकल"ची तो चौकशी करीत होता. १९३३ सालापूर्वी वारंवार भेटलेले रसिक त्या भव्य मंडपात एकमेकाला भेटून जुन्या जमान्यातल्या गोष्टी करू लागले म्हणजे कॅलेंडरची पाने कित्येक वर्षे मागे सरकली आहेत असे वाटत होते.

मुंबईतला तो महोत्सव म्हणजे नुसता जल्लोश नव्हता. बोलपटांच्या आक्रमणामुळे गलितधैर्य झालेल्या मराठी रंगभूमीला आणि तिची सेवा करणाऱ्या कलावंताना त्यांच्या लोकप्रियतेचा आणि ते करीत असलेल्या नाटकांच्या गुणवत्तेचा साक्षात्कार त्या महोत्सवामुळे झाला. रंगभूमीपासून लाभणारा आनंद हा चित्रभूमीपासून लाभणाऱ्या आनंदापेक्षा अगदी निराळा आहे याची जाणीव त्या महोत्सवाच्या मंडपात जमणाऱ्या हजारो प्रेक्षकांना झाली. गुणी कलावंताना एकत्र आणून जुनी लोकप्रिय नाटके सादर करणारे कंत्राटदार त्या महोत्सवा-

नंतर पुढे सरसावले आणि नाट्यव्यवसायाची ज्योत त्यांनी कित्येक वर्षे तेवत ठेविली. बालगंधर्व आता व्यवसायनिवृत्त झाले असा समज फैलावला असताना त्यांनी त्यानंतर १९५२ सालापर्यंत त्यांच्या लोकप्रिय भूमिका केल्या. रांगणेकरांच्या नाट्यनिकेतनच्या चटकदार नाटकांची आगेकूच पूर्वीप्रमाणेच चालू राहिली.

हजारो रसिक पुन्हा रंगभूमीकडे खेचले गेले, ही घटना फार महत्वाची होय. १९४४ ते १९५० या कालखंडात कोणत्याही निश्चित दिशेने आमच्या रंगभूमीचा प्रवास चालू होता असे म्हणता आले नाही, तरी त्या कालखंडात एक प्रकारचे चैतन्य निर्माण झाल्यामुळेच, १९५० सालानंतरच्या नव्या रंगभूमीचे दर्शन घडू शकले. १९३३ सालापासून मराठी रंगभूमीवर पसरलेली पीछेहाटीची लाट परतवून, तिला एक समृद्ध आणि अभिनव कालखंडाकडे नेण्याचे श्रेय १९४४ साली साहित्य संघाने मुंबईत साजरा केलेल्या त्या नाट्यशताब्दी महोत्सवाला दिले पाहिजे.

वसंत शांताराम देसाई

## डॉक्टरांच्या हे निदान कानावर पडले....

१९४६–४७ च्या सुमारास माझ्या यजमानांची दिल्लीहून मुंबईला बदली झाली. माझ्या मैत्रिणींबरोबर साहित्य संघाच्या नाट्योत्सवाला मी जाऊ लागले. डॉ. भालेराव कुटुंबाची व माझ्या माहेरच्या म्हसकर कुटुंबाची जुनी ओळख. पण डॉ. भालेराव इतक्या कामात असत की त्यांच्याशी बोलायला मला नेहमी संकोच वाटायचा. सौ. वहिनींशी थोडीशी वातचीत व्हायची.

साहित्य संघाने सध्याची जागा घेतली तेव्हा श्री. जोशी मला एकदा म्हणाले, "काय तुमचा संघ. त्यांना चौपाटीतलावजवळ चांगली जागा मिळत होती (सध्याची बिर्ला मातुश्री सभागृहाची) पण त्यांना गिरगावात त्या अडचणीतच जागा हवी." मी म्हटले, "अहो आपला मध्यम वर्गीय प्रेक्षक इतक्या दूर येणार कसा? सगळ्या दृष्टीने सोयीची गिरगावातील जागा आहे." पुढे डॉ. भालेराव खूप आजारी आहेत असे कळले म्हणून त्यांना मी भेटायला गेले. बाहेर आमोणकर, अंधृटकर वगैरे होते. आमोणकर मला म्हणाले, "सुशीलाबाई जागेचा हप्ता आठ दिवसात भरायचा आहे. आणि

आता जवळ एकही पैसा नाही. डॉक्टरांना सारखी तीच काळजी आहे." माझ्या डोळ्यात आसवं उभी राहिली. मी घरी आले व मि. जोशांना म्हटलं, 'अहो तुमची Turf Club Committee इतक्या संस्थांना मदत करते, आमच्या साहित्य संघाला का नाही काही देत.' मि. जोशी तेव्हा Turf Club Committee वर Home Secretary ह्या नात्याने सरकारी प्रतिनिधी म्हणून होते. ते म्हणाले, "प्रयत्न करून बघा. उद्या १२ वाजायच्या आत, Turf Secretery कडे एक व माझ्याकडे एक, अशा अर्जाच्या प्रती, सर्व अहवाल, जागेसंबंधी माहिती, किंमत, कर्ज, ही माहिती पाठवा. उद्या संध्याकाळी अनुदानाकरता सभा आहे. त्यापुढे तो अर्ज येईल असा मी प्रयत्न करीन." मी रात्री लगेच आमोणकराना फोन केला व त्यांनी दुसरे दिवशी वेळेवर सर्व कागदपत्र व अर्ज योग्य ठिकाणी पोचविले. नशीब जोरात होते व शिफारसही होती, त्यामुळे की काय रु. १०,०००/– चे अनुदान मिळाले व जागेच्या हप्त्याचा कठिण प्रसंग पार पडला. डॉक्टरांच्या निदान हे कानावर पडले ह्यातच मला समाधान वाटले.

पुढे संघाचे व माझे संबंध जरा वाढले. मी काही दिवस कार्यकारी मंडळावर होते. श्री. एम्. डी. भट, आय. सी. एस. ह्यांच्या अध्यक्षतेखाली संघ मंदिरासंबंधी विचार करण्याकरिता एक समिती नेमली. त्याचे मी व श्री. भांडारकर कार्यवाह होतो. बँकेचे कर्ज काढून देणग्या मिळवून संघ मंदिर बांधावे असा ह्या समितीने सांगोपांग विचार करून निर्णय घेतला व कार्यकारी मंडळाने तो मान्य केला. तेव्हा बांधले म्हणूनच हे संघ मंदिर उभे राहिले.

सौ. सुशीला द. जोशी

## शाखा-संमेलनांची जोड संघाने दिली

१९५० सालच्या मुख्य संमेलनाला जोडून शाखा संमेलने भरविण्याची कल्पना नवीन नसली तरी मराठी भाषा व व्याकरण, कथा, टीका, काव्य व वृत्तपत्र वाङ्मय या वाङ्मयाच्या विविध शाखांची संमेलने मुख्य संमेलनाला कोणत्याही प्रकारे बाध न आणता व वाङ्मयाच्या विविध अंगांच्या अभ्यासाला गंभीरपणे चालना मिळावी या हेतूने सुसूत्रपणे आखण्याची योजना वैशिष्ट्यपूर्ण होती. वाङ्मयाच्या त्या त्या शाखांतील विविध विषयांवर जसे निबंध मागविण्यात

आले होते त्याचप्रमाणे त्या त्या शाखेतील महत्त्वाच्या वादग्रस्त प्रश्नांवर चर्चाही ठेवण्यात आल्या होत्या. शाखा संमेलनाच्या बाबतीत हे एक पुढचे पाऊलच म्हटले पाहिजे. या शाखा संमेलनाच्या अध्यक्षांच्या रूपाने त्या त्या क्षेत्रातील विचारवंत वाङ्मयसेवकांच्या विचारांचा व विचारविनिमयाचा लाभ संमेलनाला घेता यावा हाही एक हेतू होताच. या संमेलनांच्या अध्यक्षांच्या भाषणावर व निबंधवाचन व चर्चा यांच्यावर वेळेचे बंधन घालून संमेलनांना एक प्रकारचे अभ्यासमंडळाचे सुटसुटीत स्वरूप देण्याची योजना होती. अर्थात्, पूर्व योजनेप्रमाणे सर्वच गोष्टी यशस्वी झाल्या असे नव्हे. वेळेच्या अभावी अपेक्षेप्रमाणे निबंध येऊ शकले नाहीत, पण 'केशवसुत व तांबे यांच्या संप्रदायात मूलभूत फरक आहे काय?' (क्षीरसागर), अहिराणी ठाकरी व वऱ्हाडी बोली (सौ. ढवळे), षड्दर्शनाच्या रूपकातील एक कोडे (डॉ. शं. दा. पेंडसे), भाषा शैली (गंगाधर गाडगीळ) व रस व्यवस्था (दि. के. बेडेकर) वगैरे निबंध आले. त्यांचे वाचन, होऊन त्यांच्यावर चर्चाही झाली. या सर्व चर्चांना व शाख संमेलनांना अपेक्षेबाहेर गर्दी जमत असे, यावरून ही शाखा संमेलने लोकप्रिय झाली असेच म्हटले पाहिजे.

**संमेलनाच्या अहवालातून**

## आम्ही सर्व मंडळी डॉक्टरांची ऋणी आहोत...

साहित्य संघाचा सुवर्ण महोत्सव यंदा साजरा होत आहे ही आनंदाची गोष्ट तर आहेच. परंतु मी पुण्यात रहात असल्यामुळे मुंबईच्या लोकांचा डॉक्टरांशी जेवढा संबंध येत होता तेवढा माझा येत नव्हता, ही जाणीव मला अस्वस्थ करते. डॉक्टरी पेशा असून सुद्धा त्यांनी मराठी रंगभूमीसाठी जे कष्ट घेतले त्याला तोड नाही अशी माझी भावना आहे.

सांगलीला जेव्हा नाट्य महोत्सव झाला (साल आठवत नाही) तेव्हा मला शारदेची भूमिका करण्यासाठी डॉक्टरांनी विचारलं होतं. कै. बालगंधर्व (इंदिराकाकू). तेवढं एक भाग्य मला त्या नटसम्राटाबरोबर काम करण्याचं लाभलं असतं पण केशवराव (भोळे) म्हणाले शारदेच्या भूमिकेला मी शोभणार नाही. म्हणजे मोठी दिसेन, म्हणून ते घडलं नाही. आयुष्यात जे काही हुकतं ते पुन्हा हाती लागत नाही. एवढं खरं, संघ मंदिराच्या उद्घाटनाच्या दिवशी

आम्ही सर्वांनी नांदी म्हटली होती. वसंतराव देशपांडे वगैरे होते. पु. लं.नी तो सर्व कार्यक्रम आखला होता रंगभूमीवरील आम्ही सर्व मंडळी डॉक्टरांची ऋणी आहोत.

ज्योत्स्ना भोळे

## 'तर मी माझाही राजीनामा देतो!'

डॉ० बाळ भालेरावचं पत्र आलं, साहित्य संघाचा सुवर्ण महोत्सव आहे आपला साहित्य संघाशी कित्येक वर्षाचा संबंध आहे. आठवणी लिहून पाठवा.

पत्र वाचलं मात्र आणि मन एकदम १९४३ सालात गेलं. मी नुकतीच लग्न होईन दादरहून गिरगावात राहायला आले होते. डॉ० भालेरावांना माझा कसा सुगावा लागला किंवा कुणी माझं नाव सुचवलं ह्या विषयींची दाद काही डॉक्टरांनी मला लागून दिली नाही पण एके दिवशी ते माझ्या पारेख स्ट्रीटच्या घरी आले आणि मला कार्यकारी मंडळावर या म्हणून त्यांनीं मला आग्रह केला. काही लोकांचं व्यक्तीमत्त्वच असं असतं की त्याना नाहीच म्हणता येत नाही. असा दर्शनगुण असणं हे एक भाग्य असतं आणि असा दर्शनगुण असला की सामाजिककार्य करणं, म्हणजे माणसं जोडणं लोकसंग्रह करणं ही गोष्ट आपोआपच सुलभ होते.

मी कार्यकारी मंडळाच्या सभेला जाऊ लागले. त्यावेळी सभा कै० पिरोजबाई आनंदकर ह्यांच्या आंबेवाडीतल्या शाळेतील एका खोलीत होत. कै० अश्वथ्यामाचार्य गजेंद्रगडकर हे अध्यक्ष असत. ते शिक्षकाच्या खुर्चीत बसत. बाकी आम्ही सर्व बाकावर पण त्यातही मोठी मजा असे.

माझ्या सामाजिक कामाच्या सुरवातीलाच मला साहित्य संघाच्या सभांना जाण्याची संधी मिळावी आणि डॉ. भालेरावांची कार्यपद्धती पाहायला मिळाली हे मी माझं भाग्य समजते. कारण त्यामुळे सभा कशी चालवावी, लोकांच्या मनातील कसं काढून यावं, मग आपल्या मनातलं हळूच कसं सांगावं आणि ते सर्वांच्या मतापेक्षा कसं वरचढ आणि अधिक ग्राह्य असावं, सर्वांना पटेल असं असावं–म्हणजे शांतपणे जनाचं ऐकून घेऊन शेवटी आपल्या मनाप्रमाणं सर्वांना वळवून घेऊन आपल्या मनातील हेतू कसा, खुबीनं साध्य करून घ्यावा हे मी डॉ. भालेरावांपाशी शिकले. ते मला गेल्या चाळीस वर्षात फार उपयोगी पडलं.

संघाला पैसा मिळवण्यासाठी सुरुवातीस एकेक कार्यक्रम होत असत. मग त्यात तोटा आला की दुसरा कार्यक्रम तोटा भरून काढण्यासाठी होई. रंगभूमी मृतवत झाली होती. तिला प्राणवायु देऊन जगविण्याचा आटोकाट प्रयत्न डॉ. भालेराव करीत होते. इतक्यात रंगभूमीचा शतसांवत्सरिक उत्सव आला. डॉ. फडके व मनोरमाबाई फडके ह्यांचीही अमूल्य जोड संघाला मिळाली. सुरवातीला कार्यकारी मंडळात पिरोजबाई आनंदकर व मी असे. आता आनंदकरबाई शाळेच्या व्यापामुळे येत नाहीशा झाल्या. हळूहळू आंबेवाडीत भरणाऱ्या सभा बंद होऊन दुसरीकडे भरू लागल्या.[1] पुष्कळ वेळा भालेरावांच्या घरीच आम्ही जमत असू. रंगभूमीचा शतसांवत्सरिक उत्सवाच्या निमित्तानं भालेरावांनी तत्कालीन रंगभूमीवर काम करणाऱ्या सर्वांना एकत्र आणण्याच व नाटकं बसविण्याचा चंग बांधला. मराठी रंगभूमीची सुरवात सांगलीला झाली. तेथून उत्सवाला सुरवात झाली. आमचा सारा साहित्य संघ मोठ्या उत्साहाने सांगलीला गेला. लोकांना नाटक पाहाण्याची एकदम अशी हौस आली आणि खरं म्हणजे नाट्यप्रेम महाराष्ट्रीय माणसांच्या रक्तातच आहे. ते ही संधी पाहून अगदी उफाळून आले आणि तिकिटांची अशी तुफान मागणी झाली की चुकून त्या गडबड गोंधळात एकेक तिकीट दोनदा विकली गेली की कुणी छापून आणून दुसऱ्या तिकिटा बाहेरच्या बाहेर विकल्या देव जाणे पण माझ्या तिकिटावर बसायला निराळेच दुसरं तिकिट घेऊन एक व्यक्ती आली तेव्हा मी चक्रावूनच गेले. असे अनेक तिकिटांच्या बाबतीत घडले पण कार्यकर्त्यांनी ते निभावून नेले. गॅलरी बांधली होती त्यावर तर इतकी माणसं बसली की ती कोसळलीच.

पण एकंदर उत्सव छान झाला. शारदा नाटक पहाटेपर्यंत चाललं. चिंतामणराव गुरवांनी वृद्धत्वात केलेली म्हाताऱ्याची भूमिका अगदी खरी खरी वठली.

मग १९४४ साली डॉ. भालेरावांनी मुंबईत मोठ्या प्रमाणावर हा शत-सांवत्सरिक उत्सव करण्याची योजना आखली. मरीन ड्राइव्हच्या खुल्या मैदानावर ओपन एअर थिएटरची भव्य कल्पना त्यांनी मांडली. पहिल्यांदाच असं खुलं नाट्यगृह व त्यात पाच हजार माणसं एकसमावेच्छे करून नाटक पाहणार ही कल्पनाच मोठी अभिनव व आकर्षक होती. डॉ. नी ह्या कार्यक्रमा-

साठी अनेक कार्यवाह नेमले. त्यात मला व मनोरमाबाई फडके ह्यांनाही घेतले. आमच्या दोहींच्या उत्साहाला अगदी भरती आली. त्यात 'वेड्यांचा बाजार' हे साहित्यिकांचही एक नाटक असावं असं ठरलं. त्यात काम करायला आचार्य अत्रे, काणेकर वगैरे मंडळी होती. मीही त्यात एक लहानशी भूमिका डॉक्टरांच्या आग्रहावरून करण्याचं कबूल केलं. नाटक बसविण्याचं काम धूमधडाक्यात सुरू झालं. अत्रे तालमींना आले की फारच हसून हसून मुरकुंडी वळे, कारण पुस्तकातील वाक्य न बोलता प्रत्येक वेळी ते आपली मनाची मजेदार वाक्य घुसडून देत असत.

ह्या खेपेला सगळा जमाखर्च वजा जाऊन खूप फायदा होणार आणि रंगमंदिराचं स्वप्न लवकरच साकार होणार ह्या उमेदीनं कामं चालू होती. सगळी तयारी झाली. तिकीट विक्रीही तडाखेबंद झाली. उत्सव सुरू होण्याचा दिवस आला. आम्ही सर्व मंडळी बांधकाम पुरं होत आलेल्या रंगमंचावर उभी होतो. कामाची घाई चालली होती आणि नेमका तोच तो दिवस गोदीतील स्फोटाचा दिवस ठरला. पाच वाजण्याच्या सुमारास एक स्फोट झाला. दुसरा झाला. तो गगनभेदी आवाज आणि तो स्फोटाचा फवारा पाहिला मात्र आम्ही सर्वांनी हादरलेल्या त्या रंगमंचावरून उड्या मारल्या. मी व मनोरमाबाईंनी हातात हात घालून कसेबसे मरीन लाइन्स स्टेशन गाठले आणि दादरला पोचलो त्यावेळी दुसरे महायुद्ध चालू होतं. तेव्हा जपान्यांची धाड आली म्हणून तर छातीत धडकी भरली.

पुढचा इतिहास साऱ्यांना ठाऊक आहे. दुसऱ्या दिवशी रीतसर उत्सव सुरू झाला पण मुंबईवर झालेल्या ह्या आघातानं मिळणाऱ्या पैशांवर व उत्सवावर पाणी पडलं तरी डॉ. भालेरावांचं धैर्य जराही खचलं नाही. वेड्यांचा बाजार नाटक झालं त्या दिवशी कै. चिंतामणराव देशमुख प्रमुख पाहुणे होते. त्यांच्यासमोर स्टेजवर उभे राहून चार वाक्यं बोलताना मला इतकी भीती वाटली की त्यानंतर मी पडेल ते काम करीन पण स्टेजवर उभी राहाणार नाही हे डॉक्टरांना निक्षून सांगितलं.

१९५२ साल आक्टोबरची २७ ता. साहित्य संघाच्या इतिहासातील महत्त्वाची. कारण संघाला केळेवाडीतली जागा मिळाली व ह्या दिवशी कै. काकासाहेब गाडगीळ ह्यांच्या साक्षीनं आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री

ह्यांच्या पौरोहित्यानं भूमीपूजनाचा समारंभ साजरा झाला. संघाला आपलं काम करण्यास हक्काची जागा मिळाली. ज्या दिवशी ही जागा मिळण्याचं नक्की झालं त्या दिवशी डॉक्टरांनी आम्हा सर्वांना नेऊन ती जागा किती अगत्यानं आणि आनंदानं दाखवली तो दिवस आणि डॉक्टरांच्या चेहऱ्यावरचा तो आनंद मी विसरणार नाही. ह्या भूमीपूजनाचे दिवशी मुंबईचे प्रमुख साहित्यिक हजर होते. रंगभूमीला मुंबईत माहेरघर मिळाले म्हणून ह्या उगवत्या रंगभूमीला मुजरा करण्याकरता सर्व नट-नटी मोठ्या प्रेमानं आणि हक्कानं आल्या आणि विविध नाटकातील प्रवेश करून दाखविले. भालेरावांच्या लोकसंग्रहाचा ह्या दिवशी प्रकर्षानं प्रत्यय आला.

रंगभूमीच्या उत्थानासाठी काया वाचा मने करून झिजणारे डॉक्टर भालेराव १९५५ सालपर्यंत अविरत काम करीत होते. साहित्य संघापुढे त्यांनी आपल्या संसाराच्या सुखदुःखाकडे पाहिले नाही की आपल्या वैद्यकीय व्यवसायाची कदर केली नाही. स्वतःच्या पैशाचीही पर्वा केली नाही की शरीराची काळजी घेतली नाही. रात्रंदिवस एकच ध्यास घेतला. स्वतःचं रक्त आटवून दिल्लीहून विजयी होऊन आले आणि त्यांना हार्ट अटॅक आला. ह्या दुखण्यात ते काळजी करीत होते ती संघाची संसाराची नव्हे.

आणि हाय तो २५ ऑगस्ट १९५५ चा दिवस—साहित्य संघाच्या इतिहासातील काळा दिवस आला आणि डॉक्टर आम्हाला सोडून गेले. रंगमंदिराचं स्वप्न अपुरं राहिलं पण त्यांनी जे जीवाभावाचे कार्यकर्ते निर्माण केले होते, त्यांनी डॉक्टरांचं हे काम सिद्धीस नेण्याचा संकल्प केला. आणि तो सिद्धीस नेला. रंगमंदिर पूर्ण झालं. यशवंतराव चव्हाण आले. मोठा हृद्य सोहळा झाला. भालेरावांची आठवण त्या दिवशी पदोपदी येत होती.

दरवर्षी त्यांचा स्मृतिदिन होतो. स्मृतिदिनाला गेलं म्हणजे चाललेलं व्याख्यान कानात शिरण्याऐवजी ह्या सगळ्या स्मृती जागृत होतात. त्या स्टेजवर भालेरावांचा पार्थिव देह ठेवला आहे. सारी संघाची माणसं सभोवती उभी आहेत. दुर्गाबाईंच्या रूपानं प्रत्यक्ष रंगदेवताच एका बाजूला उभी राहून अश्रु ढाळत आहे असे चित्र दिसू लागतं आणि डोळे डबडबून येतात.

भालेरावांच्या स्वभावाची माणसं—कार्यकर्ते जोडण्याची एक आठवण मी उराशी जपून ठेवली आहे ती सांगते आणि संपवते—एकदा गिरगाव बॅक

रोडवरील गणपतीच्या देवळात कार्यकारी मंडळाची सभा होती व तदनंतर काही निमित्तानं जेवणही होतं. आचार्य अत्रेही येणार होते. कार्यकारी मंडळात मी व मनोरमाबाई फडके दोघीच. बहुधा एकमेकीला फोन करून जोडीनं जात असू. ह्या दिवशी मला एकटीला आलेली पाहून डॉक्टर म्हणाले 'आज एकट्याच' मनोरमाबाई कुठं आहेत? "मी म्हटलं त्यांच्याकडे पाहुणे आले आहेत त्या येऊ शकत नाहीत." तर डॉक्टर म्हणाले, "मग आज तुम्हीही नसता आलात तरी चाललं असतं आज. अत्रे येणार आहेत. खूप विनोदी बोलतील पण तुम्हाला पाहून एखादे वेळेस जीभ आवरतील." त्यांनी ही थट्टा केली पण मला रुचली नाही. मी म्हटलं, तर मग मी परत जाते. चालू द्या तुमची मजा." "मी रागानं परत फिरत होते पण त्यांनी मला जाऊ दिली नाही. मी घरी आल्यावर राजीनामा पाठवला. आठ दिवस डॉक्टर मला फोन करीत होते. मी सर्वांना सांगून ठेवले होते की डॉक्टरांचा फोन आला तर घरी नाही म्हणून सांगा. मी फोनवर भेटत नाही पाहिल्यावर डॉक्टर स्वतः घरी आले. थट्टा केल्याबद्दल क्षमा मागितली आणि म्हणाले. "तुम्ही दिलेला राजीनामा मी कसा सभेपुढे मांडू? काय कारण सांगू? माझ्या थट्टेमुळे तुम्ही संघ सोडणार असाल तर मी माझाही राजीनामा देतो."

त्यांचं ते मोठं मन पाहून मी विरघळले. विरघळले म्हणूनच बरं झालं कारण संघाशी आजपर्यंतचे प्रेमाचे संबंध कायम आहेत. संघात गेलं की माहेरी गेल्यासारखं वाटतं. सर्व जुनी मंडळी भेटली की कसं तृप्त वाटतं—जी आज काळाच्या पडद्याआड गेली. त्यांच्या आठवणीनं ऊर भरून येतं.

**लीला मस्तकार-रेळे**

## पडद्यामागील चैतन्यमूर्ति

साहित्य संघाच्या रंगभूमीवर अनेक कलाकार आपल्या अभिनयाची कसोटी लावून गेले, पण पडद्यामागे वावरणारी, सर्व गोष्टींना यशस्वीपणे सामोरी जाणारी मुंबई मराठी साहित्य संघाची सुधावहिनी, बापूंची खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी, मालती, बाळ, कुंदा यांची आई व माझी बहिण शांताक्का.....

ती वयाच्या १४ व्या वर्षी काकतीहून (जिल्हा-बेळगाव) भालेरावांच्या घरात आली. हुंडा .न घेता झालेलं लग्न म्हणून त्याकाळात ते बरेच गाजले

होते. 'चित्रमय जगत्'मध्ये खूप प्रसिद्धी मिळाली होती. भालेरावांच्या घरात येणाऱ्या जाणाऱ्यांची वर्दळ फार. पाहुणे तर नेहमीच असत. घरात सासुबाईंचा वचक व दरारा फार मोठा. सर्वांचे हसतमुखाने स्वागत करून, आदरातिथ्य करून ती सर्वांची लाडकी सून झाली. बापूंना लहानपणी क्रिकेटची खूप आवड. घरात सणवार असला, जेवायला २५–३० माणसे असली तरी बापूंची स्वारी क्रिकेट ग्राऊंडवर असायची. आपला नवरा न खाता न पिता ग्राऊंडवर घाम गाळतोय याचं माझ्या बहिणीला खूप वाईट वाटत असे, पण बोलायची सोय नव्हती. बापूंचा स्वभाव अत्यंत करारी, तापट पण तेवढाच दिलदार होता. पुढे डॉक्टर झाल्यावर वैद्यकीय व्यवसायात रोगाचे अचूक निदान करणारा डॉक्टर म्हणून त्यांची ख्याती होती. रुग्णाचे ऑपरेशन असलं तर बापू व शांताक्का स्वतः जातीने हजर राहून रुग्णाला धीर देत असत.

शांताक्काचे व्यक्तिमत्व अष्टपैलू होते. शिक्षण फारसं नाही तरी पण हिंद महिला समाजात अवंतिकाबाई गोखले यांचेकडे जाऊन इंग्लिश शिकली. त्याचप्रमाणे मुलांचे कपडे शिवणं, एम्ब्रॉयडरी करणं यातही तिचा बराच वेळ जात असे. घराची भाडेवसूली, हिशेब ठेवणं हे काम तिचंच. दवाखान्यात कंपौंडर गैरहजर असला तर पुड्या बांधायला सुद्धा ती जायची. लोकमान्य टिळकांच्या पुतळ्याचे दर्शन १ ऑगस्टला घेण्यासाठी पहाटे धडपडत जायची तर बिर्ला हाऊसमध्ये होणाऱ्या गांधीजींच्या प्रार्थनेसही ती उपस्थित रहायची.

आमचे रिझल्ट चांगले लागले किंवा कुणाचा वाढदिवस असला तर बापू आम्हाला सर्वांनाच घेऊन सिनेमा, नाटक, बाहेर जेवण, निदान चौपाटीवर भेळ खाण्याचा तरी कार्यक्रम करीत असत. त्यावेळी ती ६ वारी साडीसुद्धा नेसत असे.

चातुर्मासात व्रतं फार, कांदा, लसूण चातुर्मासात खायचा नाही म्हणून मुद्दाम बापू तिला घेऊन बाहेर जात असत.

शांताक्काने १–२ नाटकात छोटीशी कामे केली तर फॅन्सी ड्रेसमध्ये सुद्धा भाग घेतला. आर्य महिला समाजात बॅडमिंटन खेळण्यासाठी ती जात असे.

बाळ व विजया परदेशात गेली तेव्हा ११ महिने आश्विनीला सांभाळण्याची जबाबदारी सुद्धा तिने हसतमुखाने स्वीकारली.

सेवाव्रत तर आयुष्यभर सुरू होतेच. बापूंच्या आजारीपणात तिने केलेल्या

सेवेला मोल नाही. इतकच नव्हे तर माझे वडील, भाऊ, यांच्या आजारीपणात त्यांची सेवा करता करता अक्षरशः चंदनासारखी ती झिजली. शिवाय इतर बरेच नातेवाईक आजारी पडून डॉक्टरचे घर म्हणून आमचा घरी येत असत.

जुलै १९३५ मध्ये मुंबई मराठी साहित्य संघाची १ ली सभा आमच्या घरी झाली. त्यावेळेपासून २५ ऑगस्ट १९५५ पर्यंत साहित्य संघाचे कार्यवाह म्हणून बापूंनी संघाला वाहून घेतले. माझी बहीण शांताक्का त्यांची सावली म्हणून आयुष्यभर राहिली. कधीही प्रसिद्धीची आवड धरली नाही, की कोणत्याही कामात चालढकल केली नाही.

१९४२ साली नाशिकचे साहित्य संमेलन संपवून आम्ही परत आलो तर बापूंना पकडलं होतं व महारबावडी पोलीस स्टेशनमध्ये कोठडीत त्यांना ठेवलं. घराला सील लावलं होतं. आमचा कंपौंडर "चले जाव" चळवळीचा कार्यकर्ता होता व घरीच रहात असे. ह्यांच्या घरात आक्षेपाई काहीतरी असणार म्हणून बापूनाही अटक केली. दवाखान्यासाठी ते लौकर आले व महारबावडी पोलीस स्टेशनवर जाऊन बसले. दिवाळीची रोषणाई सर्व घरात होती, आमच्या घरात मात्र अंधकार. आम्ही चौघं डॉ. साठे यांच्या घरी राहिलो. माझे सासरे आप्पा, श्री. म. वर्दे, दत्तो आप्पाजी तुळजापूरकर श्रीमती सीताबाई अण्णेगिरी, यांचे मदतीने शांताक्का महारबावडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ अधिकारी रावसाहेब डेरे यांना भेटली व बापूंची सुटका झाली. पाडवा थाटात करायचा बेत केला तर मला अपेंडिसायटीसचा अटॅक आला आणि माझीच सेवा शांताक्काला करावी लागली. डेरे कुटुंब व भालेराव यांचा स्नेह मात्र कायम राहिला या घटनेमुळे.

एकदा बापू खूप आजारी होते. डॉ० बाडांनी थोडीशी शँपेन देण्याचा सल्ला दिला. "मी दारूला स्पर्श करणार नाही" ही बापूंची प्रतिज्ञा. डॉक्टर व पति यांच्या कैचीत सांपडलेली शांताक्काची केविलवाणी मूर्ति अजून नजरेसमोरून हलत नाही.

१४ एप्रिल १९४४ रोजी साहित्य संघातर्फे नाट्य महोत्सवाची सुरवात होणार होती. रंगभूमीवरील तयारी, लाईटस्, खुर्च्या मांडणे इत्यादी कामे धुमधडाक्याने सुरू होती. ४–४॥ ची वेळ. आचार्य प्र. के. अत्रे, के. नारायण काळे आमच्या घरी जेवायला बसले होते. एवढ्यात हाहाःकार उडाला. आचार्य

अत्रे जेवता जेवता पाटावरून घसरले. तेवढ्यात त्यांनी विनोद पण केला, "माझ्या देहाची ही अवस्था तर इतरांची काय कथा." काय झालं, काय झालं करीत सर्वजण चौकशी करू लागले तेव्हा स्फोटाची बातमी आली. मुंबईच्या गोदीत प्रचंड व प्रलयकारी स्फोट झाला होता. सारी मुंबई हादरली होती. अशा परिस्थितीत नाट्य महोत्सव सुरू करायचा किंवा नाही याबद्दल साहित्य संघाच्या अधिकारी वर्गाबरोबर चर्चा, फोन सुरू झाले. गृहमंत्रीणबाईंनी निर्णय दिला अशा गंभीर परिस्थितीत उत्सव सुरू करू नये व तो सर्वांना मान्य करावा लागला. चर्चा बंद झाली. दुसरे दिवशी नाट्य महोत्सव सुरू झाला. काहीतरी प्रचंड, भव्य, थक्क करून सोडणारे अनुभवाला येत होते. बापू संघटक म्हणून वावरत होते व शांताक्का पडद्या मागची सर्व सूत्रे हलवीत होती.

आमचं घर म्हणजे साहित्यिक आणि नाट्यप्रेमी लोकांची कर्मभूमी होती. निरनिराळ्या नाटकांच्या तालमी चालत. गणपतराव बोडस सहकुटुंब २–३ महिने येऊन राहत. सर्वांची चहाची, जेवायची व्यवस्था शांताक्का पहात असे. ऐनवेळी काम करण्यास कुणी कमी पडलं तर दासीची वगैरे भूमिका करण्यासाठी मालती, (आमोणकरांच्या मुली) सुधा, लल्या एक दिवसाची तालीम घेऊन स्टेजवर उभ्या रहात. त्यांच्या कपड्याची, दागिन्यांची व्यवस्था करायची, वेळेवर तालमीला पाठवायचं ही कामे तिचीच. एकदा झुंज, लेखक-अनंत काणेकर, नाटकाचा प्रवेश संपवून कुंदा व तिच्याबरोबर काम करणाऱ्या मुली हसत हसत विंगमध्ये आल्या. बेशिस्त वर्तन केल्याबद्दल कुंदाच्या थोबाडीत बसली. कुणाचेही चुकलं तरी त्याचा प्रसाद घरच्या मुलांवर आधी होत असे. आम्हा चौघांना कठोरपणे व शिस्तीत वागवलं, याचा फायदा पुढील आयुष्यात चांगला झाला.

दिल्लीला साहित्य संघाने सादर केलेल्या भाऊबंदकी नाटकास पहिले बक्षीस मिळाले. सारे प्रेक्षक नाटक पाहून खूष झाले होते. नानासाहेब फाटक राघोबादादाची भूमिका करीत व दुर्गाबाई खोटे आनंदीबाई. आमच्या घरातील शाल्र, शेले, पैठण्या व दागिने सांभाळण्याची जबाबदारी शांताक्कावर असे. दुर्गाबाई नाटकामध्ये सर्व खरे दागिने वापरीत. एकदा धांदलीमध्ये शांताक्काची नथ त्यांनी कुठेतरी ठेवली व ती गहाळ झाली. इकडे नाटक सुरू तर विंगमध्ये नथ शोधण्याची धडपड. आपले सौभाग्य हरवले या जाणिवेने शांताक्काचा जीव

कासावीस झाला. जीवाची घालमेल झाली. नाटकाचा तोल जाऊ नये म्हणून चेहरा शांत. नंतर नथही सापडली. नाटक संपेपर्यंत या गोष्टीचा पत्ता खुद्द बापूंनाही नव्हता.

गिरगावातील फडके मंदिराचे बापू मुख्य विश्वस्त होते. गणेश जन्मोत्सवाच्या वेळी खूप मोठी जेवणावळ होत असे. शांताक्का स्वतः वाढायला उभी रहात असे. नाट्योत्सव जवळ आला की बॅचेस वगैरे करवून घ्यायची जबाबदारी तिचीच असायची.

१९५५ साली बापू वारले त्यावेळी मुलांची शिक्षणं पुरी व्हायची होती. काही ना काही निमित्ताने आम्ही दोघं जास्त वेळा भालेरावांच्या घरी जाऊ लागलो. अरविंद व शांताक्का यांच्या गप्पा खूपच चालत. २-३ तास बसलो, जेवलो तरी तिचं समाधान होत नसे. जातो, जातो करीत जिन्यापाशी अर्धा अर्धा तास गप्पा होत. त्यात साहित्य संघातील घडामोडीपासून भारतातील राजकारणापर्यंत सर्व विषय येत. पुढे काय हा प्रश्न होताच. नाट्यवेड्या पतिबरोबर संसार करता करता सगळ्या घराचेच नाटक झालं होतं. आर्थिक तणाव वाढला होता. एक दिवस सर्जन फडके सांगत आले की बाळ सर्जरीमध्ये Gold Medal मिळून M. B. B. S. झाला, त्यावेळी तिच्या डोळ्यांतून आलेले आनंदाश्रू.

११ फेब्रु. १९६९ रोजी मुंबईत दंगा सुरू होता. सर्व ठिकाणी संचारबंदी होती आणि दुपारीच शांताक्काची प्राणज्योत मालवली. दुकाने बंद असल्यामुळे हारसुद्धा मिळाला नाही. K. E. M. हॉस्पीटलमधल्या बागेतील ४ फुले तोडून हार केला. बाळने स्वतःच्याच गाडीत आईचा मृतदेह ठेवला. डॉ. अजित फडके, बाळ व मी त्या गाडीतून चंदन वाडीत आलो. एवढ्यात संचारबंदी उठणार अशी बातमी आली. ज्या थोड्या फार मंडळींना कळलं ती उपस्थित राहिली. नात्याने माझी वहीण पण खऱ्या अर्थाने आई व पडद्यामागील चैतन्यमूर्ति पडद्यामागे विलीन झाली.

**मृणालिनी गजेन्द्रगडकर**

## साहित्य संघाचा वटवृक्ष

बाळपणीचा काळ सुखाचा म्हणतात तेच खरं—

लहानपणची आठवण म्हणजे वडलांचा सहवास असा आम्हाला जास्त

मिळायचाच नाही. मी अगदी लहान होते. आमच्या घरीच सर्व साहित्य संघाच्या नाटकांच्या तालमी सुरू असत. साहित्य विषयक चर्चाही आमच्या हॉलमध्येच रंगत. तेव्हा संघाला स्वतःची अशी जागा नव्हती. त्यामुळे बाहेरच्या हॉलमध्ये गणपतराव बोडस, मधल्या खोलीत आळतेकरांची मंडळी व शेवटच्या खोलीत संगीत. ह्या सर्व प्रकारामुळे आम्ही मुलं इकडून तिकडे सांगकाम्यासारखी जात येत असू. स्वैपाकघरात एका बाजूला कोपऱ्यात कुठेतरी अभ्यासाला जागा मिळायची.

माझं अत्यंत आवडीचं काम म्हणजे सकाळची शाळा झाली की घरी आल्यावर काकांना, म्हणजे गणपतराव बोडसांना विडा कुटून द्यायचा. त्यावेळी तालमी चाललेल्या असायच्या. त्या ऐकतांना वेळ कसा जायचा ते समजायचंच नाही. खूप काही ऐकायला मिळायचं पण आम्हांला जास्त वेळ थांबायची परवानगी नसायची. अभ्यास आधी मग सर्व काही. व्यवसाय म्हणून नाटकात काम करायला तर कधीच परवानगी नसायची. हौस म्हणून एखादं दुसरं छोटं काम करायला मिळायचं. घरातील नाटकी वातावरणाचा आम्हा मुलांवर अनिष्ट परिणाम झाला नाही.

नाटकांसाठी बाहेरगावी जाताना आम्हीही बरोबर जात असू. त्यावेळी प्रवासात प्रत्येक स्टेशनवर खूप खायला प्यायला चांगलं मिळायचं. त्यात सर्वांचा सहभाग असायचा. बापूंनी संघ असा वेगळा कधी मानलाच नाही. एकत्र कुटुंबाचाच तो एक पसारा असायचा. म्हणून संघ हा आम्हाला कधी वेगळा-परका वाटला नाही. त्यांची मंडळी ती आमचीच मंडळी.

बापूंच्या सहकाऱ्यांनीही त्यांना उत्तम साथ दिली. वडिलकीचा मान दिला. सर्व धुरा वाहून न्यायची कामगिरी एकटा करू शकत नाही. त्यांचे हात बळकट केले त्यांच्या सहकाऱ्यांनी, मुलांनी, बापूराव, अंधृटकर, दाजी, वर्तक, शिवा, पांगे, तात्या. इतर अनेक प्रसंगी सर्वांचेच ते कान पकडत-रागावत. त्या मागची माया सर्वांना माहित असायची. महाबळेश्वरच्या बंगल्यात सर्वांसह वास्तव्य आम्ही करत असायचो, व्हऱ्यांड्यातून समोर बघितलं तर ध्रुव तारा दिसायचा. वा० दा० गोखले तर म्हणायचे नाव ध्रुवदर्शन ठेवा. कुणाला स्ट्रॉबेरीवर क्रीम व मध आवडायचा, कुणाला कणसाची उसळ. सर्वांचे लाड पुरवले जायचे-त्यांच्या बायकाही आपली गाऱ्हाणी माझ्या आईजवळ सांगायच्या.

सर्व पसाऱ्यामुळे त्यांच्या सहकाऱ्यांच्या बायकांचीही नवऱ्याबद्दल तक्रार असायची. म्हणावं तसं संसाराकडे लक्ष नसायचं. आई मायेनं सर्वांना समजावीत असायची अग सुशीला–अग वत्सला, माईसाहेब–सर्वांची समजूत घालणं आईचच काम असे. सासू व आई ह्या दोन्ही भूमिका तिच्याकडे असायच्या. त्यांच्या मुलांना माझी आई हक्काची आजी वाटायची. अरूण, तुषार हक्कानं आपले हट्ट पुरवून घ्यायचे—तो एक वटवृक्ष होता.

ह्या सर्वांमागे एक सूत्रधार होता. म्हणून बापू हे फक्त आमचेच नव्हते तर कित्येकांचे आश्रयदाते, वडील, मार्गदर्शक व प्रेरणा देणारे होते—म्हणून त्यांचं व्यक्तित्व हे सर्व समावेषक—युगाची सुरूवात करणारं होतं. त्यांनी स्वप्नं रंगवली, जन्माला घातली. त्या वेलाला बहर आलेला पाहाणं त्यांच्या नशिबात नव्हतं. वटवृक्षाखाली आसरा घेणाऱ्यांनी त्यांची स्वप्नं आता पुरी करत आणली आहेत. नवीन विचारसरणीमुळे काही गोष्टी मागे पडल्या असल्या तरी पेटवलेला स्फुल्लिंग विझवण्यासारखा नाही.

त्यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्वाचा वारसा आम्हा तिघांनाही मिळालेला आहे. भाऊ तर एक कर्तबगार डॉक्टर व साहित्य संघाचा उत्साही कार्यकर्ता आहे. मोठ्या वहिणीचा विषय होता तत्त्वज्ञान. जुन्या भागवत पुराणांचा तिचा अभ्यास आहे. नवीन विचारसरणीला अनुसरून त्याकडे बघायचा व त्यातून आध्यात्माची शिकवण देण्याचा तिचा प्रयत्न असतो.

मलाही संधी मिळेल त्याप्रमाणे समाजकार्य करायला आवडतं. मनाची उमेद, कुठल्याही परिस्थितीला तोंड देण्याची हिंमत व मनमिळाऊपणा आम्हा सर्वांच्यात आहेच. त्यांच्या मागे आम्ही कधीच पोरके झालो नाही. त्यांनी इतकी सर्वांना मदत केली होती की माझे यजमान थट्टेने म्हणायचे मी कुणा–कुणाचा जावई आहे? मामा पेंडश्यांपासून, दुर्गाबाई पासून सर्वांना बाळ हा आपलाच मुलगा वाटला आहे. कुणाला बरं नसले की सर्व हक्कानं बाळकडे औषध विचारायला येतात. ही आपुलकी, ही माया हाच आमचा मोठा ठेवा आहे.

**सौ० कुंदा (भालेराव) पडळकर**

## त्यांचे डोळे मला अजूनही आठवताहेत

साहित्य संघाशी माझा संबंध १९५२–५३ साली दाजी भाटवडेकरांच्यामुळे प्रथम आला. अलकाझी, मर्झबान, 'रंगायन', व्यावसायिक रंगभूमी असे टप्पे

बाहेर चालू असतानाही १९७६ सालपर्यंत तो संबंध कायम राहिला. मराठी रंगभूमीशी माझं नातं जोडण्यात आणि ते दृढ करण्यात 'साहित्य संघ' आणि त्यात भेटलेली मंडळी यांचा सहभाग फार मोठा आहे. किंबहुना माझा आजवरचा नाट्यप्रवास 'साहित्य संघां'तून मिळालेल्या संस्कारामुळेच शक्य झाला.

आठवणी अनेक आणि तीस वर्षे मागे वळून पहात असल्याने हृद्य वाटणाऱ्या—रंगमंच तेवढा बांधलेला, बाकी प्रेक्षागृह उघड्यावर, प्रयोगापूर्वी रोज लावल्या जाणाऱ्या खुर्च्या प्रयोग संपताच त्याच्या चवडी रचून त्यावर किंतान टाकून झाकून ठेवलेल्या रंगमंचावर उभं रहाताच समोर दिसणारे झुलते नारळाचे माड, माडाच्या शेजारी मागच्या बाजुला मिळणारे दिवाडकरांचे बटाटेवडे.

—पु. ल. देशपांड्याचं नाटक, 'तुझे आहे तुजपाशी'चं असामान्य यश. तिकिटांसाठी रांग लागलेली, "प्रत्येकी फक्त पाचच तिकिटे मिळू शकतील" असा झळकणारा फलक.

—'झुंझारराव', 'संशयकल्लोळ', 'दुर्गा', 'सवाई माधवरावांचा मृत्यू'—यात सर्व जुन्याजाणत्या मातब्बर नटमंडळीबरोबर भूमिका करताना माझी उडालेली तारांबळ. आणि वडीलधाऱ्यांनी लहान मुलीला सांभाळावं तशी नानासाहेब फाटक, के. नारायण काळे, मामा पेंडसे, केशवराव दाते—यांनी माझी केलेली जपणूक.

—दुर्गाबाई खोटे, गणपतराव बोडस, दत्ताराम यांच्या भूमिका, 'सौभद्र', 'मानापमान', 'शारदा', 'वैजयंती' असे दृष्ट लागावी इतके सुंदर नाट्यप्रयोग.

—आणि त्याच्याच जोडीला 'तमाशा' (थोडासा सुविहित स्वरूपात) वा लोकनाट्याचे फड. ललिता आमोणकर (केंकरे) आणि मी तमाशात वापरतात तशा बोलीभाषेत एकमेकीशी बोलायचो आणि रागं भरून घ्यायचो—डॉ. अ. ना. भालेरावांच्याकडून.

डॉ. भालेराव हे संघाचे कुटुंबप्रमुख. आम्ही सारी कुटुंबीय मंडळी. आयुष्यात काही व्यक्ती भेटतात आणि तुमच्या नकळत तुम्हाला अनुभवाची नवी कवाडं उघडून देतात. आपलं खूप कौतुक करणारा आणि आपण इतर कुटुंबियांशी कसं वागतोय यावर करडी नजर ठेवणारा एक आधार एवढच वयाच्या अठराव्या वर्षी कदाचित जाणवलं असेल. पण आज ३० वर्षानंतर

पटतय की डॉ. भालेरावांनी त्यांच्या कुटुंबात मला निवारा दिला नसता तर हिंदी चित्रपटातील एखादी नटी म्हणून नाही तर, इंग्रजी थिएटरमध्ये अमेरिकन-इंग्रजी भूमिका वठविणारी मराठी मुलगी म्हणून मी वावरत राहिले असते. डॉक्टरांच्या कारकीर्दीनंतरही संघात मी नाटकं करत राहिले. ते माझं घर होतं. 'अजब न्याय'ला जागतिक प्रसिद्धी मिळाली. 'मुद्राराक्षस'नी संस्कृत रंगभूमी-वरची माझी वाटचाल सुरू करून दिली.

—पण 'साहित्य संघ' म्हणजे काय? हे एका निवडक आठवणीत मांडायचं झालं तर माझ्या स्मरणात अति खोलवर कोरला गेलेला एकच प्रसंग मी सांगेन. 'दुर्गा' नाटकाच्या तालमी गणपतराव बोडस घेत होते. डॉक्टर रुग्णशय्येवर होते. रंगीत तालीम सुरू होण्याच्या आधी, 'दुर्गे'चा सर्व मेक-अप, कपडे वगैरे करून डॉक्टरांच्या पाया पडायला मी वहिनींच्या बरोबर गेले (वहिनी म्हणजे डॉक्टरांच्या पत्नी. त्याच मला सजवत असत). डॉक्टरांना उठताही येत नव्हतं. "नीट मन लावून काम कर"—डॉक्टर म्हणाले. त्यावेळचे त्यांचे डोळे मला अजूनही आठवताहेत. त्यात कौतुक होतं, थोडाफार विश्वासही होता. पण याचबरोबर कार्यपूर्तीचं समाधान होतं की अपुरं राहिल्याची असंतुष्टता होती त्यांचा थांगपत्ता लागत नव्हता. खरंच डॉक्टरांचं स्वप्न रंगभूमीवर पुरं होतंय का? की त्याचा आपल्याला विसर पडलाय?

विजया मेहता

## साहित्य संघाबद्दल कृतज्ञता वाटते

मुंबई मराठी साहित्य संघाची स्थापना पन्नास वर्षांपूर्वी झाली तेव्हापासून डॉ. अमृत नारायण भालेराव हे कार्यवाह आणि माझे वडील तात्या आमोणकर हे सहकार्यवाह होते. त्यामुळे माझी रंगभूमीवर काम करण्याची सुरवात साहित्य संघाच्या रंगमंचावर झाली. डॉ. भालेराव आणि तात्या यांचा जवळच्या मैत्रीचा संबंध होता. इतका घरोब्याचा संबंध होता की डॉ. भालेरावांच्या घरच्या प्रत्येक कार्यात आमच्या घरातल्या सर्व मंडळींचा समावेश असे. गणेशचतुर्थी, मंगळागौर, मुंज, लग्न कुठलंही कार्य असो आम्ही घरातल्या मंडळींसारखी सहभागी असू. १९४४ साली मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरिक उत्सवाचे बरेचसे कार्य डॉ. भालेरावांच्या घरी त्यांच्याच घरच्या कार्यासारखे चाले.

त्यावेळीही आम्ही तिथे हजर असायचो. आम्ही त्यावेळी अगदी लहान. रंगभूमी म्हणजे काय याची सुतराम कल्पना नव्हती. त्यामुळे मला साहित्य संघाचा उत्सव म्हणजे डॉक्टरांच्या घरच्या कार्यासारखेच वाटे आणि हळुहळू साहित्य संघ हा आपल्या घरच्या सारखाच मी मानू लागले. त्यामुळे इतर नटनट्यांना अभिप्रेत असलेल्या मानापमानाच्या कल्पना मी मानीत नसे.

नाट्यमन्वंतरच्या काळात जरी स्त्रियांनी नाटकात कामं करायला सुरवात केली असली तरी ज्याकाळात आम्ही नाटकात कामे करायला सुरवात केली त्याकाळातही नटनट्यांना समाजात मानाने वागवीत नसत. बऱ्याचशा तथाकथित प्रतिष्ठित घराण्यातील माणसानी कलेला तसं आपलं मानलं नव्हतं. इतकच काय पण माझ्या आईच्या माहेरी तशी परिस्थिती होती. माझ्या आईच्या माहेरी कलेची आवड होती. माझ्या मामाना नाटक, संगीत पहायला, ऐकायला आवडत असे. परंतु ते दुसऱ्या कलावंताचे. आपल्या घरातल्या कुणी गाणे, नाटकात कामे करणे हे त्यांना आवडत नसे. आमच्या आईला आणि तात्यांना तशी कलेची आवड होती म्हणून त्यानी मला आणि सुधाला नृत्याचं शिक्षण दिलं वेळप्रसंगी साहित्य संघाच्या नाटकातून कामे करायची परवानगी देत असत. हे माझ्या मामाना आवडत नसे. कधी कधी ते विरोध करून माझ्या आईला रागावत असत. ते म्हणत असत की, "बघ प्रेमा, तुझ्या मुली एखाद्या तबलजीचा, तंबोरेवाल्याचा हात धरुन पळून गेल्या की मग कळेल." मग आई घाबरायची आणि मला नाटकात काम करायची बंदी करायची आणि तात्या तिचा तसा निरोप प्रामाणिकपणे संघात पोहचवीत असत. त्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हतं. परंतु तात्याच हा प्रश्न सोडवित असत. डॉक्टर किंवा चं. वि. बावडेकर असं कोणाला तरी आईची समजूत घालायला पाठवित असत. मग आई पुन्हा परवानगी देत असे. असे प्रसंग इतक्या वेळा आले की माझ्या आईची समजूत घालणे हा त्यावेळी संघामध्ये मोठा विनोदाचा विषय होता. अशी आमच्या घरची परिस्थिती असल्यामुळे नाटकासंबंधी साधी बोलणी सुद्धा वर्ज्य होती. आम्ही काय करायचं ते वडीलमाणसांनी ठरवायचं. रंगभूमीसंबंधी एखादा प्रश्न विचारणंही मुष्कील असे. एकदा मी साहित्य संघाने सादर केलेल्या विजय तेंडुलकर लिखित 'सरी ग सरी' या नाटकात लावणी गायले आणि नाचले. माझा मामा नाटक पहायला आला होता. माझे लावणीचे नृत्य

सुरु झाल्यावरोबर भरलेल्या प्रेक्षगृहातून "ही तमासगीरीण झाली का?" म्हणून गडबड उडवून जोरजोरात निघून गेला. आणि दुसऱ्या दिवशी माझ्या आईची आणि तात्यांची खरडपट्टी काढून माझे त्या नाटकातले काम बंद केले. (खरे म्हणजे ते मला आवडलेले काम होते) यामुळे अजूनही मी रंगमंचावर आहे याचे मला आश्चर्य वाटते. अर्थात त्यानंतर काळ हळुहळू बदलत गेला आणि आज रंगभूमीवरील कलावंताना समाजात मान मिळू लागला. स्वतःच्या घरात एखादा असा कलावंत असला तर घरातील मंडळी त्याचा अभिमानाने आवर्जून उल्लेख करतात.

प्रतिकूल परिस्थितीपासून अनुकूल परिस्थितीपर्यंत इतकी वर्षे मी संघात काम करते. संघाच्या गेल्या पन्नास वर्षांच्या कारकीर्दीतील डॉ. भालेरावांच्या वेळचा काळ मला अधिक आवडतो. त्यावेळेच्या अंधुक आणि स्पष्ट आठवणीनी मन अजून मोहरून येतं. अजूनही मी डॉक्टरांच्या घरी नारायण सदन मध्ये गेले कीं, जुन्या आठवणी मनाच्या वरच्या स्तरावर साचून येतात. त्याचं कारण त्यावेळच्या त्यांच्या घरातील वातावरण आणि त्यावेळचे डॉक्टरांच्या घरातून रंगभूमीचे माझ्या कोवळ्या मनावर झालेले संस्कार. त्यावेळी नाटकात काम करायला आवडे ते केवळ नाटकात नटूनथटून रंगमचावर जायला आवडत असे म्हणून. जरा काही बरं केलं की कौतुक होत असे. या आपल्या कौतुकानं मन भरून येई. हे सर्व मला डॉक्टरांच्या घरी मिळत असे. डॉक्टरांच्या घरी नाट्योत्सवाच्या काळात गेले की छोट्या छोट्या भूमिका, दासीच्या भूमिका करण्यासाठी कुणीही नाही चल लल्या, कुठं ती नाही चल लल्या असे चाले. अशी सुरवातीपासून दासीच्याच भूमिका, कोणी कामाला नसलेल्या भूमिका अशा मिळत असत. अर्थात मला हे काम ते काम याचे काही वाटत नसे. आपल्याला रंगून नटूनथटून रंगमंचावर जायला मिळते ना बस! त्या कोवळ्या वयात रंगभूमी कशाशी खातात याची जाणच नव्हती. कार्यकारण भाव लावून एखाद्या गोष्टीकडे पहाण्याची दृष्टीच नव्हती. परंतु त्यानंतर एका बाजूने डॉ० भालेरावांच्या घरचे आणि संघाचे संस्कार आणि दुसऱ्या बाजूने वाढत्या वयामुळे व वाढत्या अनुभवामुळे रंगभूमीचे चित्र खास प्रयत्नाशिवाय स्पष्ट होत गेलं, तसं संघातील बदलत्या परिस्थितीचा अंदाज येत गेला. १९४४ पासून दरवर्षी नाट्योत्सव होत असे. नाट्योत्सवाच्या तयारीत आणि प्रत्यक्ष उत्सव यामध्ये दोन तीन

महिन्याचा काळ मोठा उत्साहात जात असे. नाटकाच्या तालमी डॉ० भालेरावांच्या घरी, सरस्वती हायस्कूल (आंबेवाडी, गिरगाव) विल्सन हायस्कूल अशा ठिकाणी चालत असत. या काळात कित्येक दिवस आम्ही डॉक्टरांच्या घरीच राहात असू. इतकंच काय पण कै० गणपतराव बोडस यांच्यासारखे बुजूर्ग नाट्यदिग्दर्शकही डॉक्टरांच्या घरी राहात असत. नाटकात कामे करणाऱ्या मोठमोठ्या नटनट्यांचा राबत डॉक्टरांच्या घरी असे. मला ही सगळी गंमतच वाटे. वेळ इतका आनंदात हसत खेळत जायचा. हे काय चाललंय, कशासाठी चाललंय सुरवातीला काहीच कल्पना नव्हती. कै० गणपतराव बोडस, कै० केशवराव दाते नंतर कै० पार्श्वनाथ आळतेकर यांच्यासारख्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ अशा रंगभूमीच्या तपस्व्यांच्या सान्निध्यात राहण्याची संधी आम्हाला लाभली. त्यांच्या रंगभूमीसंबंधीच्या गप्पा ऐकायला मिळत. त्यांच्या नाटकांच्या तालमी पाहायला मिळत. ते भूमिका कसे बसवीत, कसे करीत ते पाहायला मिळायचं नंतर तर त्यांच्या हाताखाली छोट्या छोट्या भूमिकाही प्रत्यक्ष करायला मिळाल्या. या त्यांच्या संस्कारामुळे हळुहळू हे सगळे काय चालले आहे याचा अंदाज लागत गेला आणि डॉ० भालेरावांच्या दूरदर्शीत्वाचा हिशोब सुटत गेला. शतसांवत्सरिक उत्सवाच्या पूर्वीच्या काळात रंगभूमीची अवस्था बरीच शिथिल झाली होती. व्यावसायिक नाटक मंडळ्या बंद होत चालल्या होत्या. नट पांगले होते. त्याकाळी नटांचं जीवन सर्वस्वी नाटकावर अवलंबून होतं. तेव्हा हे उपजिविकेचे साधन संपुष्टात आल्यामुळे नटांना नाट्यव्यवसाय सोडून उपजिविकेसाठी अन्य क्षेत्रे धुंडाळावी लागली. तरी काही जणांची धडपड चालूच होती. अशा नटांना गोळा करुन काही ठेकेदारांनी अस्ताव्यस्त प्रयोग लावण्याचे काम चालू केले त्यामुळे काही नटांना अर्धी भाकरी तरी मिळायची. या गोष्टीकडे डॉक्टरांचे लक्ष गेले. तसेच १९४१ च्या नाट्य सम्मेलनाच्या वेळी कै. केशवराव दाते यांनी केलेल्या भाषणातून "नटांना उभे राहायला जागा द्या" अशी ऐतिहासिक घोषणा केली. या घोषणेमुळे डॉक्टर झपाटले गेले होते. वरील दोन्ही गोष्टींमुळे डॉ. भालेराव यांनी आपले निष्ठावंत रसिक साहाध्यायी गोळा केले आणि त्यांनी रंगभूमीच्या सद्यपरिस्थितीवर मात करण्याचा जणू काय विडाच उचलला. १९४४ ला मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरिकाच्या निमित्ताने

नाट्योत्सव जंगी प्रमाणावर करण्याचे ठरविले की ज्यामुळे व्यवसायातून बाहेर पडत असलेल्या समर्थ कलावंतांना एकत्रित आणून नाट्यप्रयोग रसिकांसमोर मांडावे. त्यातून नटांना आणि साहित्य संघाला अर्थप्राप्ती व्हावी की ज्यायोगे कै० केशवराव दात्यांच्या घोषणेनुसार नाट्यरसिक पुरस्कृत अशी नटांना उभे राहाण्यासाठी वास्तू उपलब्ध करून द्यावी. मुंबई मराठी साहित्य संघातर्फे ही संकल्पित नाट्यवास्तू उभी करण्यासाठी शतसांवत्सरिक नाट्य महोत्सवासारखे नाट्योत्सव दरवर्षी करावे असा संकल्प डॉक्टरांनी सोडला. जुन्या नाटकांचे पुनरुज्जीवन तसेच नवीन नाटककारांना पाचारण करून नवीन नवीन नाटके लिहून घेणे, नवीन नटांना अनुभव मिळण्यासाठी वाव देणे, बुजूर्ग नाट्य-शिक्षकांचे सहकार्य नवीन नटांना उपलब्ध करून देणे इत्यादी कार्याला साहित्य संघाने सुरुवात केली. केवळ एवढेच करून भागणार नाही हे डॉक्टरांना ठाऊक होते त्यांनी धनिक, प्रतिष्ठित रसिकांनाही आपलेसे केले त्यामुळे एका बाजूने आर्थिक सहाय्याची व्यवस्था होईल आणि दुसऱ्या बाजूने रसिक प्रेक्षक हळुहळू रंगभूमीला पुन्हा सातत्याने लाभेल. ह्या उद्देशाने चाललेल्या या कार्यामध्ये आम्ही गंमत म्हणून सहभागी झालो ते सुद्धा घरच्या माणसांचे काम आहे आपण त्यात असायला हवे या दृष्टीने! डॉ. भालेरावांच्या घरातली माणसे वहिनी, कुंदा, बेबी, ताई, बाळ वगैरे मंडळी अगदी उत्साहाने पडेल त्या कामात सहभागी असत. वहिनी तर भक्तिभावाने डॉक्टरांना त्यांच्या कामात मदत करीत असत. घरी आलेल्या सर्व कलावंतांचं तसच इतर सहाय्यकांचं वहिनी मोठ्या जिव्हाळ्याने स्वागत करीत असत. त्यांना काय हवं, नको पाहणं, खाण्यापिण्याचा आग्रह, तालमींच्या वेळी कलावंतांची देखभाल करणं हे सर्व वहिनी जातीनं आणि प्रेमपूर्वक रितीने करीत असत. वहिनी डॉक्टरांच्या कार्यात इतक्या रस घेऊन काम करीत असत की, त्या प्रयोगाच्या वेळी स्वतः आस्थेनं रंगपट कपडेपटाची व्यवस्था पाहात असत. त्यांना कोणत्याही कामाचा कमीपणा नसे. नट्यांनी सोडून ठेवलेल्या साड्यांच्या त्या स्वतः घड्या घालीत असत. त्यांच्या घड्या घालण्याची पद्धत रंगभूमीवरील प्रत्येक नटीने आणि कपडेपटवाल्यांनी पहायला हवी होती असे वाटते. किंबहुना शिकून घ्यायला हवे होते. साड्या सोडल्यावर त्यांच्या दुमडलेल्या नीऱ्या नीट सरळ करून चुरून मग घड्या घालीत असत. मग घरी नेऊन

गच्चीत वाळत घालून पुन्हा नीट घड्या घालीत, घामाने ओले झालेले दागिने नॅपकीनने नीट पुसून मग कापसात गुंडाळून वेगवेगळ्या पेटीत ठेवत असत. अशा रितीने कपडे, वस्तू हाताळल्याने त्या वस्तूंचं आयुष्य वाढतं ह्याची जाण वहिनींना पुरेपूर होती. साहित्य संघाच्या वस्तू कपडे वहिनी स्वतःच्या वस्तुहूनही अधिक काळजीपूर्वक हाताळीत असत. संघाच्या सामानाबरोबर डॉक्टरांच्या घरचे कपडे, दागिने, चांदीची भांडीही असत. डॉक्टरांनी आणि वहिनींनी कलावंताना खूष ठेवण्यासाठी, रंगभूमीच्या कार्यासाठी अक्षरशः सर्वस्व दिलं हे सांगणं बिलकुल अतिशयोक्तिचं होणार नाही. डॉक्टरांनी कलावंताना, आपल्या सहकाऱ्यांना इतका जिव्हाळा दिला होता की डॉक्टर साधे कुठे बाहेरगावी निघाले की, त्यांचे सहकारी, तात्या, आई, बापूराव, वहिनी, अंधृटकर, वहिनी, सीताबाई अण्णिगेरी इत्यादी मंडळी घोड्याच्या गाडीतून त्यांना स्टेशनवर पोहोचवण्यासाठी यांची वरातच निघे. डॉक्टरांच्या काळातील सहवास, संस्कार, जिव्हाळा या गोष्टींचा आम्हाला घडविण्यात फार मोठा वाट आहे. पूर्वीच्या काळात बिऱ्हाड पद्धतीच्या नाटक मंडळ्या होत्या आणि ही बिऱ्हाडं नाटयशिक्षण संस्थाही होत्या. थोड्याबहुत त्याच पद्धतीनं उत्सवातील नाटकांची निर्मिती होत असे त्यामुळे आमचे नाटय शिक्षण नकळत बिऱ्हाड नाटक मंडळीच्या पद्धतीनेच झालं. त्याचा मला पुढील आयुष्यात खूप उपयोग झाला. यामुळे मला डॉक्टर भालेराव, त्यांचे सहाध्यायी, साहित्य संघ याबद्दल कृतज्ञता वाटते हे या सुवर्ण महोत्सवानिमित्त नमूद करावेसे वाटते. मला खात्री आहे आमच्या बरोबरच्या कलावंतानाही तसेच वाटत असेल.

सौ. ललिता केंकरे

## जुन्या आठवणी

सर्व मोठ्या संस्थांची सुरुवात लहान जागेत व अनंत अडचणींवर मात करून होत असते. मुंबई मराठी साहित्य संघाची आज भव्य वास्तू उभी राहिली असली तरी संस्थेची सुरुवातीची वर्षे गेली गिरगावातील सरस्वती हायस्कूलच्या जागेत. शाळा सुटल्यावर निरनिराळ्या वर्गात प्राज्ञ विशारदचे वर्ग भरत असत. आज प्रथितयश ठरलेले साहित्यिक, पत्रकार, प्राध्यापक मंडळी

यावेळी मोठ्या उमेदीने प्राज्ञ विशारदचे वर्ग घेत असत. त्यांच्यात शिक-विण्याचा उत्साह होता तसाच नोकरी करून मराठीचा विशेष अभ्यास करणारानाही होता. मला आठवतं १९४९–५० चे दिवस. त्यावेळी प्रा० वा० ल० कुलकर्णी, प्रा० रा० भि० जोशी, प्रा० अनंत काणेकर, म० अ० करंदीकर, र० वि० हेरवाडकर, वा० रा० ढवळे, प्रभाकर पाध्ये आदी मंडळी शिकवीत असत, वर्गात १५/२० मुलेच असत. त्यामुळे शिक्षक व विद्यार्थी यात बरीच आपुलकी असे. शिक्षक तन्मयतेने शिकवीत. त्यावेळी संघाचे एक कर्मचारी, श्री० र० य० पेंढारकर होते. ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत.

मला आठवते श्री० ना० पेंडसे यांची 'एल्गार' कादंबरी त्याचवेळी प्रसिद्ध झाली होती. नव्या धर्तीची कादंबरी म्हणून ती गाजत होती. श्री० पेंडसे यांच्या उपस्थितीत आम्ही विद्यार्थ्यांनी त्यावर चर्चाही घडवून आणली होती. त्यावेळचे बरेच विद्यार्थी नंतर प्राध्यापक, साहित्यिक, पत्रकार म्हणून आज चमकत आहेत.

मला एक आगळा प्रसंग आठवतो. मराठी भाषेचे शिवाजी म्हणून ओळखले जाणारे कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची जन्मशताब्दी साजरी होत होती. मराठी साहित्य संमेलनाचे त्यावेळचे अध्यक्ष डॉ० शं० दा० पेंडसे यांच्या अध्यक्षतेखाली सरस्वती हायस्कूलच्या गच्चीवर सभा होती. प्रमुख वक्ते होते 'नवशक्ती' दैनिकाचे त्यावेळचे संपादक श्री० प्रभाकर पाध्ये. श्री० पाध्ये यांनी विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या साहित्यावर खरमरीत टीका करण्यास सुरुवात केली तेव्हा डॉ० पेंडसे यांनी त्यांना अडवले आणि त्यांना सांगितले की आपण विष्णुशास्त्रींची जन्मशताब्दी साजरी करीत आहोत. तेव्हा आपणाला त्यांच्या-बद्दल जर चांगले काही बोलता येत असले तर बोला. त्यांच्यावर टीका करण्यास वर्षाचे बाकीचे दिवस तुम्हाला मोकळे आहेत.

त्यावर श्री० प्रभाकर पाध्ये म्हणाले, आज विष्णुशास्त्री हयात नाहीत ही गोष्ट खरी, परंतु जन्मशताब्दीच्या दिवशी त्यांच्या साहित्याचे मूल्यमापन कर-ताना त्यांच्यावर टीका करण्यास काय हरकत आहे ? जन्मशताब्दीच्या दिवशी चांगलेच बोलले पाहिजे, असे थोडंच आहे. आपण त्यांची जन्मशताब्दि साजरी करतो आहोत तेव्हा ते मोठे होते यात कुणालाच शंका नाही. परंतु अशा प्रसंगीच चार लोक जमतात तेव्हा त्यांच्या साहित्यासंबंधी, स्वभावासंबंधी जर

अनुकूल--प्रतिकूल चर्चा झाली तर बिघडले कोठे? उगाच आपण भाबडे बनण्यात काय अर्थ आहे?

या वादावादीनंतर श्री. पाध्ये यांनी आपले भाषण आवरते घेतले. डॉ० पेंडसे यांनी नंतर आपल्या उत्कृष्ट वक्तृत्वशैलीने विष्णुशास्त्रींची कामगिरी, त्यांनी जागृत केलेला राष्ट्राभिमान, भाषाभिमान यांचे महत्त्व त्या काळची परिस्थिती आदीची माहिती सांगून त्यांच्या थोरपणा विशद केला.

**मनोहर देवधर**

## साहित्य संघाचा मानबिंदू

मुंबई मराठी साहित्य संघ आपला सुवर्ण महोत्सव साजरा करीत आहे ही अभिमानाची गोष्ट आहे. साहित्य संघाचे भरघोस नाट्यकार्य जनतेला परिचित असल्याने संघ केवळ नाट्यकार्यच करतो असा काही लोकांचा समज आहे; पण ही अगदीच छोटी कल्पना आहे. साहित्य संघाचे जे कला मंदिर उभारण्यात आले आहे त्यात नाट्य हा एक मानाचा विभाग आहेच परंतु त्याचबरोबर या कला मंदिरात प्राचार्य अ. बा. गजेंद्रगडकर स्मारक संदर्भ ग्रंथालय व प्रा. न. र. फाटक संशोधन केंद्र हे दोन विभाग समाजप्रबोधनाचे कार्य सातत्याने करीत आहेत:—

### संदर्भ ग्रंथालयाच्या स्थापनेचा इतिहासः

कै. गजेंद्रगडकर यांच्या आकस्मिक नी अकाली निधनाबद्दल दुःख व्यक्त करण्याकरीता दि. १७ नोव्हेंबर १९४७ रोजी बागळे सभागृहात ती शोकसभा घेण्यात आली त्यावेळी त्यांच्या स्मारकाची पक्की योजना तयार करून ती पार पाडण्याची जबाबदारी व अधिकार कार्यकारी मंडळास देण्यात आले व त्यानुसार गजेंद्रगडकर स्मारक निधी उभारून त्या निधीतून त्यांचा एक संगमरवरी अर्धपुतळा उभारण्याची व त्यांच्या नावे संदर्भ ग्रंथालय स्थापन करण्याची योजना साकार झाली.

संदर्भ ग्रंथालय म्हणजे सरस्वतीचे निवासस्थान. लक्ष्मीशी हाड-वैर असल्याने सरस्वती जन्मतःच बेघर. तेव्हा साहित्य संघाची भव्य वास्तू तयार झाल्यावर ग्रंथदान मोहिमेला भरीव स्वरूपात प्रतिसाद मिळाल्यावर व संघाला थोडीशी

आर्थिक सुस्थिती प्राप्त झाल्यावर दि० १ ऑगस्ट १९६८ रोजी या संदर्भ ग्रंथालयाचे प्रा० गोवर्धन पारीख यांच्या शुभहस्ते जाहीर उद्घाटन करण्यात आले व त्या निमित्ताने दि० १ ते ३ ऑगस्ट १९६८ रोजी सुप्रसिद्ध संशोधक श्री० अ० का० प्रियोळकर यांची 'आदर्श ग्रंथालय कसे असावे' या विषयावर तीन व्याख्याने करण्यात आली व हे संदर्भ ग्रंथालय संघाच्या सभासदांसाठी व अभ्यासकासाठी खुले करण्यात आले. श्री० अ० का० प्रियोळकर यांची ही व्याख्याने पुढे संघाने पुस्तकरूपाने प्रसिद्ध केली आहेत.

संघाने केलेल्या ग्रंथदान मोहिमेच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ग्रंथदान मोहिमेतील उल्लेखनीय विशेष म्हणजे प्रा० न० र० फाटक, र० धों० कर्वे, अरविंद गजेंद्रगडकर, शि० बा० शिरगावकर, श्री० र० रा० देसाई इ० नी आपले ग्रंथदान सालंकृत म्हणजे ग्रंथांच्या कपाटासहित करून संघाला अतिशय उपकृत केले आहे. त्याशिवाय म० म० द० वा० पोतदार, डॉ० अ० ना० भालेराव, दि० वि० आमोणकर, चं० वि० बावडेकर, वा० रा० ढवळे, बापूराव नाईक, न्यायमूर्ति भा० ना० गोखले, आप्पासाहेब खाडिलकर, त्र्यं० वि० पर्वते, पु० शि० रेगे,एस० के० मुरंजन, माधवराव बागल, प्रा० मं० वि० राजाध्यक्ष, र० गो० सरदेसाई, यमुनाबाई हेर्लेकर, मु० पु० आजगावकर, पार्श्वनाथ आळतेकर, इ० थोर व्यक्तींनी तसेच अनेक सामान्य व्यक्तींनी ग्रंथदान केले आहे व त्यांचा कृतज्ञतापूर्वक ऋणनिर्देश करणे आवश्यक आहे.

आज संदर्भ विभागात पंधरा हजारांच्यावर ग्रंथ असून मुख्यतः ते संदर्भ स्वरूपाचे आहेत व त्यातील अनेक ग्रंथ दुर्मिळ आहेत मराठी-संस्कृत-हिंदी-इंग्रजी अशा पुस्तकांचा हा संग्रह आहे व पुस्तकांचे वर्गीकरण शास्त्रीय पद्धतीने करण्यात आले आहे याशिवाय चित्रमयजगत, विविध ज्ञान विस्तार, नवयुग, मनोरंजन, ज्योत्स्ना, वीणा, साहित्य, पारिजात, समीक्षक इ० मासिकांचे बांधील अंकही संग्रहित केलेले आहेत. महाराष्ट्रातील व मराठी भाषिकच नव्हेत, तर महाराष्ट्राबाहेरून व अन्य भाषिकांकडूनही साहित्यविषयक व सांस्कृतिक स्वरूपाच्या संदर्भ पृच्छा येत असतात व या सर्व पृच्छकांना उचित अशी उत्तरे दिली जातात.

या संदर्भ ग्रंथालयात महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या मालकीची विविध विषयांवरील इंग्रजी पुस्तके, विशेषतः कलाविषयक ग्रंथसंग्रह

याच ठिकाणी ठेवण्यात आला असून या ग्रंथसंग्रहाची व्यवस्था पहाण्याचे काम साहित्य संघाकडेच सुपूर्द करण्यात आले आहे. हे ग्रंथालय संघ मंदिराच्या चौथ्या मजल्यावर असून अभ्यासकांना तेथे मुक्तद्वार आहे. ग्रंथ ग्रंथालयाच्या बाहेर वाचावयास दिले जात नाहीत.

## प्रा. न. र. फाटक संशोधन केंद्र :

साहित्य संघाचे दीर्घकालपर्यंत अध्यक्ष असलेले प्रा० न० र० फाटक यांचे दि० २१ डिसेंबर १९७९ रोजी मुंबईत निधन झाले. त्यांचे कायम व यथोचित स्मारक करण्याच्या हेतूने संघाने हे संशोधन केंद्र निर्माण केले व त्याला महाराष्ट्र शासनाची मान्यताही मिळाली आहे. या संशोधन केंद्राचे उद्घाटन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे हस्ते १५ ऑगस्ट १९८२ रोजी झाले. मुंबई महानगर पालिकेने या संशोधन केंद्राच्या उभारणीस भरीव स्वरुपाचे अनुदान दिले आहे याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे आवश्यक आहे.

संशोधन केंद्राने पहिल्या दशवार्षिक योजनेसाठी पुढील कार्यक्रम आखला आहे :

१. गेल्या शतकातील मराठी नियतकालिकांतून नाटक आणि रंगभूमी यासंबंधी जे अभ्यासलेख, टीकालेख आले आहेत, यातील निवडक लेखांचे विषयदृष्ट्या संग्रह सिद्ध करणे, त्यास विवेचक प्रस्तावना आणि टीपा यांची जोड देणे व ते प्रकाशित करणे.

२. नाटक आणि रंगभूमी यासबंधीचा संज्ञाकोश सिद्ध करणे.

३. मराठी नाटककारांचा चरित्रकोश तयार करणे.

४. मराठी नाटकांचा वर्णनात्मक कोश तयार करणे.

५. रंगभूमीवरील कलावंतांचा चरित्रकोश तयार करणे.

६. मराठी नाटकांची विविध साहित्यिक रूपे आणि त्यांचे प्रायोगिक प्रकार यांचा चिकित्सक अभ्यास करणे.

७. रंगभूमीविषयक व नाट्यवाङ्मयविषयक अभ्यास निवडक रूपात प्रकाशित करण्यासाठी त्रैमासिक सुरू करणे.

८. मराठी रंगभूमीचा इतिहास (खं. २ व ३) तयार करणे.

९. रंगभूमीशी निगडीत असणाऱ्या ललितकलासंबंधी मूलगामी विचार करणाऱ्या टीपा, लेखादींचे संकलन करणे.

१०. आधुनिक पाश्चात्य नाटककारांच्या महत्त्वाच्या नाट्यकृतींचा आणि त्यांच्या नाट्यविषयक भूमिकांचा परिचय आणि परामर्श करणाऱ्या ग्रंथांचे लेखन करणे.

११. लोकनाट्याचा अत्याधुनिक नाट्य व नाट्यप्रयोग यावर पडलेला प्रभाव शोधून काढणे. भारतीय बालनाटकांची पूर्व पीठिका व त्यांचा विकास हा शोध निबंध लिहिण्याचे काम सौ० वंदना विटणकर, एम्० ए० यांचेकडे सोपविण्यात आले असून त्यांचा हा शोध निबंध लिहून तयार आहे.

तेलगू समाजाचा मुंबई शहराच्या उभारणीत सहभाग या विषयावरील शोध निबंध लिहिण्याचे काम श्री० मनोहर सीताराम केळूसकर यांचेकडे सोपविण्यात आले असून त्यांचा हा शोध निबंधही लिहून तयार आहे.

या केंद्राद्वारे 'मराठी कवितेचा उषःकाल किंवा मराठी शाहीर' या कै० श्री० म० वर्दे यांच्या ग्रंथाचे प्रकाशनही लवकरच होत आहे.

साहित्याच्या क्षेत्रात संशोधन व समीक्षा यांना उत्तेजन देणे हे मुंबई मराठी साहित्य संघाचे व संघाच्या प्रेरणेने स्थापिलेल्या न० र० फाटक संशोधन केंद्राचे एक महत्त्वाचे कार्य आहे.

असा आहे या दोन विभागांचा त्रोटक इतिहास व स्वरूप. समाजाच्या सर्व स्तरातील अभ्यासक या ज्ञान शाखांचा अधिकाधिक फायदा घेतील व ज्या वेळी संशोधन कार्य जोमाने चालू होईल त्याच वेळी या संदर्भ ग्रंथालयाचा खराखुरा उपयोग होऊ शकेल. ती वेळ लवकर उगवो हीच इच्छा.

**गो. रा. परांजपे**

## भिंतीपत्रकांचा उपक्रम

या वर्षाच्या मे महिन्यात एकदा संघाचे श्री० करमरकर यांनी यावर्षी सुवर्णमहोत्सव येत असल्यामुळे एक भिंतीपत्रक सुरू करण्यासंबंधी त्यानी मला सुचविले. दर आठवड्याला नवीन लेख लिहून ते सूचनाफलकावर लावण्याची ही योजना होती. त्याप्रमाणे आतापर्यंत बावीस लेख मी त्यांना लिहून दिले. श्री० करमरकरांचा विशेष म्हणजे त्यानी माझे लेख उत्कृष्ट कागदावर आणि सुवाच्य अक्षरामध्ये निरपेक्षबुद्धीने लिहून ते सादर केले. त्यामध्ये त्यांच्या कलापूर्ण रंगरंगोटीचा भागही आहे. या आमच्या उपक्रमाला नाट्य-परिषदेचे

श्री० घैसास आणि संघाचे प्रमुख कार्यवाह श्री० दाजीसाहेब भाटवडेकर यांचे उत्कृष्ट सहकार्य लाभले. अमराठी वाचकांसाठी मराठी भाषेचे ज्ञानदान करणारे श्री० ढगे यांनीही मला नवनवीन कल्पना दिल्या.

अद्यापपर्यंत ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास या संतत्रयींबद्दल तसेच आचार्य अत्र्यांच्या 'साष्टांग नमस्कार' या नाटकावर, श्री० आप्पासाहेब खाडिलकर यांच्या 'धर्मराज' या पुस्तकावर, सद्‌गुरु वामनराव यांच्या 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार', आणि नवाकाळचे संपादक श्री० नीलकंठराव खाडिलकर यांच्या 'प्रॅक्टिकल सोशलिझम' या इंग्रजी पुस्तकावर परीक्षणे लिहिली. तसेच लोकमान्य टिळक, प्रबोधनकार ठाकरे, योगीराज रामभाऊ सामंत, डॉ० अ० ना० भालेराव, महाराष्ट्र भाषा भूषण श्री० ज० र० आजगावकर यांच्यावर गौरव लेख लिहिले. अक्कलकोट स्वामी महाराज आणि संत गाडगे महाराज यांच्यासंबंधीही स्मृतीवजा लेख लिहिले. गणपती आणि श्रीकृष्ण या दैवतासंबंधीही भक्तिशील वाचकांसाठी वैपुल्याने माहिती दिली. प्रत्येक लेख सचित्र सादर करण्यात आला आहे.

मनोहर कोचरेकर

## मराठी शिकतानाचे माझे अनुभव

१९४८ च्या डिसेंबरमध्ये मी प्रथम मुंबईत आलो तेव्हापासून मराठी या स्थानिक भाषेचं थोडंतरी ज्ञान आपण मिळवावं अशी कल्पना माझ्या मनात घोळत होती पण बरीच वर्षे ती कल्पना फळास आली नाही. त्या काळी मराठी शिकविणारी चांगली पुस्तकं फार कमी होती किंवा मराठी शिकविणाऱ्या संस्था पण फारशा नव्हत्या. परंतु मराठीचे काही शब्द मात्र माझ्या कानावर सारखे पडायचे आणि त्यावेळी त्यांचा अर्थ मात्र मला मुळीच कळत नसे.

सुदैवानं मुंबई मराठी साहित्य संघाचे कै. तात्यासाहेब आमोणकर आणि कै. भाऊसाहेब ढवळे यांच्या संकल्पामुळे चेंबूरमध्ये १९७० च्या ऑगस्ट महिन्यातल्या एका रविवारी अमराठी प्रौढ विद्यार्थ्यांसाठी मराठी वर्गाचा श्रीगणेशा झाला. भर पावसातला तो रविवार मला अजून आठवतो. मुंबई मराठी साहित्य संघ, चेंबूर तामिळ संघम आणि जनरल एज्युकेशन अकॅडमी या संस्थांच्या सहकार्यामुळे हे शक्य झालं. प्रा. राम पटवर्धनांनी 'श्री' काढून

विधिपूर्वक या वर्गाचं उद्घाटन केलं. तेव्हापासून हे वर्ग चेंबूर आणि इतर केंद्रातही सातत्याने चालले आहेत.

मी सुरुवातीपासूनचा विद्यार्थी. प्रा० प्र० ना० परांजपे आमचा भाषा-प्रवेश वर्ग घेत असत. भाषा आणि व्याकरण यांवर त्यांचा भर असायचा. संक्रांतीच्या सणाला ते वर्गात तिळगूळ आणीत व अगदी जिव्हाळ्यानं वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना वाटून सांगत, 'तिळगूळ घ्या आणि गोड बोला.' आमचे परिचय, प्रबोध व प्रवीण हे वर्ग प्रा. तेंडुलकर यांनी घेतले. त्यांची शिकवण काव्यात्मक नि रसाळ होती. ते अनेक कविताही वर्गात वाचून दाखवीत. कै. ढवळे यांच्या कुशल निवडीमुळे सर्व केंद्रांना प्रा. राम पटवर्धन, प्रा. सुधा जोशी, प्रा. वसंत भांडारे, प्रा. सुभाष सोमण, श्री. मल्हार ढगे, प्रा. अरुण कुळकर्णी, प्रा. चौधुले यांच्या सारखे चांगले व कार्यक्षम अध्यापक लाभलेले आहेत.

मराठी शिकताना मला अनेक अडचणींना तोंड द्यावं लागलं. नामांची लिंगं ओळखणं ही आम्हाला कठीण गोष्ट होती. 'ग्रंथ' पुल्लिंगी तर वही स्त्रीलिंगी आणि 'पुस्तक' नपुसकलिंगी. चहा, कॉफी, दूध, खडू, पेंसिल, पेन, बाक खुर्ची, टेबल, ब्लाऊज, पँट, धोतर,—या शब्दातही तीच अडचण. (पुल्लिंग व स्त्रीलिंग हे शब्दही नपुसकलिंगी आहेत.) ठराविक नियम नसल्यामुळे, स्वतःच्या अनुभवावरूनच आपण हा प्रश्न सोडवू शकतो. 'सामान्य रूप' शिकतानाही मी गोंधळून गेलो. चूक हा शब्द घेऊ या. 'चुकीची' माहिती तर बुटातील 'चुकेमुळे' त्रास. 'गुन्ह्याचा' परंतु 'चहाचा', उच्चारातल्या निराळेपणामुळे मी आधी गडबडलो. कच्चा, उच्चार, वाचणे, वाचन, चहा, चमचा, उद्या, विद्या, जहाज, जन्म, झाड, झकास या शब्दातल्या 'च', 'ज', 'झ' चे उच्चार वेगळ्या प्रकारचे असतात. अध्यापकांनी समजावून सांगितल्यामुळे माझ्या खूपशा शंकांचं निरसन झालं.

ऐकणं आणि बोलणं ही भाषा शिकण्याची प्रमुख अंगं आहेत. या बाबतीत मी नशीबवान ठरलो आहे. माझ्या कार्यालयात मला खूप महाराष्ट्रीय मित्र लाभलेले आहेत. सर्वश्री गोरे, काळे (हेही गोरेपान आहेत!) कोरगावकर, ताम्हणे, प्रधान, पाटणकर, रेगे, फातरफोड, शिरोडकर, कोरडे, वागळे— ही माझी खास मित्रमंडळी. हे मित्र मराठी शिकण्याविषयी मला नेहमीच मदत करतात. म्हणजे ऑफिसमध्ये पण आपले मराठी शंका-सत्र सुरू!

श्री० बागळे यांची गोष्ट जरा वेगळ्या स्वरूपाची आहे. कारण त्यांना चांगलं तामिळ येतं म्हणून ते माझ्याशी चक्क तामिळ मध्ये बोलतात पण मी मात्र त्यांच्याशी मराठीतच बोलतो ! हा झाला एक नवीन प्रयोग !

मराठी लिहिताना मला पर्यायसूचक शब्द वाक्प्रचार, म्हणी यांचा वापर करणं आवडतं. मी कधी कधी शब्दांवर कोटी पण करतो. उदाहरणार्थ आमचे गुरुजी प्रा० पटवर्धन, मराठी भाषा सोपी असते हे पटवून दिल्यामुळे अध्यापन-पटू झालेले आहेत तर प्रा० सुधा जोशी अमृत-तुल्य मराठी आम्हाला शिकवितात. म्हणून आमची मराठी सुधारलेली आहे ! प्रा० भांडारे जणू मराठी ज्ञानाचे भांडारच आहेत ! आगगाडीच्या प्रवासाबद्दलच्या 'नको तो प्रवास' या माझ्या निबधातं 'भिकाऱ्याचा ससेमिरा, फेरीवाल्यांचा त्रास, पेपरवाल्यांचा उपद्रव आणि बूट-पॉलिशवाल्यांची कटकट या गोष्टींमुळे प्रवास असह्य झालेला आहे' हे शब्द गी मुद्दाम वा:रले आहेत. मी रविवारच्या महाराष्ट्र टाईम्समधील शब्द साधना कोडे सोडविण्याचाही प्रयत्न करीत असतो. काही वर्षांपूर्वी मी माझ्या मुलींचे शाळेतले मराठी धडेही त्यांच्याकडून करवून घेत होतो.

माझ्या हृदयात कायमचा असा साठवलेला एक अनुभव आहे. तो म्हणजे आपल्या मराठीचे श्रेष्ठ व ज्येष्ठ साहित्यिक आणि ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कै० भाऊसाहेब खांडेकर यांचा मुंबई विद्यापीठाच्या दीक्षान्त सभागृहात २५ च १९७६ ला झालेला सत्कार-समारंभ. त्या समारंभात भाग घेण्याचं महत् भाग्य मला मिळालं होतं. खरोखरीच ते माझ्या आयुष्यातील सोन्याचे क्षण होते. तामिळ लोकांमध्ये भाऊसाहेब खूप लोकप्रिय होते आणि त्यांच्या जवळजवळ सर्व कादंबऱ्यांचा तामिळमध्यें श्री० का० श्री० श्रीनिवासाचार्य यांनी अनुवाद केला आहे. हे मी त्या सभेत मराठीतून सांगितलं. कै० भाऊसाहेब खांडेकर श्रेष्ठ दर्जाचे साहित्यिक होते पण त्यापेक्षा ते एक उदात्त माणूसही होते, हाही मुद्दा मी माझ्या भाषणात मांडला.

मी खांडेकरांच्या काही कादंबऱ्या तामिळमधून वाचल्या आहेत. मराठीतून मी त्यांच्या काही लघुकथाही वाचल्या आहेत. आता मूळ मराठीत त्यांच्या कादंबऱ्या वाचण्याची ओढ निर्माण झाली आहे. याशिवाय, श्री० कृ० कोल्हटकर, पु० ल० देशपांडे, ना० सी० फडके, प्र० के० अत्रे, अनंत काणेकर, ग० दि० माडगूळकर, वि० वा० शिरवाडकर यांच्यासारख्या उच्च

दर्जाच्या साहित्यिकांचं वाङ्मयही वाचायचं मी ठरविलेलं आहे.

गेल्या वर्षी जून महिन्यात भाऊसाहेब ढवळे यांचं दुःखद निधन झालं. ही हानी फक्त मुंबई मराठी साहित्य संघाचीच नव्हे तर मराठी शिकणाऱ्या सर्व अमराठी माणसांची आणि मराठी शिकविणाऱ्या अनेक संस्थांची पण आहे. ढवळेसाहेब गेल्याची बातमी ऐकल्यावर मला मोठा धक्का बसला. भाऊसाहेबांचं निधन झाल्या दिवशी तर चेंबूर तामिळ संघम संबंधित काही लोकांना आपला कुणी नातेवाईक गेल्याइतकं दुःख झाल होतं भाऊसाहेबांच्या हातून मराठी परीक्षेची पारितोषिकं घेताना मला धन्यता वाटत असे. त्यांच्या निधनानिमित्त भरलेल्या शोकसभेत मीही सामील झालो होतो. मुंबई तामिळ संघमचे वृद्ध कार्यकर्ते श्री० कंदस्वामी पण या सभेत आवर्जून उपस्थित होते आणि त्या दिवशी ते अगदी हेलावून गेले होते. श्री० कंदस्वामींना मराठी फारसं येत नाही. परंतु कै० भाऊसाहेबांचा आणि श्री० कंदस्वामींचा संबंध दोघा भावां-प्रमाणे होता. अखेरपर्यंत भाऊसाहेब माणसे जोडीत राहिले. मराठीवर्गांचं संगोपन आता श्री० मल्हार ढगे करीत आहेत. आम्हाला मराठी शिकविणाऱ्या मुंबई मराठी साहित्य संघाचा सुवर्ण महोत्सव हा एक फार महत्त्वाचा सोहळा. या महोत्सवात मला सहभागी होता आलं हे माझं भाग्यच म्हटलं पाहिजे.

**सुंदररामन राममूर्ती**

## "मंतरलेले दिवस!"

त्या दिवशी माझ्या गायनाच्या मैफीलीला, नटवर्य गणपतराव बोडस उपस्थित होते. माझे गाणे ते लक्षपूर्वक ऐकत होते आणि वाढत्या खुषीने प्रभावीत होत होते. गाणे संपल्यावर त्यानी मला विचारले, नाटकात काम करणार? मैफीली गाजवणारा नामवंत गायक व्हायचं, ही माझी महत्त्वाकांक्षा होती. गणपतरावांचा आग्रह, त्यानी सांगितलेली रंगभूमीची वस्तुस्थिती लक्षात घेऊन, मी नाटकात काम करण्यास होकार दिला. हे जेव्हा डॉक्टर भालेराव यांना कळले तेव्हा त्याना अतिशय आनंद झाला.

माझ्या नाटयजीवनाची जडणघडण प्रामुख्याने साहित्य संघाने केली. त्याचे शिल्पकार होते, डॉ० अ० ना० भालेराव! डॉ० भालेरावांचे घर म्हणजे नाटयकलेचे विद्यापीठ! डॉ० भालेरावांच्या घरी एकाच वेळी तीन दालनात,

तीन नाटकांच्या तालमी चालू असत. सौभद्र, भाऊबंदकी आणि विद्याहरण अशी गाजलेली नाटके. गणपतराव बोडस, केशवराव दाते, गोविंदराव टेंबे असे नामवंत, गुणवंत दिग्दर्शक ! या सर्वांकडून आम्हाला खूप शिकायला मिळालं. तालमींच्या धूमधडाक्याने सारं वातावरण कसं भारावलेलं असे. पंचशरे गदवरे न्हाऊन निघायचं ! डॉक्टरांच्या सौजन्यानं उजळून राहायचं ! ते मंतरलेले दिवस माझ्या आयुष्यातील सुखमय आठवणींनी समृद्ध बनले आहेत. साहित्य संघ नाट्यशाखेच्या, सौभद्र नाटकात कृष्ण होऊन, मी रंगभूमीवर गाजलो. त्या पहिल्या नाटकातील भूमिकेनंतर, प्रेमशोधन, कुंजविहारी स्वयंवर, मानापमान, संशयकल्लोळ अशा साहित्य संघाच्या अनेक नाटकांचा मी गायक नायक होतो.

मरीन लाइन्सवरील भव्य नाट्योत्सव ज्यांनी पाहिला त्यांनाच डॉ. भालेराव यांच्या कर्तृत्वाची कल्पना येईल. रंगभूमीला संजीवन देणारे सदान्कदा रंगभूमीचा विचार करणारे, रंगभूमीसाठी तन, मन, धन वेचणारे डॉक्टर, मी जवळून पाहिले आणि नतमस्तक झालो. दिव्यत्वाच्या प्रचितीने भारावून गेलो.

साहित्य नाट्य सेवेचे प्रतीक म्हणून डॉक्टरांचे साकार झालेले स्वप्न आज संघ मंदिर वास्तूच्या रुपाने दिमाखाने उभे आहे. डॉक्टरांच्या पश्चात् माननीय तात्या आमोणकर, चं० वि० बावडेकर, भार्गवराम पांगे, यांनी साहित्य संघाच्या सेवेचे व्रत घेतले. माननीय वहिनी भालेराव यांचे परिश्रम महत्त्वपूर्ण होते. संघ मंदिराची वास्तू पाहाण्याचे भाग्य वहिनींना लाभले. "इवलेसे रोप लावियले द्वारी, तयाचा वेलू गेला गगनावरी" हे पहायला डॉक्टर भालेराव आमच्यात नाहीत. कलावंतांचे माहेरघर असलेल्या साहित्य संघाबद्दलच्या गतस्मृती जेव्हा जाग्या होतात, तेव्हा ते मंतरलेले दिवस डोळ्यासमोर येतात. त्या सुखद आठवणीत काहीतरी हरवल्याची जाणीव होते, डोळ्याचे कोपरे भरून येतात आणि मन मेहरून म्हणते, "डॉक्टर तुम्हाला शतशः प्रणाम !"

**संगीतभूषण राम मराठे**

## " साहित्य संघात येत जा ! "

फार वर्षापूर्वीची गोष्ट. त्यावेळी साहित्य संघ नाट्यशाखेचे 'होनाजी बाळा' हे नाटक अतिशय गाजले होते. पुणे येथील अलका टॉकीजमध्ये होनाजी

बाळाचा प्रयोग हाउस फुल्ल होता. मी त्यावेळी काही कामानिमित्त पुणे येथे गेलो होतो. होनाजी बाळातील होना–सुरेश हळदणकर यांचा परिचय, मी मोहिनी मासिकात 'हिरव्या चादरीवर' या सदरात लिहिला होता. प्रयोगाच्या दिवशी नाट्यगृहावर माझी व त्यांची भेट झाली आणि त्यांनी मला नाट्यप्रयोग पाहाण्यासाठी थांबून घेतले.

दुसरी घंटा झाली तरी रंगपटातील गर्दी ओसरली नव्हती. कलावंतांचे परिचित् व अितर दाटीवाटीने उभे होते. तिसऱ्या घंटेपूर्वी डॉ. भालेराव यांनी सर्वांना बाहेर जाण्यास सांगितले. या बाहेर जाणाऱ्यात माझा समावेश होता. सुरेश हळदणकर यांनी डॉ. भालेराव यांना विनंती केली आणि मला विंगमधून प्रयोग पहाण्यास परवानगी मिळाली.

मोठ्या उत्साहाने प्रयोग सुरू झाला. प्रयोग चांगला व्हावा म्हणून सर्वांचे प्रामाणिक प्रयत्न चालले होते. नाटकातील एक प्रयोग आरतीने सुरू होतो. शंकर घाणेकरांनी मला खूण केली आणि मी लवथवती विक्राळा आरतीत विंगमधून सूर मिसळला. प्रवेश संपला, त्यावेळी रंगमंचावरील सामान उचलण्यासाठी, मी श्री. पांगे यांना मदत करू लागलो. डॉक्टरांपासून मात्र मी दोन पावले दूर होतो. दुसऱ्या अंकानंतर डॉ० भालेराव यानी मला बोलावले. मी मनात थोडा घाबरलो. इतक्यात डॉक्टरांनी एक चहाचा कप मला दिला.

'नाव काय तुझं ?'

'वैसास !'

'विमलाबाई वैसासांचे कोण ?'

'आडनावबंधू !' 'तुम्हाला नाटकाची आवड आहे का ?'

'हो !'

'मुंबईला गेलात की साहित्य संघात येत जा !'

मी मुंबईत होतो पण नोकरीमुळे संघात येऊ शकत नव्हतो. सुट्टीचे दिवशी एकदा संघात सहजपणे आलो. (खुला रंगमंच) डॉक्टांची पुन्हा भेट झाली. हातातील दोन भजी माझ्या हातावर ठेवीत डॉक्टर म्हणाले, 'काय रे तुझा पत्ता काय ?' मी काहीच बोललो नाही.

काही काळानंतर डॉक्टर गेल्याची बातमी मी वृत्तपत्रात वाचली. केवळ दोनच भेटींचा सहवास पण त्या बातमीने मन बेचैन झाले.

नाट्य परिषदेचे कार्यालय मुंबईत साहित्य संघात आले. योगायोग असा मला नाट्य परिषदेत नोकरी मिळाली. गेली दोन तपे मी साहित्य संघाच्या कार्यात निरपेक्षपणे सहकार्य देत आहे. हे पाहायला डॉक्टर नाहीत पण त्यांचा तो आशीर्वाद मात्र चिरंतन झाला आहे, 'साहित्य संघात येत जा!'

**शि. मो. घैसास**

## डॉ० भालेराव म्हणजे धाडस

डॉ० भालेराव म्हणजे धाडस. धाडसाच्या जोडीला झपाटणारा उत्साह. बिनधास्तपणा, उत्कट प्रेम, महत्त्वाकांक्षा, अशक्याला शक्य करून दाखवण्याची कुवत ह्या सगळ्यांचे मिश्रण म्हणजे डॉ० भालेराव.

आम्ही समोरासमोर राहत होतो. व दोघांनाही खेळाची आवड त्यामुळे हिंदु जिमखान्यावर रोज आम्ही बरोबर जात असू. क्रिकेट, टेनिस हे आमचे आवडते खेळ. एकदा आमच्या टीममध्ये प्रसिद्ध खेळाडू एल० पी० जाय होते. तेव्हा डॉ० भालेराव यांनी बडोद्याला तेथील प्रिन्सच्या टीमबरोबर मॅच घेतली. आम्ही जवळजवळ १६ जण बडोद्याला गेलो. आमच्या टीममध्ये माधव व कांता घुमटकर, डॉ० हिंदळेकर, गजू राव, जगू वागळे असे बरेच जण होते. आम्हाला रहाण्यास राजवाडा वगैरे थाट होता. बॉम्बे क्रिकेटीअर्स हे टीमचे नाव होते. आपल्याला एखादी गोष्ट जमेल का? हा प्रश्न त्याला कधी पडलाच नाही. करायचंच, जमवायचंच हे त्याचे सूत्र होते. जे मोल द्यावं लागेल त्याला त्याची तयारी होती. त्याने स्वर्गातून खेचून आणलेली गंगा म्हणजेच संघ मंदिर ही होय. दुसरी आठवण म्हणजे आम्ही नाशिक १९४२ च्या संमेलनाला गेलो होतो. श्री० अत्रे हे अध्यक्ष होते. संमेलनाहून आम्ही परत आलो ते भालेराव यांच्या घराला सील लावलेले! तेव्हा दोन-तीन दिवस भालेराव यांचा मुक्काम आमचेकडेच होता. चौकशी केली तेव्हा कळले की पोलिसांनी घराची संशया-वरून झडती घेतली त्यात त्यांना कॉंग्रेस बुलेटीनस् सापडली. त्यांचा कंपाउंडर मोकाशी हा बुलेटीन वाटीत असे. एक दिवस भालेराव यांना पोलिस चौकीवर रहावे लागले.

त्यानंतर डॉ० भालेराव यांचे लक्ष नाटकाकडे वळले. त्यामुळे माझी मुलगी सौ० मीना व डॉक्टरांची मुलगी सौ० बेबी–मालती त्यांनी भाऊबंदकी नाटकात

देशस्थ व कोकणस्थ या बायकांची कामे करवून घेतली. मलाही 'अरे बाबा जाहिरात' या नाटकात काम करावयास लावले. गिरगावात नाटकाचे थिएटर नाही असे ते नेहमी म्हणत. ती उणीव त्यांनी स्वतःच्या प्राणाची व वित्ताची पर्वा न करता भरून काढली.

डॉ० भालेराव आता आपणातून गेले. डॉक्टरांची थोरवी ज्यांनी त्यांना पाहिलं, ज्यांना सहवासाचा लाभ मिळाला त्यांना माहित आहे. आता त्यांच्या स्मरणानेच आपल्या मनाचे समाधान करावं लागत आहे.

**डॉ० मो० का० व सौ० मनोरमा साठे**

## संघ नाट्यशाखा? अं हं? कुटुंब नाट्यशाखा!

त्यावेळी साहित्य संघ नाट्यशाखा, 'होनाजी बाळा' या नवीन नाट्यप्रयोगाची वैभवशाली निर्मिती करण्यांत दंग झाली होती. होनाजी बाळाची नायिका मात्र ठरली नव्हती. पन्नासावर नायिकांच्या मुलाखती होऊन गेल्या होत्या. एक इच्छुक उमेदवार म्हणून साहित्य संघात मी मुलाखतीसाठी आले होते. डॉ. भालेरावांनी माझे स्वागत खूप चांगलं केलं. काही प्रश्न विचारले गेले. एक गाणं म्हणायला सांगितलं. भालचंद्र पेंढारकर यांनी पेटीची साथ केली. एकंदर वातावरणावरून माझं वागणं, चालणं, बोलणं, गाणं पटल्यासारखं वाटलं. डॉक्टरांनी विचारलं, नाचता येतं का? मी मान खाली घातली. डॉक्टर समजले. मेहेनत करायची तयारी आहे? मी होय म्हटलं. त्याच वेळी मी होनाजी बाळाची 'गुणवती' झाले.

'होनाजी बाळा' हे डॉक्टरांचं अतिशय आवडतं नाटक! प्रयोगात तीळमात्र उणीव डॉक्टरांना आवडत नसे. एवढेच काय पण तालमीतील कसूर माफ होत नसे. रोज सहा सहा तास नाचून मी नृत्य आत्मसात केलं. दिग्दर्शक बाळासाहेब काळे अभिनयाचे बारीक बारीक बारकावे दाखवीत, ते मी आत्मसात करीत होते. होनाजी बाळाचा पहिला प्रयोग नितांत सुंदर झाला. डॉक्टरांनी माझ्या आईला सांगितलं, "आज मुलीची दृष्ट काढा!"

होनाजी बाळाचे प्रयोग धुमधडाक्याने चालू होते.

साहित्य संघ नाट्यशाखा! एक कौटुंबिक वातावरण! द्वेष नाही, मत्सर नाही, सर्वजण रंगमंच प्रेमानं भारावलेले! मला नऊ वार साडी नेसता येत नाही, हे कळल्यानंतर स्वतः वहिनी भालेराव मला नऊ वार साडी नेसवीत. होनाजी बाळा नाटकातील एका गाण्यापूर्वी मला पहिली सर्व वेषभूषा बदलून, परकर, चोळी, ओढणी, गजरे अशी राधेची वेषभूषा करावी लागे. या वेळी होणाऱ्या धावपळीत, अंधृटकर, सुमन पांगे सुशिलावहिनी नाईक, आमोणकर माझ्या मदतीला येत. साहित्य संघातल्या सर्वजणांचे प्रेमवात्सल्य मला मिळालं.

मोठी संस्था आणि आदरणीय व्यक्तींचा सहवास, यासारखं भाग्य मिळालं, हे माझ्या कुंडलीतील महान योग !

साहित्य संघ नाट्यशाखेचा दौरा संस्मरणीय होत असे. प्रवासात उत्तम व्यवस्था, निवासस्थानावर प्रत्येक कलावंताच्या सुखसोयीकडे लक्ष पुरविले जाई. डॉक्टर हे कटाक्षाने पहात असत. रात्री नाटक संपल्यावर, येणाऱ्या दुपारी, कलावंताना भरपूर झोप मिळावी. रात्री रंगमंचावर त्यानी उत्साही असावं, दिसावं यासाठी सर्व सुखसोयी पाहिल्या जात. एका निवासस्थानी माझ्यासाठी मस्का स्लाइस मिळाला नाही तर डॉक्टरानी चार माणसं गावात पाठवून तशी व्यवस्था केली. मस्का स्लाइस मिळाला नाही तर आमची गुणवती सुकून जाईल, असे डॉक्टर कौतुकानं म्हणत. दौऱ्याच्या ठिकाणची प्रेक्षणीय स्थळं, आम्हाला आपुलकीने दाखविली जात असत. मी गावात फिरायला गेले तर चार विश्वासू सहकारी बरोबर दिले जात. रंगमंच सजावटीबाबत, डॉक्टर फार दक्ष असत. पोपटाला पेरू डाळींब मिळायचंच ! गुणवती दूधानं अंग धुवून आलीस की काय ? या वाक्यावर माझ्यावर येणाऱ्या प्रकाशझोताचा स्पॉट बरोबर लागला की नाही, अश्या गोष्टीतही डॉक्टरांचे पूर्ण लक्ष असे, नाट्यप्रयोगाच्या वेळी सर्वांनी आनंदी असावं. प्रेक्षकांना कलात्मक आनंद द्यावा, ही भावना संघाने रुजविली होती. माझी गुणवती अतिशय रसिकप्रिय झाली. अजून सुद्धा गुणवती म्हणून प्रेक्षक मला ओळखतात. माझे कलागुण कलेच्या कोंदणात बसविण्याचे श्रेय साहित्य संघालाच आहे. ते सुगीचे, मजेचे दिवस वाऱ्याच्या वेगानं निघून गेले.

मन रिकामं असतं, त्यावेळी संघातील सुगंधी आठवणीनं भरून येतं. एक डौलदार स्वप्न साकार होतं. साहित्य संघ, नाटकांच्या तालमी, प्रयोगांचे दौरे, धूपगंधानं दरवळलेल्या त्या स्वररम्य रात्री ! मन आनंदानं न्हावून निघतं. उत्साही बनतं ! थोड्याच वेळात गतकालातील हे स्वप्न विरतं ! वास्तवाला जाग येते. आणि पाऊल नित्य जीवनाकडे वळतं. "तेहि नो दिवसा गतः !" दुसरे काय ?

लीला मेहेता

## आठवणी : साहित्य संघाच्या

लहानपणापासून मला वाचनाचा छंद. वेंगुर्ल्यास माध्यमिक शाळेत असताना मी "लक्ष्मी ग्रंथ संग्रह" स्थापन केला होता. १९३७ मध्ये मॅट्रिक. चर्नीरोडच्या शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयात दाखल झालो आणि भाई जीवनजी लेन मधील मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचा सभासद झालो. साहित्य संघाच्या कार्यक्रमास उपस्थित राहू लागलो. आमच्या गावचे प्रा० वा० दा० गोखले तेव्हा मर्डा हायस्कूलमध्ये संस्कृतचे शिक्षक होते. श्रीपादराव वर्दे, चं. वि. बावडेकर आणि वा. दा. गोखले साहित्य संघाचे "वीणा" हे द्वैमासिक संपादित करीत. श्रीपादराव वर्दे शाहिरी वाङ्मयाचे अभ्यासक होते. "वीणा"

मध्ये लोक वाङ्मयाचा अंतर्भाव असे. १९३८ साली महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अधिवेशन भरायचे होते. प्रतिनिधी म्हणून नाव नोंदवण्यासाठी मी संघाच्या कचेरीत गेलो. तिथे कॅ. मा. कृ. शिंदे आणि आप्पा पेंडसे हे कार्यकर्ते असत. त्यांच्या निवडीतून पार होऊन मी प्रतिनिधी झालो. संमेलन काँग्रेस हाऊस जवळच्या रॉबर्ट मनी हायस्कूलच्या विस्तीर्ण प्रांगणात भरले. अध्यक्ष स्वातंत्र्यवीर सावरकर होते. स्वागताध्यक्ष बॅ. जयकर. संघाचे अध्यक्ष प्रा. गजेन्द्रगडकर. पण ते सरकारी नोकरीत होते म्हणून मामा वरेरकर आणि पु. रा. लेले यांनी टीकासत्र चालवले होते. सरकारात तक्रारीही झाल्या. त्यामुळे प्रा. गजेन्द्रगडकर बाजूला सरले आणि माझे रामायणकर्ते दाजीसाहेब तुळजापूरकर संमेलनाचे तात्पुरते कार्याध्यक्ष झाले. या संमेलनात भारूडे, गण, गौळण-लावण्याचे कार्यक्रम होते. ते प्रथमच तमाशा-विन्मुख श्रोत्यांना पाहता आले. काव्यगायनाच्या कार्यक्रमात एक कवी बेभान होऊन काव्यगायन थांबवण्यास तयार होईनात. काव्यगायन सत्राचे अध्यक्ष प्रबोधनकार ठाकरे. त्यानी दोनदा ताकीद देऊनही जेव्हा हे कवी आवरेनात तेव्हा प्रबोधनकारांनी त्याना उचलून मंचाखाली ठेवले! संमेलनात बाक्रे की सप्रे नावाचे एक प्रतिनिधी प्रत्येक ठरावावर बोलायला उठत. त्यांचे पहिले वाक्य असे "मी जेव्हा त्रिखंड प्रवास करून परतलो..." श्रोत्यानी दोनतीन वेळा सहन केले. नंतर हे वाक्य ऐकताच "होऽऽ" असे आवाज श्रोत्यातून येऊ लागले. पुढे पुढे तर "हरहर महादेवचा" गजर सुरू होई. आवाजाच्या रोखाने मी वळून पाहिले तेव्हा म्होरके आप्पा पेंडसे असल्याचे आढळून आले. मंडप व्यवस्थेत आमोणकर आणि बापूराव कोल्हटकर प्रमुख होते. त्याना धुंडाळण्यासाठी गेलो तर आमोणकर स्वयंसेवकांच्या घोळक्यात आणि बापूराव कोल्हटकर स्वयंसेविकांच्या घोळक्यात सापडायचे हे निश्चित!

१९४० साली रत्नागिरी येथे महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे पंचविसावे अधिवेशन भरले तेव्हा मी प्रतिनिधी म्हणून नोंदणी करण्यासाठी संघाच्या कचेरीत गेलो. कचेरी तेव्हा खटाववाडीतील दर्शनी इमारतीत होती. तिथे डॉक्टर भालेरावांची भेट घेतली. मुंबईचे प्रतिनिधी बोटीने रत्नागिरीला जाणार होते. त्यांच्याबरोबर मला जायचे होते. बोटीची तिकिटे संपलेली होती. डॉक्टर म्हणाले उद्या भाऊच्या धक्क्यावर येऊन भेट. व्यवस्था करतो. मी गेलो. डॉक्टर भेटले. त्यानी मला अनंतराव गद्र्यांच्या स्वाधीन केले. बोटीच्या शिडीपाशी तासभर थांबल्यावर अनंतरावांनी मला बोटीत घुसविले. दुपारी जेवणाच्या थाळ्या (किंमत फक्त सहा आणे) वाटण्याचे काम वा. दा. गोखले यांच्यासह मी करत होतो. जेवणे झाल्यावर हिशेब करता सहा थाळ्यांचे पैसे वसूल झाले नाहीत असे लक्षात आले! हे पैसे वा. दा. नी भरले.

रत्नागिरीला उन्हाळा. प्रतिनिधी उघड्यावर झोपत. प्रभाकर पाध्ये यांच्या डोक्याजवळ फणसाचे झाड होते. एक फणस रात्री पाध्यांच्या डोक्याजवळ पडला. तेव्हा गडबडून सर्व जण आत झोपायला गेले! के. नारायण काळे यांची इथे ओळख झाली. रत्नाकर प्रतिभा या वाङ्मयीन नियतकालिकांचे संपादन आपण कसे केले ही हकीगत त्यांच्याच मुखाने

ऐकायला मिळाली. संमेलनाध्यक्ष प्रा. ना. सी. फडके, कुमारी कमल दीक्षित यांच्यासह मोटरने कोल्हापूरहून निघाले होते. पण रत्नागिरीस पोहचले नव्हते. त्यांच्याच बरोबर निघालेले प्रा. श्री. ना. बनहट्टी येऊन पोहचले. त्यांच्याकडून कळले की अध्यक्ष सह्याद्रीची शोभा पाहण्यास घाटात थांबले. अनेक प्रतिनिधी प्रा. फडक्यांची उत्सुकतेने वाट पाहत होते. ते मामा वरेरकर यांच्याकडे चौकशी करण्यास येत. मीही तिथेच-घोटाळत होतो. प्रतिनिधींच्या प्रश्नांनी कंटाळून मामा शेवटी म्हणाले, "फडके गेले ×××× ×××! मग प्रतिनिधी तिथे फिरकेनासे झाले. या संमेलनात मी मामांच्या सांगण्यावरून वेंगुर्ल्याच्या पार्सेकर मंडळीचा दशावतारी खेळ ठरवला होता. प्रयोग सुरू होण्यापूर्वी मी प्रस्तावना करत होतो. दशावतारी खेळ हे मराठी रंगभूमीचे उगमस्थान आहे वगैरे. तेव्हा प्रेक्षकातून आप्पा पेंडसे ओरडून म्हणाले, "तुमचे वक्तव्य पुरे" आम्हाला दशावतारी खेळ पाहू द्या. आणि मला त्यांनी गप्प केले. याच संमेलनात शांता आपटे यांनी हरी नारायण आपटे यांच्या कादंबऱ्यांवर सुंदर भाषण केले. ते प्रा. फडके यांनी लिहून दिले होते असे काही श्रोते म्हणत होते. एका चर्चेचे अध्यक्ष पु० मं० लाड होते. चर्चेच्या समारोपाच्या भाषणाच्या ओघात त्यांनी एक कविता रचून म्हणून दाखवली. त्यांच्या शीघ्र कविता रचनेने श्रोते स्तिमित झाले.

रत्नागिरी साहित्य संमेलनानंतर साहित्य संघाशी माझा घनिष्ट संबंध आला. १९४१ साली नाट्य संमेलनाचे अधिवेशन मुंबईत भरवण्याची कल्पना रत्नागिरीसच प्रा० बनहट्टी यानी डॉक्टर भालेरावांच्या गळी उतरवली.

नाट्य संमेलनात तमाशाचा प्रयोग सादर करावा अशी मी साहित्य संघाचे कार्यवाह डॉ. भालेराव यांना विनंती केली. नाट्य संमेलनाचे कार्यकारी मंडळ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळात इतर १३ जणांची नियुक्ती करून सिद्ध करावे असे ठरले होते. मामा वरेरकर आणि पु. मं. लाड (त्या वेळी ठाण्याचे जिल्हा न्यायाधीश) यांनी माझ्या विनंतीस पाठिंबा दिला. आणि डॉ. भालेरावांनी माझा संमेलनाच्या कार्यकारी मंडळात समावेश करून करमणूक समितीचे कार्यवाह पदही माझ्यावर सोपविले. हा माझा संघ कार्यकर्त्यात प्रत्यक्ष प्रवेश.

तमाशाचा प्रवेश संमेलनात करायचा तर तो आदर्श व्हावा अशी अपेक्षा. यासाठी तमाशाचा फड ठरवायचा होता. मी राधाबाई बुधगावकरीण यांच्या फडाची शिफारस केली. त्यांचा तमाशा मी वेंगुर्ल्यास पाहिला होता. त्याचे स्वरूप अश्लिलतेकडे झुकणारे होते. राधाबाईचा मुक्काम तेव्हा पुण्यास होता. त्यांचा तमाशा पाहून नक्की करायचे असे डॉक्टरांनी ठरवले. यासाठी डॉ. भालेराव, प्रा. वा. ल. कुळकर्णी, श्री. दि. वि. आमोणकर आणि मी पुण्याच्या इब्राहीम थिएटरवर गेलो. राधाबाई आल्या नव्हत्या. त्या काळी तमाशात गाणाऱ्या स्त्रिया रंगून थिएटरच्या बाहेर बाजूला बसत. राधाबाई तमाशात प्रतिष्ठित त्या त्यात बसत नसत. त्यांचा घरचा पत्ता घेऊन मी जवळच असलेल्या इमारतीत गेलो. राधाबाईंना पाच की सहा अपत्ये. पुढच्या दिवाणखान्यात ती ओळीने

झोपली होती. त्यांना ओलांडून मी आंत गेलो. राधाबाईंचे यजमान जोशी हे थर्ड इयर ट्रेन्ड शाळामास्तर होते. त्या उभयतांसह मी थिएटरवर आलो. राधाबाईंच्या तमाशात नारायण म्हणून नाच्या होता. मोठा हजरजबाबी. तमाशाचा प्रयोग पाहिला. आम्ही तिसऱ्या-चवथ्या ओळीत बसलो होतो. तिथे दौलत जादा करणारे श्रोते बसत. त्यात आम्ही लांबोडे. तमाशास जरा प्रतिष्ठित रुप द्यावे म्हणून मुख्य नाच्याचे काम शाहीर नानिवडेकरांना करायला सांगावे असे ठरले. त्याला नानिवडेकरही कबूल झाले.

प्रत्यक्ष प्रयोगात तमाशाचे वातावरण म्हणून मी दौलतजादाचा कार्यक्रम आखला. त्याला डॉ. भालेरावांची संमतीही मिळवली. त्यासाठी मामा वरेरकर, आप्पा पेंडसे, प्र. के. गुते यांना विनंती केली आणि ते कबूलही झाले. नाट्य संमेलन विल्सन कॉलेजच्या प्रांगणात भव्य मंडपात भरले. आसन व्यवस्था श्री. रा. टिकेकर यांच्याकडे होती. टिकेकर आंतरराष्ट्रीय परिषदात वावरलेले. आसन व्यवस्थेत रांगांना अ. आ. इत्यादी आनुपूर्वी-त्यात ढ आलाच. दुर्दैवाने नाट्यसंमेलनाचे कार्याध्यक्ष श्री. ना. बनहट्टी यांचे आसन याच रांगेत आले.

दौलतजाद्यात मामा वरेरकर पांढऱ्या गुलमिशा लावून आणि डोक्यास कोकणी पद्धतीने रुमाल बांधून आले होते. आप्पा पेंडसे यानी गांव--पाटलाचे सोंग काढले होते. प्रभाकर गुते एक तालिमबाज म्हणून सजले होते. प्रेक्षकात डॉ. पां. वा. काणे, दत्तोपंत पोतदार, वामन मल्हार जोशी, अ. बा. गजेंद्रगडकर, आचार्य अत्रे, श्री. ना. बनहट्टी, के. नारायण काळे, केशवराव दाते, चिंतामणराव कोल्हटकर, डॉ. फडके यांच्यासारखे प्रतिष्ठित, एरवी तमाशाकडे न फिरकणारे श्रोते होते.

या तमाशात "लइ खोल ग आडाचे पाणी लइ खोल" ही लावणी राधाबाई गात होत्या. नाच्या नारायणाने त्याना अडवले आणि म्हणाला, "खोल तर तुम्ही आमच्या आडावर पाणी भरायला का येता?" बाई म्हणाल्या "मग आम्ही पाणी कुठून आणायचे?" नारायण पक्का. तो म्हणाला, "घरात नळ घ्या की!" त्यांतील सूचितार्थ समजून येताच श्रोत्यांत हास्यकल्लोळ झाला!

नाट्य संमेलनात केशवराव दाते आणि चिंतामणराव कोल्हटकर यांनी दोन प्रवेश सादर केले. "कांचनगडची मोहना" या खाडिलकरांच्या नाटकांतील अंक २ प्र. १ ला प्रतापरावाचे "हरामखोर विश्वासघाताने विजयनगरास सुळावर चढवणाऱ्या मात्रागमन्या नरपशो, कोणाला हे ब्रह्मज्ञान शिकवतोस?" हे भाषण सादर केले. त्यानी अशा आवेशाने रंगमंचावर प्रवेश केला की सर्व प्रेक्षक थरारून गेले. राघोजीरावाने "पाद-शहाच्या विरुद्ध बंड करता" हे शब्द उच्चारताच प्रतापरावाचा उद्गार "बंड? कोण कोणाविरुद्ध बंड करतो" यातील "बंड" या शब्दातील अनुस्वारांवर मिंड घेऊन असा आवाज लावला की श्रोत्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले.

चिंतामणरावांनी "राज संन्यास" नाटकाच्या पाचव्या अंकातील पहिल्या प्रवेशाचा काही भाग सादर केला. त्यात येसूबाईचे काम मनूताई फडके यांनी केले. चिटणीस

प्रभाकर गुते. साबाजीचे काम चिंतामणरावांनी केले. मरून पडलेल्या हिरोजीचे काम मला दिले होते. पांढऱ्या मिशा, डोक्यास मुंडासे. कऱ्हरवर नानिवडेकरांचा खड्या आवाजातील पोवाडा चालला होता. सबंध दोन दिवसांच्या अविश्रांत श्रमामुळे मला पडल्या पडल्याच गुंगी आली, आणि गाढ झोप लागली. येसूबाईंना आणि शाहूमहाराजांना चिटणीसांच्यासह निरोप देवून साबाजी (चिंतामणराव) हिरोजीच्या प्रेताकडे वळतो. हिरोजी —मी मेलेलाच (म्हणजे झोपलेला) "संसारांतल्या सफरीतला 'सच्चा' सोबती, दिलाचा दोस्त, जिवाचा जोडीदार" हे साबाजीचे आर्त शब्द माझ्या कानात शिरलेच नाहीत. परंतु साबाजीने हिरोजीच्या प्रेताला (म्हणजे मला) मिठी मारून "हिरोजी, हिरू" असा आक्रोश कानाजवळ करताच मी खडबडून जागा झालो. चिंतामणरावांची आरोळी अशी कान फोडून गेली. काही क्षणापूर्वी मी मृतवत् झोपेत होतो. आप्पा पेंडसे यानी सावधगिरीने पडद्याआडून पाणी ओतले तरी मला जाग आली नव्हती. चिंतामणरावांचे दीर्घ भाषण माझ्या कानात घुमते आहे.

रत्नागिरी साहित्य संमेलनात प्रा. ना. सी. फडके यांनी आपल्या भाषणात वृत्तपत्रे, साप्ताहिके यातील लिखाणावर टीका केली. तिला आचार्य अत्रे यांनी आपल्या घणाघाती शैलीत उत्तर दिले. त्यातून अत्रे-फडके वाद निर्माण झाला. हे दोन श्रेष्ठ लेखक-प्रथितयश साहित्यिक एकमेकावर चिखलफेक करू लागले. त्यांचा हा वाद मिटवण्याच्या प्रयत्नात साहित्य संघाने महत्त्वाची कामगिरी केली. डॉ. भालेराव, प्रा. वामन मल्हारा जोशी, प्रा. वा. दा. गोखले यांनी प्रा. ना. सी. फडके आणि आचार्य अत्रे यांच्याशी यशस्वी बोलणी केली. आणि वाद थांबवण्याच्या खर्ड्यावर उभयताच्या सह्या मिळवल्या.

साहित्य संघाने केळेवाडीतील जागा घेण्यापूर्वी संघाचे कार्यक्रम चिकित्सक समूहाच्या वागळे हॉलमध्ये होत असत. हॉल संपूर्ण भरे. आणि कार्यक्रम रंगत. संघाने बैठकीच्या लावण्यांचा एक कार्यक्रम ठरवला. सगनभाऊंच्या लावण्या गाणाऱ्या पूर्वाश्रमीच्या लीला जयकर यांचा पुण्यात, शुक्रवार पेठेतील डॉ. भालेरावांच्या मालकीच्या चाळीत दिवाणखाना होता. त्यांच्या लावण्या ऐकण्यास डॉ. भालेराव, वा. श्री. पुरोहित, कॉन्ट्रॅक्टर दातार आणि मी सकाळीच गेलो. बाईंच्या तरुण शिष्या कु. भामाबाईही गायल्या. आम्ही लावण्या निवडल्या. मी त्या छोट्याशा प्रस्तावनेसह न्यू भारत प्रेस मध्ये छापून प्रसिद्ध केल्या. (आता मजपाशी त्याची प्रत नाही) कार्यक्रमासाठी लीलाबाई भामाबाईसह मुंबईस आल्या. त्याना घेण्यासाठी मी आणि अंधृटकर बोरीबंदरवर गेलो होतो. बाईंना गंगावने हवी होती म्हणून आम्ही भुलेश्वरला मगनलाल ड्रेसवाल्याकडे गेलो. स्टेशनपासूनच बघ्यांचे डोळे आमच्याकडे लागले होते. तिथे आम्हाला ओळखणारे एक गृहस्थ भेटले. आम्ही वागळे हॉलवर आलो. कार्यक्रमास ९ वाजता सुरुवात झाली एक वाजेपर्यंत छापलेल्या लावण्यांचे गायन झाले. डॉ. भालेरावांनी नारीवर्गास कार्यक्रम संपल्याची सूचना दिली. त्या निघून गेल्यावर लीलाबाईंनी ठेवणीतल्या लावण्या गायला सुरुवात केली. इरसाल लावण्यांचे हे गायन तीन वाजेपर्यंत चालले होते. त्या काळात मी येरवड्याच्या

कारागृहातील सरकारी मुद्रणालयात पर्यवेक्षक होतो. आमचे हेडक्लार्क श्री. जोगळेकर. यांच्यासह मी गावात येऊन दत्तोपंत पोतदारांकडे थांबत असे. आम्ही सायकलवरून बुधवार चौकात आलो तेव्हा एका तरुणीने थांबवले. आणि ती म्हणाली की "काय राव ओळख विसरलात वाटते." ती होती भामाबाई. मी सर्द झालो. जोगळेकरांना काय वाटले असेल माहीत नाही.

१९४३ साली विष्णुदास भावे यांच्या सांगली संस्थानात मराठी रंगभूमीचा शतसांवत्सरिक उत्सव साजरा व्हावा असा प्रस्ताव प्रा. बनटहट्टीनी मुंबई नाट्य संमेलनात मांडला होता. त्यांनुसार साहित्य संघाने पुढाकार घेतला. उत्सवात "शारदा" नाटकाचा प्रयोग करावा. शारदा नाटकाच्या प्रयोगाची सिद्धता करण्यासाठी डॉक्टर भालेराव, वामनराव पुरोहित–डॉक्टरांचे मावसभाऊ आणि मी पुण्यात कुलवंत वाण्याच्या धर्मशाळेत गंधर्व संगीत नाटक मंडळीच्या बिऱ्हाडी कै. नारायणराव राजहंसांना भेटण्यास गेलो. गणपतराव बोडसांशी पूर्वीच संपर्क साधला होता. त्यानी शारदेतील श्रीमंताच्या कामासाठी चिंतोबा गुरव याना विनंती करावी अशी शिफारस केली होती. चिंतुबुवानी नाटक सोडून २७ वर्षे झाली होती. किर्लोस्कर नाटक मंडळीशिवाय अन्यत्र काम करायचे नाही अशी त्यांची प्रतिज्ञा होती. पण नारायणराव (इंदिरा काकू), गणपतराव बोडस (कांचनभट), चिंतामणराव कोल्हटकर (भद्रेश्वर दीक्षित), केशवराव दाते (सुवर्ण शास्त्री), गंगाधरपंत लोंढे (कोदंड) यांच्या आग्रहास बळी पडून चिन्तुबुवानी श्रीमंताची भूमिका करण्याचे कबूल केले. त्यांनी ती उत्तम वठवली. शारदेचे काम मास्टर नरेशने झक्क केले. हळदीकुंकवाच्या प्रवेशात वल्लरीने (आजची मंदाकिनी भडभडे) बहार उडवून दिली.

सांगली येथील शतसांवत्सरिक उत्सवाचे उद्‌घाटन बॅ. जयकर यानी करावे अशी कल्पना होती. त्यांची आम्ही भेट घेतली ती मलबार हिलवरील त्यांच्या बंगल्यात. डॉ. भालेराव, वामनराव पुरोहित यांच्या बरोबर मी होतो. जयकरांनी नकार दिला. नाटक पाहण्याशिवाय रंगभूमीशी आपला संबंध नाही असे ते म्हणाले तेव्हा मी त्यांना आठवण करून दिली की १९२७ साली पुण्यास भरलेल्या नाट्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यावर बॅ. जयकर म्हणाले, "Young man that was my folly never to be repeated." नंतर बॅ. सावरकरांची उद्‌घाटक म्हणून नियुक्ती झाली.

उत्सवाच्या पूर्वतयारीसाठी डॉक्टर भालेराव, वामनराव पुरोहित, प्रा. वा. दा. गोखले, नाशिकचे पलोबा औरंगाबादकर आणि मी एक दोन वेळा सांगलीस गेलो. सांगलीहून परतताना मिरजेस आम्हाला रेल्वे गाडीत जागा मिळाली नाही. पलोबा औरंगाबादकरांच्या पुढाकाराने आम्ही गार्डास सांगून एका छोट्या स्त्रियांच्या कंपार्टमेंटमध्ये शिरलो. त्यात सहा जागा होत्या. प्रत्येक स्टेशनवर प्रवासी येत. पलोबा औरंगाबादकर डोक्यावरून धोतर घेऊन बोडकीचे सोंग वठवत खिडकीशी बसत आणि प्रवासी अन्यत्र वळत, पुण्यास पोहचल्यावर गार्ड हजर झाला बक्षिसीसाठी. डॉ. भालेरावांनी पलोबांकडे रु. १० दिले. पलोबांनी फक्त एक रुपया गार्डाच्या हातावर टिकवला. पलोबा म्हणाले एम्. एस. एम्.चा

गार्ड-पावलीवर खूष असतो. चौपट बक्षीस पुरे.

सांगलीच्या शतसांवत्सरिक उत्सवास मुंबईहून सुमारे ३०० प्रतिनिधी जाणार होते. पुण्याला वा. दा. गोखले, दत्तोपंत पोतदार आणि मी त्यांना भेटणार होतो. डॉ. भालेरावांची मला सूचना होती की मी एक पोते भुईमुगांच्या शेंगा आणि एक घासलेटचा डबा दही घेऊन यावे. शेंगा आणि दही आणणे सोपे. पण दत्तोपंत पोतदार! एका बैलगाडीत शेंगाचे पोते आणि दही मी स्टेशनवर पाठवले. आणि पोतदारांसह टांग्यातून स्टेशनवर दाखल झालो. दुपारी १२ला आम्ही पोहचायचे होते. झाले साडेबारा. धावत जाऊन एम्. एस्. एम् च्या फलाटावर आम्ही पोहचलो तेव्हा १२-३० झाले होते. आम्ही गाडीत शिरलो तोच गाडी हालली. प्रतिनिधींच्या दुपारच्या जेवणाची सर्व व्यवस्था वहिनींनी केली होती. दुपारच्या चहासाठी स्टो वारा लागून विझू नये म्हणून घासलेटच्या डब्याला एका बाजूस भोक ठेवून आत ठेवायचा. थर्मासमधून दूध, सोबत फराळाचे, शेंगा होत्याच.

सांगलीच्या शतसांवत्सरिक उत्सवास जाणाऱ्या प्रतिनिधींची यादी मला डॉक्टरांनी दिली होती. त्यांतील नोंदी. नवरे आणि त्यांच्या चार बायका (श्रीपाद शंकर नवरे आणि माटुंग्याच्या अनाथाश्रमातील स्त्रिया), अंधृटकर आणि त्याचा बाप. नट आणि वोल्ट, इत्यादी. र. धों. कर्वे आमच्याबरोबर होते. त्यांचा होल्डऑल हरवला. तो नंतर दुसऱ्या दिवशी नवऱ्यांच्या बायकांच्या सामानात सापडला. प्रवासात कर्वे बाकांवर बसून होते !

शतसांवत्सरिक उत्सवासाठी मंडप उभारला होता. मागे चढत्या पायऱ्या लाकडी फळ्यांच्या केल्या होत्या. पाऊस पडून मंडपात चिखल झाला. खुर्च्या बरोबर लावता न आल्यामुळे आसन व्यवस्थेचा विचका झाला. मुंबईकर प्रतिनिधींना आरक्षित जागा नव्हत्या. त्यामुळें आप्पा पेंडसे आणि पलोबा औरंगाबादकरांनी गिल्ला केला. स्टेट इंजिनियर रावसाहेब भावे यांनी काही दुरुत्तरे उच्चारल्यामुळे शारदा नाटक रद्द करू असे त्याना सांगण्यात आले तेव्हा ते हबकून गेले. त्यातच मागची गॅलरी कोसळून अनेक रक्तबंबाळ झाले. कसेबसे उद्‌घाटन उरकले. पण गोंधळ चालूच होता. दुसऱ्या दिवशी डॉक्टर भालेराव मला घेऊन रावसाहेब भाव्यांच्या घरी गेले. त्यांच्याशी चर्चा करुन दुखावलेल्या प्रतिनिधींची माफी मागण्यास त्यांना प्रवृत्त केले. प्रतिनिधी निवासात येऊन त्यानी ती मागितलीही.

शारदा नाटकाच्या पहिल्या अंकात भद्रेश्वर दीक्षित श्रीमंताना विचारतो तुम्हाला वधू कशी पाहिजे. त्यावेळी प्रेक्षागारात टोळांनी धुमाकूळ घातला होता. एक टोळ चिंतुबुवांच्या अंगरख्यावर बसला. चिंतुबुवा म्हणाले थांबा दीक्षित हा टोळ काढतो आणि मग सांगतो ! त्यांच्या प्रसंगावधानाने श्रोत्यात हशा पिकला आणि ते गैरसोई विसरुन गेले. उत्सवातील भोजन व्यवस्था उत्तम होती. जेवण रुचकर होते. कृष्णाकाठच्या वांग्याची भाजी आणि देशस्थी आमटी. माझ्या आमटीच्या वाटीत एक टोळ सापडला. कोणाला कळणार नाही अशा बेताने मी तो काढून टाकला पण जवळच बसलेल्या बावडेकरानी पाहिला. त्यावर

नंतर चर्चा सुरु झाली. वर्तमान पत्रात हा आमटीतला टोळ गाजत राहिला होता.

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या संन्यस्त खड्ग नाटकांतील शस्त्रग्रहणाच्या प्रवेशात चिंतामणराव कोल्हटकरांनी काम केले होते. खड्ग उचलण्यापूर्वी ते रागाने थरथरत आणि उडी मारुन खड्ग उचलीत. त्यांचा अभिनय हृदय भेदून जाणारा. प्रेक्षकांतून टाळयांचा कडकडाट झाला. मामा वरेरकर आणि के. ना. काळे यांच्या शेजारीच मी बसलो होतो. काळे वास्तव अभिनयाचे पुरस्कर्ते. ते मामांना सांगत होते "मेझमेरीझम सुरु झाले. अभिनय संपला." आणि मामा मान डोलवीत होते. याच कोल्हटकरांनी सर्वोदय कलामंदिर या शासन निर्मित संस्थेत मामांची जिवा-शिवाची भेट इत्यादी नाटके बसवली. कालाय तस्मै नमः

१९४४ साली मराठी रंगभूमीचा शतसांवत्सरिक साजरा करण्यात आला. त्यासाठी चर्नी रोड स्टेशन जवळील मोकळ्या जागेवर खुले नाट्य मंदिर उभारले होते. प्रारंभाच्या दिवशी मी दत्तोपंत पोतदारांना घेऊन मुंबईस आलो. गोदीत स्फोट झाल्यामुळे आगगाडी भायखळयास थांबली. वाहने नव्हती. मोठ्या मिनतवारीने हमालास राजी करुन त्याच्या डोक्यावर सामान देऊन पायीच आम्ही विठ्ठलभाई पटेल रोड वरील नारायण सदनात गेलो. खुल्या रंगमंचाचे काम पूर्ण झाले होते परंतु जमीन सपाटीवरील रंगामंचापुढे कोच, खुर्च्यांसाठी खड्डा केला होता. त्याखालील नळ फुटून पाणीच पाणी झाल्याची बातमी आली. डॉक्टर स्वतः, मेहुणी ताई गजेंद्रगडकर, मुलगी मालती, अंधृटकर, मी आणि संघाचे अन्य कार्यकर्ते बादल्यानी पाणी उपसण्याचे काम करु लागलो! चर्नी रोडच्या दक्षिणेस असलेल्या उघड्या रेल्वे पुलावरुन श्री. वि. वर्तक येत होते. पुलावर जमलेल्या काही लोकांनी वर्तकांना विचारले की हे पाणी उपसणारे कामगार आम्हाला गोदीतील पडझड साफ करायला मिळतील काय? त्यादिवशी ठरलेले सारस्वत नाटक दुसऱ्या दिवसावर ढकलले होते. मामा वरेरकरांना मी विनंती केली की त्यांनी सूत्रधाराचे सोंग काढून नाटकाची प्रस्तावना करावी. मामांनी ते कबूल केले. पण मी रेजिस्टरचे काम करावे. मामांनी प्रवेश तिथेच लिहून काढला. रात्री मी माझे भाषण पाठ केले. मामांनी कोकणी दशावतारांतील सूत्रधाराचा वेश घेतला. पांढऱ्या मिशा आणि डोकीस रुमाल. मला रेजिस्टर आळतेकरांचा झब्बा धोतर हा वेश. सारस्वत नाटक आळतेकरांच्या अभिनयाने संपन्न होते. स्वागताध्यक्ष आचार्य अत्र्यानी नवयुगमधील लेखांत मामांचे नाटक पहिल्या दिवशी टेवल्यामुळे गोदीत स्फोट झाला, असे भाष्य केले. मामांच्या पायगुणाच्या यादीत आप्पा पेंडसे यांनी पुढे त्या भाष्याचा अंतर्भाव केला.

वेड्यांचा बाजार हे नाटक १९४४ च्या उत्सवांत सादर करण्यात आले. त्यांत साहित्तिकांनी कामे करावी ही कल्पना डॉ. भालेराव यांची. त्यांनी स्वतः त्यातील तालीम मास्तरची भूमिका केली होती. गडकऱ्यांनी चिंतुबुवा दिवेकर यांच्यावरुन ही घेतलेली आहे. काळे जाकीट आणि वाटोळी हंगेरीयन काळी टोपी त्यानी पैदा केली पण पांढऱ्या काड्यांचा चष्मा मिळवण्यास आम्हाला जुन्या बाजारात खेपा घालाव्या लागल्या. या

नाटकातील अनंत वर्तक यांची बाळाभाऊची भूमिका फार गाजली. आचार्य अत्र्यांनी अण्णासाहेबांचे काम केले. तर अनंतराव गद्र्यांनी त्यांचा मोठा भाऊ तात्या यांचे काम केले होते. अनंतरावानी आपले भाषण पाठ केलेच नाही. तात्यांना ज्योतिषाचा नाद असतो. ते नित्य जन्मपत्रिका हातांत घेऊन वावरत असतात. त्यावर त्यांनी आपले सबंध भाषण लिहून काढले. ते पाहून ते बोलत! अण्णासाहेब–अत्रे पदरचे पुष्कळच बोलत. अण्णासाहेबांच्या पत्नी यशोदा ही भूमिका सौ. कुळकर्णी यानी केली होती. अत्र्यांकडून क्यू न मिळाल्यामुळे त्यांची पंचाईत व्हायची. पण त्या खंबीर. अत्रे थांबले की आपली भाषणे त्या म्हणून टाकीत. अण्णासाहेबांना सारखी आजाराची भावना. वैद्यबुवाना बोलावण्यासाठी त्यांनी आपला मुलगा माधव (वा. रा. ढवळे) याला पाठवलेले असते तो वेळेवर येत नाही. कारण विंगेत ढवळे कोणाशी तरी बोलण्यात गुंतलेले. अस्वस्थ होऊन अत्रे म्हणाले "हा म्हाद्या मुलखाचा आगावू. वैद्याला आणण्या ऐवजी म्युनिसिपालटीचा पास घेऊन येईल." ढवळे भडकले. त्यांची समजूत काढून त्याना रंगमंचावर ढकलण्यास आमच्या नाकी नवू आले. या नाटकात अंधृटकर आणि मी भूमिका केल्या होत्या.

१९४७ साली झालेल्या दुसऱ्या वार्षिक नाट्योत्सवाचे अध्यक्ष होते गणपतराव बोडस त्यांचे अध्यक्षीय भाषण लिहायचे काम चंद्रकांत बावडेकर यांच्याकडे सोपवले होते. विविधवृत्ताच्या साप्ताहिक अंकाचे लिखाण करण्यात बावडेकर गुंतल्यामुळे थोडा मजकूर लिहिल्यावर पुढे लिहिण्यास त्यांना वेळ नव्हता. बावडेकरांना तगादा करण्याचे काम माझ्याकडे होते. त्यानी भाषण पुरे करायचे काम माझ्याकडे सोपवले. गणपतराव बोडसांचा मुक्काम डॉक्टरांकडे तिथेच मी. दर संध्याकाळी नारायण सदनमध्ये नाट्यप्रेमी व्यक्तींचा अड्डा असे. संध्याकाळच्या भोजनानंतर एखाद्या जुन्या नाटकाची संहिता पद्य-संगीतासह गणपतराव म्हणून दाखवीत. ही बैठक रात्री बारा-एक वाजता संपायची. नंतर स्त्रीवर्ग निघून गेल्यावर मग गणपतराव किर्लोस्करांनी रचलेल्या शिमगागीतांचे आणि लावण्यांचे गायन करायचे. हा कार्यक्रम दोन तीनपर्यंत चाले. अशा या कार्यक्रमांत त्यांच्याशी अध्यक्षीय भाषणाची चर्चा करायला वेळ कुठे. बावडेकरांचे त्रुटित लिखाण मी पुरें केले आणि मोरमकरांच्या लक्ष्मीविलास छापखान्यात छापायला दिले. त्यांत बावडेकरांच्या हस्ताक्षरांतील भाग होता. प्रूफे तपासण्यास विविधवृत्त संपादन कक्षात येत. तिथे आप्पा पेंडसे यांच्या लक्षात हा बनाव पडला आणि चर्चा सुरू झाली. बावडेकरांना आपल्या हस्ताक्षरांतील मजकूर जुळणी खात्यात जायला नको होता. ते माझ्यावर रुष्ट झाले.

१९३८ साली मुंबईस भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या बाविसाव्या अधिवेशनानंतर बारा वर्षांनी १९५० साली साहित्य संमेलनाचे तेहतिसावे अधिवेशन मुंबईस कविवर्य यशवंतराव पेंढरकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. या संमेलनात काव्यगायनासाठी अखिल महाराष्ट्रांतून अनेक कवी आले होते. त्यांची चाचणी घेताना एक जळगावचे कवी आपली कविता संमेलनात गाऊ द्यावी म्हणून आग्रह धरून बसले. कवितेची सुरुवात

होती "एक फांदीवर दोन फुले" ही ओळ परत परत ते आळवीत. त्यामुळं संमेलनात हुर्यो होईल हे काही त्याना पटले नाही. अर्थात त्यांना संधी दिली नाही म्हणून ते रागावले.

संमेलनास जोडून केलेल्या वार्षिक नाट्योत्सवात शिरवाडकरांचे मेटरलिंकच्या मोना-व्हेनाचे 'वैजयंती' हे भाषांतर बसवले जात होते. त्यात महेश्वर वैजयंतीची वाट पाहत तंबूत प्रतिक्षा करीत आहे असा प्रसंग आहे. लांबून येत असलेल्या गाड्यांच्या बैलांच्या घुंगरूंचा अस्पष्ट नाद ऐकू येतो. आणि गाड्या जसजशा जवळ येत गेल्या तसा तो स्पष्ट होतो, मोठ्याने ऐकू येतो. रंगमंचावरील तंबूत ही ध्वनी योजना करता यावी म्हणून डॉक्टरांनी हे घुंगुरांचे आवाज ध्वनिमुद्रित करायचे ठरवले. नियोजक रेडिओचे आनंदराव ढोलेकर. श्रीमती दुर्गाबाईकडे ध्वनिमुद्रणयंत्र होते ते आणले. नाट्यगृहातील कार्यक्रम संपल्यावर प्रदर्शन कक्षात पहाटे चार पांच वाजेपर्यंत हा कारभार चाले. हातात घुंगरू वाजवत चिंतामणी आपटे, अंभ्रूटकर, शिवा चिखलीकर, पलोबा औरंगाबादकर आणि मी, हाजी कासम वाडीतील स्वयंसेवक वर्ग, कधी डॉक्टरसुद्धा लांबवरून ध्वनिमुद्रण यंत्राच्या दिशेने चालत असू. डॉक्टर लय सांभाळीत. हे काम संपल्यावर आम्ही विशेषतः पलोबा आणि मी भुलेश्वरी गोपाळदास बर्फीवाल्याकडे श्रीखंड खायला जात असू. जागरणाचा श्रम परिहार होत असे!

१९५२ साली झालेल्या वार्षिक नाट्योत्सवाचे अध्यक्ष होते केशवराव दाते. त्यांच्याशी चर्चा करून त्यांचे भाषण लिहायची कामगिरी डॉ. भालेरावांनी माझ्यावर सोपवली. दादरच्या विजयनगर या इमारतीतील चवथ्या मजल्यावरील एका ब्लॉकमध्ये केशवराव राहत. तिथे जाऊन त्यांच्याशी चर्चा करून भाषण मला लिहायचे होते. दाते–खाडिल-करांचे अनुयायी. त्यांच्या नाटकांवर ते जीव ओवाळून टाकीत. प्रस्तुत भाषणात ते म्हणतात :

> "खाडिलकरांचे सवाई माधवरावांचा मृत्यू हे नाटक विस्तारांतून १८९३ मध्ये प्रसिद्ध झाले तिथपासून 'सवती-मत्सर' नाटकापर्यंत ३० वर्षांचा काळ हे मराठी रंगभूमीचे सुवर्णयुग होय."

ही त्यांची श्रद्धा. ते पुढे म्हणतात :

> "वैयक्तिक सुखदुःखांच्या आणि क्षुद्र व्यक्तिनिष्ठेच्या आकुंचित जागेत मराठी नाट्यलेखन गुदमरून गेले. शाश्वत मूल्यांवरील श्रद्धा उडून गेली. स्वार्थाचा आविष्कार करण्यात आणि थिल्लर विनोदात नाट्यकला भ्रष्ट झाली. "विनोद"कारांनी तिला उकिरड्यावर आणून सोडली."

फक्त 'विनोद' नाटकाचा वर उल्लेख आला तरी दात्यांचा रोख आचार्य अत्र्यांवरही होता. त्यापूर्वीच आचार्य अत्र्यांची विनोदी नाटके शुक्रवार पेठेतील विजयानंद नाट्य-गृहात होत. बुधवारातील किर्लोस्कर नाट्यगृह म्हणजेच सोज्वल नाट्यगृह निष्प्रभ होत होते. ही दात्यांची कल्पना मी पुढील वाक्यात मांडली :

प्रभावी नाटककार निष्प्रभ झाले, शाब्दिक कोटीबाज आणि क्षुद्रविनोदकार पुढे आल्यावर रंगभूमीला बुधवारातून शुक्रवारात जावे लागले नाही तरच आश्चर्य!

बुद्धीपेक्षा भावना आणि विद्येपेक्षा कला श्रेष्ठ आहेत असा माझा विश्वास आहे—ही दात्यांची श्रद्धा मला हृद्य वाटली. तिचा विस्तार त्यांच्या भाषणाच्या लेखनात मी पुढील प्रमाणे केला.

"सहस्रमुखांनी अधःपाताच्या सागरांत उडी टाकणाऱ्या जीवन गंगेला, भावनेचे बांध घातल्यावाचून, यंत्रयुगातील निर्जीव मनाची वैराण वाळवंटे आर्द्र होणार नाहीत. अशी मला भीती वाटते. द्वेष, दंभ, स्वार्थ इत्यादी कण्यांनी युक्त असे नाशाचे विराट चक्र प्रचंड वेगाने चालू असताना आपल्या धर्म चक्राचा प्रभाव पडावा अशी इच्छा असेल, तर भावनेला आवाहन करायला हवे. आणि त्याकरिता ललित कलांचाच आश्रय घेतला पाहिजे. म्हणून सर्व कलांमध्ये श्रेष्ठ अशा नाट्यकलेची उपासना करावी असे मी म्हणतो."

केशवरावांच्या कल्पनेला मी वरील शब्दरूप दिले आहे. ह्या वाक्यावर चांगली रचना म्हणून माझे प्रेम आहे. म्हणूनच मी ते स्मरणातून पुनर्लिखित करू शकलो. केशवरावांच्या या भाषणात अनेक मौलिक मुद्दे आहेत. त्यांची दखल मौज साप्ताहिकाशिवाय अन्य कोणी घेतली नाही. मौजेने 'रंगभूमी बुधवारांतून शुक्रवारांत गेली" हे वाक्य ठळक टाइपांत छापल्यानंतर आचार्य अत्र्यांनी केशवरावांवर कडाडून टीका केली!

भाषणाच्या शेवटी केशवरावानी सांगितले—"संघाने रंगभूमीबाबत असा मानदंड निर्माण केला पाहिजे की हिरव्या चादरीवर धिंगाणा घालणाऱ्या बेजबाबदार लोकांना धास्ती वाटावी. संघमंदिर हे मराठी रंगभूमीची प्रयोग शाळा व्हावे. लेखकाना नाट्य-लेखन करायला अत्यंत आवश्यक असे कलेचे शिक्षण घ्यायची इथे सोय व्हावी. कल्पक दिग्दर्शकाला इथे संधी असावी. उत्साही तरुणाना अभिनय शिक्षण घेण्यास इथे अवसर असावा. अशी माझी तळमळ आहे." "त्याच जागेच्या (केळेवाडीतील) पूजनाच्या वेळी कार्याध्यक्षानी सांगितले की आज पहिले पाऊल, आणखी दोन पावले पडायची आहेत. ही उपमा त्यानी कोणत्या अर्थाने दिली हे मला माहित नाही. मला मात्र तीत खूपच अर्थ अभिप्रेत दिसतो. बटूवामनाचे हे इष्ट आक्रमण आहे... वामनाचे दुसरे पाऊल धनिकांच्या थैलीवर पडो. आणि तिसरे सरकारी तिजोरीवर पडो आणि संघमंदिर त्वरित उभे राहो, अशी इच्छा करतो."

१९४९ नंतर एक वर्ष मी मुंबईत होतो. १९५० ऑगस्ट पासून १९५२ डिसेंबर पर्यंत इंग्लंडमध्ये होतो. त्या माझ्या विलायतेतील वास्तव्यात डॉ. भालेरावांच्या पत्रांतून नाट्यगृह बांधणी विषयी माहिती पाठवण्याची निकड असे. मुंबईस परतलो तेव्हा संघाचे खुले नाट्यगृह बांधून झाले होते. शिरवाडकरांचे मॅक्बेथचे रूपांतर "राजमुकुट" आणि चिं. य. मराठे यांचे "होनाजी बाळा" ही नाटके खुल्या नाट्यगृहांत व्हायची होती. "होनाजी बाळा" नाटकांतील पहिला देखावा रस्त्याचा—शुक्रवारांतील गुणवतीच्या

दिवाणखान्यातून बुधवारपर्यंत. त्यात मोरशेट आणि उदाजीराव बोलत बोलत शिवमंदिरात काकड आरतीसाठी प्रवेश करतात. ह्या प्रवेशामधील दोन पानाचे संभाषण कव्हरवर घेणे मला अप्रयोजक वाटले. केळेवाडीतील खुल्या नाट्यगृहात उजव्या बाजूस सटरफटर सामान साठले होते. त्यापुढे विंगा उभ्या केल्या होत्या. रंगमंचावर प्रवेश विंगेतून न करता उजव्या बाजूस अरुंद फलाट बांधून प्रेक्षागारा मध्येच आडोशाच्या विंगातून दादर काढून तिथून मोरशेट आणि जाधवराव खाली उतरतात असे दाखवले तर जास्त स्वाभाविक दिसेल ही माझी कल्पना डॉक्टरांना पटली. परंतु दिग्दर्शक बाळासाहेब काळे, जरी त्याना आधुनिक दृष्टि होती तरी हे नाविन्य धोक्याचे वाटले. नाट्यप्रयोगाच्या सुरुवातीसच विचका होईल अशी भीती वाटली. प्रत्यक्षात तसे काही झाले नाही हा भाग वेगळा. होनाजी बाळा या संगीत नाटकाने संगीत नाटकांचा पुनर्जन्म झाला ही गोष्ट नाट्येतिहासांत आता नोंदली गेली आहे.

या नाट्योत्सवात शिरवाडकरांचे राजमुकुट प्रयोगित झाले. नानासाहेब फाटक आणि दुर्गाबाई खोटे यांच्या त्यात प्रमुख भूमिका होत्या. दिग्दर्शक हर्बर्ट मार्शल. यांनी या प्रयोगासाठी शेक्सपेरीयन रंगतंत्र वापरायचे ठरवले होते. आजच्या फॅशन परेडप्रमाणे प्रेक्षकात घुसणारा अरुंद फलाट उभारला. पद्दीप वर्ज्य. बाजूला अर्ध वर्तुळाकृती बुरुज. त्यांत दारे. मागे पहिला मजला, त्याखाली खोल मंच (deep stage) मागे दरवाजा. जिथे प्रवेश चालू असेल तिथे प्रकाश. प्रवेश संपताना प्रकाश मंद होत जायचा, पुढच्या प्रवेशात प्रकाश. "नाटक" मासिकांत यावर मी विस्तृतपणे लिहिले आहे.

या नाट्योत्सवानंतर माझी पुण्यास बदली झाली, मग बडोदे. आणि नंतर नागपूर असा प्रवास करत १९५० पासून १९५८ पर्यंत मी मुंबई बाहेरच होतो. परंतु महत्वाच्या कार्यक्रमांस आणि नाट्योत्सवांसाठी मुंबईस येत असे. त्यांत भाग घेत असे. १९५८ मध्ये माझी मुंबईस डेप्युटी डायरेक्टर प्रिन्टिंग ॲण्ड स्टेशनरी पदावर बदली झाली. दरम्यान संघाने म. दा. भट आय. सी. एस. यांच्या अध्यक्षतेखाली "वेज ॲण्ड मीन्स्" समिती नेमली होती तिच्या शिफारशी कार्यवाह भांडारकर यांनी लिहून काढल्या होत्या. त्यांवर कांहीच कार्यवाही झाली नव्हती. संघाच्या गंगाजळीत फार थोडी रक्कम होती तरी आम्ही पक्के संघ मंदिर बांधण्याचा निर्णय घेतला. आमचे पाठीराखे श्री. शं. नवरे आणि बावडेकर होते. आमोणकरांना हे धाडस पसंत नव्हते. संघ कर्जामुळे परत पेचात येईल असे त्यांना वाटे. डॉक्टर भालेरावांनी आपली मेडिकल प्रॅक्टिस आणि स्थावर मालमत्ता संघकार्यात दिली. अखेर प्राणार्पणही केलं हे लक्षात घेऊन त्यांचे स्वप्न साकार करण्याची आमच्यावर जबाबदारी आहे हे त्याना पटवून द्यावे लागले. बांधकाम पुरे होऊन संघ मंदिराचे उद्घाटनही झाले.

**बापूराव नाईक**

## न० र० फाटक

१९५२ पासून त्यांच्या मृत्युपर्यंत (१९७९) अखंड २७ वर्षे न० र० फाटक हे साहित्य संघाचे अध्यक्ष होते. एक चिकित्सक संशोधक आणि प्रकांड पंडित म्हणून त्यांचा दबदबा होता परंतु सार्वजनिक संस्थांच्या कार्यात ते अतिशय स्वागतशील आणि सर्वांना सांभाळून त्यांच्या कार्याला गती देणारे होते. डॉ० भालेरावांनी त्यांना संघात आणले आणि त्यांच्या मृत्यूनंतर सर्व कार्यकर्त्यांना प्रेरणा देऊन त्यांच्यामध्ये सौहार्द राखण्याचे कार्य प्रा० फाटक अध्यक्ष असल्यामुळेच होऊ शकले. न्या० रानड्यांनी सार्वजनिक संस्था ज्या हेतूने स्थापन केल्या त्याचे ज्वलंत भाव फाटकांमध्ये होते. मुंबई मराठी साहित्य संघासारख्या संस्था म्हणजे त्या महापुरुषाच्या स्वप्नांची पूर्तीच अशी त्यांची भावना होती.

फाटकांच्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत साहित्य संघाचे कार्य सर्वांगाने फुलत-फळत गेले. संघाची भव्य वास्तू उभी राहिली. व्याख्याने, चर्चा, परिसंवाद यांनी संघाचा परिसर घुमू लागला. ते पाहून फाटक मनोमन आनंदित होत. स्वतः संशोधनात, चिंतनात, लेखनात आकंठ बुडालेले फाटक संघाचे काम म्हटल्यानंतर सारी हातातली कामे दूर सारून सहजपणे संघाच्या सांस्कृतिक कार्याची धुरा वाहत. त्यांनी साहित्य संघातील जुन्या-नव्या सर्व प्रकारच्या साहित्याच्या चर्चेला प्रोत्साहन दिले. स्वतः जुन्या वळणाचे होते म्हणून त्यांनी कधीही नवीनाचा अधिक्षेप केला नाही. साहित्याच्या चर्चेच्या क्षेत्रात साहित्य संस्थांचे कार्य हे सर्व प्रकारच्या वाङ्मयाचे प्रतिनिधित्व करणे हेच असल्यामुळे संघातील आधुनिक वाङ्मयाच्या पाठपुराव्याचे त्यांनी सदैव स्वागत केले.

साहित्य संघातील प्रा० फाटकांच्या व्याख्यानमाला ही एक खासियत होती. आजचे संघ मंदिर उभारले जाण्यापूर्वी उघड्या जागेत त्यांची 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' आणि 'महाभारत' या विषयांची झालेली व्याख्याने अनेकांच्या स्मरणात आहेत. त्यांनी अशा तऱ्हेने एकवीस व्याख्यान मालांतून २२२ व्याख्याने दिली आहेत.

प्रा० फाटकांचे अध्यक्षपद संघाने सदैव भूषण म्हणून मिरवले.

**भीमराव कुलकर्णी**

## वा० रा० ढवळे

साहित्य संघाने गेल्या पन्नास वर्षांत मराठी वाङ्मयाच्या अभिवृद्धीचे जे कार्य चर्चा, परिसंवाद, व्याख्यानमाला यांच्या रूपाने केले आहे, त्याचे श्रेय प्राधान्याने वामनराव ढवळे यांजकडे जाते. संघाच्या स्थापनेपासून गेल्यावर्षी (१९८४) त्यांना मृत्यू आला, तोपर्यंत म्हणजे अखंड ४४ वर्षे त्यांचा साहित्य संघाशी घनिष्ठ संबंध आला. साहित्य संघातील व्याख्यानमालांचे, व्याख्यानांचे, परिसंवादांचे संयोजन अखंडपणे व निरलसपणे वामनरावांनी अनेक वर्षे केले. नव्या-जुन्या सर्व तऱ्हेच्या साहित्यिकांशी वामनरावांचे घनिष्ठ संबंध होते.

मराठी वाङ्मयाने गेल्या पन्नास वर्षांत अनेक प्रकारे जी गती घेतली त्याचे वामनराव हे साक्षी होते. 'पारिजात', 'ज्योत्स्ना' 'रागिणी' सारख्या चोखंदळ नियतकालिकांच्या संपादनात वामनरावांनी जी आधुनिक दृष्टी दाखविली होती त्यामुळे साहित्य संघाच्या 'साहित्य' या नियतकालिकाच्या संपादनाची धुरा वामनरावांनीच वाहणे हे अपरिहार्य होते. वामनरावांनी संपादित केलेले 'साहित्य'चे अंक आज उघडून पाहिले तर वामनरावांची जाणकारी आणि सौंदर्यदृष्टी यांचे पुरेपूर प्रत्यंतर त्यातून घडते.

वामनरावांनी आपल्या आस्थेवाईक वृत्तीने हयातभर जी माणसे जोडली, त्या सर्वांचे सहकार्य त्यांनी संघकार्यात मिळविले. या सहकार्यामुळेच बराच काळ आधुनिक मराठी वाङ्मयीन चर्चेचे व्यासपीठ म्हणून साहित्य संघास महत्त्व प्राप्त झाले. मराठी साहित्य महामंडळाच्या घडणीतही वामनरावांचा मोठा वाटा होता.

साहित्य संघाने मराठी साहित्याच्या परीक्षांचे जे वर्ग अनेक वर्षे चालविले त्यामध्ये वामनरावांनी मुंबई महानगरीतील सर्व प्रकारच्या प्राध्यापकांचे सहकार्य मिळविले. आयुष्याच्या अखेरच्य काळात अमराठी भाषिकांसाठी मराठीचे वर्ग सुरू करण्याची त्यांची धडपड अतिशय यशस्वी ठरली. आज असंख्य अमराठी बांधव त्यासाठी वामनरावांना दुवा देत आहेत.

साहित्य संघाशी वामनरावांचा असलेला दीर्घ ऋणानुबंध लक्षात घेऊन संघाने त्यांच्या षष्ट्यब्दी पूर्तीनिमित्त 'एका पिढीचे आत्मकथन' या गौरव ग्रंथाचे प्रकाशन केले आहे. वामनरावांच्या कार्याची ती एक प्रकारे पावतीच होय.

**भीमराव कुळकर्णी**

# मुंबई मराठी साहित्य संघाचे संदर्भ ग्रंथालय

साहित्य संघाने संदर्भ ग्रंथालयाच्या कल्पनेस 'गजेंद्रगडकर संदर्भ ग्रंथालया'च्या रूपाने मूर्त स्वरूप दिले आहे. या निमित्ताने या संबंधाने काही कल्पना स्पष्ट करणे जरूरीचे आहे. संदर्भ ग्रंथालय म्हणजे सामान्य वाचन ग्रंथालय नव्हे. संघाच्या ग्रंथालयातून पुस्तके बाहेर (आपल्या घरी) नेऊन वाचण्यासाठी दिली जाणार नाहीत. ज्यांना या ग्रंथालयाचा फायदा घ्यावासा वाटेल त्यांनी संघाच्या जागेत बसून आपले काम करावे. अशी ही योजना आहे.

संदर्भासाठी कोणते साहित्य उपयोगी, याचे थोडे विवरण केल्यास हा विषय स्पष्ट होईल. जुनी दुर्मिळ पुस्तके, मासिके वृत्तपत्रके, निरनिराळ्या संस्थांचे अहवाल, भिन्न भिन्न विषयांचे कोश इत्यादी साहित्य हे स्थूल मानाने संदर्भ साहित्य अशी व्याख्या मानल्यास चुकीचे ठरणार नाही. 'जुने ते सोने' ही म्हण या संबंधात पूर्णपणे यथार्थ ठरते. पुढील गोष्टीने या विषयाचा खुलासा होईल.

एका गृहस्थाला आपल्याकडे येणाऱ्या लग्नाच्या निमंत्रण पत्रिका जपून ठेवण्याची सवय होती. (हे गृहस्थ दिवंगत होऊन फार वर्षे लोटली नाहीत) ह्यांच्या मृत्युपूर्वी दोन तीन वर्षात एक तीस पस्तीस वर्षामागच्या लग्नाचे प्रकरण हायकोर्टात उपस्थित झाले. तो खटला निपुत्रिक विधवेचा होता. ती लग्नाची बायको नसून रखेली आहे म्हणून ती ज्याला नवरा म्हणते त्या पुरुषाची मालमत्ता लाटावी या हेतूने मयताच्या नातलगांनी बाईविरुद्ध खटला मांडला. तेव्हा लग्नपत्रिका साठविणारांने त्या बाईच्या लग्नाची पत्रिका कोर्टात दाखवून तिचा बचाव केला.

या गोष्टीवरून संदर्भ साहित्य म्हणजे काय हे गळी उतरेल. मुंबई मराठी साहित्य संघाचे संदर्भ ग्रंथालय उपयोगी साहित्याच्या समृद्धीने इतरांना आदर्श व्हावे अशी संघचालकांची मनीषा आहे. तेव्हा संघाच्या सभासदांना व हितचिंतकांना प्रार्थना करावीशी वाटते की त्यांच्याजवळ दुसऱ्या परिच्छेदात सुचविलेले साहित्य ग्रंथालयास देण्याची कृपा करावी. हे कार्य यशस्वी करणे हे केवळ संघचालकांचे नसून सर्व साह्यकर्त्यांचे भूषण होऊन राहील.

**न० र० फाटक**